# कृष्ण परमात्मा

8



श्रीपरमानंदस्वामी

"ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? "

कोमल
प्रकाशन



# कृष्णपरमात्मा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकाला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते.

मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कृष्णपरमात्मा

## लेखक : श्रीपरमानंदस्वामी

प्रस्तुती : प्रतिमा आठवले

pratimathavale@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

ई साहित्य प्रतिष्ठान

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604


**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशन १८ एप्रिल २०१८ (अक्षय्यतृतिया)





नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ८

**श्री.अविनाश मोरेश्वर लिमये**

**एम.एस्सी.**

**उर्फ**

**श्रीपरमानंदस्वामी**

**सर्व हक्क स्वाधीन :**

सौ.अनुपमा अविनाश लिमये

१३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,

दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४

मोबाईल : ९९६९८ ७६८५०

# अनुक्रमणिका


४२. अर्जुनाची विमनस्क अवस्था आणि गीताबोध
४३. युद्धारंभ
४४. भीष्मांचा पराक्रम
४५. भीष्मप्रतिज्ञा आणि कृष्णाची योजना
४६. शरपंजरी भीष्म
४७. दुर्योधनाचा वध, पांडवांचा विजय
४८. अश्वत्थाम्याचा सुडाग्नी आणि द्रौपदीची सहृदयता
४९. अनुगीता
५०. कृष्णभक्त उद्धव
५१. उद्धवाचे गोकुळगमन
५२. उद्धव-राधा भेट
५३. कृष्णाला अवतारसमाप्तीचे वेध
५४. निर्वाणीचा कृष्ण
५५. उद्धवाला भागवत धर्माचा बोध
५६. कृष्णाचे निर्याण
५७. उपसंहार






# अर्जुनाची विमनस्क अवस्था आणि गीताबोध

अर्जुनाच्या मनःस्थितीचे व एकंदर परिस्थितीचे गांभीर्य कृष्णाच्या लक्षात आले. कृष्ण पुन्हा त्वरित रथात बसला आणि त्याने रथ दोन्हीही सैन्यांपासून थोडासा दूर नेला. कृष्णाने रथ थांबवल्यावरती कृष्ण रथातून उतरायच्या आतच अर्जुन रथातून उतरला आणि कृष्णाच्या जवळ येऊन जमिनीवरच बसला. अचंबित झालेल्या कृष्णापुढे अर्जुनाने त्याचे दोन्ही हात जोडले आणि तो म्हणाला,

“कृष्णा, मला क्षमा कर. पण माझ्याच्याने हे युद्ध होणे शक्यच नाही. मला तर हे युद्ध केवळ अनावश्यकच नव्हे, तर अयोग्यच वाटत आहे. स्वकीयांशी युद्ध करण्यामध्ये काय मोठा पराक्रम आहे, हेच मला कळत नाही. स्वकीयांना मारूनच जर आम्ही युद्ध जिंकले आणि राज्य प्राप्त करून घेतले तर त्यात काय मोठेपणा आहे, हेच मला समजत नाही. स्वकीयांनाच युद्धात ठार मारल्याने जर आमच्याच नात्यातील अनेक स्त्रिया विधवा होणार असतील आणि जर अनेक बालके अनाथ होणार असतील तर ते पुण्यकर्म खचितच नाही, किंबहुना आम्ही मोठ्या पापाचेच धनी होऊन रहाणार आहोत ही गोष्ट तर खरीच आहे ना? अशा परिस्थितीत जाणूनबुजून पापकर्माला उद्युक्त होण्याची चूक मी का बरे करू? तेव्हा नंतर पश्चात्तापाची वेळ येण्यापेक्षा आपण वेळीच सावध झालेले बरे, असे मला अगदी मनापासून वाटत आहे. त्यासाठी आता हे युद्ध सुरू होण्याच्या आधीच आपण थांबणे करूया.”

अर्जुनाच्या मुखातून अनपेक्षितपणे आलेले बोलणे ऐकून आधी केवळ चकितच झालेला कृष्ण नंतर मात्र थोड्याशा आवेशानेच बोलू लागला.

“अरे अर्जुना, तू काय बोलत आहेस ते तुला तरी कळत आहे का? मला तरी त्याचा काहीच अर्थबोध होत नाही. तू ही पापपुण्याची भाषा एकदम काय सुरू केलीस? हे खूळ एकदम तुझ्या डोक्यात कोठून आले? अरे पाप व पुण्य याचा अर्थ तरी तुला कळतो काय? त्या शब्दातील

भावार्थ तरी तू जाणतोस काय? पाप व पुण्य हे केवळ कर्माच्या कृतीवरून ठरत नाही, तर ते त्या कर्मामागील हेतूवरून सिद्ध होत असते. जसे अंगावर एखादा हिंस्त्र पशू चालून आला असता त्याला ठार मारणे हे कर्म तर आवश्यकच ठरते आणि त्या हिंस्त्र पशूपासून स्वतःचे व इतरांचेही रक्षण करणे, हे तर मोठे पुण्यकर्मच ठरते. त्याचप्रमाणे आज जे खल वृत्तीचे दुष्टजन सज्जनांचा छळ करून त्यांना मरणप्राय यातना देत आहेत, त्यांना शासन करणे हे निःसंशयपणे पुण्यकर्मच आहे.

अर्जुना, तू पाप-पुण्याविषयी बोलत आहेस. पण पाप व पुण्य यांची व्याख्या तरी तुला कळते का? असत् कर्म करणे किंवा त्या कर्माला साहाय्यभूत होणे हे पापच आहे आणि सत्कर्म करणे किंवा त्या सत्कर्माला मदत करणे हेच खरे पुण्य आहे. दुर्योधनासारखे दुर्जन, ज्यांनी कपटकारस्थानाने तुमचे राज्य बळकावले आणि द्रौपदी, जी तुमची धर्मपत्नी आहे, तिच्यावर ज्यांनी जाहीरपणे बळजबरी करून तिची अब्रू घेण्याचा प्रयत्न केला त्यांना शिक्षा न करता मोकळे सोडणे, हे पाप नव्हे काय? हे पुण्य तर खचितच नाही ना? अशावेळी तुझ्या पतीधर्माचे पालन करणे आणि तुझ्या पत्नीचा ज्यांनी घोर अपराध केला आहे त्यांना शासन करणे, हे तरी तुझे कर्तव्यकर्म आहेच ना? स्वतःच्या कर्तव्यकर्माचे पालन करण्यानेच पुण्य लाभणार आहे ना? मग तुझ्या मनात ही नसती शंका उत्पन्नच कशी झाली? ऐनवेळी तुझे मन कच का खाऊ लागले बरे? तुझ्या मनात निश्चितच काही तरी कचरा निर्माण झाल्याचेच ते लक्षण आहे. तेव्हा वेळीच तुझ्या मनातील तो कचरा काढून टाकून मन साफ व स्वच्छ कर. त्यामुळे तुझ्या मनाठायीचा विवेक पुन्हा जागा होईल आणि मनाची ही संभ्रमावस्था पूर्णपणे दूर होईल.

अर्जुना, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घे की स्वतःच्या कर्तव्यकर्माचे पालन करणे हाच जर धर्म आहे तर मग त्या कर्तव्यकर्मापासून च्युत होणे, हा अधर्मच नाही का? आणि अधर्माच्या आचरणानेही पापच घडणार. तुझ्याठायी तर जन्मजातच क्षत्रियधर्म आहे. त्या क्षत्रियधर्माचे पालन करणे



हेच तुझे कर्तव्यकर्म आहे आणि तेच तुझे पुण्यकर्महीही आहे. क्षत्रियधर्मानुसार सज्जनांना रक्षण व आधार देणे, हे तर तुझे प्रथम कर्तव्यकर्म आहे. एरव्ही तर तुझ्याठिकाणी तुझ्या क्षत्रियधर्माचा सार्थ अभिमान असतो. मग आताच तुला त्या धर्माचे विस्मरण का होत आहे? तेव्हा तुझ्या मनावरती आलेले हे सावट तू वेळीच व लागलीच दूर कर आणि युद्धासाठी सज्ज हो."

कृष्णाच्या बोलण्याने अर्जुनाच्या मनाचा अधिकच गोंधळ झाला. कारण कृष्णाचे सांगणे त्याच्या बुद्धीला तर पटत होते, परंतु त्याच्या मनाला मात्र अजिबात झेपत नव्हते. कृष्णाच्या बोलण्यातील सत्यत्व जाणवल्यामुळे अर्जुनाच्या मनावरील दडपण अधिकच वाढले आणि त्याचा ताण त्याला असह्य होऊ लागला. मनाच्या त्या तणावपूर्ण अवस्थेतच अर्जुनाने बोलायला सुरुवात केली.

"अरे कृष्णा, माझ्या मनात आधीच अनेक प्रश्न निर्माण होऊन ते माझ्या मनाला सतावीत आहेत. म्हणून मी माझे मन तुझ्यापाशी मोकळे करण्याचा प्रयत्न केला. असे असताना, तूच मला अनेक प्रश्न विचारीत आहेस. त्यामुळे माझ्या मनाचा गोंधळ अधिकच वाढला आहे. तू मला माझ्या क्षत्रियधर्माचे जे स्मरण करून दिलेस, ते अत्यंत योग्यच आहे आणि ते मलाही कळतेच आहे. परंतु त्याचे प्रत्यक्ष आचरण करण्याचे बळ माझ्या मनात मुळीच नाही असे मला जाणवू लागले आहे. माझ्या मनाला अचानक अशी ही दुर्बलता कशामुळे प्राप्त झाली, हेच मला समजत नाही. ती दुर्बलता झटकून टाकण्याचेही बळ आता माझ्याठायी नाही. मला सर्व कळते पण वळत मात्र नाही, अशीच माझ्या मनाची दुरावस्था झालेली आहे. तेव्हा तू मला साहाय्यभूत हो. माझ्या मनाच्या दुर्दशेचे निदान करून मला सांग आणि मला त्यातून तू बाहेर काढ. माझ्या मनाची अवस्था अत्यंत घुसमटल्यासारखीच झालेली आहे."


अर्जुनाची ती केविलवाणी अवस्था पाहून कृष्णाला त्याची दयाच आली आणि त्याने अर्जुनाशी अत्यंत गंभीरपणे बोलावयास सुरुवात केली.

"अरे अर्जुना, तुझ्या मनामध्ये स्वकीयांविषयीचा मोह निर्माण झाल्यामुळेच तुझी अशी दिग्मूढावस्था झालेली आहे आणि तू एवढा हतबल होऊन राहिला आहेस. तुझ्या मनाचा मोह नष्ट झाल्याशिवाय तुझे मन पुन्हा मूळ पदाला येणार नाही आणि सबळही होणार नाही. जेव्हा तुला सत्य काय आहे याचे ज्ञान होईल आणि तुझ्या बुद्धीच्या ठिकाणी विवेक निर्माण होईल, तेव्हाच तुझ्या मनाचा मोह नाहीसा होईल. असे सत्यज्ञान केवळ आत्मज्ञानी अशा सद्गुरूंकडूनच प्राप्त होत असते, जे मला माझ्या सद्गुरूंकडून प्राप्त झालेले आहे. त्या आत्मज्ञानानेच चंचल मनाच्या ठिकाणचे सर्व विकार नाहीसे होऊन ते मन स्थिर होते आणि बुद्धीही शुद्ध होऊन तिच्याठायी त्या ज्ञानाचा दृढ निश्चय होतो. त्यामुळेच मनःचक्षुंवरील अज्ञानाची झापड दूर होते आणि मनाला योग्य दृष्टी प्राप्त होते. धर्म-अधर्म, योग्य-अयोग्य यातील फरक स्पष्टपणे व निरपेक्षपणे दिसू लागतो आणि योग्य धर्माचरण करण्याचे मनोबळ प्राप्त होते."

कृष्णाचे बोलणे अर्जुनाला थोडेसे कळल्यासारखे वाटले खरे, पण त्याला ते पूर्णपणे समजले नव्हतेच. परंतु कृष्णाच्या बोलण्यातील धागा पकडून अर्जुन लागलीच म्हणाला,

"कृष्णा, तू ज्या आत्मज्ञानाचा उल्लेख केलास ते मीही ऐकून व वाचून आहे. पण तरीही मी त्याविषयी पूर्णपणे अनभिज्ञच आहे. परंतु त्या आत्मज्ञानाने जर माझ्या मनातील हे अज्ञानाचे ओझे दूर होणार असेल, तर ते माझ्यासाठी अत्यंत आवश्यकच आहे. पण तू तर म्हणतोस की त्यासाठी सद्गुरूंची नितांत जरूरी आहे आणि आता मला अशा सद्गुरूंची भेट होणार कशी आणि माझे अज्ञान दूर होणार कसे? आता एवढा वेळ आहेच कोठे? कारण आपण तर याठिकाणी प्रत्यक्ष रणांगणावरतीच उभे आहोत. तेव्हा अशा परिस्थितीत मी काय व कसे करावे, हे तूच मला समजावून सांग बरे!"

अर्जुनाची अगतिक अवस्था पाहून कृष्णाच्याठायी अर्जुनाविषयी कणव निर्माण झाली. एवढा काळ अर्जुनाचा केवळ मित्र म्हणून चोख



भूमिका पार पाडणाऱ्या कृष्णाला, अर्जुनाच्या हिताच्या दृष्टीने आता योग्य भूमिका घेणे अत्यावश्यक झाले होते. भर रणांगणात पण दोन्ही सैन्यांपासून थोडेसे दूर असलेल्या कृष्णाला जास्त वेळ फुकट घालवणेही शक्य नव्हते. कृष्णाने मनाशी निश्चय केला आणि अहंकाराचा दोष पत्करूनही अर्जुनावरील प्रेमापोटी, तो अर्जुनाशी थोड्याशा तातडीच्या सुरातच बोलू लागला.

“अरे अर्जुना, तुझी अडचण बरोबर आहे. पण त्याच्यावरतीही निश्चितच उपाय आहे आणि तो माझ्याच रूपाने तुझ्यासमोर उभा आहे. अर्जुना, ज्या आत्मज्ञानाविषयी मी तुला सांगितले ते आत्मज्ञान, मला माझे परमप्रिय सद्गुरू सांदिपनी महर्षी यांच्या कृपेने प्राप्त झाले आहे. त्यांची आत्मानुभवाची अवस्था मला परमभाग्याने पहायला मिळाली आणि मी त्यांना शिष्य म्हणून अनन्य भावाने शरण गेलो असता, अत्यंत कृपावंत होऊन त्यांनी त्या आत्मज्ञानाचा माझ्यावरती संस्कार केला आणि त्यांच्या भक्तीनेच ते ज्ञान माझ्या हृदयात फलरूप होऊन राहिले आहे. तू आजपर्यंत माझ्याकडे केवळ तुझा एक परममित्र व हितचिंतक यादृष्टीनेच पहात आलास. त्यामुळे माझ्या अंतःकरणाची ही आत्मानुभवाची अवस्था एखादेवेळेस तुझ्या लक्षातही आली नसेल, किंवा क्वचित प्रसंगी तुझ्या लक्षात येऊनही ती तुझ्या लक्षात राहिली नसेल. तेव्हा हे आत्मज्ञान तू आता म्हणजे या क्षणाला, माझ्याकडूनच जाणून घे. आत्ताच्या परिस्थितीत हेच शक्य आहे. त्यासाठी तू मनाचा निश्चय कर आणि मनातील इतर सर्व धर्मांचा त्याग करून शिष्यभावाने मलाच शरण येण्याचे कर. मीच तुझ्या अज्ञानाचे निरसन करीन आणि मोहजालात गुंतून अडकलेल्या तुझ्या मनाला मुक्त करीन.”

कृष्णाचे बोलणे ऐकून अर्जुन आधी चकित झाला आणि मग थोडासा चपापलाही. आज प्रथमच, कृष्णाचे हे वेगळेच रूप अर्जुनाच्या समोर प्रगटले होते. नेहमी हसतमुख व प्रेमळ दिसणारे कृष्णाचे मुख आता अर्जुनाला, अत्यंत आरक्त व तेजस्वी असे जाणवत होते. अर्जुन मनातून लागलीच सावरला आणि सावधही झाला. आत्मज्ञान प्राप्तीचा कृष्णरूपाने प्रगटलेला मार्ग अर्जुनाला स्पष्ट दिसू लागला होता. परमभाग्याने

मिळालेल्या त्या सुवर्णसंधीचे मोल अर्जुनाला तात्काळ जाणवले मात्र, क्षणाचाही विलंब न करता अर्जुनाने उठून कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवले आणि दोन्ही हात जोडून कृष्णाला वंदन केले. कृष्णाने प्रेमाने अर्जुनाच्या मस्तकावर हात ठेवला असता, अर्जुनाला गहिवरून आले. पण तशाच अवस्थेच तो निश्चयात्मक सुरात कृष्णाला म्हणाला,

“हे कृष्णा, एवढा काळ तुझ्या सन्निध राहूनही मी तुला यथार्थपणे कधीच ओळखू शकलो नाही. तुझे माहात्म्य न जाणल्यामुळे मी तुझ्याकडे, केवळ माझा अत्यंत जवळचा परममित्र म्हणूनच पहात होतो. ती संधीही मला तुझ्याच कृपेमुळे मिळाली होती आणि त्या मैत्रीचे ब्रीदही खऱ्या अर्थाने तूच राखीत होतास. अज्ञानामुळे मी बऱ्याच वेळा तुझ्याशी बरोबरीच्या नात्याने वागून तुझा अवमानही केला आणि माझ्याकडून तुझे अवमूल्यनही घडले. हे सर्व आता मला जाणवू लागले आहे. यादृष्टीने, माझ्या आयुष्यातील केवढा तरी वेळ फुकटच गेला. अर्थात द्रौपदी माझी पत्नी म्हणून माझ्या जीवनात आल्यावर माझी तुझ्याकडे पहाण्याची दृष्टी थोडी थोडी का होईना, पण निश्चितच बदलत राहिली. आताचे तुझे हे रूप पाहून, मात्र माझ्या मनाठायी तुझ्या माहात्म्याचा पूर्ण निश्चय झालेला आहे. माझ्याठायी अज्ञानाने निर्माण झालेल्या भ्रमाचे तूच एकीएक निरसन करशील, याची आता मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा माझ्यावर आता कृपा कर आणि माझ्यासाठी सत्य प्रगट करून अज्ञानाच्या बंधनात अडकून पडलेल्या माझ्या मनाला मुक्त कर. मी तुला अनन्यभावे शरण आलेलो आहे आणि काया, वाचा मने पूर्णपणे तुझ्या स्वाधीन झालेलो आहे.”

असे म्हणत असतानाच अर्जुनाच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या होत्या. त्या अश्रुंसहित अर्जुनाने त्याचे मस्तक पुन्हा कृष्णाच्या चरणांवर ठेवले. कृष्णाने अर्जुनाला अत्यंत प्रेमाने उठवले आणि स्वतःच्या चरणांपाशी बसवून घेतले. कृष्णाने क्षणभरच त्याचे नेत्र मिटून घेतले आणि नंतर अर्जुनाकडे आत्यंतिक प्रेमदृष्टीने पहात तो अर्जुनाशी अत्यंत गंभीरतेने बोलू लागला.



"अरे अर्जुना, खरेच तू अत्यंत भाग्यवान आहेस, यात जराही शंका नाही. मानव जन्माला येऊनही 'मी कोण, मी कुठून आलो व मी कशासाठी आलो' असा प्रश्नही ज्यांच्या मनात निर्माण होत नाही, ते तर केवळ मूढच होत. असा प्रश्न मनात निर्माण होऊनही ज्यांना व्याकुळता येत नाही आणि त्या प्रश्नाचे उत्तर प्राप्त करून घेण्याची तळमळही मनात निर्माण होत नाही, त्यांना तर दुर्भागीच म्हणावे लागेल. परंतु जे या मानवी जन्माचेच नव्हे तर या सर्व सृष्टीचेच रहस्य जाणून घेण्यासाठी आर्त होतात आणि त्यांना त्या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचा सद्‌गुरू शरणागतीचा मार्गही मिळतो ते तुझ्यासारखे खरोखरीच भाग्यवान होत.

अर्जुना, या सृष्टीकडे पहाण्याची योग्य दृष्टी जेव्हा प्राप्त होते तेव्हाच या सृष्टीचे सर्व रहस्य अगदी सहजपणे उलगडते. ही सृष्टी ज्या परमशक्तीने संचलित व कार्यान्वित आहे, त्याच्या मुळाशी एकीएक परमतत्त्व आहे. त्या शक्तीलाच परमेश्वर असे म्हणतात. ही सर्व सृष्टी त्या परमेश्वराने निर्माण केली असे म्हणण्यापेक्षा, तो निर्गुण निराकार परमेश्वरच या सृष्टीच्या रूपाने सगुण साकार झालेला आहे आणि या पंचमहाभूतात्मक सृष्टीतील चैतन्यरूपी चिद्‌शक्तीच्या रूपाने तो परमेश्वरच संचार करीत आहे. सृष्टीरूपातील परमेश्वराचा हा चिद्विलास म्हणजे जणू त्या परमेश्वराच्याठायीचा निर्गुण आनंदच सगुण झालेला आहे. ही सृष्टी जड व जीव या दोन्हींची मिळून बनलेली आहे. जडाठायीचे चैतन्य हे सुप्त व निष्क्रिय आहे तर जीवमात्रांच्याठायीचे चैतन्य हे जागृत व क्रियाशील आहे. सर्व जीवांच्याठायी ते परमतत्त्व अंशात्मक रूपाने आहे ज्याला आत्मतत्त्व असे म्हणतात. ते आत्मतत्त्व सर्व जीवमात्रांच्याठायी प्राणरूपाने स्फुरत असते आणि सर्व जीवांना जिवंत व कार्यशील ठेवते.


अर्जुना, अशा या जड सृष्टीरूपी चमत्कारामध्ये मानव जन्म हा एक मोठाच चमत्कार आहे. पंचमहाभूतात्मक जड देह आणि त्यामध्ये स्फुरणारे आत्मतत्त्व यांच्या संयोगातून मन व बुद्धी या अद्‌भूत तत्त्वांचा जन्म मानवी देहात झालेला आहे. मन व बुद्धी हे खरे तर त्या आत्म्याचे अंश आहेत. परंतु अज्ञानामुळे त्यांना त्यांच्या मूळ आत्मस्वरूपाचा विसर पडतो आणि ते देहालाच आपला समजून त्या देहाला धरून रहातात. त्यामुळेच

मन व बुद्धी यांची वृत्ती ही बहिर्मुखच रहाते. एवढेच नव्हे, तर देहाच्या माध्यमातून सुख अनुभवण्याचा त्यांचा नित्य प्रयत्न चालू असतो. आत्म्याचा विचार विसरलेले मन सुखाच्या विविध कल्पना करू लागते आणि आत्मनिश्चयापासून ढळलेली बुद्धी त्या मनाला पूर्णपणे साथ देऊ लागते. मन व बुद्धी यांची ही अपवित्र युती देहाच्या सर्व कर्मेंद्रियांना त्या काल्पनिक सुखप्राप्तीसाठी राबवते आणि त्याचीच परिणती केवळ देहाला कष्ट, मनाला क्लेश आणि बुद्धीला ताण यामध्येच होते. त्या अनुभवाने सावध न होता मन पुन्हा वेगवेगळया सुखांचा अधिकच विचार करते आणि बुद्धी त्यांच्या प्राप्तीचा निश्चय करून त्या देहाला अखंडपणे कष्टवित रहाते. त्यामध्ये देह, मन व बुद्धी यांची अनन्वित झीज होते. पण एकतर ती गोष्ट मनाला जाणवत नाही किंवा जाणवूनही, मन त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करते. एवढेच नव्हे, तर एखादेवेळी बुद्धीने जरी मनाला सावधानतेचा इशारा दिला, तरी मन त्याची पर्वा करीत नाही. अशा तऱ्हेने देह, मन व बुद्धी यांच्या दुष्टचक्रात अडकून राहिलेला जीव मात्र, केवळ अनन्वित यातना भोगत रहातो.”

कृष्णाच्या मुखातून अज्ञानी जीवाच्या हाल अपेष्टांचे वर्णन ऐकत असताना अर्जुनाच्या मनाला वाईट वाटले खरे, परंतु त्याचबरोबर त्याला हेही जाणवले की कृष्णाने जीवाच्या ज्या दुरावस्थेचे वर्णन केले ते तर अर्जुनाच्या अवस्थेचेही वर्णन आहे. अर्जुनाला स्वतःच्या जीवदशेच्या बंधनाची जाणीव झाली आणि तो अधिकच व्याकूळ झाला. त्यामुळे कृष्णाशी बोलताना अर्जुनाचा स्वरही जरासा आर्तच झाला.

“अरे कृष्णा, सामान्य जीवाचे तू केलेले वर्णन अत्यंत यथार्थ आहे, हे मी माझ्या अनुभवाने म्हणत आहे. पण मग त्या जीवाला त्या दुष्टचक्रातून सुटण्याचा काही मार्ग आहे की नाही?” त्यावर कृष्ण चटकन म्हणाला,

“अर्जुना, प्रत्येक संकटातून मार्ग व अडचणींवरती उपाय हा असतोच. काळोख नाहीसा करण्याचा जसा एकमेव उपाय प्रकाश हाच आहे, त्याचप्रमाणे अज्ञान नाहीसे करण्याचा एकमेव उपाय म्हणजे ज्ञान हाच होय. आत्मज्ञानानेच मनाला खऱ्या भासणाऱ्या असत्य गोष्टींचा निरास



होऊ शकेल. कारण जसे आत्म्याचे अस्तित्व हेच एकीएक सत्य आहे तसेच आत्मज्ञान, हेच एकीएक मूलभूत सत्यज्ञान आहे. ते प्राप्त होण्यासाठी आत्मानुभवी अशा अधिकारी व्यक्तींनाच अनन्यभावाने शरण जाणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या मुखातूनच त्यांचे स्वानुभवाचे आत्मज्ञान शब्दरूपाने प्रगट होते आणि त्या आत्मज्ञानाचा संस्कार प्रथम शब्दाने मनावर होतो. पण मन विकाररहित अशा पूर्ण शुद्ध अवस्थेत असले, तरच त्या मनरूपी भूमीमध्ये ते संस्काररूपी बीज रूजते आणि मूळ धरते. त्यानंतर सद्‌गुरूंचा सहवास, सेवा व संवाद या साधनांमुळेच त्या मूळाला सद्‌गुरूंच्या ईश्वरी प्रेमाचे जल लाभते. नित्य उपासना व साधना घडून ती मूळे मनात अधिकाधिक खोलवर जात रहातात. मग त्याला ईश्वरीभक्तीची सुगंधित फुले येतात आणि एका दिवशी व एका क्षणी ईश्वरी अनुभवाच्या आनंदाचे रसपूर्ण व सुमधुर असे फळ प्राप्त होते. परंतु त्यासाठी मनाकडून केवढीतरी तपश्चर्या घडणे आवश्यक आहे. कारण मन सर्व विकारांपासून जेव्हा पूर्णपणे मुक्त होईल, तेव्हाच मनाची पूर्ण शुद्धी होईल आणि बुद्धीचा सर्व अहंकार जेव्हा झडून जाईल, तेव्हाच बुद्धीची शुद्धी होईल. बुद्धीठायीचा ‘मी’पणाचा अहंकार आणि मनाठायीचा ‘माझे’पणा यांचे ओझे पूर्णपणे उतरल्यावरतीच त्या जीवाकडून पराक्रम घडू शकेल.”

कृष्णाचे सांगणे ऐकत असताना अर्जुनाला ते निश्चितच समजत होते, पण ते केवळ शब्दानेच. त्यामुळे त्याचे मन अजूनही थोडेसे गोंधळलेलेच होते. मनाच्या त्याच अवस्थेत अर्जुन कृष्णाला म्हणाला.

“कृष्णा, तुझे बोलणे मला निश्चितच कळत आहे. ‘प्रत्येक मानवाच्याठायीचे आत्म्याचे अस्तित्व हेच सत्य आहे’ हे तुझे सांगणेही मला पटत आहे. त्यासाठी आत्मानुभवी अशा महात्म्यांना शरणागती देण्याची आवश्यकता आहे, हेही अगदी साहजिकच आहे. परंतु तो आत्मानुभव प्राप्त करून घेणे, ही गोष्ट मात्र नक्कीच सोपी नाही. एक तर, त्या अनुभवाच्या अवस्थेपर्यंत जाण्याचा मार्ग हा दीर्घ पल्ल्याचा आहे आणि त्या मार्गाने प्रवास करून ध्येय गाठण्यासाठी अत्यंत चिकाटीच हवी. पण त्याला लागणारा मनाचा निश्चय आधी होणे आणि मन त्या मार्गाने

जाण्यासाठी उद्युक्त होणे, हे अत्यंत आवश्यक आहे. मला वाटते हीच गोष्ट जास्त कठीण आहे. कारण असा मनाचा केलेला निश्चय वारंवार ढळण्याचीच शक्यता जास्त आहे, असे मला माझ्या अनुभवाने तरी निश्चितपणे वाटते. अशावेळी मग काय उपाय करायचा जो त्या मनाला आधी मार्गावरती धरून ठेवील आणि नंतर त्या मार्गाने पुढे जाण्यासाठी मनाला उत्साहित करील?”

अर्जुनाच्या प्रश्नावरती कृष्णाने हलकेच मान डोलवली आणि तो म्हणाला,

“अर्जुना, तुझा प्रश्न अत्यंत योग्य आहे आणि तुझी अडचणही अगदी बरोबरच आहे. कारण साध्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या साधकाला अडचणी या येणारच आणि त्यासाठीच तर सद्‌गुरूंचा नित्य सहवास व मार्गदर्शन आहे. सद्‌गुरूमुखातून प्रगटलेले स्वानुभवाचे आत्मज्ञान हेच सत्य आहे असा कायमचा निश्चयच हवा आणि असा निश्चय, केवळ त्यांच्या माहात्म्याच्या जाणीवेमुळेच होऊ शकतो. पण तो निश्चय तसा टिकून रहाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण सत्यज्ञान शब्दाने कळले म्हणून तो अनुभव होऊ शकत नाही. त्या ज्ञानाचा अनुभव घेण्याची सुरूवात ही बाह्य आचरणानेच होते. त्यासाठी आपले जीवन आधी बाह्यांगाने बदलणे अत्यंत आवश्यक असते आणि मनाची तीच मोठी अडचण आहे. कारण मनाच्या ठायीचे मूळ अज्ञान व वासना कायम असल्यामुळे, मन बाह्य जीवनातच पूर्णपणे अडकून राहिलेले असते. पूर्णपणे बहिर्मुख झालेल्या मनाला पूर्णपणे अंतर्मुख करणे अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक असते. त्यासाठीच स्वतःच्या बाह्य जीवनातही सद्‌गुरूंचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. स्वतःचे कर्तव्यकर्म निश्चित काय आहे, त्याच्या मर्यादा काय आहेत, त्यात आवश्यक व अनावश्यक काय, कर्तव्यकर्म कसे कसे बदलत जाते, कर्तव्यकर्म व मोह यामध्ये नेमका काय फ़रक आहे, इत्यादी गोष्टी जीवनातील प्रत्यक्ष प्रसंगांच्या निमित्ताने सद्‌गुरूंकडून जाणून घ्याव्यात आणि त्यांच्या सांगण्यानुसार बाह्य कृती करीत रहावे. योग्य बाह्य कृती घडता घडताच मनाची वृत्तीही हळूहळू बदलून सुधारत रहाते. नित्यावश्यक कर्मांमुळे मनात निर्माण होणाऱ्या विकारांचा मळ हळूहळू नाहीसा होतो आणि मन



पूर्णपणे निर्मळ होते. परंतु सद्गुरूंच्या मार्गदर्शनानुसार वागण्याचे बळ येण्यासाठी त्यांच्याविषयी नितांत श्रद्धा व प्रेम असणे आवश्यक असते. सद्गुरूंच्या सहवासात त्यांच्या ईश्वरी प्रेमाचा अनुभव घेता घेताच, त्यांच्याविषयी प्रेम निर्माण होऊन ते वाढत असते आणि त्यांच्या ईश्वरी अनुभवाची जाणीव होता होताच, त्यांच्याविषयी श्रद्धा निर्माण होऊन ती दृढ होत असते. सद्गुरूंच्या प्रेमाने मनाची शुद्धी होते, तर त्यांनी सांगितलेल्या ज्ञानावरती श्रद्धा ठेवल्यामुळे बुद्धीची शुद्धी होते. मन व बुद्धी यांची पूर्ण शुद्धी झाल्यावरतीच आत्मज्ञानाचा अनुभव घेण्याचा ध्यास चित्ताठायी निर्माण होतो आणि हळूहळू वाढत जाऊन तो ध्यास दृढ होतो. या ध्यासानेच चित्ताचीही पूर्ण शुद्धी होते आणि आत्मज्ञानाच्या अनुभवाकडे वाटचाल होऊ लागते. मनाचा हा आंतरिक प्रवास एका क्षणी अत्यंत सहजपणे पूर्ण होतो आणि मन आत्मस्वरूपाला पावून त्यामध्ये एकरूप होते आणि तेथेच मुक्तपणे विहार करीत रहाते. मनाच्या त्या क्रीडेमुळेच आत्म्याच्या आनंदस्वरूपाठायी लहरींवरती लहरी पुन्हा पुन्हा निर्माण होऊन विलय पावत रहातात. आत्मस्वरूपामध्ये पूर्णपणे रमून तेथेच क्रीडा करण्याच्या मनाच्या या वृत्तीमुळेच, आत्मस्वरूपाचा आनंद नित्य उपभोगता येतो. आत्मानंदाची ही अनुभूती, हीच मानवी जन्मातील परिपूर्ण अवस्था आहे.”

कृष्णाच्या बोलण्याने खरे तर, अर्जुन पूर्ण भारितच झाला होता. काहीही बोलणे त्याला शक्यच नव्हते. परंतु थोड्या वेळाने तो भानावर आला. त्याने स्वतःच्या मनाला सावरले आणि कृष्णाशी बोलावयास सुरूवात केली.

“कृष्णा, तुझ्या मुखातून त्या सर्वश्रेष्ठ अनुभवाचे वर्णन ऐकत असताना ते माझ्याही मनाला निश्चितच आकर्षित करीत आहे. परंतु हा अनुभव दीर्घ काळाच्या वाटचालीनंतरच येणार आहे हेही मी जाणून असल्यामुळे, माझे मन आतून सावधही आहे. आता कोठे त्या अनुभवाचा माझ्यावर केवळ शब्दाने संस्कार झाला आहे. माझ्या मनात खोलवर जाऊन ते रूजायला अजून बराच काळ जावा लागणार आहे हे निश्चित! त्यासाठी या विषयावर मला तुझ्याशी वारंवार बोलून संवाद साधावा लागणार आहे. कारण मी जे

ऐकले त्याचा कृतनिश्चय होण्यासाठी ते अत्यंत आवश्यक आहे, असे तुझ्याच बोलण्यातून तू निर्देशित केले आहेस. परंतु जे मला शब्दाने कळले ते मनात खोलवर जाण्यासाठी माझ्या मनातील समजुती बाहेर येणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच आधी माझ्या मनातील विचार तुला सांगून तुझ्याकडून योग्य ती समज करून घेणे माझ्यासाठी अत्यंत जरूरीचे आहे. त्यापैकी आताच्या या कठीण प्रसंगातील माझ्या मनाची अडचण दूर करणे, यालाच प्राधान्य द्यावयास हवे.

कृष्णा, माझ्या मनात एक प्रकारची नकारात्मक भूमिका निर्माण झालेली आहे, असे मलाही जाणवते. पण ती योग्यच आहे असेही मला वाटते. आताच जेव्हा तू ईश्वराच्या अस्तित्वाविषयी सांगताना म्हणालास की ईश्वराचे अस्तित्व हे सर्वच प्राणिमात्रात आहे. मग असे असताना मी कोणालाही युद्धात ठार मारणे हे त्या ईश्वरालाच मारण्यासारखे नाही का? खरे तर, ईश्वरच सर्वांच्याठायी असल्यामुळे मी सर्वांशीच प्रेमाने व सामोपचारानेच वागावयास हवे. त्यामध्ये माझा काही व्यक्तिगत स्वार्थ व अभिलाषा आड येणे, हे तर सर्वथाच चुकीचे नाही का? येथे तर मी राज्यप्राप्तीच्या लालसेने स्वकीयांशीच युद्ध करून त्यांना ठार मारण्याचा विचार करू पहात आहे. पण तो विचार माझ्या मनात ठरू शकत नाही. तेव्हा निव्वळ स्वार्थापोटी मी करीत असलेले हे युद्ध केवळ अयोग्यच नव्हे तर ते पापही आहे अशीच माझ्या मनाची समजूत झाली आहे. त्यात काय बरे चूक आहे? ते आता तूच मला सांग.”

अर्जुनाचे बोलणे संपता संपताच कृष्णाने बोलावयास सुरूवात केली.

“अरे अर्जुना, मनात एकदा का नकारात्मक विचारसरणी निर्माण झाली की मग मनालाही स्वतःच्या भूमिकेला पुष्टी देणारे सोयीस्कर संदर्भ एकदम सुचू लागतात आणि दिसूही लागतात. त्यामुळे मनाची नकारात्मक भूमिका अधिकाधिक घट्ट होऊ लागते. आताच बघ ना! युद्ध करायचेच नाही असे आधीपासूनच ठरवून बसलेल्या तुझ्या मनाला ‘ईश्वर सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी आत्मरूपाने आहे’ हे माझ्या सांगण्यातील वचन



लागलीच व सोयीस्करपणे आठवले. हे वचन एक तत्त्व म्हणून सत्यच आहे. परंतु त्या तत्त्वाला ज्यांनी जाणले नाही ते तर सामान्य जीवच आहेत आणि ज्यांनी ते तत्त्व केवळ शब्दाने जाणले असेल त्यांनीही त्या तत्त्वाचा अनुभव घेण्याचे शिल्लक राहिलेलेच आहे. परमेश्वराठायीच निर्माण झालेल्या या सृष्टीरूपी मायेत अज्ञानी जीव हे त्यांच्याठायीच्या सत्त्व, रज व तम या गुणांनी युक्त असतात आणि त्या गुणांच्या धर्मानुसार जीवन जगत असतात. सत्त्वगुणी जन हे सदाचाराने वागून जीवनातील चांगली मूल्ये जपत असतात. त्यांच्याठायी ईश्वराच्या अस्तित्त्वाची जाणीव असते आणि आस्तिक्यभावाने ईश्वराची उपासना करून त्यांच्याठायीची ईश्वरी श्रद्धा ते जागृत ठेवतात. त्यांच्याठायीची मनोभूमी ही सुपीक असते. फक्त त्या भूमीत ईश्वरप्राप्तीच्या संकल्पाचे बीज रूजणे तेवढे बाकी राहिलेले असते. तशी ईश्वरप्राप्तीची आर्तता जर त्यांच्याठायी निर्माण झाली आणि त्यांना जर भाग्याने सद्गुरूंची प्राप्तीही झाली, तर मग त्यांच्यासाठी ईश्वरप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो. अर्थात् पुढील दीर्घकाळाची तपश्चर्या करण्याची जबाबदारी मात्र त्यांचीच असते आणि सद्गुरूकृपेने त्यांना ईश्वरी अनुभवाची अवस्था प्राप्तही होऊ शकते. असे सत्त्वगुणी जन हे त्यांच्या सज्जनवृत्तीमुळे व परोपकारी स्वभावामुळे सामान्य जनांमध्ये आदराचे स्थान प्राप्त करून घेतात. परंतु सामान्यांचा उद्धार करणे किंवा दुर्जनांना शासन करणे या गोष्टी मात्र त्यांच्याकडून घडत नसतात. कारण त्यांच्या सात्त्विकभावामध्ये तेजाचा अभाव असतो.


अर्जुना, रजोगुणी जन हे सुखलोलुप असतात. अनेक प्रकारची विषयसुखे कशी प्राप्त करून घेता येतील आणि त्यांचा अनुभव कसा घेता येईल याच विचारात ते नेहमी मग्न असतात. त्याच्यासाठीच नित्य प्रयत्न करून ते स्वतःच्या देहाला व मनाला अनन्वित कष्ट देत असतात. स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्यांना त्रासही द्यायला ते कमी करीत नाहीत आणि दुसऱ्यांच्या भावनांची पर्वा न करता त्यांना दुखवायलाही हे रजोगुणी जन नेहमीच तयार असतात. स्वतःच्या स्वार्थापलीकडे दुसऱ्या कशाचाच विचार त्यांच्याठायी असत नाही आणि असलाच तर तोही स्वतःच्या स्वार्थाला पूरक एवढाच असतो. हे रजोगुणी जन ईश्वराचे अस्तित्व मानतात खरे, पण ईश्वराकडून नेहमी त्यांच्या वासनांच्या पूर्तीची

अपेक्षा करीत असतात. स्वार्थी व मतलबी हेतू मनात ठेवून ते ईश्वराची सकाम उपासना करतात. त्यासाठी ईश्वराच्या अस्तित्वाच्या प्रतिकात्मक असलेल्या मूर्ती, तीर्थयात्रा, उपासतापास इत्यादी गोष्टी त्यांना साहाय्यभूत होत असतात. ईश्वराच्या अशा बाह्य उपासनेतच रमणारे त्यांचे मन, संसारात मात्र पूर्णपणे गुंतलेले असते आणि सांसारिक सुखदुःखाचा अनुभव घेण्यातच त्यांचे संपूर्ण जीवन व्यतीत होते. पण शांती व समाधान मात्र त्यांच्या हाती कधीच लागत नाही.

परंतु तमोगुणी जन हे मात्र यापेक्षाही भयंकर वृत्तीचे असतात आणि सामान्यांसाठी ते अधिक धोकादायक असतात. दुष्ट व खल प्रवृत्तीचे हे लोक दुसऱ्यांना त्रास देण्यातच सुख मानतात आणि सामान्यांना छळण्यातच त्यांना भूषण वाटत असते. दुसऱ्यांचे सुख त्यांना पाहवत नाही आणि दुसऱ्यांच्या सुखानेही त्यांना दुःखच होते. अशा दुर्जनांमुळेच समाजात अशांतता व असुरक्षितता पसरत असते आणि सामान्यजन भयभीत होऊनच जीवन जगत असतात. हे लोक ईश्वराचे अस्तित्वच मानत नाहीत आणि स्वतःपेक्षा कोणाला ज्ञानी व सामर्थ्यवानही समजतच नाही.

अर्जुना, अशा त्रिगुणात्मक जनांमध्ये केवळ तत्त्वतः ईश्वराचे अस्तित्व आहे या ज्ञानाने कोणाच्याही जीवनाचे कोडे सुटणार नाही. अशा तीन गुणांच्या पण अज्ञानी जीवांशी आपण कसे वागायला हवे याचेही ज्ञान हवेच. त्यांच्याठायी तत्त्वतः ईश्वर आहे म्हणून सत्त्वगुणी जनांविषयी आपल्याला आदर वाटेल, रजोगुणी जनांविषयी दया येईल आणि तमोगुणी जनांविषयी रागही येईल. पण तरीही आपल्या जीवनातील प्रश्न मात्र अनुत्तरीतच रहातील. मग त्या आत्मज्ञानाचा आपल्याला प्रत्यक्ष जीवनात काहीच उपयोग होणार नाही. त्यासाठीच त्याच्या जोडीला आपल्या स्वधर्माची जाणीव करून देणारे ज्ञानही आपल्याला हवेच. कारण तरच त्या आत्मज्ञानाचा आपल्याला प्रत्यक्ष जीवनातही अनुभव घेता येईल.

अर्जुना, अनुभवाचे ज्ञान हेच खरे आत्मज्ञान होय ही महत्त्वाची गोष्ट कायमची लक्षात ठेव. आत्मज्ञानामुळे स्वधर्माचरणाने वागण्याचे बळच प्राप्त होते. आत्मज्ञान हे निरपेक्ष असते तर स्वधर्माचरण हे सापेक्ष असते. स्वधर्माचरणाची कृती व्यक्ती, प्रसंग, स्थळ व काळ यानुसार ठरत असते.



परंतु आत्मज्ञानामुळे अंतःकरण शुद्ध झालेले असल्यामुळे, तेथे राग-लोभ अथवा मोह-तिरस्कार यासारखे कोणतेही विकार नसतात. त्यामुळे त्या त्या वेळेस घडलेले सापेक्ष आचरण हे योग्यच असते. आत्मज्ञानाच्या अधिष्ठानावर घडत असल्यामुळे त्या आचरणामध्ये वासनेचा वा अहंकाराचा लवलेशही नसतो. फलेच्छा नसल्यामुळे सर्व कर्मे ईश्वरार्पण होतात. अशा निर्लेप व निरहंकारी वृत्तीने घडणारी कर्मे, हीच खरी शुद्ध कर्मे व सत्कर्मे होत आणि तेच खरे सदाचरण होय.

अर्जुना, प्रत्येक मानवाला अनेक प्रकारची कर्मे करणे हे तर क्रमप्राप्तच आहे. कारण कर्माशिवाय जीवनच नाही. आत्मज्ञान प्राप्तीमुळे ही कर्मे काही थांबत नाहीत. आत्मज्ञान मानवाला निष्क्रिय न करता स्वधर्माचरणाला व योग्य कर्तव्यकर्माला प्रवृत्तच करते आणि पराक्रमालाही उद्युक्तच करते. कर्तव्यकर्माचा मोह होणे जेवढे अयोग्य आहे तसेच मोहामुळे कर्तव्यकर्म न करणे, हेही तेवढेच अयोग्य आहे. आत्मस्वरूपाची जागृती झाल्यानंतर त्या स्वरूपातच रहाणे हाच स्वधर्म होय. या स्वधर्माचरणामुळे सर्व आवश्यक कर्तव्यकर्मे सहजपणे व सुयोग्य प्रकारे घडत रहातात. त्यासाठी मनाला वेगळा काही विचार आणि बुद्धीला वेगळा असा निश्चय करावाच लागत नाही. त्यामुळे सर्व कर्तव्यकर्मे करताना दिसत असूनही आत्मज्ञानी पुरूष मात्र, सर्वापासून नामानिराळा व मनातून मोकळा रहातो. परंतु जोपर्यंत आत्मस्वरूपाची ही सिद्धावस्था प्राप्त झाली नाही तोपर्यंत मात्र, स्वतःचे कर्तव्यकर्म निश्चित काय, किती व कसे आहे याचे मार्गदर्शन घेत रहाणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठीच सद्गुरूंचा सततचा सहवास करून स्वतःचे जीवन मनमोकळेपणाने प्रगट केले पाहिजे आणि स्वतःचे कर्तव्यकर्म जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनानुसार आचरण केल्यानेच योग्य कर्तव्यकर्म करूनही मन त्यामध्ये गुंतून रहाणार नाही आणि मनाला आत्मज्ञानाचा अनुभव घेण्याचा ध्यास लागणे शक्य होईल.

अर्जुना, मगाशी तुला झालेल्या ज्ञानाच्या समजुतीनुसार तू म्हणालास की ईश्वर जर सर्व भूतमात्रांच्याठिकाणी आत्मरूपाने वास करीत आहे, तर युध्दात कोणालाही ठार मारणे हे त्या आत्म्याला नष्ट करण्यासारखेच नाही का? सकृत्दर्शनी तुझी शंका योग्य वाटते खरी, पण

खरे तर ती फसवीच आहे. हा तर तुझ्या बुद्धीठायीच्या शब्दज्ञानाचा, मनाने सोयीनुसार केलेला दुरूपयोग आहे. कारण सत्य हे आहे की आत्मा हे एक तत्त्व आहे आणि सनातन व चिरंतन असलेल्या परमात्म तत्त्वाचा ते अंश आहे. त्यामुळेच आत्मा हाही त्याच्या मूळ तत्त्वाप्रमाणेच अविनाशी आहे. आत्मा हा जलाने भिजू शकत नाही किंवा तो अग्नीने जळूही शकत नाही; आत्मा कधीच नष्ट होऊ शकत नाही; आत्मा ना कोणाला ठार मारतो ना आत्म्याला कोणी ठार मारू शकतो; आत्मा स्वतःहून काहीच करत नाही, तर आत्मशक्तीमुळेच या देहाद्वारे सर्व कर्मे घडत असतात. पण त्या आत्मशक्तीवर अज्ञानाचे आवरण आल्यामुळे सामान्य जीवांना त्या आत्मशक्तीची जाणीव असत नाही आणि ते जड देहालाच सर्वाचा कर्ता समजतात. पण खरा कर्ता करविता ती आत्मशक्तीच आहे. जेव्हा ती आत्मशक्ती सुप्त होते तेव्हा त्या शक्तीमुळे देहात स्फुरत असलेले पंचप्राण देहाला सोडून जातात आणि देह निष्प्राण होतो. देहातील आत्मतत्त्व व्यापक परमात्म तत्त्वात विलीन होते आणि जड देह पंचमहाभूतात मिसळून जातो.

खरे तर आत्मा हा निःसंगच आहे. पण आत्म्याचा जड देहाशी जेवढा काळ संग होतो तेवढा काळच हा जीवनाचा खेळ चालू रहातो. अशा असंख्य जीवांच्या जीवनाचा खेळ या सृष्टीरूपाने एकाच वेळी चालू असतो. पण त्या सर्व खेळाचा सूत्रधार मात्र, एकीएक तो परमात्माच आहे. त्याच्याठायीच घडणारी ही सर्व लीला आहे. त्या परमात्म्यापासून वेगळे असे काहीच घडलेले नाही, तर त्या परमात्म्याठायीच हे वेगळेपण निर्माण झालेले आहे. ज्याप्रमाणे जलाठायी निर्माण झालेल्या लहरी या पूर्णतः जलरूपच असतात अगदी त्याचप्रमाणे, परमात्म्याठायीच निर्माण झालेली ही विविधरूपी सृष्टी ही जरी वेगळी दिसली, तरी तो केवळ भासच आहे. कारण त्या सृष्टीरूपात एकीएक परमात्म तत्त्वच भरलेले आहे. सृष्टीरूपाने एकीएक ते परमात्म तत्त्वच साकार झालेले आहे. हा सृष्टीरूपी खेळ ज्याला कळला नाही त्याच्यासाठी सृष्टी ही मायाच ठरते. माया म्हणजे खरे तर जिला वेगळे अस्तित्व नाही पण तरीही जी वेगळी दिसते. या वेगळेपणाच्या भासालाच माया असे म्हणतात. परंतु बाह्यांगाने वेगळेपणाने दिसूनही त्या मायारूपाने प्रगटलेल्या परमात्म्याला जो



जाणतो, त्यालाच या सृष्टीखेळाचा आनंद अनुभवता येतो आणि तोच या मायेची खरी मौजही घेतो.

अर्जुना, हे तात्त्विक बोलणे कितीही केले तरी न संपणारेच आहे. परंतु आत्म्याच्या या तात्त्विक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेणे ही गोष्ट महत्त्वाची आहे. ज्यांनी तो आत्मानुभव घेतला त्यांच्याकडून त्यांच्या स्वभावानुसार प्राप्त कर्तव्यकर्मे सहजपणे घडत रहातात, हे सत्यच आहे. परंतु ज्यांना तो आत्मानुभव घ्यायचा आहे त्यांनी प्राप्त कर्तव्यकर्मे निरपेक्षपणे व निरहंकाराने प्रयत्नपूर्वकच करावयास हवीत. तरच त्यांना आत्मानुभवाची अवस्था निश्चितपणे प्राप्त होईल. प्राप्त परिस्थितीत तू हाच विचार करावयास हवा. हा तुझ्यावर आलेला युद्धाचा प्रसंग तुला अटळच आहे. युद्ध तुला करायचे आहे की तुझ्यावर ते कोणी लादत आहे हा प्रश्नच नाही. त्या युद्धाला तुला सामोरे जावे लागणारच आहे. तेव्हा जी गोष्ट क्रमप्राप्त झालेली आहे ती मनापासून करणे, हेच केव्हाही उचित आहे. तुझ्या क्षत्रिय धर्मानुसार आवश्यक तेव्हा युद्ध करणे हे तुझे कर्तव्यकर्मच आहे आणि स्वतःचे कर्तव्यकर्म टाळणे हा अधर्मच आहे ही गोष्ट तूही जाणून आहेस. तेव्हा तुझ्या मनावर आलेले स्वकीयांच्या मोहाचे आवरण विवेकाच्या बळाने झटकून टाक आणि मनोबळ घेऊन पूर्ववत् युद्धासाठी तयार हो!

अर्जुना, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की तू जरी दुर्बल होऊन शस्त्र खाली ठेवलेस तरी हे युद्ध होणारच आहे. कारण आता ती गोष्ट तुझ्या एकट्याच्या हातात नाही. दुर्योधन आता माघार घेणे शक्यच नाही. कोणत्याही परिस्थितीत युद्ध करून पांडवांचा पाडाव करण्याचा त्याचा तर निर्धारच आहे. तेव्हा दुर्योधन युद्ध सुरू करणारच आहे. आणि तुला स्वरक्षणासाठी व तुझ्या बंधूंच्या संरक्षणासाठी हातात शस्त्र हे धरावे लागणारच आहे. कारण स्वरक्षण व बंधूंचे संरक्षण हे तर तुझे प्रथम कर्तव्यकर्मच आहे. हा तर तुझा सहजधर्मच आहे. क्षत्रिय धर्मानुसार युद्धातून माघार घेणे हेही पापच आहे. तेव्हा हकनाक या पापाचा धनी होण्यापेक्षा क्षत्रियधर्माचे आचरण करून कमीत कमी पुण्य तरी प्राप्त करून घे. क्षत्रियधर्माचे आचरण करीत असताना जर यदाकदाचित तुला वीरमरण आले, अर्थात् तसे कधीच होणे शक्य नाही, तरी तू स्वर्गाला निश्चित जाशील, हे माझ्याप्रमाणे तूही जाणून आहेस. पण जेव्हा तू युद्धात

जिंकशील आणि मला पूर्ण खात्री आहे की हे युद्ध तूच जिंकणार, तेव्हा सर्व बंधूंसह या पृथ्वीवर राज्य करशील. तेव्हा आता कृतनिश्चय करूनच युद्धासाठी सज्ज होऊन उभा रहा.

अर्जुना, आता तुला शेवटची एकच महत्त्वाची गोष्ट सांगतो, ती लक्षपूर्वक ऐक. हे धर्म-अधर्मातील युद्ध व्हावे ही खरे तर मूळ माझीच इच्छा आहे. तो माझ्याठायीचाच संकल्प आहे. सद्धर्माची स्थापना करण्याच्या माझ्या कार्यातील हे युद्ध हा एक महत्त्वाचा भाग आहे. सध्या धर्म हा अत्यंत तेजोहीन झालेला आहे आणि त्यामुळे अधर्म हा वरचढ होऊन राहिलेला आहे. अधर्माची तर अगदी परिसीमा झालेली आहे आणि त्यामुळे खऱ्या धर्माला कोठेच थारा राहिलेला नाही. खरे तर, त्या अधर्माला समूळच नष्ट करावयास हवे. परंतु काळगतीनुसार ते शक्य नसले तरीही मर्यादेचे उल्लंघन केलेल्या त्या अधर्माला आळा घालून आवरणे अत्यंत आवश्यक आहे. माझ्या जीवनाचे तेच कार्य आहे आणि म्हणूनच मी माझ्या सर्व शक्तीनिशी तुम्हा पांडवांच्या मागे उभा आहे. तेजोहीन झालेल्या तुमची तेजस्विता पुन्हा संपूर्णपणे प्रगट व्हावी आणि तुमच्याद्वारे धर्माचा विजय व्हावा याच एकमेव हेतूने मी या युद्धात सक्रिय झालेलो आहे. त्याचसाठी तर मी तुझा सारथी व साथीही झालेलो आहे. आता मला पूर्ण साथ देण्याची जबाबदारी केवळ तुझीच आहे. कारण पांडवांमध्येही मी फक्त तुझाच भरवसा धरून आहे. केवळ तू पराक्रमी आहेस म्हणून नव्हे, तर तू माझ्या अत्यंत प्रेमाचा आहेस आणि माझा जीवश्च कंठश्च असा परममित्र आहेस म्हणून! तुझी खात्री धरूनच मी हाती शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा केलेली आहे, ही गोष्ट ध्यानात ठेव. माझी ती प्रतिज्ञा राखणे आता सर्वस्वी तुझ्यावरतीच अवलंबून आहे. खरे तर, अधर्माशी लढून त्याचा पराभव करण्याचे सामर्थ्य माझ्याठायीही आहे आणि आतापर्यंत अनेकवेळा अशी युद्धे करून मी अधर्मियांना नामोहरमही केलेले आहे. परंतु असा पराक्रम आता मला अत्यंत प्रिय असलेल्या अर्जुनाकडून घडावा, अशीच माझी तीव्र इच्छा आहे. माझे पांडव पराक्रम करून विजयी व्हावेत आणि त्यांना त्यांच्या हक्काचे असलेले सर्व राजवैभव प्राप्त व्हावे हाच माझा एकमेव हेतू आहे. आता यापुढे मला तुला अधिक काहीही सांगायचे नाही. धर्म व अधर्म याचे यथार्थ ज्ञान मी तुला समजावून सांगितलेले आहे आणि



त्याचबरोबर माझी तुझ्याकडून काय अपेक्षा आहे व ती का आहे, हेही मी तुला स्पष्टपणे सांगितले आहे. त्यातून तुझी जी काही समज झालेली असेल आणि तुला जी काही इच्छा व प्रेरणा होईल त्याप्रमाणे तू कृती कर."


*****

# युद्धारंभ

कृष्णाचे बोलणे एवढा वेळ एकाग्रतेने ऐकत असताना अर्जुनाच्या मनावर आलेले मळभ हळूहळू दूर होत होतेच. कृष्णाच्या मुखातून प्रगटणाऱ्या सत्य, स्पष्ट व तेजस्वी ज्ञानाचाच तो परिणाम होता हे तर निश्चितच. परंतु जेव्हा शेवटी कृष्णाने त्याच्या व्यक्तिगत प्रेमाची जाणीव व अपेक्षा अर्जुनाला करून दिली, तेव्हा मात्र अर्जुनाचे मन एकदम खडबडून जागे झाले आणि अर्जुन पुन्हा कृष्णप्रेमाने युक्त झाला. त्याचीच परिणती म्हणजे अर्जुन क्षणार्धात उठून उभा राहिला. त्याने कृष्णाला दोन्ही हात जोडून वंदन केले आणि तो उत्स्फूर्तपणे कृष्णाला म्हणाला.

“कृष्णा, मी आता केवळ तुझ्याच सांगण्याप्रमाणे वागेन आणि कोणत्याही परिस्थितीत तुझेच वचन मी खरे करीन. शब्दाने तू मला सांगितलेले सत्य ज्ञान माझ्या बुद्धीला जरी कळलेले असले तरी ते मला पूर्णपणे आकलन झालेले नाही ही गोष्ट मी जाणून आहे. माझा मोहही दूर झाला आहे असे मला वाटत असले तरी त्या ज्ञानाचा माझ्या बुद्धीठायी निश्चय होणे, ही गोष्ट अजूनही शिल्लकच आहे. परंतु एक गोष्ट मला पूर्णपणे समजली आहे की तू माझ्या प्रेमाचा व माझ्या सहकार्याचा केवढा तरी भरवसा धरलेला आहेस. अर्थात तू माझ्याकडून करत असलेली अपेक्षा ही रास्तच आहे. तुझ्या माझ्यावरील प्रेमामुळे तो तर तुझा हक्कच आहे. तू या युद्धामध्ये विजय प्राप्त करून घेण्याचा जो संकल्प धरलेला आहेस तो मी जिद्दीने पूर्ण करीन, याची तू शंभर टक्के खात्री बाळग.”

अर्जुनाच्या या प्रतिक्रियेने कृष्ण आनंदित झाला. अर्जुनाला पुन्हा उत्साहाने युक्त अशा अवस्थेत बघून कृष्णही अत्यंत उत्साहित झाला. त्याने पुढे होऊन अर्जुनाचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि त्याला प्रेमाने दृढालिंगन दिले. पुढच्याच क्षणाला अर्जुन रथावर आरूढ झाला. कृष्णही सारथ्याच्या जागेवर आसनस्थ झाला आणि त्याने अत्यंत वेगाने रथ पांडवसेनेच्या अग्रभागी नेला. अर्जुनाने शंख फुंकून युध्द सुरू झाल्याचे सूचित केले मात्र, एवढा वेळ सैन्यापासून दूर गेलेला कृष्ण व अर्जुन यांच्याकडे कुतुहलाने पाहून थोडेसे चिंतितच झालेल्या पांडव सैन्यामध्ये पुन्हा चैतन्य पसरले. पांडव सैन्यामध्ये अनेकांनी शंख फुंकून त्यांचा जोश



प्रगट केला. खरे तर, कृष्ण व अर्जुन यांना रणभूमीपासून दूर गेलेले पाहून दुर्योधनासह सर्व कौरवसेनाही संभ्रमितच झालेली होती. परंतु भीष्माचार्य मात्र सावध होते. कृष्ण व अर्जुन यांचे प्रेमाचे संबंध ते जाणून होते. हे युध्द व्हावे ही मुळात कृष्णाचीच इच्छा आहे आणि त्यासाठी तो अर्जुनाला पूर्णपणे प्रेरित करणार याची भीष्मांना पूर्ण खात्री होती. त्यामुळे अर्जुनाने युध्दासाठी शंख फुंकल्यावरती क्षणाचाही विलंब न लावता भीष्मांनी जोराने शंख फुंकला. त्याबरोबर कौरव सैन्यातही उत्साहाचे वारे वाहू लागले. उभय सैन्यामध्ये रणवाद्ये वाजू लागली आणि दोन्ही सैन्ये परस्परांवर चालून गेली. रथाला रथ व योद्ध्याला योध्दा भिडू लागले. तलवारींचा खणखणाट, धनुष्यांचा टणत्कार व गदेच्या आघातांमुळे घुमणारा आवाज यामुळे जिकडे तिकडे एकच कोलाहल माजून राहिला आणि तुंबळ युध्दाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली.”

युद्धाची सुरूवात कशी झाली हे सांगताना नारदाच्या वाणीनेही वेग घेतला आणि त्याच्या मुखातून भराभर शब्द बाहेर येऊ लागले. नारदाच्या बोलण्याच्या अचानक वाढलेल्या वेगाने लक्ष्मी तर चकितच झाली आणि स्तब्धही झाली. थोड्या वेळाने तिला तो वेग सहन होईना. त्या वेगाशी जमवून घेणे लक्ष्मीला कठीणच होऊ लागले म्हणून लक्ष्मीने लागलीच तिचे दोन्ही कर जोडून नारदाला वंदन केले आणि त्याचे लक्ष तिच्याकडे वेधून घेतले. लक्ष्मीची असहाय्यता नारदाच्या लगेचच लक्षात आली आणि त्याने त्याचे बोलणे प्रयत्नपूर्वक थांबवले. लक्ष्मीची भांबावलेली अवस्था पाहून नारदाला गंमत वाटली आणि तो किंचित स्मित करीत लक्ष्मीकडे अपेक्षेने बघत राहिला. नारदाठायीची अपेक्षा लक्ष्मीच्या लक्षात आली आणि तिने तिचे मन मोकळे करावयास सुरुवात केली.

“अरे नारदा, तू तर एकदम युद्धाचे वर्णन सुरूच केलेस आणि एकदा का युद्धाचे वर्णन सुरू झाले की मग तुझ्या बोलण्याला किती वेग येईल याची चुणूक मला आता सुरुवातीलाच कळली. पण माझ्या दृष्टीने कृष्ण व अर्जुन यांच्यामध्ये झालेला संवाद हाच महत्त्वाचा व अभ्यसनीय आहे. कारण त्यामध्ये कृष्णाने अर्जुनाला अत्यंत मूलभूत असे ज्ञान सांगितले आहे. प्रत्येक सामान्य जीवाचे ईश्वराशी व पर्यायाने व्यापक परमेश्वराशी

असलेले नातेच कृष्णाने अर्जुनाच्या निदर्शनास आणून दिले आणि तेच एकमेव सत्य आहे असे अर्जुनाच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्नही कृष्णाने अगदी मनःपूर्वक केल्याचेही मला जाणवते. त्याचा अर्जुनावर तात्कालिक तरी परिणाम निश्चितच झाला असे मला वाटते. पण ते ज्ञान अर्जुनाला पूर्णपणे आकलन झाले नाही असे त्यानेच प्रांजळपणे कबूलही केले. मग अर्जुनाच्या मनाठायी निर्माण झालेला मोह दूर झाला असे जे त्याला वाटले, ते तरी खरे होते की नाही? की तीही अर्जुनाची तात्कालिकच समज होती?

नारदा, अर्जुनाठायी कृष्णाचे प्रेम जागे झाले आणि त्याच्या मनाने पुन्हा उभारी घेतली या गोष्टीचे मला अधिक अप्रूप वाटत आहे. कारण त्या प्रेमामुळेच अर्जुनाच्या मनाने बळ घेतले आणि कृष्णप्रेमासाठी तो युद्धाला तयार झाला. कृष्ण एवढा वेळ अर्जुनाशी बोलल्याचे हे फळ जणू कृष्णालाच मिळाले, असेच म्हणावयास हवे. कारण कृष्ण अर्जुनाशी किती आर्ततेने व कळवळयाने बोलत होता. त्या मागचे कृष्णाचे प्रेम अर्जुनाला जाणवले हेही सुदैवच म्हणावे लागेल. शेवटी का होईना, पण कृष्णप्रेमाची मात अर्जुनावर झाली हेच खरे! ऐनवेळी कृष्णप्रेमच अर्जुनाच्या व कृष्णाच्याही कामाला आले. अर्थात् ही गोष्ट चांगलीच झाली. पण मग जे काही ज्ञान कृष्णाकडून अर्जुनासाठी प्रगट झाले ते पुढे तरी कधी अर्जुनाच्या कामाला आले की नाही? कृष्णाकडून प्रगटलेले एवढे सत्यज्ञान वाया जाणे योग्यच नाही. तेव्हा अर्जुनाने पुढे त्या ज्ञानाचा विचार करून त्याचा अनुभव घेतला की नाही? हा विचार माझ्या मनात जरा प्रकर्षानेच येत आहे. तेव्हा या महत्त्वाच्या विषयातील गाभा तू मला आधी नीटपणे समजावून सांग आणि मगच युद्धाचे वर्णन करून सांग. कारण युद्ध अर्जुनाने नक्कीच जिंकले असणार याची मला पूर्ण खात्री आहे. पण माझे मन ज्या विचारात अडकून बसलेले आहे त्यातून ते जेव्हा पूर्ण मोकळे होईल, तेव्हाच मला ती युद्धकथा ऐकण्याचा आनंद अनुभवणे शक्य होईल. होय की नाही?”



लक्ष्मीच्या बोलण्यातील आशय नारदाच्या लक्षात आला आणि त्याच्या मनाला समाधान वाटले. कारण लक्ष्मीचे प्रश्न हे तिच्या मननशीलतेचे द्योतक होते. श्रवण करीत असताना त्यातील गाभा सेवन करण्याची आणि विषयाचे मूळ जाणून घेण्याची आवश्यकता, लक्ष्मीला म्हणूनच जाणवत होती आणि नारदाला त्याचेच कौतुक व महत्त्व जाणवत होते. लक्ष्मीची ही श्रवणभक्तीच नारदाला भक्तिगायनासाठी अधिक उत्साहित करीत होती. त्यामुळे लक्ष्मीच्या प्रश्नाचे निमित्त करून नारदाने त्याच्या अंतःकरणातील आनंद अनुभवण्याची संधी साधली आणि बोलावयास सुरुवात केली.

“लक्ष्मी, तुझ्या मनात आलेले प्रश्न हे योग्यच आहेत, कारण कृष्णाकडून अर्जुनासाठी सत्य ज्ञान प्रगट झाले ही गोष्ट जेवढी खरी आहे, तेवढेच हेही खरेच आहे की ते ज्ञान एका विशिष्ट प्रसंगाच्या निमित्ताने प्रगट होत असल्यामुळे प्रासंगिकही होते. अर्जुनाला युध्दाला प्रवृत्त करणे हा त्यामागील एकमेव हेतू होता. अर्जुनाच्या बुध्दीवर मोहाचे सावट असल्यामुळे अर्जुनाची विचारशक्तीच कुंठीत झाली होती आणि त्यामुळे साहजिकच अर्जुनाठायीचा विवेकही लुप्त झाला होता. म्हणून कृष्णाने अर्जुनाला मूलभूत सत्य ज्ञान सांगून त्याला त्याचे प्राप्त कर्तव्यकर्म करण्याचे महत्त्व व जरूरीही पटवून दिली. खरे तर, कृष्णाच्या मुखातून ज्ञान श्रवण करीत असताना अर्जुनाठायीची जिज्ञासूवृत्ती जागृत झाली आणि त्याने त्यापोटी कृष्णाला अनेक प्रश्नही विचारले आणि कृष्णानेही अर्जुनावरील प्रेमापोटी त्या प्रश्नांची शास्त्रोक्त व सविस्तर उत्तरे देऊन, एक प्रकारे अर्जुनाचे लाडच पुरवले असेच म्हणावे लागेल. कारण त्या प्रश्नांचा, कृष्ण प्रतिपादन करीत असलेल्या विषयांशी तसा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थार्थी संबंध नव्हता. परंतु कृष्णाने चर्चिलेले ते सर्व विषय तुला सांगण्याचे मी मुद्दामच टाळले. कारण कृष्णमाहात्म्य जाणून घेण्याच्या दृष्टीने ते अप्रस्तुतच आहेत. खरे तर, प्रत्यक्ष युद्धभूमीवर एवढ्या विषयांची चर्चा करायला वेळच नव्हता. त्यावेळेस कृष्णाने अर्जुनाशी थोडक्यातच, पण नेमके बोलणे केले होते. पण पुढे माझा शिष्य असलेले महर्षी व्यास हे ‘महाभारत’ ग्रंथ लिहित असताना त्यांच्या लिखाणात जेव्हा या कृष्णार्जुन संवादाचा उल्लेख आला तेव्हा व्यासांना तो अतिशय भावला. कृष्णाने

अर्जुनाशी केलेला अद्‌भुत संवाद आणि त्यावेळी प्रगटलेले कृष्णाचे अती अद्‌भुत रूप व्यासांच्या अंतःचक्षुसमोर प्रगट झाले आणि म्हणूनच पुढे त्यांनी त्या संवादाचा विस्तार करून एक वेगळा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाला 'भगवान कृष्णाने गायन केलेली' म्हणून 'भगवद्-गीता' असे नामाभिधान प्राप्त झाले. कृष्णाने जणू वेदरूपी गायीचे दोहन करून हे गीतारूपी दुग्धच अर्जुनाला अत्यंत प्रेमाने प्राशन करविले जेणेकरून अर्जुनाचे मन धष्टपुष्ट व्हावे आणि तो पराक्रम करण्यासाठी प्रवृत्त व्हावा.

हे लक्ष्मी, पुढे हाच भगवद्गीता ग्रंथ आध्यात्मिक मार्गियांसाठी मानदंड ठरला आणि त्या ग्रंथाचा अभ्यास करून त्यातील ज्ञानाचा, साधक बुद्धीठायी निश्चय करू लागले. परंतु भगवद्गीता हा ग्रंथ मुळातच गुरूशिष्य या नातेसंबंधात घडलेला संवाद आहे. त्यामुळे त्या ग्रंथाचा अभ्यास सद्‌गुरूंच्या मार्गदर्शनाशिवाय स्वतंत्रपणे करता येणे शक्यच नाही. खरे तर, शिष्यावरील प्रेमापोटी गुरूंच्या मुखातून प्रगटणारे सत्यज्ञान हीच त्या शिष्यासाठी 'गीता' आहे. पण ही गोष्ट ज्यांच्या लक्षात आली नाही त्यांनी गीता या ग्रंथाचाच केवळ अभ्यास करून त्यातील ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना बुद्धीचे शाब्दिक ज्ञान जरूर मिळाले, परंतु त्या ज्ञानाचा अनुभव त्यांना घेता आला नाही. कारण सद्‌गुरूकृपेशिवाय आत्मप्रचिती नाही आणि सद्‌गुरूभक्तीशिवाय सद्‌गुरूकृपा नाही हेच सत्य आहे. अशी सद्‌गुरूभक्ती त्यांच्या सहवासामुळे, सेवेमुळे व त्यांच्याशी साधलेल्या संवादामुळेच घडते. परंतु अर्जुनाच्या बाबतीत हे सर्व घडायचे बाकी राहिलेले होते, ही वस्तुस्थिती होती. त्याच्यावरती केवळ शब्दानेच ज्ञानाचा संस्कार घडलेला होता. परंतु त्या ज्ञानाचे माहात्म्य व मूल्य त्याला यथार्थतेने कळले नव्हते, ही गोष्ट खरीच होती आणि अर्जुनाने ती गोष्ट प्रांजळपणे कबूलही केली होती.

लक्ष्मी, परंतु अर्जुनाच्या बाबतीत एक गोष्ट चांगली व योग्य घडली की त्यावेळी अर्जुनाठायीच्या कृष्णप्रेमाची मात झाली. 'कृष्णप्रेमाला आपण जागायला हवे आणि कृष्णाच्या धर्मस्थापनेच्या कार्याला आपण सर्वतोपरी मदत करायला हवी' हा विचार अर्जुनाठायी प्रबळ झाला.



कृष्णप्रेमाच्या तात्कालिक प्रभावामुळे का होईना, पण त्याच्या ठिकाणचे नैराश्य पूर्णपणे बाजूला हटले आणि तो कृतनिश्चयाने युद्धाला उभा राहिला. पण एक गोष्ट लक्षात ठेव की अर्जुनाच्याठायीचा तात्कालिक मोह जरी दूर झाला असला, तरी त्याच्याठायीचे मोहाचे मूळ काही नष्ट झाले नव्हते. 'माझा मोह नाहीसा झाला' असे जरी अर्जुनाला वाटत होते तरी तसे ते झालेले नव्हते किंवा तसे ते सहजासहजी घडणे शक्य नव्हते, हे कृष्ण जाणून होता. त्यामुळे 'तुझा मोह नष्ट झाला आहे' असे कृष्ण काही अर्जुनाला म्हणाला नव्हताच. कारण ते मोह पुन्हा पुन्हा कोणत्याही कारणाने मनाला ग्रासू शकतात आणि मग अशा वेळी मोहाची मात होऊन मनातील प्रेम दुर्बल व हतबल ठरते.

लक्ष्मी, मागे एकदा हाच अर्जुन चित्रसेन गंधर्वाच्या निमित्ताने केलेल्या प्रतिज्ञेत स्वतःच अडकून बसला होता आणि खुद्द कृष्णाविरूद्धच युद्धाला उभा ठाकला होता, या गोष्टीचे तुला निश्चितच स्मरण असणार. त्यावेळेस अर्जुनाचे कृष्णप्रेम कमीच पडले होते ही गोष्ट तर खरीच आहे ना? अर्थात यावेळेस अर्जुनाच्याठायीच्या कृष्णप्रेमाची मात झाली ही गोष्ट निश्चितच कौतुकाची आहे, यात जराही संशय नाही. पण प्रेमाला दुर्बल करणारे मोहाचे मूळ मात्र अर्जुनाच्याठायी अजूनही कायम होते ही गोष्टही तेवढीच खरी आहे. त्यासाठी अर्जुनाने कृष्णाचा सहवास करून व त्याच्याशी संवाद साधूनच ते मोहाचे मूळ पूर्णपणे नष्ट करणे हे अत्यंत आवश्यक होते. कारण मोह समूळ नष्ट झाल्यावरतीच प्रेमाची मात कायमची होऊन रहाते हेच सत्य आहे. अर्थात त्या युद्धप्रसंगी तसा संवाद करणे शक्यच नव्हते. पण युद्ध समाप्तीनंतर तरी अर्जुनाने कृष्णाचे माहात्म्य जाणून त्याचा सहवास केला का आणि त्याच्याशी संवाद करून खरी निर्मोही अवस्था प्राप्त करून घेतली का? कृष्णाकडून शब्दाने श्रवण केलेल्या आत्मज्ञानाचा अर्जुनाच्या बुद्धीठायी निश्चय झाला का आणि त्याच्या चित्ताठायी ईश्वरप्राप्तीचा ध्यास लागून अर्जुनाला खरेच आत्मानुभवाच्या रूपाने ईश्वर प्राप्ती झाली का? या तुला अपेक्षित असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे कथेच्या प्रवाहाच्या ओघात पुढे तुला

सहजपणे मिळणारच आहेत. तोपर्यंत मात्र, तुझ्या अधीर मनाला जरा धीर धरावयास सांग म्हणजे झाले.”

नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत असताना लक्ष्मी अत्यंत प्रभावित होत होती. नारदाचे बोलणे संपत असतानाच लक्ष्मी उद्गारली,

“नारदा, तुझी खरेच कमाल आहे. कोणताही विषय तू नुसता वरवर सांगून सोडून देत नाहीस, तर त्याच्या अगदी मुळापर्यंत जाऊन तो विषय सर्वांगाने व यथार्थपणे प्रगट करतोस. त्यामुळे कोणत्याही शंकेला खरेतर मनामध्ये थाराच रहात नाही. पण तरीही मनामध्ये प्रश्न हे निर्माण होतच रहातात. त्याचे कारण मला वाटते मनाच्या विचार करण्याच्या गुणधर्मात आहे. पण मन जर ईश्वरी प्रेमाने भरलेले असेल आणि बुद्धीठायी ईश्वरी माहात्म्याचा पूर्ण निश्चय असेल तर मात्र, मनात निर्माण होणारे प्रश्न हे कोणत्याही प्रकारच्या शंकेतून निर्माण न होता ईश्वराचे माहात्म्य यथार्थपणे जाणून घेण्याच्या भक्तिभावामधूनच ते प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे ईश्वराचे माहात्म्य अधिकाधिक अंगाने व विविध रंगाने प्रगट होते. नेमके तेच व तसेच होत आहे आणि त्याचा मात्र, मला निश्चितच आनंद होत आहे.

नारदा, तू व्यक्तिगत प्रेमाचे जसे महत्त्व सांगितलेस तसेच त्याच्या मर्यादाही दाखवून दिल्यास, हे अगदी योग्यच केलेस. व्यक्तिगत प्रेमाचा नेम नसतो. त्या प्रेमामध्ये सातत्यही नसते. त्यामुळेच त्या प्रेमाचा निश्चित असा भरवसा असत नाही. काहीवेळा ते प्रेम कामाला येते तर काही वेळेला ऐनवेळी ते कामाला येतही नाही. तरीही त्या प्रेमाचाच भरवसा धरून रहावे हे लागतेच आणि कृष्णही अर्जुनाविषयीचा नेमका तोच भरवसा धरून होता, कारण त्यालाही तेवढेच करणे शक्य होते. त्या भरवशापोटीच कृष्णाने अर्जुनाला कौरवांशी युद्ध करण्यासाठी प्रवृत्त केले. त्याने अर्जुनाच्या रथाचे सारथ्यही स्वीकारले. एवढेच नव्हे, तर युद्धासारखी कठीण परिस्थिती असताना आणि त्याहीपेक्षा कठीण अशी अर्जुनाची मनःस्थिती असताना कृष्णाने अर्जुनासाठी सत्यज्ञान प्रगट केले, तेही अर्जुनावरील त्याच भरवशाने! पण एवढे करून कृष्णाने घेतलेल्या



कष्टांचे चीज झाले हे महत्त्वाचे. अर्जुनाच्या मनावर आलेले मोहाचे आवरण तात्कालिक का होईना, पण दूर झाले आणि तो युद्धाला उभा राहिला हे चांगले झाले. ते युद्ध कृष्णाच्या मार्गदर्शनानुसार अर्जुनानेच जिंकले असणार, हे तर निर्विवादच आहे. त्या युद्धाचा तपशील सांगण्यात तुला व ऐकण्यात मलाही स्वारस्य नसणे अगदी साहजिकच आहे. कारण त्यामध्ये सगुण प्रेमरस असणे शक्यच नाही. पण मला खात्री आहे की युद्धामध्येही अनेक प्रकारचे प्रसंग हे घडले असणारच. पांडवांनाही अनेक अडचणी व संकटे आली असणारच आणि त्या त्या वेळी कृष्णाचे पांडवांवरील प्रेमही वेगळ्या अंगाने व रंगाने प्रगट हे झाले असणारच. तेव्हा कृष्णाचे माहात्म्यही विशेषत्वानेच प्रगट झाले असणार, हेही साहजिकच आहे. तेच श्रवण करण्यात मला रस आहे. कारण त्यामध्येच कृष्णप्रेमाचा रस पूर्णपणे भरलेला आहे, ही गोष्ट सत्य आहे आणि तू ते वर्णन करून सांगू लागलास की तो प्रेमरस भरभरून ओसंडणार आहे, हेही नक्कीच आहे. तृप्त करूनही तहान वाढविणारा तो प्रेमरस सेवन करण्याची माझी आर्तता आता अगदी पराकोटीची वाढली आहे. नारदा, तरी तू मला आता फार काळ तहानलेली ठेवू नकोस."

लक्ष्मीच्या आर्ततेचा स्पर्श नारदाच्या मनाला झाला मात्र, त्याचे मनही लागलीच आर्त झाले आणि सगुण प्रेमरसाचे सेवन करण्यासाठी अतिशय तहानले. त्यासाठी मग त्या मनाने नारदाच्या अंतःकरणातच नित्य स्त्रवणाऱ्या प्रेमरसामध्येच उडी घेतली आणि ते तेथे पूर्णपणे बुडालेही. प्रेमरस सेवून आर्ततेची पूर्तता झाल्यानंतर नारदाचे मन त्या प्रेमरसातच वेगळेपणाने क्रीडा करू लागले आणि नारदाच्या अंतःकरणात सगुण प्रेमभक्तीचा आनंददायी खेळ पुन्हा सुरू होऊन रंगू लागला. त्या रंगानेच शब्दरूपाचे अंग धरले आणि नारदाच्या मुखातून शब्दरंग प्रगट होऊन कृष्णचरित्राचे रंगीबेरंगी शब्दचित्र रेखाटले जाऊ लागले.

"हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. त्या युद्धामध्ये अंतिम विजय अर्जुनाला म्हणजेच पर्यायाने पांडवांना मिळाला, हे खरेच आहे. अर्थात कृष्णासाठी तो विजय हा सद्धर्माचा होता आणि म्हणूनच कृष्णासाठी त्या विजयाचे विशेष अप्रूपही होते. कारण त्या युद्धामुळे

अधर्मीय शक्तींचा ऱ्हास झाला. काळाच्या नियतीनुसार अधर्माचा संपूर्णतः निःपात होणे जरी शक्य नव्हते, तरी त्याला आळा मात्र निश्चितच बसला आणि सद्धर्माला पुन्हा वर येण्यासाठी संधी मिळाली. परंतु सज्जनांची दुर्बलता नाहीशी होऊन ते पुन्हा पूर्ण सबळ होणे मात्र, अजूनही शिल्लक राहिलेले होतेच. त्याशिवाय त्या सज्जनांठायी आत्मधर्माची संस्थापना होणे शक्यच झाले नसते. कारण त्यासाठी सज्जनांनी सद्‌गुरूंना अनन्यभावे शरण जाऊन आत्मधर्माची आधी ओळखण, मग ज्ञान व अंती त्याचा अनुभव घेणे या सन्मार्गाने जाणे आवश्यक होते. नेमके तेच घडण्याची शक्यता कालमानानुसार दुरावत चालली होती. परंतु कृष्णाच्या स्वभावाप्रमाणे त्याच्याकडून तसा प्रयत्न मात्र निश्चितच घडत होता. सर्व प्रथम कृष्ण स्वतः शिष्यभावाने सांदिपनी ऋषींना शरण गेला आणि त्यानंतर त्याने त्याच्या स्वानुभवाचे ज्ञान अर्जुनासाठी प्रगट केले. खरे तर, अर्जुनाठायी शिष्याचा अनन्यभाव आलेला नव्हताच आणि ही गोष्ट कृष्णही पूर्णपणे जाणून होताच. ‘मी तुला शिष्य म्हणून शरण आलो आहे’ असे अर्जुन जरी केवळ शब्दाने म्हणाला होता, तरीही कृष्णाने मात्र लागलीच ती संधी साधली. अर्जुनावर त्या आत्मज्ञानाचा शब्दाने का होईना, पण संस्कार केला आणि त्या निमित्ताने पुढे त्या ज्ञानाचा अनुभव घेण्याची मानवी जन्मातील अमूल्य संधी, अर्जुनासाठी उपलब्ध करून ठेवली. कृष्णाने त्याचे अर्जुनासंबंधीचे कार्य पुरे केले. त्याची पूर्तता करण्याचे कार्य अर्जुनाचे होते. ते त्याच्याकडून पूर्णपणे घडले की नाही, हा इतिहास पुढचा आहे. त्याविषयी आत्ताच बोलणे नको. नाहीतर विषयांतर होईल आणि कथेचे सूत्र सुटून आपण ते हरवून बसू.

लक्ष्मी, युद्धामध्ये कृष्ण हा प्रत्यक्ष सहभागी असल्यामुळे अर्थातच काही विशेष प्रसंग निश्चितच घडले. मुळात प्रसंग युद्धाचाच असल्यामुळे रोमहर्षक प्रसंग अनेक निर्माण झाले. पांडवांसाठी अनेक अडचणींचे प्रसंगही आले. त्याप्रसंगी काही वेळा ते अगतिक व निराशही झाले. परंतु कृष्णाने मोठ्या कौशल्याने त्या अडचणींतून त्यांना सुखरूप पार नेले. कृष्णाच्या मार्गदर्शनाने, पांडवांनी अचानक उद्भवलेल्या संकटांवरतीही मात केली. त्याचबरोबर कृष्णाच्या अस्तित्वामुळे काही प्रसंग कृष्णप्रेमाचे किंवा कृष्णाविषयीच्या भक्तिभावातून घडले. त्या प्रसंगांचेच वर्णन मी



विशेषत्वाने करून सांगणार आहे. तेच प्रसंग खऱ्या अर्थाने माझ्यासाठी वर्णनीय आहेत आणि तुझ्यासाठीही श्रवणीय आहेत. कारण त्या प्रसंगातून कृष्णप्रेमाचा रस व कृष्णमाहात्म्याचे विशेषत्व प्रगट झालेले आहे आणि जेथे कृष्णप्रेम आहे व जेथे कृष्णमाहात्म्य आहे, तेथेच भक्तिभावाचा उगम आहे; तेथेच आनंदाचा खरा अनुभवही आहे आणि असा आनंद अनुभवण्यासाठीच तर आपण या कृष्णचरित्राचे गायन करीत आहोत.

* * * * *

# भीष्मांचा पराक्रम

हे लक्ष्मी, कौरव व पांडव यांच्यातील घनघोर युद्ध सुरू झाले तेव्हा सुरुवातीला कौरवांचे सेनापती, अर्थातच भीष्मच होते आणि पांडवांचा सेनापती साहजिकच अर्जुनच होता. दोघांच्याही अधिपत्याखाली दररोज निरनिराळी व्यूहरचना होऊन युद्ध लढले जाऊ लागले. भीष्मांनी तर अतुलनीय पराक्रम गाजवला आणि पांडवसेनेला जर्जर करून सोडले. भीष्मांपुढे अर्जुनाचाही पराक्रम फिकाच पडू लागला. भीष्मांपुढे जेव्हा अर्जुनाचे काहीच चालेनासे झाले तेव्हा कृष्णाच्या ठिकाणी काळजीच निर्माण झाली. कृष्णाच्या मुखावरील प्रगटलेली अस्वस्थता भीष्मांच्याही लक्षात आली आणि त्यांना कृष्णाच्या अर्जुनावरील प्रेमाचे कौतुक वाटले. भीष्मांच्या अंतःकरणात कृष्णाविषयीचा भक्तिभाव असल्यामुळे, त्यांना युद्धाच्यावेळचे कृष्णाच्या मुखावरील नानाविध भाव आनंदितच करीत होते. कृष्णाने मांडलेल्या या धर्म-अधर्माच्या युद्धरूपी खेळामध्ये सहभागी व्हायला मिळाले याचा भीष्मांना आनंदच झाला. ‘दैववशात आपण कृष्णाच्या विरूद्ध पक्षामध्ये आहोत’ या गोष्टीचा खेद न मानता, त्याहीपेक्षा आपण कृष्णाच्या सन्मुख आहोत यातच भीष्मांनी धन्यता अनुभवली. कृष्णमुखावरील अनेक भावांच्या छटा भीष्मांच्या मनाला सुखवीत होत्या. कृष्णाच्या सारथ्य कौशल्याला भीष्म मनापासून दाद देत होते. अर्जुनाला प्रोत्साहित करण्यासाठी कृष्ण अनेक परी करीत असल्याचे भीष्मांच्या लक्षात येत होते आणि त्या कृष्णलीला भीष्मांच्या मनाला अधिकच आनंदित करीत होत्या.

लक्ष्मी, एक दिवस तर भीष्मांकडून एवढा अद्वितीय पराक्रम प्रगट झाला की सर्व पांडव सैन्य तर हैराण झालेच, पण अर्जुनही एकदम दिग़्मूढच झाला. भीष्म एवढ्या वेगाने अर्जुनावर बाण सोडू लागले की अर्जुनाला धनुष्याला बाण लावता येणेही अशक्य होऊ लागले. अर्जुनाची कित्येक धनुष्ये मोडूनच पडली. अर्जुनाचे अनेक रथही कोलमडून पडू लागले. कृष्णाने त्वरेने अनेक नवीन रथ व घोडेही बदलले. पण भीष्मांच्या वेगवान बाणवर्षावापुढे अर्जुन अगतिकच होऊ लागला. अर्जुनाची वाढत जाणारी निष्क्रियता कृष्णाला अधिकाधिक अस्वस्थ करू लागली.

अर्जुनाची झालेली ही दुर्दशा कृष्णाला पाहवेना. अर्जुनाची असहाय्यता कृष्णाच्याच मनाला जास्त त्रास देऊ लागली. त्याच्या प्रिय अर्जुनाला नामोहरम करीत असलेल्या भीष्मांना पाहून कृष्णाचा राग अनावर झाला. क्षणार्धात जराही विचार न करता कृष्णाने रथातून खाली भूमीवर उडी घेतली आणि तेथे रणांगणातच पडलेले एक रथचक्र आपल्या हातात घेऊन कृष्ण त्वेषाने भीष्मांवर चालून गेला. कृष्णाची ही कृती एवढ्या उत्स्फूर्तपणे व एवढ्या वेगाने घडली की भीष्मही स्तंभितच झाले. एका हातात रथचक्र आणि रागाने लालबुंद झालेले कृष्णाचे मुखकमल, अशी ती प्रिय कृष्णाची मूर्ती पाहून भीष्म तर अत्यंत भावपूर्णच झाले. त्यांनी हातातील धनुष्यबाण त्वरित रथातच टाकले आणि रथातून उडी मारून भीष्म कृष्णापुढे येऊन उभे राहिले. भीष्म आपले दोन्ही गुडघे टेकून कृष्णासमोर बसले आणि त्यांनी दोन्ही कर जोडून कृष्णाला भक्तिभावाने वंदन केले. कृष्णाविषयीच्या भक्तिभावाने भीष्मांचा उर भरून आला आणि ते कृष्णाला म्हणाले,

"अरे भक्तप्रेमी कृष्णा, तुझे हे तुझ्या भक्तावरील प्रेम पाहून मी धन्यच झालो. अर्जुनावरील प्रेमापोटी 'मी करी शस्त्र धरणार नाही' ही तू केलेली प्रतिज्ञा, तू अगदी सहजपणे मोडलीस, हेच तर तुझे माहात्म्य आहे. भक्तांवरील प्रेमापोटी जणू तूच त्यांची सेवा करीत असतोस आणि भक्तांचे नेहमी प्रिय करण्यासाठीच तू तुझे सर्व जीवनच व्यतीत करीत असतोस. तुझ्या प्रतिज्ञेपेक्षाही तुझे अर्जुनावरील प्रेमच कित्येक पटीने अधिक आहे. म्हणूनच तुझी प्रतिज्ञा भंग झाल्याचा तुला जराही खेद नाही. या तुझ्या भक्तप्रेमापुढेच मी विनम्र आहे आणि तुला शतशः वंदन करीत आहे. पण त्याचबरोबर 'मी युद्धात कृष्णाला हाती शस्त्र धरावयास लावीनच' हा माझा शब्दही तू खरा केला आहेस, त्याचा मला अर्थातच विशेष आनंद आहे. कृष्णा, हा धर्म-अधर्माच्या युद्धाचा खेळ तुझ्याच प्रेरणेने आणि तुझ्याच अधिष्ठानावर सुरू झालेला आहे. त्यामध्ये अंतिम विजय तुझाच म्हणजेच पर्यायाने धर्माचाच आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. कारण जेथे योगेश्वर कृष्ण आहे आणि धनुर्धारी पार्थ आहे तेथेच यश आहे हे सत्य आहे. या युद्धात कौरवांचा पराभव आहे हे तर विधिलिखीतच आहे. पण

मी केवळ कर्तव्यभावनेनेच हे युद्ध करीत आहे, हे तूही जाणून आहेस. मात्र तुझ्या भक्तिभावाने युक्त राहूनच, या युद्धभूमीवरतीच मी देहत्याग करणार आहे. तेवढीच कृपायाचना मी तुझ्याकडे करीत आहे. त्याला तू 'तथास्तु' म्हणावेस हीच तुझ्या चरणी माझी प्रार्थना. त्यातूनही तुझ्या हस्ते मला आताच मृत्यू येणार असेल, तर माझ्यासारखा भाग्यवान मीच!"

असे म्हणून भीष्मांनी त्यांचे दोन्ही कर जोडून कृष्णाला पुन्हा भक्तिभावपूर्वक वंदन केले. भीष्मांच्या भक्तिभावाने प्रसन्न झालेल्या कृष्णाने पुढे होऊन भीष्मांच्या मस्तकावर त्याचा कृपाकर ठेवला आणि भीष्मांचे मस्तक हळुवारपणे कुरवाळून थोपटले. कृष्णाच्या त्या प्रेमळ स्पर्शाने भीष्मांचे सर्वांग पुलकीत झाले आणि त्याच आनंदाच्या भरात उठून भीष्म त्यांच्या रथाकडे धीमी पाऊले टाकीत चालू लागले. तेवढ्यात अर्जुनही धावत धावत कृष्णाजवळ येऊन उभा राहिला आणि त्याने कृष्णाच्या कमरेला मिठी मारून त्याला पुन्हा मागे वळवले. स्वतः स्वतःवरच रागावलेला अर्जुन काकुळतीच्या सुरात कृष्णाला विनवू लागला.

"अरे कृष्णा, तू माझ्यासाठी तुझी प्रतिज्ञा भंग करू नकोस. खरे तर, त्यामध्ये तुझी काहीच चूक नाही. त्याचा सर्व दोष माझ्याकडेच जातो. माझे प्राण वाचविण्यासाठी तुला हातात शस्त्र धरण्याची वेळ यावी, हा तर माझ्या पराक्रमाचाच अवमान आहे. माझ्या क्षत्रियधर्माचाही धिक्कारच आहे. पण तुला खरेच सांगतो की भीष्मांच्यापुढे माझा नाइलाजच होत होता. भीष्म मलाच काय पण कोणालाही केव्हाही आटोपणे कधीच शक्य नाही. या त्रिभुवनातही असा कोणी वीर जन्मलेला नाही, की जो भीष्मांना हरवू शकेल. भीष्माचार्य माझे पितामह आहेत या गोष्टीचाही माझ्या मनावरती परिणाम होत असावा, असे मला अगदी निश्चितपणे वाटते. कारण त्यांच्याशी लढत असताना माझे मन थोडेसे कचरते आणि आपसूकच माझा हातही थोडासा आखडतोच, हे मलाही जाणवते. पण तरीही मी तुला आता वचन देतो, की तू दिलेल्या ज्ञानाचे स्मरण ठेवून मी माझे मन सबळ करीन आणि भीष्मांशी आताच्या आता प्राणपणाने लढून



त्यांचा निश्चितपणे पराभव करीन. हा मी दिलेला शब्द आहे एवढे लक्षात ठेव. आपण पुन्हा रथात बसून आता युद्धाला सुरुवात करूया.”

अर्जुनाची झालेली केविलवाणी अवस्था पाहून कृष्णाला त्याचा कळवळा आला. त्याने अर्जुनाच्या खांद्यावर आपला हात ठेवून त्याला सांत्वनपर थोपटले आणि तो अर्जुनाशी बोलू लागला.

“तू असा निराश होऊ नकोस आणि असा घायकुतीलाही येऊ नकोस. मुख्य म्हणजे भीष्मांच्याकडे नात्याच्या दृष्टीने पाहून त्यांचा मनावर दबाव घेऊ नकोस. त्यांच्याकडे केवळ युद्धातील प्रतिस्पर्धी म्हणूनच पाहा. त्यासाठी तू प्रत्यक्ष भीष्मांनाच आदर्श मान. ते तुझ्याकडे कोणत्याही नात्याने पहात नसून, तुझ्याकडे फक्त एक युद्धातील प्रतिस्पर्धी म्हणूनच पहात आहेत. काहीही करून तुझा पराभव करायचा चंगच भीष्मांनी बांधलेला आहे आणि म्हणूनच ते एवढ्या त्वेषाने तुझ्याशी लढत आहेत, हे लक्षात घे. तूही त्यांच्यापासूनच प्रेरणा घेऊन त्यांचा पराभव करण्यासाठी सज्ज हो. त्यासाठी तुला निकराचे प्रयत्न करावे लागणार आहेत, हे तर आता निश्चितच झालेले आहे आणि तसा प्रयत्न करण्याची तुझी क्षमता नक्कीच आहे. फक्त तुझी ती क्षमता पूर्णपणे प्रगट होणे आवश्यक आहे आणि त्याचकडे तुझे व्यवधान ठेव. इतर कोणत्याही गोष्टींना मनामध्ये थारा न देता, एकीएक युद्ध जिंकण्याच्या विचारावरतीच तुझे मन केंद्रित कर म्हणजे झाले, आणि तुला ते सहज शक्यही आहे.

अर्जुना, मला माझी प्रतिज्ञा मोडावी लागली म्हणून तुला वाईट वाटणे अगदी साहजिकच आहे. परंतु त्याचा सर्व दोष तुझ्याकडेच जातो असे मात्र मुळीच नाही. कारण आज भीष्मांचा पराक्रमच एवढ्या प्रकर्षाने प्रगट झाला की त्यांच्यापुढे कोणाचाही निभाव लागणे शक्यच नव्हते. त्या मानाने तू मात्र त्यांना चांगलीच लढत दिलीस. तुझ्याकडून तू प्रयत्नांची शर्थ करीत होतास आणि तीच गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण तीच गोष्ट आपल्या हातात असते. बाकी यशापयश हे ईश्वराधीन आहे. आता, माझी प्रतिज्ञा माझ्याकडून मोडली गेली याची मला जराही खंत नाही. त्यापेक्षा भीष्मांनी जी प्रतिज्ञा केली होती की ‘मी कृष्णाला हाती शस्त्र

धरायला लावीनच लावीन.'ती खरी झाली, याचाच मला आनंद आहे. कारण भीष्मांनी ती प्रतिज्ञा त्यांच्या पराक्रमाच्या अहंकाराने केलेली नव्हती, तर ती केवळ माझ्यावरील भक्तिभावानेच केली होती. भीष्मांना तसे करण्याचा पूर्ण हक्क आहे, कारण ते माझे परमभक्त आहेत. त्यांच्या भक्तिभावाची पूर्ती झाली याचा मला होणारा आनंद, हा भीष्मांना झालेल्या आनंदापेक्षाही जास्तच आहे. कारण माझ्या भक्ताच्या भक्तिभावाचा विजय झाला म्हणून मला विशेष आनंद होणे हे साहजिकच नाही का? खरे तर, भीष्म हे आत्मज्ञानी आहेत. त्यामुळेच केवळ त्यांचे कर्तव्यकर्म म्हणूनच ते करीत असलेल्या या युद्धकर्माचा त्यांना जराही लेप नाही. कारण त्यांचे अंतःकरण ईश्वरी प्रेमाने भरलेले असल्यामुळे, अत्यंत शुद्ध व निर्मळ आहे. म्हणूनच त्यांच्याकडून सहजभावाने घडणाऱ्या कोणत्याही कर्माचा मळ त्यांच्याठायी निर्माणच होत नाही. त्याचप्रमाणे भक्तिभावाने युक्त असल्यामुळे भीष्मांची वृत्ती ही निरहंकारीच आहे. त्यांच्याठायी जशी सहृदयता आहे, तशीच त्यांच्याठायी तेजस्विताही आहे. कौरवांच्या भर दरबारात द्रौपदीचे लज्जारक्षण भीष्मांनीच केले होते हे तुझ्या लक्षात आहे ना? त्याचे मूळ कारण म्हणजे भीष्मांच्या अंतःकरणाची ही नित्य व सहज अवस्थाच आहे, ही गोष्ट कायमची लक्षात ठेव.

अर्जुना, भीष्मांबरोबर आताच्या आता लागलीच युद्ध करून त्यांना हरवण्याचा तुझा विचार व त्यामागील तुझी जिद्द कौतुकास्पदच आहे. माझ्याठायी तुझ्या पराक्रमाविषयीही जरासुद्धा शंका नाही. किंबहुना, माझ्याठायी त्याची खात्रीच आहे. पण आपण भावनेच्या आहारी न जाता विवेकाने निर्णय घ्यावयास हवा. भीष्मांचा पराक्रम या क्षणाला अत्यंत उंचीला पोहोचलेला आहे. असे असताना त्यांच्याशी युद्ध करणे ही जिद्द न ठरता, तो एक हट्टच ठरेल आणि हट्टीपणाने प्रयत्न केला असता कधीही अपेक्षित फळ मिळत नाही. प्रयत्नाला योग्य काळवेळेची अनुकूलता असणेही तेवढेच आवश्यक असते. खरे तर, आज तूही प्रयत्नांची पराकाष्ठाच केली होतीस. परंतु तरीही तुझा पराक्रम भीष्मांच्या पुढे कमसरस ठरला ही वस्तुस्थिती आहे. आजचा दिवस जणू तुझा नाही असे म्हणून आज

आपण येथेच थांबणे योग्य ठरेल. तेव्हा आता आपण शिबिराकडे परतूया. हे परतणे म्हणजे माघार घेणे आहे असे समजून मनाला उगीच क्लेश देऊ नकोस. कारण हा निर्णय म्हणजे युद्धातील एक धोरणात्मक खेळीच आहे. शिबिरात जाऊन शांत मनाने विचार करूनच आपल्याला पुढील युद्धनीती ठरवावी लागणार आहे. भीष्मांचा पराभव झाल्याशिवाय कौरवांचा पराभव होणे शक्यच नाही, ही गोष्ट सत्यच आहे. त्याचबरोबर भीष्मांचा पराभव करणे ही गोष्ट तर अशक्यप्रायच आहे. कारण भीष्मांना 'स्वेच्छामरणाचा' वर मिळालेला आहे. त्यामुळे त्यांना रणांगणातच निष्क्रिय करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला शांत मनाने व स्वस्थ चित्ताने काही तरी वेगळीच योजना आखावी लागणार आहे. तेव्हा आता आपण निघूया."

असे म्हणून कृष्णाने लगबगीने अर्जुनाला रथात नेऊन बसवले आणि स्वतःही रथात बसून युद्धभूमीपासून दूर असलेल्या पांडवांच्या शिबिराच्या दिशेने रथ त्वरित हाकला. कृष्णाच्या बोलण्याचा व कृतीचा विचार करीत असलेला अर्जुन थोडासा संभ्रमितच झाला. कृष्णावरील विश्वासाने अर्जुनही काही न बोलता कृष्णासह शिबिरात पोहोचला खरा, परंतु त्याचे मन मात्र अजूनही मागे युद्धभूमीवरच होते. भीष्मांच्याबाबतीत घडलेल्या प्रसंगाचे विस्मरण अर्जुनाला प्रयत्न करूनही होत नव्हतेच. तरीही त्याच्या मनातील चलबिचल बाह्यांगाने न दर्शविता अर्जुन प्रयत्नपूर्वक शांत राहिला होता."


असे म्हणून नारदही थोडावेळ शांत राहिला. लक्ष्मीने तीच संधी साधली आणि ती म्हणाली,

"नारदा, कृष्णाठायी त्याच्या प्रिय व्यक्तींविषयी जे प्रेम आहे, खरे तर, त्यामध्ये काही विशेष नवलाई नाही. कारण ते कृष्णाकडून वारंवार कारणा कारणाने व अगदी सहजतेने प्रगट होत असते. परंतु त्या सर्वांच्या प्रेमाचा कृष्ण जो योग्य मेळ घालतो, त्याचे मात्र मला निश्चितच कौतुक वाटते. कारण त्यासाठी सर्वांचे भाव योग्य प्रकारे समजणे आणि त्यातील फरकही कळून तसा फरक करताही येणे अत्यंत आवश्यक आहे, असे मला

तरी वाटते. कृष्णाला नेमके तेच जमते आहे आणि अगदी सहजपणे जमते आहे. अर्थात् कृष्णाचे हेच तर विशेषत्व आहे आणि ते मी पूर्णपणे जाणूनही आहे. आत्ताच्याच प्रसंगात बघ ना! कृष्ण अर्जुनावरील प्रेमापोटी जेवढ्या त्वेषाने भीष्मांवर धावून गेला तेवढ्याच प्रेमाने कृष्णाने भीष्मांच्याही भक्तिभावाचा स्वीकार केला आणि तो भीष्मांवर प्रसन्नही झाला. परंतु त्यानंतर कृष्ण पुन्हा भीष्मांच्या पराभवाची योजनाही तेवढ्याच सहजतेने आखण्यात निमग्न आहेच. अर्जुनावरील प्रेमात सहजता, भीष्मांचा भक्तिभाव स्वीकारण्यातही सहजता, एवढेच नव्हे तर अर्जुनावरील प्रेमापोटी स्वतः केलेली प्रतिज्ञा स्वतःच मोडण्यातही तीच सहजता. खरेच कृष्णाची ही सहजताच माझ्या मनाला लुब्ध करते. तरीही एका गोष्टीचे मला राहून राहून आश्चर्य वाटतच आहे. कृष्णाने ज्या पद्धतीने स्वतःची प्रतिज्ञा बाजूला केली त्यावरून मला तरी क्षणभर असेच वाटले की तो जणू स्वतःची प्रतिज्ञा पूर्णपणे विसरलाच असावा. खरे काय घडले असावे बरे? ते तर केवळ तूच सांगू शकशील. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाने मंदस्मित केले आणि तो म्हणाला,

“लक्ष्मी, या कृष्णाचे चरित्र काही वेळा विचित्र दिसते ही गोष्ट खरी आहे, कारण त्यामध्ये सकृत् दर्शनी अनेक विरोधाभास दिसतात. परंतु त्यामागील सूत्र मात्र एकच असते आणि ते म्हणजे कृष्णप्रेमाचे सूत्र होय. अर्थात् कृष्णप्रेम म्हणजे मूलतः व मुख्यतः कृष्णाचे इतरांवरील प्रेम होय. काही वेळेला अनेक जणांचे कृष्णावरील प्रेमही प्रगट झालेले आहे, नाही असे नाही. पण त्याचे मूळही कृष्णाच्या त्यांच्यावरील प्रेमामध्येच होते, ही वस्तुस्थिती आहे. कृष्णाने त्याच्या भक्तांवरील प्रेमासाठी अनेक वेळा त्याची कृती, त्याचे शब्द यामध्ये बदल केलेले आहेत. परंतु कृष्णाने त्याचे स्वधर्माचरणाचे तत्त्व मात्र कधीच सोडले नाही. किंबहुना याच तत्त्वाच्या आधारावर व बळावर कृष्ण सद्धर्म रक्षणाचे कार्य, त्याच्या भक्तांच्या भावाचे रक्षण करून करीत होता. त्यामुळेच अर्जुनाच्या प्रेमापोटी व भीष्मांच्या भक्तिभावापोटी कृष्णाकडून त्याची प्रतिज्ञा अगदी सहजपणे बाजूला सारली गेली, यात नवल ते काय?



लक्ष्मी, तुला एक गंमतीची गोष्ट सांगतो जी ऐकून तुलाही मौज वाटेल. कृष्ण ज्यावेळेस भीष्मांवरती धावून गेला त्यावेळेस त्याच्या हातात रथचक्र होते आणि युद्धशास्त्राचा विचार केला असता, रथाचे चक्र हे तर शस्त्र नाहीच. त्यामुळे तसे बघायला गेले तर ‘युद्धाच्या वेळी मी हातात शस्त्र धरणार नाही’ ही कृष्णाने केलेली प्रतिज्ञा अबाधितच राहिली. ती गोष्ट अर्जुनाच्या लक्षात आली नाही आणि कृष्णाने तशी ती आणूनही दिली नाही. त्यामुळेच अर्जुनाला वाटले की त्याच्यासाठी कृष्ण हा प्रतिज्ञेचा भंग करीत आहे. त्यातून एक गोष्ट मात्र अत्यंत चांगली झाली की अर्जुनाला स्वतःचीच चीड आली आणि कृष्णप्रेमामुळे त्याच्याठायीची विजिगीषु वृत्ती पुन्हा जागृत झाली. त्याच भरात त्याने भीष्मांचा पराभव करण्याचा कृतनिश्चयच केला.

लक्ष्मी, भीष्मांच्या भक्तिभावाने कृष्ण प्रसन्न झाला तरी तो भीष्मांच्या पराभवाची योजना आखण्यातही निमग्न होता, या दोन गोष्टींमध्ये तुला विरोधाभास दिसणे साहजिक आहे. तसे बघायला गेले तर त्या दोन गोष्टी या वेगळ्या स्तरावरच्या आहेत आणि त्यांच्यामध्ये फरकही आहे. भीष्मांचा कृष्णाविषयीचा भक्तिभाव हा व्यक्तिगत होता आणि म्हणूनच तो वैयक्तिक पातळीवरचाही होता. परंतु धर्म-अधर्मातील युद्ध जिंकणे हा कृष्णाच्या जीवनकार्याचा भाग होता आणि त्याच्यासाठी त्याचे कार्य हेच अधिक महत्त्वाचे आणि म्हणूनच प्राधान्याचे होते. त्याच्या धर्मकार्याला जे साहाय्यभूत झाले, त्यांनाच कृष्णाने त्याच्या जीवनात आपलेपणाने स्थान दिले आणि स्वतःही त्यांच्या जीवनात प्रेमाचे स्थान घेतले. परंतु जे कृष्णाच्या विरोधात उभे ठाकले, मग ते अज्ञानाने असोत, अहंकाराने असोत किंवा भीष्मांसारखे अगदी आत्मज्ञानीही असोत, कृष्णाने त्यांची अजिबात गय केली नाही आणि हर प्रयत्नाने त्यांचा पराभवच केला. मग त्यासाठी कृष्णाने साम, दाम, दंड, भेद अशा सर्व उपायांचा उपयोग करण्यासही मागे पुढे पाहिले नाही. वेळप्रसंगी कृष्णाने कपटनीतीचा अवलंब करण्यासही कमी केले नाही. याचे कारण एकच की कृष्णाठायी सर्वांविषयी जरी प्रेम असले तरी तो कोणाच्याही मोहात नव्हता. त्यामुळेच धर्मकार्यासाठी आवश्यक असणारे योग्य निर्णय व

आवश्यक ती योग्य कृती करण्याचे सामर्थ्य कृष्णाठायी पूर्णपणे होते. कृष्णाठायी असलेल्या आत्मबळाचेच ते लक्षण होते.

हे लक्ष्मी, भर युद्धामध्ये कृष्ण अर्जुनाला घेऊन शिबिरात परत गेल्याचे सर्वांनाच नवल वाटले. प्रत्येकाने त्याच्या त्याच्या समजुतीनुसार त्याचा अर्थ लावला. अर्जुनाने त्या दिवशीचा पराभव मान्य केला असे कोणाला वाटले, कोणाला त्यामध्ये कृष्णाची काहीतरी चाल असावी अशी शंका आली, तर कोणाला भीष्मांच्या पराक्रमाचे कौतुक वाटले. परंतु कृष्णाच्या लीलेचा खरा आनंद अनुभवलेले भीष्म मात्र, प्रसन्न चित्ताने कौरवांच्या शिबिरात परत गेले. त्यांच्यासाठी युद्धभूमीवर थांबण्याचे काहीच प्रयोजन राहिले नव्हते. घडलेला प्रकार दुर्योधनाच्या कानावर जेव्हा गेला, तेव्हा त्याचा राग अनावर झाला. त्याने तातडीने जाऊन भीष्मांची भेट घेतली आणि रागारागाने भीष्मांशी बोलायला सुरूवात केली.

“अहो पितामह, माझ्या कानावरती जी गोष्ट आली आहे ती खरी आहे का? अर्जुनाला ठार मारण्याची चालून आलेली आयती संधी तुम्ही गमावलीत. तशी संधी तुम्ही हातातून जाणूनबुजूनच जाऊ दिली असणार, याची मला पूर्ण खात्री आहे. अर्जुनाचा पराभव तुम्ही आज केलेला होताच आणि फक्त त्याला ठार मारणे तेवढे बाकी राहिलेले होते. अशा वेळी केवळ तुमचे लक्ष विचलित करण्याच्या हेतूनेच त्या कपटी कृष्णाने तुमच्यावर चाल करून आल्याचा आविर्भाव केला आणि तुम्ही त्याच्या चालीला बळी पडलात. त्याच्या नाटकाची भूल तुमच्याही मनावर पडली की काय? तुम्ही मुद्दामच अर्जुनाला जिवंत सोडलेत आणि रणांगणावरून पळून जाऊ दिलेत, याबद्दल माझ्या मनात जराही शंका नाही. तुमच्याठायी पहिल्यापासूनच पांडवांविषयी सहानुभूती आहे आणि तुमचा कलही त्यांच्याकडेच आहे, हेही मी जाणून आहे. पण तरीही कुरूकुळाचे रक्षण करून त्याचे सामर्थ्य व साम्राज्य वाढविण्यासाठीचे तुमचे कर्तव्यकर्म, तुम्ही प्रामाणिकपणे पार पाडाल असा विश्वास मी धरून होतो. परंतु तुम्ही तर या थोर अशा कुरूकुळाचाच विश्वासघात केलेला आहे. तुम्ही मीठ आम्हा कौरवांचे खाता पण तुमची निष्ठा मात्र पांडवांकडेच आहे हे तर

अगदी स्पष्टपणे दिसत आहे. तुम्ही केवळ तनानेच आमच्या बाजूला आहात पण तुमचे मन मात्र पूर्णपणे पांडवांकडेच आहे ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. नाहीतर आयत्या हातात मिळालेल्या अर्जुनाला तुम्ही असे सहजासहजी पळून जाऊच दिले नसते. गेले नऊ दिवस कौरवसेना तुमच्या अधिपत्याखाली लढाई करीत आहे. पण तरीही आम्हाला अजूनही विजयाची आशा वाटत नाही. तुम्ही पूर्णपणे मनापासून लढत नसून हातचे राखूनच युद्ध करीत असल्याचेच हे लक्षण आहे. तेव्हा आता एकदा काय तो मनाचा निर्णय घ्या आणि या युद्धाचे सेनापती रहायचे की नाही ते ठरवा. सेनापती म्हणून रहात असाल तर युद्ध त्वरित जिंकून द्या. तुम्ही सूज्ञ आहातच. यापुढे तुम्हाला आणखीन काही समजावून सांगण्याची आवश्यकता आहे, असे मला तरी वाटत नाही."

दुर्योधनाचे बोलणे थांबले तरी त्याच्या रागाचे फुत्कार त्याच्या श्वासातून अजूनही बाहेर पडतच होते. त्याच्या बोलण्याने व्यथित झालेल्या भीष्मांकडे दुर्योधनाचे लक्षही नव्हते. त्याला त्यांची पर्वाच वाटत नव्हती. परंतु दुर्योधनाच्या बोलण्याने भीष्मांचे अंतःकरण मात्र, निश्चितच दुखावले. तरीही शांत मनाने व गंभीर सुराने त्यांनी दुर्योधनाशी बोलावयास सुरूवात केली.


* * * * *

# भीष्मप्रतिज्ञा आणि कृष्णाची योजना

“अरे दुर्योधना, तू हे काय बोलतो आहेस? कुरूकुळाशी असलेल्या माझ्या निष्ठेविषयी आजपर्यंत कोणीही शंका घेतलेली नाही. तशी शंका घेण्याची संधीही मी कोणाला दिलेली नाही आणि यापुढेही तशी संधी कोणालाही कधीच मिळणार नाही, ही गोष्ट तू निश्चितपणे लक्षात ठेव. एवढे दिवस होऊनही अजून आपल्याला पांडवांचा पराभव करता आला नाही, हीच तुझी व्यथा आहे आणि त्यामुळेच तुला उद्विग्नता आलेली आहे हे मी जाणून आहे. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे की तू माझ्या निष्ठेविषयीच शंका घ्यावीस. क्षत्रियांना त्यांची निष्ठा ही त्यांच्या प्राणापेक्षाही जास्त महत्त्वाची असते. त्याविषयी कोणीही जर शंका घेतली तर तो त्या क्षत्रियाचा अवमानच आहे आणि तो अवमान कोणताही खरा क्षत्रिय कधीच सहन करणार नाही. ही गोष्ट तू नीट व  कायमची लक्षात ठेव, त्याचे कधीही विस्मरण होऊ देऊ नकोस.

दुर्योधना, मी पांडवांचा पक्षपाती असल्याचा तू माझ्यावर केलेला आरोप तर निखालस खोटा आहे. तुझ्या पूर्वग्रहदूषित मनाचीच ती कल्पना आहे. त्यात काहीच तथ्यांशही नाही. माझे नातू या नात्याने कौरव व पांडव हे मला सारखेच जवळचे आहेत, ही गोष्ट तर खरीच आहे. परंतु माझी निष्ठा पूर्णपणे एकीएक कुरूकुळाशीच वाहिलेली आहे आणि मी फक्त हस्तिनापुरच्या राज्याचाच एकनिष्ठ सेवक आहे.  हस्तिनापूर राज्याचीच भरभराट व समृद्धी व्हावी, हीच माझी एकमेव धारणा आहे. त्यामुळे हस्तिनापूर राज्याचा सेनापती या नात्याने कोणत्याही परिस्थितीत प्रतिपक्षावरती विजय मिळवणे, हेच माझे कर्तव्यकर्म आहे. मग ते प्रतिस्पर्धी पांडव असोत नाहीतर आणखी दुसरे कोणीही असोत. माझ्या कर्तव्यकर्मात कोणताही बदल होण्याची जराही संभाव्यता नाहीच. काही झाले तरी त्या कर्तव्यकर्माची पूर्ती मी करणार म्हणजे करणारच!

परंतु दुर्योधना, तू उतावीळ झाला आहेस. पांडवांचा पराभव अजून कसा झाला नाही या एकाच विचाराने तू घायकुतीला आलेला आहेस आणि त्यामुळे तुझ्या मनाचा तोलही पूर्णपणे ढळलेला आहे. म्हणूनच पांडव हेही अत्यंत पराक्रमी आहेत, ही मुख्य गोष्टच तू विसरला आहेस.



अर्जुन हा तर महापराक्रमी आहे आणि आज सर्व भूतलावर त्याच्या तोडीचा धनुर्धर नाही ही गोष्ट जरी तुला मानवत व मान्य नसली, तरी ती खरीच आहे. त्यातून स्वतः कृष्ण हा सारथी म्हणून अर्जुनाच्या साथीला आहे. त्यामुळेही अर्जुनाचे मनोबळ नेहमीच उच्च अवस्थेत रहाते. कृष्णाचे त्याला प्रत्यक्ष मार्गदर्शन असल्यामुळे अर्जुनाचे नीतीधैर्यही उत्कट असते. आजही कृष्णाच्या जेव्हा लक्षात आले की अर्जुन हा पराक्रमात आज माझ्याशी तुल्यबळ होऊ शकत नाही आहे, तेव्हा त्याने मोठ्या चातुर्याने अर्जुनाची समजूत घालून रथ माघारी वळवला आणि अर्जुनाचा होणारा संभाव्य पराभव टाळला. आपण कितीही पराक्रमी असलो तरी आपल्या बाजूला कृष्णासारखा मुत्सद्दी, धोरणी व युद्धनीतीनिपुण असा कोणीही नाही, ही वस्तुस्थिती आहे.

दुर्योधना, आपल्याला जय प्राप्त होत नाही आहे याचे मला कोणत्याही प्रकारचे समर्थन करायचे नसून केवळ जी वस्तुस्थिती आहे, तीच तुझ्या नजरेसमोर आणावयाची आहे. आता आपल्याला पराक्रमाची शर्थ करावी लागणार आहे आणि ती मी तरी करणारच आहे. परंतु तुझा माझ्यावरती विश्वासच राहिलेला नसल्यामुळे तुझ्या समाधानासाठी मी अशी प्रतिज्ञा करतो की मी उद्याच्या युद्धामध्ये निःपांडवी पृथ्वी करीन."

भीष्मांचे प्रतिज्ञेचे वाक्य पुरे होण्याच्या आतच दुर्योधनाने उतावीळपणाने विचारले, "परंतु तुम्ही जर उद्या असे करू शकला नाहीत तर?"

दुर्योधनाचा प्रश्न ऐकून भीष्मांना खेद वाटला आणि ते उद्गारले,


"अरे दुर्योधना, हा तुझा उतावीळपणा व शंकेखोर स्वभावच तुझ्या व पर्यायाने कौरवांच्याही सर्वनाशाला कारणीभूत होणार आहे आणि त्याचेच मला वाईट वाटत आहे. परंतु माझाही नाइलाजच आहे. ईश्वराची नियतीच जर तशी असली तर मी तरी काय करणार आणि तू तरी काय करणार? 'ईश्वरेच्छा बलियसी' हेच खरे! खरे तर, माझी प्रतिज्ञा ही माझ्यासाठी अंतिमच असते. त्यामध्ये 'किंवा', 'वा', 'अथवा' अशा शब्दांना

वावच नसतो. परंतु ज्या अर्थी तू माझ्या प्रतिज्ञेविषयी शंका व्यक्त केलीच आहेस त्या अर्थी मी तुला एवढेच सांगतो की जर माझी प्रतिज्ञा मी पूर्ण केली नाही किंवा करू शकलो नाही, तर मी स्वेच्छामरणच स्वीकारीन."

भीष्मांच्या बोलण्यातील भावार्थ दुर्योधनाला कळला आणि त्याच्या मनाची खात्री पटली की दुसऱ्या दिवशी भीष्म त्यांचा सर्व पराक्रम पणाला लावूनच लढतील. परंतु भीष्मांनी स्वीकारलेल्या पर्यायाची काय परिणती होईल हे मात्र, अल्पमती दुर्योधनाच्या लक्षातच आले नाही. भीष्मांच्या प्रतिज्ञेला पर्याय उपलब्ध करून देऊन आपण स्वतःच्याच पायावरती धोंडा मारून घेत आहोत ही गोष्ट दुर्योधनाच्या खिजगणतीतही नव्हती. 'दुसऱ्या दिवशी पांडवांचा पूर्णपणे नाश होऊन कौरवांचा विजय निश्चितपणे होणार आहे' याच विचारांच्या खुशीची गाजरे मनातल्या मनात खात, दुर्योधन निश्चिंत मनाने भीष्मांच्या राहुटीतून बाहेर पडला. त्या नादात निघताना भीष्मांना प्रणाम करण्याची औपचारिकताही पाळण्याचे भान दुर्योधनाला राहिले नाही."

बोलता बोलता नारदाने सहजपणे एक दृष्टीक्षेप लक्ष्मीकडे फिरवला तर लक्ष्मीच्या मुखावरील थोडेसे काळजीचे भाव नारदाच्या नजरेने लागलीच टिपले. परंतु लक्ष्मीने काही बोलण्याच्या आधीच नारदाने तिला हाताच्या खुणेने थांबवले आणि त्याचे बोलणे पुढे चालूच ठेवले.

"लक्ष्मी, तुझ्या ठिकाणी निर्माण झालेली काळजी अगदी साहजिक आहे आणि मी ती समजूही शकतो. कारण 'निःपांडवी पृथ्वी' करण्याची प्रतिज्ञा दुसऱ्या कोणी सामान्य व्यक्तीने केलेली नव्हती तर ती साक्षात भीष्मांसारख्या सत्यवचनी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वीर पुरूषाची प्रतिज्ञा होती. खरे तर, त्या प्रतिज्ञेला दुसरा पर्याय नव्हताच. परंतु ऐनवेळी दुर्योधनाला दुर्बुद्धी झाली आणि त्याने शहाणपणा दाखवून भीष्मांच्या प्रतिज्ञेविषयी शंका व्यक्त केली. त्यामुळे भीष्मांना प्रतिज्ञेला पर्याय देणे नाईलाजाने भागच पडले. परंतु त्यामुळे त्या पर्यायातच पांडवांच्या रक्षणाचाही मार्ग लपलेला आहे ही गोष्ट दुर्योधनाच्या लक्षातच आली



नाही. पण नेमकी तीच गोष्ट कृष्णाच्या मात्र सहज लक्षात आली जेव्हा त्याला ती बातमी कळली.

लक्ष्मी, खरे तर रणांगण सोडून परत फिरलेल्या अर्जुनावर धर्मराजा अत्यंत नाराजच झाला होता आणि त्याने त्याची नाराजी स्पष्ट शब्दात व्यक्त करण्यासही मागे पुढे पाहिले नव्हते. त्याने अर्जुनाच्या पराक्रमाविषयीच शंका व्यक्त केल्यावरती अर्जुनालाही रागच आला. परंतु जेव्हा धर्मराजाने अर्जुनाला अत्यंत प्रिय व जीव की प्राण असलेल्या त्याच्या गांडीव धनुष्याचीच निंदा केली, तेव्हा मात्र अर्जुनाचा संताप अनावरच झाला. ‘माझ्या गांडीव धनुष्याची जो निंदा करील त्याचा मी वध करीन’ अशी प्रतिज्ञा अर्जुनाने केलेली असल्यामुळे अर्जुन धर्मराजाच्या अंगावर धावूनच गेला. कृष्णाने अर्जुनाला आवरून शांत केले. पण अर्जुनाची प्रतिज्ञा पुरी करण्यासाठी कृष्णाने एक तोडगा काढला. ‘सज्जनांना त्यांची निंदा हीच मृत्यूसमान असते’ असे सांगून कृष्णाने अर्जुनाला धर्मराजाची निंदा करावयास सांगितली. त्याप्रमाणे अर्जुनाने धर्मराजाची निंदा केलीही. नवल म्हणजे अशी निंदा करण्यासाठी अर्जुनाला काहीच अडचणही आली नाही. कृष्णाने त्या उभयतांशी बोलून त्यांची मने शांत केली व त्यांना पुढील युद्धासाठी सज्ज होण्यास सांगितले.

तेवढ्यातच कृष्णाला त्याच्या हेरांकरवी भीष्मांच्या प्रतिज्ञेची खबर मिळाली आणि पांडवांच्या गोटात एकच खळबळ उडाली. अर्जुनासह सर्व पांडव तर चिंताग्रस्त झालेच, पण कृष्णाच्या मनातही काळजी निर्माण झाली. पण जेव्हा हेरांकडून भीष्मांच्या प्रतिज्ञेचा दुसरा भागही कृष्णाला समजला तेव्हा कृष्णाच्या लक्षात आले की भीष्मांपासून पांडवांना वाचवण्याची संधी निश्चितच आहे. कृष्णाने ती गोष्ट पांडवांच्याही लक्षात आणून दिली आणि त्यांच्या मनाला धीरही दिला. यातून काही तरी मार्ग निश्चितच निघेल अशी खात्रीही कृष्णाने पांडवांना दिला आणि कृष्णावर पूर्ण भरवसा ठेवून पांडव स्वस्थ झाले. पण कृष्ण मात्र स्वस्थ बसू शकला नाही आणि तसा तो स्वस्थ बसलाही नाही.

लक्ष्मी, भीष्मांनी केलेल्या प्रतिज्ञेची बातमी जेव्हा द्रौपदीला कळली तेव्हा तिला राहवलेच नाही आणि ती धावतच रणभूमीवर पांडवांच्या शिबिरामध्ये आली. त्यावेळेस द्रौपदीला तेथे पाहून पांडवांनाही धक्काच बसला. पण द्रौपदीच्या मुखावरील चिंताग्रस्त भाव पाहून सर्वांना तिचीच काळजी जास्त वाटू लागली. परंतु द्रौपदीची समजूत घालण्याची हिंमत कोणालाच होईना. शेवटी कृष्ण स्वतः पुढे आला आणि त्याने द्रौपदीच्या मस्तकावर हलकेच थोपटून तिला धीर दिला. द्रौपदीने एवढा वेळ आवरून धरलेले तिच्या मनाचे बांध एकदम फुटले आणि तिच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागल्या. कृष्णाने आपल्या शेल्याने द्रौपदीचे अश्रू हळुवारपणे पुसले आणि तिचे सांत्वन केले. द्रौपदीकडे पहात असतानाच कृष्णाच्या मनात एक विचार चमकून आला आणि एक योजना त्याच्या मनामध्ये हळूहळू साकार होऊ लागली. कृष्णाने पांडवांसह द्रौपदीला एका बाजूला नेले आणि तो त्यांच्याशी हलक्या व दबलेल्या आवाजात बोलू लागला.

“कोणीही कसलीही काळजी करू नका. भीष्मांपासून पांडवांचे प्राण वाचवायचा उपाय सापडला आहे आणि तो उपाय द्रौपदीपाशीच आहे. ज्या भीष्मांनी पांडवांचे प्राण घेण्याची प्रतिज्ञा केली आहे, केवळ ते भीष्मच पांडवांना अभयदान देऊ शकतात. परंतु ते अभयदान त्यांच्याकडून द्रौपदीला मागावे लागेल आणि त्यासाठी तिला आत्ताच्या आत्ता भीष्मांची भेट घ्यावी लागेल. हाच एकमेव उपाय आता शिल्लक आहे आणि त्याची अंमलबजावणीही आपल्याला त्वरित करावी लागेल. कारण आपल्याकडे वेळ अत्यंत थोडाच आहे. आता द्रौपदीने भीष्मांची भेट कशी घ्यायची यासंबंधीची काळजी तुम्ही कोणीही करू नका. ती सर्व जबाबदारी तुम्ही माझ्यावरती सोपवा. मी स्वतः द्रौपदीला भीष्मांकडे घेऊन जाईन आणि तेथे गेल्यावर काय करायचे, हेही मी तिला तेथे गेल्यावरतीच सांगेन. आता कोणीही दुसरा तिसरा विचार करूच नका. कारण वेळ फुकट घालवण्यात काहीच अर्थ नाही”

असे म्हणून कृष्णाने द्रौपदीचा हात धरला आणि कोणाला काहीही विचार करायला काही अवसरच न देता, कृष्ण द्रौपदीला घेऊन लगबगीने पांडवांच्या शिबिराच्या बाहेर पडला सुद्धा! सर्व पांडव दिङ्मूढ होऊन



चकित मुद्रेने कृष्णाकडे पहातच राहिले आणि द्रौपदीही भयचकित होऊन कृष्णाच्या मागोमाग जवळ जवळ धावतच चालू लागली.

लक्ष्मी, त्या वेळच्या युद्धाच्या नियमानुसार सूर्यास्तानंतर युद्ध स्थगित असे आणि दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर ते पुन्हा सुरू होत असे. एवढेच नव्हे, तर उभय पक्षांतील सैनिक दिवसाचे शत्रुत्व विसरून कोणतीही शस्त्रास्त्रे न बाळगता दुसऱ्या पक्षातील सैनिकांना भेटतही असत. कारण ते विरूद्ध पक्षात असले तरी एकमेकांचे सगेसोयरेही होते. नेमका याच गोष्टीचा कृष्णाने फायदा उठवून उपयोग करून घेतला. कृष्णाने स्वतःचे मुख शेल्याने थोडेसे झाकून घेतले आणि द्रौपदीलाही तिच्या मुखावरती तिच्या साडीचा पदर घ्यावयास लावला. रात्रीची वेळ असल्याने सर्वत्र अंधःकारही पसरलेला होता. त्यामुळे जेव्हा कृष्ण द्रौपदीला घेऊन कौरवांच्या शिबिरात शिरला तेव्हा ती गोष्ट कोणाच्याही लक्षात आलीच नाही. कौरवांच्या शिबिराची सर्व बित्तंबातमी कृष्णाकडे असल्यामुळे त्वरेने मार्ग काढीत कृष्ण भीष्मांच्या राहुटीच्या बाहेर येऊन पोहोचला. गोंधळलेल्या नजरेने कृष्णाकडे पाहणाऱ्या द्रौपदीला उद्देशून कृष्ण हलक्या आवाजात बोलू लागला.

“द्रौपदी, घाबरू नकोस आणि मनावर कोणता ताणही घेऊ नकोस. ही भीष्मांची राहुटी आहे. त्यांची आता ध्यानधारणेची वेळ आहे ही गोष्ट मला ठाऊक आहे. तू आता एकच गोष्ट करायची आहेस. हलक्या पावलांनी आतमध्ये जा आणि ध्यानस्थ बसलेल्या भीष्मांसमोर उभी राहून त्यांना वाकून नमस्कार कर. फक्त नमस्कार करताना तुझ्या हातातील कंकणांचा थोडासा आवाज होईल एवढीच काळजी मात्र घे. मग आपसूकच पुढे सर्व काही योग्य ते घडेल. आत प्रवेश करताना तुझी पादत्राणे मात्र काढून ठेव. म्हणजे तुझ्या पावलांचा आवाज होणार नाही.”


कृष्णाच्या वागण्याबोलण्याने द्रौपदी संमोहित झाल्यासारखीच दिसत होती. तिची विचारशक्ती जणू कुंठीतच झाली होती. भारावलेल्या अवस्थेतील द्रौपदीने कृष्णाच्या सांगण्यानुसार तिची पादत्राणे काढून ठेवली असता, कृष्णाने ती लगेच उचलून आपल्या हातात घेतली. द्रौपदीने धीर करून भीष्मांच्या राहुटीमध्ये प्रवेश केला असता, एका आसनावर नेत्र

मिटून ध्यानस्थ अवस्थेत बसलेली भीष्मांची धीरगंभीर व शांत मूर्ती तिच्या दृष्टोत्पत्तीस आली. भीष्मांची प्रसन्न मुद्रा पाहून द्रौपदीच्या मनालाही प्रसन्नता जाणवली आणि पावलांचा अजिबात आवाज होऊ न देता, द्रौपदी भीष्मांच्या सन्मुख येऊन उभी राहिली. कृष्णाच्या सांगण्यानुसार द्रौपदीने भीष्मांच्या समोर वाकून तिचे दोन्ही हात जोडले आणि भीष्मांना नमस्कार केला. हात जोडून नमस्कार करीत असताना द्रौपदीच्या हातातील कंकणांचा आवाज, अगदी सहजपणे झाला. खरे तर, त्यासाठी द्रौपदीला मुद्दाम प्रयत्नही करावे लागले नाहीत. कंकणांचा हळुवार झालेला किणकिणाट भीष्मांच्या कानावर येताक्षणीच, त्याही अवस्थेत भीष्मांच्या लक्षात आले की कोणीतरी विवाहित स्त्री त्यांच्या भेटीला आलेली असावी. आत्मज्ञानाने विशुद्ध असलेल्या आणि कृष्णप्रेमात रमलेल्या भीष्मांच्या अंतःकरणातील सद्भाव अगदी सहजतेने प्रगट झाला. भीष्मांच्या मुखातून सहजोद्गार निघाले, “ अखंड सौभाग्यवती भव!”

भीष्मांच्या मुखातून बाहेर आलेल्या आशीर्वचनांचा अर्थबोध जेव्हा द्रौपदीला झाला तेव्हा द्रौपदी एकदम हर्षभरीत झाली. तिने भीष्मांच्या चरणांना स्पर्श करून त्यांना पुन्हा विनम्रभावाने वंदन केले आणि तिच्या मुखातून शब्द बाहेर आले, “पितामह, आपला आशीर्वाद मला लाभला यातच मला सर्व काही मिळाले.”

द्रौपदीचे शब्द कानावर येताच भीष्मांनी त्यांचे नेत्र अलगदपणे उघडले. समोर द्रौपदीला पहाताच भीष्मांना नवल वाटले आणि तिला उद्देशून ते म्हणाले,

“अगं द्रौपदी, तू या वेळेस येथे काय करीत आहेस? अशा रात्रीच्या वेळेस तू एकटीच येथे कशी काय आलीस? खरे तर, उद्या पांडवांचा पूर्ण निःपात करण्याची प्रतिज्ञा मी केलेली आहे, असे असताना आता तू मुद्दामहून माझ्या भेटीला आलीस आणि माझ्याकडून तुझ्या सौभाग्याच्या रक्षणाची हमीही तू वदवून घेतलीस. तुझ्या येथील येण्यामागे निश्चितच कोणाचा तरी हात आहे, याची मला खात्री आहे. तो हात कोणाचा आहे



हेही मला ठाऊक आहे आणि तो हात केवळ हात नसून तुझ्या पाठीशी असलेला कृपाकरच आहे, याचीही मला जाणीव आहे. तो कृपाकर कोणा दुसऱ्या तिसऱ्याचा असूच शकत नाही, तर तो केवळ कृष्णाचाच आहे, याचीही मला खात्री आहे. हा सर्व खेळ त्या कृष्णाचाच आहे. तोच तुला येथे घेऊन आला असणार हे नक्की. तुला पुढे करून तो मागे उभा राहिला असणार. होय ना? पण तो माझा प्रिय कृष्ण आहे कोठे?"

असे म्हणून भीष्म त्यांचे आसन सोडून धावतच त्यांच्या राहुटीच्या बाहेर आले तर तेथे द्रौपदीची पादत्राणे हातात धरून सांभाळीत उभा असलेला कृष्णच त्यांच्या दृष्टीस आला. भीष्मांनी प्रेमाने कृष्णाचे दोन्ही हात त्यांच्या हातात धरले आणि त्यांनी कृष्णाला त्यांच्या राहुटीमध्ये आणले. भीष्मांनी कृष्णाला त्यांच्या आसनावर आदरपूर्वक बसवले. भीष्म स्वतः कृष्णासमोर हात जोडून उभे राहिले आणि त्यांनी कृष्णाच्या स्तुतीपर वचने बोलावयास सुरूवात केली.

"हे कृष्णा, ऋषी, मुनी व योगी ज्या परमतत्वाच्या ध्यानात सदैव निमग्न असतात त्याच परमतत्वाचा अत्यंत सुंदर, रमणीय व विलोभनीय आविष्कार तुझ्या रूपाने साकार झालेला आहे, हे सत्यच आहे. या सत्याला ज्यांनी जाणले ते तर खरोखरी धन्य होतच, परंतु ज्यांना तो आविष्कार प्रत्यक्ष पहाता व अनुभवता आला ते खरे भाग्यवानच होत. तुझ्या रूपाचे ध्यान आत्मज्ञानी असलेल्यांनाही जेथे आकर्षित करते, तेथे सामान्य जन जर तुझ्या रूपाला भुलले, तर त्यात जराही नवल नाही. खरे तर, भक्तांनी तुझ्यावर प्रेम करावे, तुझे ईश्वरी माहात्म्य जाणून तुझी भक्ती करावी आणि आनंदाच्या अनुभवाने त्यांनी त्यांचे सर्व जीवन जगावे. पण तुझे प्रेमीजन तुला एवढे प्रिय आहेत की तूच त्यांच्यावरील तुझे प्रेम नेहमी अनुभवीत असतोस आणि त्यांची सर्वतोपरीने काळजी घेऊन जणू त्यांचीच सेवा करीत असतोस, असेच दृश्य तुझ्या चरित्रात नित्य पहावयास मिळते. तुझ्या प्रेमीजनांना रक्षण व आधार देणे हा तर तुझा सहज स्वभावधर्मच आहे.

कृष्णा, आज तर तुझ्या भक्तांवरील प्रेमाने कमाल उंचीच गाठली, असेच म्हणावे लागेल. बघ ना, पांडवांच्या प्राणांचे म्हणजेच द्रौपदीच्या

सौभाग्याचे रक्षण करण्यासाठी, तू आज जणू द्रौपदीचा अंगरक्षक बनून तिला येथे माझ्याकडे घेऊन आलास आणि एखाद्या सेवकाप्रमाणे तिची पादत्राणे सांभाळीत माझ्या दाराच्या बाहेर तिष्ठत उभा राहिलास. भक्तप्रेमाने पुरेपूर भरलेल्या तुझ्या त्या मनोहारी रूपाचे मला दर्शन झाले आणि माझी सर्व तपश्चर्याच फळाला आली. तुझी इच्छा व हेतूही आता फलद्रूप झालेला आहेच. आता माझ्या भक्तिभावाची पूर्ती करण्याची संधी तू मला द्यावीस, एवढीच विनंती मी तुला करीत आहे."

असे म्हणून भीष्मांनी कृष्णाची मनोभावे पाद्यपूजा केली आणि कृष्णाच्या चरणांवर मस्तक ठेवून त्याचे भक्तिभावाने दर्शन घेतले. भीष्मांच्या भक्तिभावाने प्रसन्न झालेले कृष्णाचे मुखकमल पाहून, द्रौपदीनेही दोन्ही हात जोडून कृष्णाचे भक्तिभावाने दर्शन घेतले. कृष्ण आसनावरून उठून उभा राहिला आणि भीष्मांच्या जवळ आला. कृष्णानेही त्याचे दोन्ही कर जुळवून भीष्मांना प्रेमादरपूर्वक नमस्कार केला आणि तो म्हणाला.

"अहो भीष्म पितामह, तुमच्या भक्तिभावाने मी अगदी संतुष्ट झालेलो आहे. परंतु तुम्ही आत्मज्ञानीही आहात, म्हणून माझ्याठायी तुमच्याविषयी अत्यंत आदरही आहे. आत्मबळ व भावबळ या दोन्हीचा तुमच्याठायी असलेला संयोग, ही खरेच एक अत्यंत दुर्मिळ व विशेषत्वाची गोष्ट आहे. आत्मज्ञानाच्या बळावरती तुम्ही तुमचे प्राप्त कर्तव्यकर्म निष्ठेने करीत आहात आणि तरीही तुम्ही त्या कर्तव्यकर्मापासून अलिप्तही आहात. परंतु तुमच्याठिकाणी असलेल्या भक्तिभावामुळे त्या कर्माची फळे तुम्ही ईश्वरार्पण करीत आहात. यातूनच तुमचे निरंहकारीत्व प्रगट होते आणि त्यामुळेच तुम्ही नित्य स्वानंदातही रममाण असता. तुमच्या या परमावस्थेला माझे मनःपूर्वक प्रणामच आहेत.

अहो भीष्म, या युद्धातील जशी तुमची भूमिका मी जाणून आहे तसेच, तुम्हीही माझी भूमिका जाणून आहातच. या युद्धामध्ये पांडवांचाच पक्ष हा धर्माचा आहे, हे तुम्हालाही निश्चितच ठाऊक आहे. एवढेच नव्हे, तर या युद्धात पांडवांचाच विजय व्हावयास हवा आणि तसाच तो होणारही आहे, हेही तुम्हाला पूर्णपणे माहित आहे. पांडवांना विजय प्राप्त



होण्यामध्ये तुमचे युद्धातील अस्तित्व हाच मोठा व एकमेव अडथळा आहे, ही वस्तुस्थिती तर अगदी स्पष्ट आहे. कारण युद्धभूमीवर तुमचा पराभव होणे शक्यच नाही. परंतु तुम्हीच कृपावंत होऊन तो अडथळा आता स्वतःचा स्वतःच दूर करीत आहात, हे तुमचे पांडवांवरचे केवढे तरी उपकारच आहेत. त्यांना तर तुम्ही जन्मभराचे ऋणी करून ठेवलेच आहे. पण तुमच्या भक्तिभावाने तुम्ही माझ्याही अंतःकरणात कायमचे स्थान घेऊन ठेवलेले आहे. आता आम्ही येथे फार काळ थांबणे उचित नाही. तरी तुम्ही आम्हाला निघण्याची अनुज्ञा द्यावी, हीच विनंती."

असे म्हणून कृष्णाने दोन्ही हात जोडून भीष्मांना पुन्हा वंदन केले. द्रौपदीनेही पुढे होऊन वाकून भीष्मांना नमस्कार केला. भीष्मांच्या अत्यंत भावपूर्ण मुखावरील नेत्र पाणावले होते. कृष्णाने द्रौपदीचा हात धरला आणि तो त्वरित भीष्मांच्या राहुटीच्या बाहेर आला. कृष्ण व द्रौपदी या उभयतांनी आपले चेहरे वस्त्रांनी झाकून घेतले आणि ते लगबगीने पांडवांच्या शिबिराकडे परत आले."


बोलता बोलता श्वास घेण्याच्या निमित्ताने नारद थोडासा थांबला. ही गोष्ट लक्ष्मीच्या दृष्टीने उपकारकच ठरली. कारण कृष्णचरित्रातील एवढा भावपूर्ण प्रसंग श्रवण केल्यानंतर लक्ष्मीलाही स्वस्थ बसणे अत्यंत कठीणच झालेले होते. तिला झालेला आनंद आणि तिची झालेली भावपूर्ण अवस्था प्रगट केल्यावरतीच लक्ष्मीचे मन मोकळे होणार होते. त्यासाठी लक्ष्मीला बोलणे भागच पडत होते, ही गोष्ट लक्ष्मीलाही ठाऊक होती आणि नारदही ती गोष्ट जाणून होता. त्यामुळे मिळालेल्या थोड्याशा अवधीचा लक्ष्मीने पुरेपूर उपयोग केला आणि ती बोलू लागली.

"अरे नारदा, कृष्ण व त्याचे प्रेमीजन यांच्यामधील हा प्रेमाचा खेळ खरोखरीच मनोहारी व चित्ताकर्षकच आहे, असेच म्हणावे लागेल. आपल्या प्रेमीजनांच्या प्रेमात नित्य रंगलेल्या कृष्णाकडून प्रसंगी असा काही खेळ खेळला जातो की त्यामुळे कृष्णप्रेमाचे अनेक रंग प्रगट होतात आणि त्यामुळे कृष्णाचा प्रेमखेळही अधिकाधिक रंगत रहातो. प्रसंग सुखाचे असोत किंवा दुःखाचे असोत, कृष्णप्रेमामुळे ते प्रसंग अत्यंत भावपूर्ण

होतात. त्या निमित्ताने एकच कृष्णप्रेम सापेक्षतेने प्रगट होते आणि म्हणूनच त्या प्रेमरंगाच्या विविध छटा दृष्टीला येतात. कृष्णाच्या त्या प्रेमरंगाने त्याचे प्रेमीजन त्या प्रसंगात सर्व अंगाने रंगून रहातातच, परंतु त्याच्या भक्तजनांचे अंतरंग मात्र, प्रसंग सरल्यानंतरही कृष्णाच्या प्रेमरंगाने रंगलेलेच रहाते. त्यामुळेच त्यांच्या अंतरंगातही कृष्णप्रेम सदासर्वकाळ रंगतच रहाते. खरोखरीच कृष्णप्रेमाच्या या रंगतदार खेळामुळेच कृष्णाविषयीची प्रीती अधिकाधिक वाढते आणि कृष्णाची भक्ती करण्यासाठीचे मनोबळ प्राप्त होत रहाते. कृष्णाच्या भक्तीने मनाठायी कृष्णप्रेमाची भूक अधिकाधिक वाढत रहाते आणि मनाला प्रेमार्त अवस्थेत ठेवते. म्हणूनच कृष्णाची ऐक्यभावाची भक्ती करणे मनाला शक्य होते हेच एकमेव सत्य आहे आणि तेच या कृष्णचरित्रातून वारंवार प्रगट होत असते, असे मला निश्चितपणे जाणवत आहे.

नारदा, कृष्णाने पांडवांवरच्या प्रेमामुळे पांडवांचे सर्वतोपरीने रक्षण करण्याचे व्रतच घेतले होते, असेच म्हणावे लागेल. परंतु द्रौपदीच्या भक्तिभावासाठी तर कृष्ण तिचा सखाच झाला होता, असेच मला जाणवते. म्हणूनच कृष्ण सर्व प्रसंगात तिच्या साथीलाच होता. द्रौपदीला घेऊन भीष्मांकडे जाणे, तिची पादत्राणे स्वतःच्या हातात घेऊन भीष्मांच्या राहुटीच्या द्वारापाशी ताटकळत उभे रहाणे आणि शेवटी भीष्मांकडून द्रौपदीच्या सौभाग्य रक्षणाचे अभिवचन घेणे हे सर्व खरोखरी अद्‍भुतच आहे. केवळ कृष्णच हे सर्व काही करू जाणे. कारण त्यासाठी कृष्णाचेच अंतःकरण हवे. आत्मज्ञानी भीष्मांच्याठायी असलेला कृष्णभक्तीचा भाव ही गोष्ट तर असाधारणच आहे, त्याला तर कसलीही तोडच नाही. त्यांच्याही भक्तिभावाचा स्वीकार करून कृष्णाने त्यांनाही आनंदित केले. खरेच या कृष्णाचे जीवन एवढ्या विविध रंगांनी नटलेले आहे की त्यातून त्याचे अंतरंग प्रगट झाले असे वाटले तरी ते पूर्णपणे प्रगट होत नाही, हेच खरे. पुन्हा या सर्व रंगांपासून कृष्ण वेगळाच रहातो व दिसतोही आणि त्याचेच मला नवल वाटते आणि गूढही जाणवते."

लक्ष्मीच्या बोलण्यावर मंदस्मित करून नारद म्हणाला, "हे लक्ष्मी, कृष्णप्रेमाने जरी त्याच्या खेळाला रंग आला तरी कृष्ण त्या खेळामध्ये



गुंतत नव्हता आणि म्हणूनच त्याचे मन त्या खेळामध्ये अडकून न रहाता त्या खेळातील पुढील खेळीचा विचार, लागलीच सुरू करीत असे. किंबहुना, कृष्णाच्या मनामध्ये पुढील विचार आधीच सुरू झालेले असत. हेच कृष्णाचे खरे अंतरंग आहे. कारण बघ ना, कृष्णाने भीष्मांच्या भक्तिभावाचा स्वीकार केला त्याचा त्याला आनंद झाला खरा, पण कृष्णाच्या मनात दुसऱ्या दिवशीच्या युद्धाचे विचारही ताबडतोब सुरू झाले. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष रणांगणात भीष्मांचा पराभव करणे हे अशक्यच आहे हे जाणून असलेल्या कृष्णाने ‘भीष्मांचा पराभव कसा करावयाचा’ या गोष्टीचा विचार करायला सुरूवात केली सुद्धा! खरे तर, सकृतदर्शनी या दोन गोष्टींमध्ये कमालीचा विरोधाभासच आहे आणि अशा विरोधाभासामुळेच कृष्णाचे चरित्र कित्येक वेळा विचित्रही वाटते. परंतु कृष्णाचे अंतःकरणच जर आपण जाणले तरच त्याच्या चरित्रातील सुसूत्रता लक्षात येऊ शकेल. नाहीतर, सामान्यजनांच्या मनाची संभ्रमावस्था होण्याची शक्यताच अधिक आहे. कृष्णाचे अंतःकरण जाणावयाचे तर मनामध्ये त्याच्याविषयीचा भक्तिभावच हवा. त्या भक्तिभावामुळेच कृष्णाचे व्यक्तिमत्त्व, कृष्णाचे जीवन आणि कृष्णाचे कार्य याची सांगड लागू शकेल. कारण या तिन्हीचे मूळ एकीएक कृष्णाच्या अंतःकरणातच आहे, हीच गोष्ट सत्य आहे.

लक्ष्मी, कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वातून प्रगटणारे त्याचे रूप, विशेषतः त्याचे बोलणे, त्याचे वागणे, त्याचे करणे हे सर्व एवढ्या सहजतेने होत असे की ती सहजताच सर्वांच्या मनाला अत्यंत आकर्षित करीत असे. कृष्णाचे हसणे म्हणा, त्याचे गांभीर्य म्हणा किंवा त्याची सांगण्याची शैली व संवादचातुर्य म्हणा, हे सर्वांच्याच मनाला मोहवून अगदी खिळवून ठेवीत असे. परंतु कृष्णाची खरी थोरवी त्यांच्या जीवनातूनच प्रगट होत असे. त्याच्या ठिकाणी जरी सर्वांविषयीच आपलेपणा असला, तरी त्याच्या प्रेमीजनांविषयीचे त्याचे प्रेम मात्र खासच होते. आपल्या प्रेमीजनांचे नित्य कौतुक करून त्यांना सुखविण्यातच कृष्णाला अतिशय आनंद होत असे. प्रेमीजनांच्या अडीअडचणी व दुःखाच्या प्रसंगी तर कृष्ण अत्यंत व्याकुळच होत असे आणि स्वतः धावून जाऊन त्या प्रेमीजनांना संकटमुक्त केल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे. त्यांच्या पाठीशी कृष्ण सदैव उभा

असे. त्यांना नैतिक बळ देऊन त्यांचे मनोधैर्य वाढवीत असे आणि त्यांना त्यांचे जीवन जगण्यासाठी सबळ करीत असे.

लक्ष्मी, हे सर्व जरी खरे असले आणि ते सर्व जरी कृष्णाकडून लीलया घडत असले तरी कृष्णाच्या अंतरामध्ये नित्य ध्यास असे, तो त्याच्या कार्याचा. ज्या आत्मधर्माची स्थापना करण्यासाठी त्याचे या भूतलावर अवतरण घडलेले होते त्याची जाणीव, कृष्णाच्या अंतःकरणात नित्य जागृत असे. हृदयात स्फुरणारी ती जाणीवच कृष्णाला त्याच्या ध्येयाविषयी सावध ठेवून प्रेरणा देत असे. त्याच्या त्या कार्यासाठी ज्यांचे ज्यांचे साहाय्य जेव्हा जेव्हा मिळत असे, तेव्हा तेव्हा कृष्ण ते स्वीकारीत असेच. परंतु त्याच व्यक्ती व गोष्टी जर त्याच्या कार्याच्या साध्याच्या आड येऊन अडचणीच्या होऊ लागल्या तर त्यांना बाजूला करणेही कृष्णाकडून, तेवढ्याच सहजतेने घडत असे. कृष्णाठायी असलेल्या आत्मबळाचेच हे लक्षण आहे. म्हणूनच, कृष्णाने अर्जुनाच्या प्रेमाचा उपयोग धर्मयुद्धासाठी करून घेतला, तसेच द्रौपदीच्या भक्तिभावासाठी तिलाही सर्वतोपरीने साहाय्य करून रक्षण दिले. एवढेच नव्हे, तर आत्मज्ञानी भीष्मांच्या भक्तिभावाचा आनंदही कृष्णाला झालाच. परंतु हे सर्व झाल्यानंतर त्याच्याच प्रेरणेने सुरू झालेले धर्मयुद्ध जिंकण्याची कृष्णाच्या अंतरातील उर्मी प्रबळ होऊन पुन्हा वर आली आणि कृष्ण लागलीच पुढच्या हालचालीला लागला. आधीच्या प्रसंगातून मोकळे होण्यासाठी कृष्णाला क्षणाचाही वेळ लागला नाही, याचे एकमेव कारण म्हणजे कृष्ण त्यामध्ये जरासुद्धा गुंतलेला असा नव्हताच मुळी!”

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मी एवढी प्रभावित झाली होती की बराच वेळ झाला तरी तिची काहीही प्रतिक्रिया अशी व्यक्त होईचना. थोड्या वेळाने जेव्हा लक्ष्मी थोडीशी भानावर आली तेव्हा तिने सर्वप्रथम एकच गोष्ट केली आणि ती म्हणजे दोन्ही कर जोडून व मान लववून नारदाला नम्रभावाने नमस्कार केला. लक्ष्मीच्याकडे थोड्याशा कुतूहलाने पहात असलेल्या नारदाला उद्देशून लक्ष्मी एवढेच म्हणाली,

“नारदा, जेवढी कमाल मला त्या कृष्णाची वाटते तेवढीच कमाल मला तुझीही वाटत आहे. सर्वसामान्याला अगम्य असणारे कृष्णाचे



अंतःकरण तू अगदी सुगमतेने जाणतोस. कारण तुझे अंतःकरणच कृष्णमय झालेले आहे. जसे कृष्ण म्हणजे त्याचे अंतःकरण तसे कृष्णाचे अंतःकरण म्हणजे तूच व तुझेच अंतःकरण होय. मुळामध्ये तू या नारायणालाच आत्मसात केलेला असल्यामुळेच या नारायणाची सगुण चरित्रे तुझ्या अंतःकरणामध्ये ऐक्यभावाने व म्हणूनच सहजतेने स्फुरत असतात. त्यामुळेच कृष्णचरित्र हा तुझाच आत्मानुभव आहे  आणि म्हणूनच ते जणू तुझेच आत्मचरित्र असल्यासारखेच, तुझ्याकडून एवढ्या तन्मयतेने व सहजतेने प्रगट होत आहे. तुझ्या अंतरीची ही खूण मला निश्चितच जाणवते व पटतेही. आता त्या खुणेच्या निर्देशानुसार भक्तिभावाची वाटचाल करून मला तुझ्या अनुभवापर्यंत जाऊन पावायचे आहे. अर्थात् तो ध्यास माझा आहे, ती वाटचालही माझीच आहे आणि त्यासाठीचा प्रयत्नही मीच करावयाचा आहे. परंतु तुझी जोड व मदत घेऊनच मला ते शक्य होणार आहे, याचीही निश्चिती माझ्याठायी आहे. त्यासाठीच कृष्णचरित्राचे गायन तू सुरूच ठेव. कारण त्याद्वारेच कृष्णाचे अंतरंग प्रगट होत राहील आणि ते जाणून घेणे मला शक्य होईल."

लक्ष्मीच्या अंतरीची भक्तिभावाची आर्तता नारदालाही जाणवली. त्या आर्तभावाचे महत्त्व नारद स्वानुभवाने जाणून होता. त्यामुळे त्या आर्ततेची पूर्ती करण्यासाठी नारदही आर्तच झाला. कारण त्या निमित्ताने नारदाच्या भक्तिभावाचा आनंदच साकार होणार होता आणि तो आनंदानुभव घेण्यासाठी तर नारद नित्यच आतुर असे. खरे तर, त्यासाठी नारदाला कारणाचीही जरूरी लागत नसे. असे असताना कारणाने मिळालेली संधी सोडणे नारदाला शक्यच झाले नसते. त्यामुळेच नारदानेही लागलीच बोलावयास सुरूवात केलीच.

"हे लक्ष्मी, अनेक अंगाने प्रगट होणाऱ्या कृष्णाच्या माहात्म्याच्या द्वारेच कृष्णाच्या अप्रगट अंतरंगापर्यंत पोहोचता येणे शक्य आहे आणि ते अप्रगट अंतरंगच तर कृष्णाच्या प्रगट माहात्म्याचे मूळ आहे. ते मूळ यथार्थपणे जाणल्यावरतीच कृष्णमाहात्म्याची बाह्यांगाने प्रगटणारी अंगे खऱ्या अर्थाने जाणता येतात आणि त्या अंगांचे महत्त्व लक्षात येते. मुळात कृष्ण, कौरव व पांडव यांच्या निमित्ताने धर्मयुद्धच घडवून आणीत होता

आणि ते यशस्वी करणे म्हणजे त्या युद्धात धर्माला विजय प्राप्त करून देणे हेच व्यवधान मुख्यत्वे करून कृष्णाठायी होते. त्यामध्ये अर्जुनाचे सारथ्य करणे, द्रौपदीला आधार देणे, पांडवांना भीष्मांपासून वाचवणे इत्यादी घडणाऱ्या गोष्टी त्या युद्धाचा एक भाग होत्या. युद्धातील असे अनेक प्रसंग कृष्णाने त्या त्या वेळी कौशल्याने व यशस्वीपणे निभावून नेलेच. पण तरीही युद्ध जिंकण्याचे कृष्णाचे मूळ ध्येय कृष्णाठायी जागृत होते आणि तेच त्याला नेहमी सावधही ठेवत असे.

कृष्ण जेव्हा द्रौपदीसह पांडवांच्या शिबिरात परत आला आणि जेव्हा पांडवांना सर्व वृत्तांत कळला तेव्हा सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. 'कृष्णामुळेच या प्राणसंकटातून सुटका झाली आहे' याची जाणीव सर्व पांडवांना झाली होती आणि प्रत्येकाने त्याची त्याची कृतज्ञता त्याच्या त्याच्या परीने कृष्णाजवळ व्यक्त केली. धर्मराजाने कृष्णाच्या खांद्यावर प्रेमाने थोपटले. भीमाने कृष्णाचे हात आपल्या हातात घेऊन ते प्रेमाने दाबले. नकुल व सहदेव यांनी कृष्णाला नम्रतेने वाकून अभिवादन केले. अर्जुनाने कृष्णाला प्रेमाने दृढालिंगनच दिले. द्रौपदीने अश्रुपूर्ण नेत्रातील दृष्टीनेच तिचे सर्व भाव कृष्णापर्यंत पोहोचवले आणि कृष्णानेही द्रौपदीकडे त्याच नजरेने पाहून द्रौपदीचा भाव त्याला पावल्याचे सूचित केले. जास्त काही करण्याची वा बोलण्याची आवश्यकता कृष्ण व द्रौपदी या दोघांनाही जाणवली नाही. सर्वांच्याच उचंबळून आलेल्या भावना थोड्या वेळाने हळूहळू ओसरल्यावरती कृष्णाने बोलावयास सुरूवात केली.

"परमेश्वराच्या कृपेने आपल्यावर आलेले मोठे कठीण संकट बाजूला सरलेले आहे खरे, परंतु अजूनही युद्ध संपलेले नाही या गोष्टीचे भान आपण सर्वांनीच ठेवावयास हवे आणि या युद्धाचा शेवट तुम्हा पांडवांचा विजय होण्यामध्येच झाला पाहिजे. तेच व्यवधान आपण राखले पाहिजे. एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की जोपर्यंत भीष्म हे युद्ध लढत आहेत तोपर्यंत पांडवांना विजय प्राप्त होण्याची सुतराम शक्यताही नाही. मग हे युद्ध कितीही दिवसच काय कितीही वर्षे जरी चालले, तरी या युद्धाचा काहीही निर्णय होणे शक्यच नाही. कारण भीष्म हे पांडवांनाच काय, कोणत्याही योद्ध्यासाठी अजिंक्यच आहेत ही वस्तुस्थिती आहे आणि ती आपण मान्य



करून स्वीकारली पाहिजे. एवढेच नव्हे, तर युद्ध जिंकण्यासाठी जर इतर मार्गांचा अवलंब करण्याची वेळ आली तर त्या मार्गांचे अवलंबन करण्याची आपली तयारी हवी आणि तशी वेळ आता येऊन ठेपलेली आहे.


भीष्मांचा पराभव करण्यासाठी एकच व्यक्ती आपल्याला साहाय्यभूत होऊ शकते आणि त्या व्यक्तीचे नाव आहे ‘शिखंडी’. या शिखंडीच्या ठिकाणी स्त्रीत्व व पुरूषत्व असे दोन्हीही आहेत. मूळच्या स्त्री देहाच्या असलेल्या शिखंडीने दीर्घकाळ तपश्चर्या करून देहाचे पुरूषत्व प्राप्त करून घेतलेले आहे. भीष्म हे क्षत्रिय धर्मानुसार स्त्रियांवर केव्हाही शस्त्र चालवत नाहीत. त्यामुळे ते या शिखंडीवर शस्त्र चालवणे कधीही शक्यच नाही. नेमका याच गोष्टीचा उपयोग आता आपल्याला करून घ्यायचा आहे. उद्या युद्धामध्ये आपण शिखंडीला भीष्मांसमोर उभे करू. त्यामुळे भीष्मांना शस्त्र खाली ठेवणे भागच पडेल आणि मग तीच वेळ अर्जुनाने साधायची आहे. शिखंडीच्या आड उभे राहून भीष्मांना बाणांनी पूर्णपणे विद्ध करण्याची जबाबदारी अर्जुनाची आहे. भीष्म तर युद्धभूमी सोडून जाणे शक्यच नाही आणि कौरव सेनेने त्यांना रक्षण देण्याचा जरी कितीही प्रयत्न केला, तरी अर्जुनापुढे त्यांचा टिकाव लागणारच नाही. आणि मग भीष्मांचा पाडाव अटळ आहे.”

कृष्णाचे बोलणे व योजना लक्षपूर्वक ऐकणाऱ्या पांडवांच्या मुखावरील भाव वेगवेगळे होते आणि ते क्षणाक्षणाला बदलतही होते. धर्मराजा तर जास्तच नाराज झाला होता. भीष्मांचा पराभव करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे हे त्या सर्वांनाच कळत होते. परंतु त्यांचे मन मात्र तो मार्ग स्वीकारण्यासाठी तयार होत नव्हते. योग्य-अयोग्य व धर्म-अधर्म यांच्या विचाराने त्यांची मने संभ्रमितच झालेली होती. परंतु त्यांच्या दृष्टीसमोर दुसरा कोणता मार्गही नव्हताच. पांडवांची ही द्विधा मनःस्थिती कृष्णाने ओळखली आणि त्याने पुन्हा त्यांच्याशी बोलण्यास सुरुवात केली.

“धर्मराजा, तुमच्या सर्वांच्या व विशेषतः तुझ्या मनात काय विचार चालू आहेत हे मला माहित आहे. परंतु एकच गोष्ट लक्षात ठेव की आताची वेळ ही योग्य-अयोग्य किंवा धर्म-अधर्म याविषयीचा विचार करण्याची

नाहीच आहे. कारण धर्मशास्त्रानेही संकटकाळासाठी म्हणून आपद्धर्म हा सांगितलेला आहेच. परंतु त्या सर्वाची छाननी करण्याची ही वेळ नव्हे. युद्ध संपल्यानंतर आपण त्या सर्वाचा सावकाशपणे विचार करू. कारण युद्ध संपेपर्यंत अशाच तऱ्हेचे निर्णय कदाचित आपल्याला आणखीनही घ्यावे लागतील, काही सांगता येत नाही. ते निर्णय जसे तात्काळ घ्यावयाचे असतील तसेच ते तात्कालिकही असतील. अशा निर्णयांचा नियम होणार नाही, याची मात्र आपण निश्चितपणे काळजी घेऊ म्हणजे झाले. धर्मराजा, मी तुला एवढे नक्की आश्वासन देतो की युद्ध संपल्यानंतर आपण धर्मशास्त्रातील अधिकारी जनांची भेट घेऊ आणि त्यांच्याकडून तुला शंका येत असलेल्या निर्णयांविषयीच्या सर्व शंकांचे निरसन करून घेऊ. त्यातूनही आपले काही निर्णय धर्मशास्त्राला धरून नाहीत असे जर सिद्ध झाले, तर त्याबद्दल आपण सर्वजण योग्य ते प्रायश्चित्तही घेऊ. मग तर झाले?”

कृष्णाचे बोलणे एवढे समजूतदारपणाचे होते की त्यामुळे धर्मराजासह सर्वच पांडवांच्या मनाचे समाधान झाले. त्यातूनही धर्मराजाची समजूत पटली ही गोष्ट जास्त महत्त्वाची होती. कारण धर्मशास्त्राच्या आचरणाबाबत त्याचे मन अधिकच संवेदनाशील होते. प्रत्यक्ष युद्धकाळात जर मनात काही शंका आल्या तर त्याविषयी युद्धानंतर खात्री करून घेण्याची कृष्णाची सूचना मात्र, धर्मराजाला अत्यंत मानवली. त्यासाठी त्याला कृष्णाचे कौतुकही वाटले आणि धर्मराजाने तसे बोलूनही दाखवले. अर्थात कृष्णाच्या बोलण्यातील भावार्थ अर्जुनाच्या मात्र निश्चितच लक्षात आला. ‘आता व पुढेही युद्धाच्यावेळी ताबडतोब निर्णय घेण्यामध्ये धर्मराजाच्या भूमिकेचा काहीही अडथळा येऊ नये’ याच एका हेतूने हे सर्व बोलणे कृष्णाने केलेले आहे ही गोष्ट अर्जुनाने ओळखली. कृष्णाच्या बुद्धीचातुर्याचे अर्जुनाला कौतुकही वाटले आणि त्याने कृष्णाकडे पाहून मंदस्मित करून कृष्णाला दाद देत असल्याचे सूचित केले. कृष्णाने मात्र त्याच्या मुखावरील गंभीरता प्रयत्नपूर्वक कायम राखली. कृष्णाच्या बोलण्यामागील हेतू द्रौपदीच्याही लक्षात आला आणि कृष्णमाहात्म्य जाणवून तिचे मन कृष्णप्रेमाने भरून आले.




हे लक्ष्मी, धर्मराजासह सर्व पांडवांची संमती मिळवण्यामध्ये यशस्वी झाल्यानंतर मात्र, कृष्णाने वेळ जराही वाया जाऊ दिला नाही. त्याने दूतांकरवी तातडीने निरोप पाठवून शिखंडीला बोलावून घेतले. काही कारणाने शिखंडीचाही भीष्मांवरती राग होता. भीष्मांनी आपल्यावर अन्याय केला आहे, अशी त्या शिखंडीची पक्की धारणा होती. त्यासाठी भीष्मांचा सूड घेण्याच्या भावनेने शिखंडीही मनातून अत्यंत आतुर होता आणि योग्य संधीची वाट पहात होता. नेमकी तीच संधी कृष्णाने त्याला उपलब्ध करून दिल्यावरती तर शिखंडीला चेवच आला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा सर्व गोष्टींची इत्यंभूत माहिती कृष्णाकडे नेहमी तयार असे. योग्य वेळ येताच तो त्याचा योग्य उपयोग करून घेत असे आणि सर्व काही कृष्णाच्या मनासारखे झाल्यानंतर कृष्ण मात्र, नामानिराळा व मोकळा रहात असे. सर्व करूनही नामानिराळा राहून आणि सर्व गुंत्यात कारणापुरते तेवढा वेळ गुंतल्यासारखे दाखवून, कृष्ण तो गुंता सोडवून स्वतः मात्र मोकळा रहात असे. कृष्णचरित्रातील वारंवार प्रगट होणारे हे रहस्य कृष्णाच्या अंतःकरणाच्या निर्मोही व निरहंकारी अवस्थेचेच लक्षण होते. तेच कृष्णाचे माहात्म्य होय.'

* * * * *

# शरपंजरी भीष्म

हे लक्ष्मी, आत्तापर्यंत युध्दाचे नऊ दिवस उलटून गेलेले होते. तरीही जयपराजयाचे पारडे कोणत्याही बाजूला झुकलेले नव्हते. पण दहाव्या दिवसापासून युध्दाला वेगळी कलाटणी मिळाली. कौरवसेनेचे सेनापती म्हणून अधिपत्य करीत असलेले भीष्म जेव्हा रणांगणात उतरले, तेव्हा त्यांच्यासमोर शिखंडीला उभे करून अर्जुनाने त्याच्या पाठीमागून युध्दाला सुरूवात केली. शिखंडीला समोर पाहिल्याबरोबर भीष्मांनी लागलीच ओळखले की ती चाल कृष्णानेच रचलेली आहे. भीष्मांनी मंदस्मित करून अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करणाऱ्या कृष्णाकडे साभिप्राय नजरेने पाहिले. परंतु कृष्णाची मुद्रा मात्र गंभीरच होती. ‘स्त्रियांवर शस्त्र चालवायचे नाही’ या क्षत्रिय धर्माच्या संकेतानुसार भीष्मांनी त्यांच्या हातातील धनुष्य-बाण ताबडतोब खाली ठेवले. खरे तर, ‘निःशस्त्र व्यक्तीशी लढायचे नाही’ हाही क्षत्रिय धर्माचा संकेत आहे. त्यामुळे अर्जुनाच्या मनाचाही थोडासा गोंधळ झालाच. धनुष्यावरून बाण सोडणारा अर्जुनाचा हातही थांबल्यासारखा झाला. अर्जुनाची ही मनःस्थिती कृष्णाच्या लगेचच लक्षात आली. त्याने झटकन मान मागे वळवून अर्जुनाकडे पाहिले आणि अर्जुनाला बाण सोडण्याची क्रिया चालू ठेवण्याची नेत्रखूण केली. कृष्णाची इच्छा प्रमाण मानून अर्जुनाने भीष्मांवर बाण सोडणे चालूच ठेवले. भीष्मांचा पराभव करायची हीच एक संधी आहे हे अर्जुनाने ओळखले आणि बाण सोडण्याची गती वाढवून भीष्मांवरती बाणांचा वर्षावच केला. शरीरात आरपार जाऊन रूतून बसलेल्या बाणांनी भीष्मांचे सर्व शरीर विध्द झाले आणि रथातून बाहेर पडून भीष्मांचा देह रणभूमीवर कोसळून पडला. भीष्म रणभूमीवर पडल्याची बातमी सर्वत्र पसरली आणि कौरवसेनेमध्ये एकच हाहाकार माजला. सर्व कौरवसैन्य माघार घेऊन शिबिरात परत फिरले.

कृष्ण व अर्जुन रथातून त्वरेने उतरले आणि धावतच भीष्मांच्या जवळ आले. भीष्मांच्या शरीरातून पार झालेल्या बाणांची टोके जमिनीत रूतली होती आणि त्याच्यावर भीष्मांचा देह पडलेला होता. भीष्म जणूकाही बाणांच्या शय्येवरतीच पहुडले आहेत, असेच वाटत होते. भीष्मांची मुद्राही अत्यंत शांत होती. त्या ठिकाणी कोणतेही क्लेश वा



भीती यांचा लवलेशही नव्हता. कृष्णाला पाहिल्यावरती भीष्मांनी त्याच्याकडे पाहून मंद हास्य केले आणि त्यांनी नजरेच्या खुणेने कृष्णाला आपल्याजवळ बोलावले. कृष्णाने पुढे होऊन भीष्मांच्या मस्तकावर हात ठेवला आणि हळूवारपणे थोपटले. शरीराच्या त्याही अवस्थेत भीष्मांनी कष्टपूर्वक हात जोडून कृष्णाला वंदन केले आणि थोड्याशा क्षीण पण स्पष्ट आवाजात ते कृष्णाशी बोलू लागले.

"कृष्णा, तुझी लीला जरी अगम्य असली तरी ती तेवढीच रम्यही आहे. तुझे भक्त तुला अत्यंत प्रिय असले तरी तुझे धर्मकार्य तुला अधिक प्रिय आहे. अर्थात् ते साहजिकच आहे. कारण त्यासाठीच तुझा अवतार आहे आणि तेच तुझे जीवन आहे. तुला भक्तांचा भक्तिभाव निश्चितच आनंदित करतो. पण तुझ्या भक्तांनी तुझ्या कार्यात तुला सहाय्यभूत व्हावे अशीच तुझी योग्य अपेक्षा असते. एखादा भक्त तुझ्या कार्यात बाह्यांगाने आड येऊ लागला, तर त्याला तेवढ्याच सहजतेने बाजूला करायलाही तू कमी करत नाहीस. सकृतदर्शनी दिसणारा हा विरोधाभास केवळ तुझ्या विशुध्द अंतःकरणाठायीच संभवतो आणि तो तुला अतिशय शोभूनही दिसतो. बाह्यांगाने परस्पर विरोधी दिसणारे भाव जेव्हा तुझ्या मुखावर प्रतिबिंबित होतात, तेव्हा तुझे मुखकमल अत्यंत विलोभनीय  दिसते. ते तुझे रमणीय रूप पाहताना सर्व देहभानच हरवले जाते आणि मानवी जन्माचे सार्थक झाल्याचा तृप्त भाव अनुभवास येतो.


कृष्णा, हा देह तर नाशिवंतच आहे आणि त्याचा केव्हा ना केव्हा त्याग करणे हे अटळच आहे. परंतु माझ्या मृत्यूची वेळ अजून आलेली नाही. मी 'इच्छामरणी' असल्यामुळे दक्षिणायन संपेपर्यंत माझे प्राण अवरोध करून ठेवीन आणि उत्तरायण सुरू झाल्यावरती स्वेच्छेने देहत्याग करीन. माझ्यातील आत्मतत्त्व व्यापक परमात्म तत्त्वात सहजपणे विलीन होईल याची मला खात्री आहे. मुख्य म्हणजे, मी आता युद्धात निष्क्रिय झाल्यामुळे तुझे काम झालेले आहे. तुझ्या सहाय्याने पराक्रमी अर्जुनाचाच विजय होणार आहे ही गोष्ट तर निश्चितच आहे. तुझ्या धर्मकार्याचा विजय या नेत्रांनी पाहिल्यावरतीच माझे नेत्र समाधानाने मिटतील. परंतु माझी तुझ्याकडे एकच प्रार्थना आहे की पांडवांना विजय मिळाल्याची बातमी

मला तू स्वतः येऊन सांगावीस. तुझ्या मुखावरील तो विजयानंद पहाण्याचे भाग्य मला लाभावे, एवढीच माझी विनंती आहे.”

बोलता बोलता भीष्मांचा आवाज मंद मंद होत राहिला. त्यांनी कृष्णाला दोन्ही हात जोडून पुन्हा वंदन केले आणि शांतपणे त्यांचे नेत्र मिटून घेतले. कृष्णाने भीष्मांचे दोन्ही हात धरून ते अलगदपणे खाली बाजूला ठेवले आणि भीष्मांच्या मस्तकाला हळुवारपणे हस्तस्पर्श करून कृष्ण भीष्मांपासून हलकेच दूर झाला. भीष्मांचे बोलणे ऐकून व त्यांचा कृष्णाठायीचा भाव पाहून अर्जुनही अत्यंत भावपूर्णच झालेला होता. पाणावलेल्या नेत्रांनी अर्जुनाने भीष्मांच्या पदांना स्पर्श करून नम्रभावाने नमस्कार केला आणि तो कृष्णाच्या जवळ येऊन उभा राहिला. कृष्णाने अर्जुनाच्या पाठीवर थोपटून त्याचे सांत्वन केले आणि त्याचा हात आपल्या हातात घेतला. कृष्ण व अर्जुन रथात बसून अत्यंत गंभीर मुद्रेने पांडवांच्या शिबिराकडे परत फिरले. दोघेही एकमेकांशी काहीच बोलत नव्हते. आजच्या दिवशी विजय प्राप्त होऊनही त्यांच्या मुखावर विजयाचा आनंद मात्र मुळीच नव्हता.”

नारदाच्या मुखातून बाहेर येणारे शब्द व त्याचे बोलणे हे अधिकाधिक भावपूर्ण होत होते. ही भावपूर्णता केवळ प्रसंगातील भावपूर्णतेमुळे नव्हती, तर प्रसंग वर्णनाच्या निमित्ताने नारदाच्या अंतःकरणातील भावपूर्णता प्रगट होत होती. पण प्रसंगातील भावपूर्णता लक्ष्मीच्या मनाला मात्र अत्यंत भावपूर्ण करीत होती. लक्ष्मीच्या त्या अवस्थेमुळेच कृष्णाचे माहात्म्य तिला जाणवत होते आणि ते माहात्म्य अधिक सखोलतेने व अधिक व्यापकतेने जाणून घेण्याची तिची आर्तताही अधिकच वाढत होती. लक्ष्मीची ही भक्तिभावाची अवस्थाच तिच्या बोलण्यातून अगदी सहजपणे प्रगट होऊ लागली.

“नारदा, या कृष्णचरित्राच्या माध्यमाने जशी त्याच्या अंतःकरणाची अवस्था व्यक्त होते, तशीच कृष्णाविषयीच्या भक्तिभावाचीही अनेक अंगे प्रगट होतात. त्या भक्तिभावाच्या अंगांचे हृदय हे कृष्णप्रेमच असल्यामुळे, त्या विविध अंगांतून एकीएक कृष्णप्रेमच व्यक्त होते. म्हणूनच त्या विविधतेतीलही एकविधता जाणवते आणि ती म्हणजे कृष्णाचे अंतःकरण.



भक्तिभावाने ज्यांचे अंतःकरणच कृष्णाच्या अंतःकरणासारखेच झाले, त्यांनाच कृष्ण खऱ्या अर्थाने पावला असेच म्हणावे लागेल. बाकीच्या काही जणांचे कृष्णप्रेम भावनेने त्यांच्या मनाच्या अवस्थेपर्यंतच राहिले, तर काहीजणांना कृष्णमाहात्म्य त्यांच्या बुद्धीठायी केवळ शब्दरूपानेच कळले. पण कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जाणून ज्यांना कृष्णप्रेमाची गोडी लागली, त्यांच्याच चित्ताठायी कृष्णाचे ईश्वरी प्रेम अनुभवण्याची आर्तता कायमची निर्माण झाली आणि त्यांचेच अंतःकरण कृष्णमय होऊन राहिले. त्या भक्तांनीच कृष्णाचे माहात्म्य अनुभवले. त्यांनीच कृष्णप्रेमाचा खरा आनंद नित्य अनुभवला आणि तेच कृष्णाचे खरे भक्त आहेत हे सिद्ध झाले. भीष्माचार्य हे असे कृष्णाचे सिद्ध भक्त होते, असे निश्चितपणे जाणवते.

नारदा, भीष्मांनी कृष्णाच्या अंतःकरणाची अवस्था केवळ ओळखलेली व जाणलेली नव्हती, तर ते कृष्णाच्या त्या अवस्थेशी त्यांच्या भक्तिभावाने पूर्णपणे ऐक्य पावलेले होते आणि म्हणूनच कृष्णचरित्राचा आनंदही ते पूर्णपणे घेत होते. हेच त्यांचे आणि म्हणजेच भक्तिभावाचे विशेषत्व होय. भीष्माचार्य बाह्यांगाने युद्धात कृष्णाच्या प्रत्यक्ष साथीला नव्हतेच. पण तरीही त्यांच्या भक्तिभावामुळे भीष्माचार्य कृष्णाच्या अंतःकरणात, कृष्णाच्या अगदी संगे होते असेच म्हणावे लागेल आणि तेही एवढ्या संगे म्हणजे जवळ होते की कृष्णाच्या अंतःकरणाचे ते अंगच होऊन राहिले होते. म्हणजे भीष्माचार्यच खऱ्या अर्थाने कृष्णाच्या संगतीत होते असेच म्हणावे लागेल. पण अर्जुन हा युद्धात कृष्णाच्या प्रत्यक्ष साथीला होता. त्याच्याठायी कृष्णाविषयी प्रेम होते आणि श्रद्धाही होती. एवढेच नव्हे, तर कृष्णाच्या मुखातून त्याने आत्मज्ञान श्रवणही केलेले होते. पण त्या ज्ञानाचे श्रेष्ठत्व कळूनही अर्जुनाला त्याचा अनुभव आलेला नव्हता. त्याचप्रमाणे अर्जुनाच्याठायी कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्याचा पूर्ण निश्चयही झालेला नव्हता. त्यामुळेच अर्जुनाच्याठायी कृष्णाविषयीचा भक्तिभावही अजून तरी निर्माण झालेला नव्हता. म्हणूनच अर्जुन त्याच्या अवस्थेने कृष्णाच्या अंतःकरणापासून दूरच होता. म्हणजेच अर्जुन खऱ्या अर्थाने कृष्णाच्या संगे नव्हताच. तेव्हा अर्जुन कृष्णाच्या प्रत्यक्ष साथीला असूनही प्रत्यक्ष कृष्णाच्या संगे नव्हता आणि भीष्माचार्य कृष्णाच्या प्रत्यक्ष साथीला

नसूनही प्रत्यक्ष कृष्णाच्या संगे होते. कारण कृष्ण म्हणजे त्यांचे अंतःकरणच होय. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाने हसून मान डोलावली आणि तो म्हणाला,

“अगदी बरोबर! लक्ष्मी तुझी विषयाची मांडणी अगदी योग्य अशीच आहे आणि तुला तो विषय योग्य प्रकारे समजल्याचेच ते लक्षण आहे. परंतु एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घे की कृष्णाला भीष्मांच्या भक्तिभावाचा आनंद निश्चितच होत होता, परंतु त्याला जरूरी होती ती अर्जुनाच्या साथीची. कारण अर्जुनाच्या साथीनेच कृष्णाचे कार्य यशस्वी होणार होते. भीष्मांच्या भक्तिभावाचा आनंद कृष्णाच्या ज्या अंतःकरणाला होत होता, त्याच कृष्णाच्या अंतःकरणामध्ये त्याच्या कार्याचे मूळही होते. त्यामुळेच अर्जुनाची कार्यातील साथही कृष्णाच्या अंतःकरणाला आनंदित करीत होतीच. प्रश्न शिल्लक रहातो तो फक्त म्हणजे कृष्णाला साथ व संगत करणाऱ्यांचा. त्याचे फळ म्हणजे जो अनुभव, तो मात्र ज्याला त्याला त्याच्या त्याच्या भावानुसारच मिळत असतो, अशी मुळी ईश्वराची नियतीच आहे. जसा संसारात ‘जशी वासना तसे कर्म आणि जसे कर्म तसे फळ’ असा नियम आहे तसाच भक्तिमार्गातही ‘जसा भाव तशी कृती आणि जशी कृती तसे फळ’ असाच संकेत आहे. कृष्णाच्या कार्यात कोणी सेवा म्हणून त्याला मदत केली, त्याचे कृष्णाला कौतुकच वाटले. कोणी कृष्णावरील व्यक्तिगत प्रेमाने त्याच्या कार्याला साथ केली, त्याचे कृष्णाला समाधान झाले. कोणी कृष्णावरील श्रद्धेने त्याची व्यक्तिगत सेवा केली, त्यानेही कृष्णाला संतोष झाला. कोणी कृष्णावरील व्यक्तिगत प्रेमाने कृष्णाच्या जवळ राहिले, त्यानेही कृष्ण सुखावलाच. पण कोणी कृष्णावरील भक्तिभावाने सदैव कृष्णाच्या संगे राहिले, त्याने मात्र कृष्ण खरा आनंदित झाला. ज्यांनी कृष्णाची कार्यात सेवा वा त्याच्यावर व्यक्तिगत प्रेम केले, त्यांना कृष्णाने त्यांच्या त्यांच्या भावानुसार निश्चितच फळ दिले. पण जे कृष्णाविषयीच्या भक्तिभावाने युक्त होऊन राहिले, त्यांचा मात्र कृष्ण कायमचा ऋणी होऊन राहिला. भक्तिभाव हाच फळरूप असल्यामुळे कृष्णही त्यांना काही वेगळेपणाने देऊच शकत

नव्हता. कारण कृष्ण व त्याच्या भक्तांमध्ये काहीही वेगळेपणा शिल्लकच राहिलेला नव्हता.

पण कृष्णाने व्यक्तिगत म्हणा किंवा त्याच्या कार्यात म्हणा, सेवेचा व प्रेमाचा स्वीकार केल्यामुळे एक गोष्ट निश्चितपणे घडली की अनेकांना कृष्णाची जवळीकता मिळाली आणि कृष्णाचे माहात्म्य जवळून पहाण्याची व जाणण्याची संधी मिळाली. त्यातून ज्यांना कृष्णाचे व्यक्तिमत्त्व व त्याचे माहात्म्य या दोन्हीचे मूळ असलेले अंतःकरण जाणवले आणि ज्यांना त्याचा ध्यासच लागला, त्यांनी मात्र मिळालेल्या संधीचे सोनेच केले. त्यातूनही जे त्या ध्यासाने कृष्णाच्या अंतःकरणाशी एकरूप झाले त्यांच्या जीवनाचे तर सोनेच झाले आणि कृष्णभक्तिने जे कृष्णमयच झाले, ते कृष्णभक्त तर कृष्णाच्या कंठातील एक अलंकारच होऊन राहिले. अशा दैदिप्यमान भक्तांमुळे कृष्णचरित्रातील मूळची तेजस्विता अधिकच झळाळली आणि कृष्णचरित्रातील सहज सौंदर्यही अधिकच खुलले. भीष्मही त्यांच्या कृष्णभक्तिमुळे, कृष्णचरित्रातील असेच एक ललामभूत आभूषण होऊन राहिले.

लक्ष्मी, खरे तर अजून युद्ध पूर्ण झालेले नाही आणि त्यामुळे त्या विषयीचे सांगणेही संपलेले नाही. भीष्मांनी अवरोध करून ठेवलेल्या त्यांच्या प्राणांचा त्याग हा युद्ध संपल्यानंतरच केला. त्यांच्या प्राणत्यागाचा प्रसंगही त्यांच्या कृष्णावरील भक्तिभावामुळेच अत्यंत भावपूर्णच झाला. तेव्हा त्या प्रसंगाचे वर्णन आधी करणे, हेच उचित होईल. कारण त्यामुळे कृष्णचरित्रातील एका भावपूर्ण अध्यायाची सुयोग्य सांगता झाल्यासारखे होईल. युद्धाच्या दहाव्या दिवशी भीष्म रणभूमीवरती पडल्यानंतर पुढे आणखीन आठ दिवस युद्ध चालू राहिले आणि अठराव्या दिवशी दुर्योधनाच्या मृत्यूने युद्धाचा शेवट झाला. तोपर्यंतचा व त्याच्यानंतरचाही भाग मी पुढे सांगणारच आहे. युद्ध संपल्यानंतर सूर्याचे दक्षिणायनही संपले आणि उत्तरायणाला सुरुवात झाली. भीष्मांना दिलेल्या शब्दानुसार कृष्णाने रणभूमीवर जाऊन भीष्मांची भेट घेतली. धर्मराजालाही कृष्णाने त्याच्याबरोबर मुद्दामहूनच घेतले होते. मिळालेल्या विजयाचा आनंद अनुभवण्याची धर्मराजाची मनःस्थितीच नव्हती. त्याचे मन खेदाने व विषादाने पूर्णपणे भरलेले होते.

उभय सैन्याचा घडलेला संहार बघून त्याच्या मनाला निराशेने व उदासीनतेने पूर्णपणे घेरलेले होते. युद्ध केल्याच्या अपराध भावनेने धर्मराजाला पश्चात्तापच होत होता. भीष्मांच्या समोर आल्यावरती तर धर्मराजा फक्त मान खाली घालूनच उभा होता. भीष्मांची अवस्था त्याला बघवतही नव्हती आणि त्यांच्या नजरेला नजर देण्याचे धैर्यही त्याला होत नव्हते. अशा वेळी कृष्णाच्या विनंतीवरून भीष्मांनी वडिलकीच्या नात्याने धर्मराजाचे सांत्वन केले. एवढेच नव्हे, तर पुढे राज्य करीत असताना नीती व धर्माचे राज्य करण्यासाठी म्हणून भीष्मांनी धर्मराजाला राजधर्माचेही ज्ञान दिले. भीष्मांच्या अनुमतीने धर्मराज प्रणाम करून तेथून निघून गेला. त्यानंतर भीष्मांनी दोन्ही कर जोडून कृष्णाला भक्तिभावाने वंदन केले आणि ते म्हणाले,

"कृष्णा, अंतकाली जे तुझे स्मरण करतात ते सद्गतीला जातात, अशी तुझी महती आहे. परंतु माझे परमभाग्य आहे की माझ्या अंतःकाळी तू प्रत्यक्ष माझ्या जवळच आहेस. माझ्या देहत्यागाची वेळ आता नजिक येऊन ठेपलेली आहे. अशा वेळी माझी तुझ्याकडे एकच विनंती आहे की तू माझ्या सन्मुख उभे रहावेस. म्हणजे तुझ्या रूपाकडे पहात असतानाच माझे प्राण पंचत्वात विलीन होतील. तुझ्या सगुण रूपाच्या ध्यासामध्ये असतानाच माझ्या जीवनाचा होणारा शेवट, हा अत्यंत गोड व आनंददायी असेल. माझा आत्मा जसा परमात्म्यात विलय पावेल तसाच माझा आत्मानंदही तुझ्या परमानंदात मिसळून राहील.

कृष्णा, तुझ्याकडे प्रेमाच्या हक्काने मी आणखीन एक मागणे करीत आहे. गोकुळात असताना तू गोकुळवासीयांच्या प्रेमाखातर तेथे मुरलीचा मधुर नाद घुमवला होतास आणि त्या भाग्यवान गोकुळवासीयांना त्या नादाचे वेडच लावले होतेस, अशी तुझी किर्ती मी ऐकून आहे. त्या मुरलीच्या द्वारे तू सनातन असा ब्रम्हनादच प्रगट केला होतास, हे सत्य मी जाणून आहे. तो तुझ्या मुरलीचा नाद या माझ्या अंतःकाळी श्रवण करावा एवढीच माझी केवळ इच्छाच नव्हे, तर आर्तताच आहे. या माझ्या अंतिम इच्छेची तू पूर्तता करावीस, एवढीच तुझ्या पवित्र चरणांशी माझी प्रार्थना



आहे.” असे बोलता बोलताच भीष्मांचा स्वर मंदावून पूर्णपणे थांबला. परंतु त्यांचे अश्रुपूर्ण नेत्र मात्र, कृष्णाच्या मुखाकडे लागून राहिलेले होते.


भीष्मांच्या त्या मागण्याने कृष्णही अत्यंत भावपूर्ण झाला आणि त्याच्या नेत्रातूनही अश्रुधारा वाहू लागल्या. तशाच अवस्थेत कृष्ण भीष्मांच्या सन्मुख अगदी जवळ येऊन उभा राहिला. भीष्मांचे दोन्ही हात कृष्णाने आपल्या हातात घेतले आणि स्वतःच्या हृदयाशी धरले. देहाच्या त्याही अवस्थेत भीष्मांच्या तेजस्वी मुखावरती मंदस्मित झळकले आणि त्यांनी त्यांचे मस्तक किंचित हलवून लववले. कृष्णाने कमरेच्या शेल्यात खोवलेली आणि जणू मुद्दामच आणलेली त्याची मुरली अलगदपणे बाहेर काढून आपल्या अधरावर ठेवली. कृष्णाने त्याचे नेत्र मिटून घेतले. त्याचे मुखही आरक्त होऊन विशेष तेजस्वी दिसू लागले आणि क्षणात कृष्णाच्या मुरलीतून स्वरांचा नाद हळूहळू बाहेर येऊ लागला. अतिशय आर्त भावाने व देहभान पूर्णपणे हरवलेल्या अवस्थेतून कृष्णाकडून मुरलीवादन घडत होते. सुरुवातीला हळुवार असलेला मुरलीचा नाद जसा जसा अधिकाधिक तीव्र होत राहिला, तशी तशी त्या नादाची माधुरीही अधिकाधिक वाढत राहिली. सर्व आसमंतच कृष्णाच्या मुरलीच्या नादाने भरून व भारून राहिला होता. काळाचे अस्तित्वच जाणवत नव्हते. असा किती वेळ गेला असेल, याची गणना करता येणेही शक्यच नव्हते. परंतु काही काळानंतर कृष्णाकडून उत्स्फूर्तपणे घडणारे मुरलीवादन तेवढ्याच सहजतेने थांबलेही. देहभानावर येऊन कृष्णाने मुरली ओठांवरून बाजूला केली आणि त्याने भीष्मांकडे प्रेमाने पाहिले. पण भीष्मांच्याकडून जेव्हा काहीच प्रतिसाद मिळाला नाही तेव्हा कृष्ण लगबगीने भीष्मांच्या अगदी जवळ आला. भीष्मांच्या मुखावरले स्मित व प्रसन्नता कायम होती. फक्त त्यांचे नेत्र मात्र स्थिर व स्तब्ध होऊन राहिले होते. मुखावरील तेज कायम असूनही नेत्रातील तेज शांत झाले होते. भीष्मांची आत्मज्योत परमात्म तेजात सामावली गेली होती आणि देहातील चिद्‌शक्ती सुप्त झाली होती. भीष्मांची ती अवस्था पाहून कृष्णाचे अंतःकरणही गलबललेच. कृष्णाने पुढे होऊन भीष्मांचे उघडे नेत्र आपल्या हाताने मिटले आणि दोन्ही हात जोडून भीष्मांना वंदन केले. कृष्णाशी भीष्मांच्या झालेल्या ऐक्याचा

अनुभव अंतःकरणामध्ये घेऊन कृष्ण अत्यंत जड पावलांनी एकटाच तेथून परत निघाला.”

बोलता बोलता नारदाचे शब्द जड होऊ लागले होते आणि नारदाला शब्दोच्चारही प्रयत्नपूर्वकच करावा लागत होता. नारदाने त्याचे नेत्र अलगद उघडून लक्ष्मीकडे पाहिले असता त्याच्या लक्षात आले, की लक्ष्मीच्या मिटलेल्या नेत्रातूनही अश्रुबिंदू एकेक करून ओघळतच होते. लक्ष्मीची काहीही बोलण्याची अवस्था नाही हे ओळखून नारदाने त्याचे बोलणे प्रयत्नपूर्वक चालूच ठेवले.

“लक्ष्मी, काळ कोणासाठी कधीही थांबत नाही. काळाचा वेग एवढा जबरदस्त असतो की ‘मी’ ‘मी’ म्हणवणाऱ्या कित्येकांना काळाची ही गती आकलन होत नाही. जेव्हा ती कळते तेव्हा फारच उशीर झालेला असतो. कारण त्यांच्यासाठी फारच थोडा वेळ शिल्लक राहिलेला असतो आणि काळाच्या उदरात गडप होण्याशिवाय त्यांना गत्यंतरच राहिलेले नसते. अशा अनेकांना आपल्या उदरात जिरवून, काळाचा प्रवाह मात्र अखंड चालूच रहातो. परंतु महात्मे महापुरूष मात्र, जीवनाला असणारी ही काळाची मर्यादा ओळखतात आणि आपले जीवनकार्य आधीच पूर्ण करून जीवनाचे ध्येय गाठतात. अत्यंत शांतपणे व समाधानाने त्यांचा जडदेह काळाच्या स्वाधीन करून, त्यांचे आत्मस्वरूप व्यापक परमात्मस्वरूपात विलीन करतात. अशाच महात्म्यांची जीवनचरित्रे ही उद्बोधक व प्रेरणादायी ठरतात. मानवी जीवनाची व काळाची मर्यादा ज्यांना कळली, त्यांनाच मानवी जन्माचे मूल्य खऱ्या अर्थाने कळते आणि तेच मानवी जन्माचे सार्थक त्वरित करून घेतात. असो.

लक्ष्मी, आता भीष्म शरपंजरी पडल्यापासूनचे कथासूत्र पुन्हा घेऊन युद्धाच्या मधल्या भागाकडे पुन्हा पाहूया. भीष्मांच्या अंतकाळाला अजून अवकाश आहे हे जाणून असलेल्या कृष्णाठायी, युध्दाचे व्यवधानही तेवढ्याच सहजतेने जागृत होते. भीष्मांच्या नंतर आता पुढे युध्दाचा रंग कसा बदलेल, याचा विचारविनिमय कृष्ण पांडवांच्या शिबिरात बसून करीत होता. भीष्मांच्यानंतर कौरवसेनेचे अधिपत्य कौरव-पांडवांचे युध्दशास्त्रातील गुरू, द्रोणाचार्य यांच्याकडेच जाणार हे अगदी नक्की व



अपेक्षितच होते आणि झालेही तसेच. भीष्म युध्दभूमीवर पडल्यानंतर खरे तर, दुर्योधनाचा धीर सुटलाच होता. परंतु नाउमेद न होता त्याने कौरवसेनेचे सेनापती म्हणून गुरू द्रोणाचार्य यांच्याकडे सर्व सूत्रे अत्यंत विश्वासाने सोपवली. द्रोणाचार्य व त्यांचा अत्यंत पराक्रमी पुत्र अश्वत्थामा, हे निष्ठापूर्वक कौरवांच्या बाजूने लढत होते. त्यांनी सर्व सूत्रे हातात घेतल्यावर कौरव सैन्यात तात्पुरता का होईना, पण पुन्हा उत्साह निर्माण झाला. द्रोणाचार्यांनी दररोज नाना प्रकारच्या व्यूहरचना करून पांडवांना जेरीस आणले. त्यांच्यापुढे अर्जुनाचा पराक्रमही चालेनासा झाला आणि त्याची धनुर्विद्या गुरूपुढे कमीच पडू लागली. पांडवांच्या गोटात अत्यंत काळजीचे वातावरण निर्माण झाले. परंतु द्रोणाचार्यांचा पराभव करण्याचा निश्चित असा काहीच मार्ग सापडेना.

लक्ष्मी, तेवढ्यातच दुर्योधनाने कपटनीतीचा अवलंब करून कृष्ण व अर्जुन यांना रणभूमीपासून दूर नेले आणि इकडे द्रोणाचार्यांनी सैन्याची चक्रव्यूहाची रचना करून पांडवांना आव्हान दिले. पांडवांपुढे पेचप्रसंग निर्माण झाला. कारण चक्रव्यूहाचा भेद करण्याचे तंत्र फक्त अर्जुनालाच माहित होते. अर्जुनाचा पुत्र अभिमन्यू, याला फक्त चक्रव्यूहात शिरण्याचेच ज्ञान होते. तेवढ्या अर्धवट ज्ञानाच्या बळावर अभिमन्यू मोठ्या हिमतीने चक्रव्यूहात शिरला असता, कौरव सैन्यातील मोठ्या मोठ्या योद्ध्यांनी अभिमन्यूला चारी बाजूंनी घेरले. खरे तर, एकास एक लढण्याचा धर्मयुद्धाचा नियम आहे. परंतु मदोन्मत्त कौरवांनी एकाच वेळी अभिमन्यूवर हल्ला केला. अभिमन्यू शर्थीने लढला खरा, परंतु शेवटी त्याचा पराक्रमही कमीच पडला आणि तो जखमी अवस्थेत भूमीवर पडला. अशा वेळी, कौरव वीरांनी निःशस्त्र अभिमन्यूवर शस्त्रांचे घाव घातले आणि त्याचा अमानुषपणे वध केला. एवढेच नव्हे, तर अभिमन्यूच्या मृतदेहाची त्यांनी असभ्यपणे वागून अवहेलना केली. अभिमन्यूच्या मृत्यूचा कौरवांना हर्षोन्माद झाला. पण पांडव मात्र अत्यंत शोकग्रस्त झाले. अर्जुन व कृष्ण जेव्हा त्यांचे युद्ध आटोपून परत आले, तेव्हा त्यांना अभिमन्यूच्या मृत्यूची बातमी कळली आणि अर्जुनाला शोक अनावर झाला. कृष्णाच्या खांद्यावर डोके ठेवून तो अश्रू गाळू लागला. कृष्णालाही अत्यंत दुःख झाले. पण त्याने अर्जुनाची समजूत घालून त्याला

अभिमन्यूच्या वधाचा बदला घेण्यासाठी उद्युक्त केले. कृष्णाने अर्जुनाकडून तशी प्रतिज्ञाच करवून घेतली आणि त्याची पूर्तीही करून घेतली. अभिमन्यूच्या मृत्यूची बातमी कृष्णाने स्वतः सुभद्रेकडे जाऊन तिला सांगितली. त्यावेळी सुभद्रेच्या दुःखात समरस होताना कृष्णालाही शोक अनावर झाला. पण कृष्णाचा शोक पाहून सुभद्रेचे दुःखही हलके झाले आणि तिने स्वतःला थोडेसे सावरले.

लक्ष्मी, अशा दुष्कृत्यांनीच कौरवांच्या पापाचा घडा भरत चालला होता आणि त्यांच्या विनाशाची वेळ अधिकाधिक जवळ येत चालली होती. कृष्णानेही एक गोष्ट जाणली होती, की द्रोणाचार्यांचा वध झाल्याशिवाय युद्ध पुढे सरकणे शक्यच नव्हते. पण समोरासमोरच्या युद्धात द्रोणाचार्यांचा वध केवळ अशक्य आहे, हेही कृष्ण ओळखून होता. जशासतसे या न्यायाने कपटनीतीला कपटनीतीनेच उत्तर देणे आवश्यक होते. पुन्हा धर्म-अधर्माचा प्रश्न निर्माण होत होता खरा, पण कृष्णाचाही नाइलाजच होता. अत्यंत पराक्रमी असलेल्या द्रोणाचार्यांचा, त्यांचा एकुलता एक पुत्र अश्वत्थामा याच्यावर अत्यंत जीव होता. तो त्यांना प्राणाहूनही प्रिय होता. त्यांचा पुत्रस्नेह हाच त्यांच्या मनाचा कच्चा भाग होता आणि नेमकी हीच गोष्ट कृष्णाला माहित होती. कृष्णाने त्याचाच उपयोग करून घेण्याचे ठरवले आणि त्यानुसार योजना आखली. त्यानुसार 'अश्वत्थामा युद्धात मेला' अशी खोटी बातमी रणभूमीवर जाणूनबुजून पसरवायची म्हणजे द्रोणाचार्य शोकाकुल होऊन हातातील शस्त्र निश्चितच खाली ठेवतील. नेमकी तीच वेळ साधून द्रोणाचार्यांचा वध करायचा.

लक्ष्मी, कृष्ण एक गोष्ट नक्की जाणून होता की द्रोणाचार्य बातमीचा खरेपणा जाणून घेण्यासाठी धर्मराजालाच विचारतील. कारण त्यांचा केवळ धर्मराजावरतीच विश्वास होता. धर्मराज कधीही खोटे बोलणे शक्यच नाही याची त्यांना पूर्ण खात्री होती. त्यासाठी धर्मराजाच्या मनाची तयारी करणे आवश्यक होते. परंतु कृष्णाची ही योजना धर्मराजाला मान्य होणे शक्यच नव्हते. प्रत्यक्ष गुरूंशी प्रतारणा करून गुरूद्रोह करावयास त्याने सपशेल नकार दिला. कृष्णाने मोठ्या युक्तीने त्यातून मार्ग काढला आणि धर्मराजाची समजूत घालून, त्याला कसेबसे तयार केले. कृष्णाने एका हत्तीचे नावच 'अश्वत्थामा' असे ठेवले आणि



त्याचाच वध करून 'अश्वत्थामा मेला' अशी बातमी पसरवण्याचे ठरले. त्यानंतर जेव्हा द्रोणाचार्य धर्मराजाकडून खात्री करून घेतील तेव्हा धर्मराजाने 'तो अश्वत्थामा असेल' असे मोठ्याने म्हणायचे आणि नंतर हळू आवाजात 'किंवा हत्तीही असेल' एवढेच म्हणायचे. म्हणजे धर्मराजाने खरेच सांगितले असेही होईल आणि द्रोणाचार्यांना ऐकूही जाणार नाही. त्यामुळे धर्मराजाला काही दोषही लागणार नाही आणि पांडवांचे कामही होईल. यावर धर्मराजाने बराचसा विचार केला. त्याचे पूर्ण समाधान झाले नाही तरीही तो शेवटी नाइलाजाने का होईना, पण तयार झालाच.

लक्ष्मी, कृष्णाच्या अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडले. दुसऱ्या दिवशी तुंबळ युद्ध सुरू असतानाच कृष्णाने 'अश्वत्थामा' नामक एका हत्तीचा वध करवला आणि 'अश्वत्थामा मेला, अश्वत्थामा मेला' असा गलबलाही कृष्णानेच जाणूनबुजून सुरू करून तो सर्व सैन्यात पसरवला. द्रोणाचार्यांच्या कानावर ही बातमी पोहोचवण्याची व्यवस्थाही कृष्णानेच केली. बातमी ऐकताक्षणीच द्रोणाचार्य व्याकूळ झाले आणि त्या बातमीची खात्री करून घेण्याचा प्रयत्न करू लागले. त्यावेळीही कृष्णाने धर्मराजाला मुद्दामहूनच द्रोणाचार्यांच्या समोर जाण्यास सांगितले. धर्मराजाला पहाताक्षणीच द्रोणाचार्यांनी त्याला प्रश्न विचारला, 'अरे धर्मराजा, माझा पुत्र अश्वत्थामा मेला ही बातमी खरी आहे काय?' कृष्णाने आधीच सांगितल्याप्रमाणे धर्मराज मोठ्याने 'तो असावा' असे म्हणाला आणि अगदी हळू व अस्पष्ट आवाजात 'किंवा हत्तीही असावा' असे म्हणून तो त्वरेने पुढे निघून गेला. अपेक्षेनुसार द्रोणाचार्य अत्यंत दुःखी झाले आणि पुत्राच्या मृत्यूच्या शोकाने त्यांचे सर्व अवसानही गळून पडले. हातातील शस्त्र खाली टाकून ते भर रणभूमीवरतीच खाली बसून राहिले. द्रौपदीचा भाऊ धृष्टद्द्युम्न याने पूर्वीच काही कारणास्तव 'द्रोणाचार्यांचा वध करण्याची' प्रतिज्ञा केलेली होती. ही गोष्टही कृष्णालाच माहित होती आणि त्याच्या लक्षातही होती. किंबहुना कृष्णाच्या योजनेतील तो एक गुप्त भाग होता, जो कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हता. कृष्णाने

केवळ नजरेनेच धृष्टद्द्युम्नाला खूण केली. धृष्टद्द्युम्नाने ती खूण लगेचच ओळखली. क्षणार्धात तो पुढे धावला आणि आपल्या हातातील गदेने त्याने द्रोणाचार्यांच्या मस्तकावर जोरदार प्रहार करून ते विदीर्ण केले. कौरव सैन्यामध्ये एकच हाहाकार माजला आणि त्यांना पळता भुई थोडी झाली. पांडवांना त्यादिवशी विजय मिळाला खरा, परंतु त्याचा जल्लोश मात्र ते करू शकले नाहीत. कारण कितीही झाले तरी द्रोणाचार्य त्यांचे युद्धकलेतील गुरू होते आणि ही गोष्ट पांडव विसरू शकले नाहीत. धर्मराजाच्या मुखावरील खेद तर अगदी स्पष्टपणे दिसत होता. पण ही पांडवांची विजयाच्या दिशेने पडणारी पावले आहेत हे जाणून असलेला कृष्ण मात्र, मनातून समाधानी होता. अर्थातच कृष्णाने ते समाधान त्याच्या मुखावर दिसू दिले नाही.

द्रोणाचार्यांचा वध झाल्यावर मात्र दुर्योधन पूर्णपणे खचला आणि युद्ध चालू ठेवण्याची हिंमतही तो पूर्णपणे हरवून बसला. परंतु दुर्योधनाचा मित्र असलेल्या कर्णाने त्याची समजूत काढली. एवढेच नव्हे, तर युद्ध जिंकून देण्याचे आश्वासनही त्याने दुर्योधनाला दिले. कर्णाच्या पराक्रमावरती पूर्ण विश्वास असलेल्या दुर्योधनाने कर्णालाच कौरव सेनेचे सेनापतीपद दिले. मनातून अर्जुनाचा अत्यंत द्वेष, मत्सर करणाऱ्या कर्णाला, अर्जुनाशी लढण्याची संधी हवीच होती. द्रौपदीने स्वयंवराच्यावेळी केलेला त्याचा अवमान तो विसरला नव्हता. त्या प्रसंगाची अढी कर्ण मनात बाळगून होताच आणि सूड घेण्यासाठी अत्यंत आतुर होता. अर्जुन व कर्ण यांचे युद्ध होणार हे कळल्यावर कुंतीचे अंतःकरण अत्यंत कळवळले. कारण कर्ण हा कुंतीला सूर्यदेवतेपासून झालेला पुत्र होता. परंतु कुंतीचा विवाह होण्याच्या आधीच तो जन्माला आलेला असल्यामुळे तिने लोकलज्जा व लोकनिंदा यांच्या भीतीने, कर्णाचा जन्मतःच त्याग केलेला होता. त्यानंतर तो एका सारथ्याला नदीच्या प्रवाहात पेटीमध्ये सापडला होता आणि त्यानेच कर्णाचा सांभाळ केलेला होता. कर्णाचे हे जन्मरहस्य कुंतीव्यतिरिक्त फक्त कृष्णालाच ठाऊक होते. म्हणून कुंतीने कृष्णाची भेट घेऊन तिच्या मनीची व्यथा त्याला सांगितली आणि काहीतरी उपाय योजना करण्याची विनंती कृष्णाला केली.



लक्ष्मी, कुंतीच्या नाजूक भावना कृष्ण निश्चितच समजू शकला. कुंतीच्या मनाची होणारी तगमगही कृष्णाच्या लक्षात आली आणि कृष्णाने स्वतः भर रात्री व एकांतात कर्णाची भेट घेतली. कृष्णाने कर्णाला त्याच्या जन्माचे रहस्य उघड करून सांगितले आणि कुंतीच्या भावनाही त्याच्याप्रत पोहोचवल्या. कर्णाने पांडवांच्या पक्षाला यावे अशी कृष्णाने कर्णाला विनंतीही केली. स्वतःच्या जन्माचे रहस्य कळल्यावर कर्णही साहजिकच थोडासा भावनिक झाला. परंतु कोणत्याही परिस्थितीत निष्ठा बदलून मित्रदोह करणार नाही या त्याच्या निश्चयावरती मात्र, तो ठाम राहिला. अर्जुनाविषयीच्या आकसाने पछाडलेला कर्ण पांडवांच्या बाजूने लढण्याचा विचारही करू शकत नव्हता. कृष्णाविषयी मनात आदर असलेला कर्ण कृष्णाला एवढेच म्हणाला,

“कृष्णा, या युद्धाचा शेवट काय आहे हे तुझ्याप्रमाणे मीही जाणून आहे. परंतु आता माझ्या भूमिकेत बदल करण्याची वेळ निघून गेलेली आहे. कारण ‘मी पराभवाच्या किंवा मृत्यूच्या भीतीनेच माझी भूमिका बदलत आहे’ असाच अर्थ त्यातून निघेल आणि माझ्या बाबतीत तर ते केव्हाही शक्य नाही, हे तूही जाणून आहेस. कुंती मातेला माझा नमस्कार सांग आणि म्हणावे की तिने मला जन्म दिल्याचे ऋण फेडण्यास मी असमर्थ आहे. त्याबाबत मी तिची मनःपूर्वक क्षमायाचना करीत आहे. माझ्या अर्जुनाशी होणाऱ्या युद्धात जर मी दैववशात् जिवंत राहिलो तर मी पुत्र म्हणून कुंतीमातेची निश्चित भेट घेईन. कारण अर्जुनाशी होणारे माझे युद्ध हे जीवनमरणाचेच युद्ध असणार आहे ही गोष्ट कृष्णा, तुलाही ठाऊक आहेच.”

असे म्हणून कर्णाने हात जोडून कृष्णाला नमस्कार केला आणि त्याला निरोप दिला. एकंदर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे कृष्णालाही अत्यंत वाईटच वाटले. परंतु त्याचाही नाइलाजच होता. म्हणून कृष्णही दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कर्णार्जुन युद्धाचा विचार करीतच पांडवांच्या शिबिरात आला. कर्णाकडे घडलेली सर्व हकीगत कृष्णाने कुंतीला सांगितली. कुंतीच्या दुःखामध्ये पूर्णपणे सहभागी होत असतानाच कृष्णाने कुंतीच्या

मनाची समजूत काढली आणि पुढील प्रसंगाला धैर्याने सामोरे जाण्यासाठी, तिला तिच्या मनाची तयारी करण्यास सांगितले.

लक्ष्मी, कर्णाने सेनापतीपद स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कर्ण व अर्जुन यांच्यातील समोरासमोरचे प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले. एकमेकांवरती बाणांचा वर्षाव करून विद्ध करण्यासाठी उभय धनुर्धारी वीरांकडून निकराचे प्रयत्न सुरू झाले. बाणांच्या जखमांनी घायाळ होऊन उभयतांची शरीरे रक्तबंबाळ झाली होती. परंतु तरीही ते दोघे अटीतटीने लढतच होते. 'जिंकणे किंवा मरणे' याशिवाय त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. सर्व सामर्थ्य एकवटून लढत असताना कर्ण व अर्जुन या दोघांनाही अतिशय चेव आला होता. अशा तऱ्हेने युद्धाने परिसीमा गाठलेली असतानाच कर्णाच्या रथाचे एक चाक अचानकपणे जमिनीत रूतू लागले. रथाचा तोल एका बाजूला झुकल्यामुळे कर्णाला वेगाने बाण सोडणे कठीण जाऊ लागले. अर्जुनाच्या बाणांची गती मात्र वाढू लागली आणि कर्णाला हातात धनुष्य धरणेही कठीण जाऊ लागले. कर्ण ताबडतोब रथातून उडी मारून खाली उतरला आणि आपल्या दोन्ही हातांनी जमिनीत रूतलेले रथाचे चाक बाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागला. कर्णाने सर्व बळ एकवटून अत्यंत शर्थीचे प्रयत्न केले तरी रथाचे चाक जमिनीत अधिकाधिक रूतू लागले. कर्णाची ती अगतिक अवस्था पाहून अर्जुनही थोडासा भांबावला आणि बाण सोडणारा त्याचा हात थोडासा ढिला पडू लागला. ही गोष्ट कृष्णाच्या लक्षात येताच त्याने अर्जुनाला खूण करून बाण सोडण्याचा वेग अधिकच वाढवण्यास सांगितले. कर्णाला रूतलेले रथाचे चाक भूमीतून वर काढण्यासाठी अवसरच मिळेनासा झाला. तेव्हा कर्णाने अर्जुनाकडे बघून मोठ्याने बोलण्यास सुरूवात केली.

"अरे अर्जुना, थांब! मी निःशस्त्र असताना माझ्यावरती शस्त्र चालवू नकोस. भूमीमध्ये रूतलेले हे रथाचे चाक तेवढे आधी मला बाहेर काढू दे आणि त्यानंतरच पुन्हा युद्धाला सुरूवात कर. निःशस्त्र व्यक्तीवरती शस्त्र चालवणे ही गोष्ट क्षत्रियधर्माला धरून नाही. तो अधर्मच आहे ही गोष्ट तू ही जाणूनच आहेस. तेव्हा मला थोडा अवधी दे."



कर्णाचे बोलणे ऐकून अर्जुनाची द्विधा मनःस्थिती होऊ लागली आहे ही गोष्ट कृष्णाच्या लागलीच ध्यानात आली आणि अर्जुनाने काही बोलण्याच्या आधीच कृष्णाने कर्णाशी थोड्याशा उच्च रवानेच बोलावयास सुरुवात केली.


“अरे कर्णा, तुला आता धर्म-अधर्माची आठवण झाली का? तुझा प्रत्यक्ष मृत्यूच तुझ्याजवळ येऊन ठेपल्यावर तू आता सोयीस्करपणे धर्माचा आधार घेऊ पहात आहेस. स्वतःच्याच प्राणांवर बेतल्यावरती तुला या सर्वांचे स्मरण होत आहे. पण जेव्हा दुर्योधन अधर्माने वागून पांडवांना अनन्वित दुःख व क्लेश देत होता, तेव्हा तुझे हे ज्ञान कोठे गेले होते? दुर्योधनाने जेव्हा पाडवांना लाक्षागृहात जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तुझा धर्म कोठे होता? कपटद्युत खेळून दुर्योधनाने पांडवांना वनवासात पाठवले तेव्हा तुझा धर्म कोठे गेला होता? भर दरबारात जेव्हा दुर्योधनाने द्रौपदीची विटंबना केली तेव्हा तुझा धर्म कोठे होता? कोवळया वयातील अभिमन्यूला एकटे पाडून त्याच्यावर सर्वांनी मिळून हल्ला करून त्याचा वध केला एवढेच नव्हे, तर त्याच्या मृतदेहाची अवहेलना करण्यासही ज्यावेळेस कौरवांनी कमी केले नाही त्यावेळेस तुझा धर्म कोठे गेला होता?

कर्णा, या व अशा प्रत्येक वेळी तू कौरवांना निष्ठापूर्वक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे साथच केलेली आहेस. काहीवेळा घडणाऱ्या गोष्टींकडे तू जाणूनबुजून कानाडोळा केलास, तर काही वेळेला तुझ्या समोर गोष्टी घडत असतानाही तू स्वस्थच बसून राहिलास. धर्म व अधर्म हे स्वतःच्या सोयीनुसार बोलण्याचे वा बदलण्याचे विषय नाहीत. अधर्मीयांच्या साथीने उभे राहिल्यानंतर धर्माच्या रक्षणाची अपेक्षा करू नये. कारण अधर्मीयांना मदत करणे हाही तेवढाच मोठा अधर्म आहे. म्हणूनच तुझ्यासारखे चांगुलपणाचा आव आणणारे धर्माचा आधार घेण्यास पात्रच नाहीत. तुम्हाला धर्माचे रक्षण कधीच मिळणार नाही. तुमच्याकडून घडलेल्या दुष्कृत्यांची फळे तुम्हाला भोगावीच लागतील आणि तीच वेळ

आता येऊन ठेपलेली आहे. तुझा मृत्यू तुझ्यासमोर उभा आहे, त्याला विनातक्रार सामोरे जा.”

असे त्वेषाने बोलणारा कृष्ण अर्जुनाकडे पाहून म्हणाला, “अरे अर्जुना, धर्म-अधर्माचा विचार करीत बसून आता वेळ वाया घालवू नकोस. कर्णाच्या दुष्कृत्यांचा घडा पूर्णपणे भरलेला आहे. त्याला आता अवधी देऊ नकोस आणि कर्णाचा वध करण्याची संधी सोडू नकोस. या परिस्थितीत आणि या क्षणी हाच तुझा धर्म आहे. चल, सोड बाण आणि कर्णाचा वध करून विजयाला दृष्टीक्षेपात आण.”

कृष्णाच्या त्वेषपूर्ण बोलण्याचा अर्जुनावर योग्य तो परिणाम झाला आणि मागचा पुढचा काहीही विचार न करता, त्याने कर्णावरती बाणांचा वर्षाव करून त्याला जर्जर करून सोडले. शेवटी अनेक जखमांनी विद्ध झालेल्या कर्णाच्या छातीचा वेध घेऊन अर्जुनाने त्याच्यावर बाण सोडला. त्या बाणाने त्याचे लक्ष्य गाठले आणि कर्णाचा देह मृतप्राय होऊन तो जमिनीवर कोसळला. क्षणार्धातच सर्व काही शांत झाले. अर्जुनही जागच्या जागीच स्तब्ध होऊन उभा राहिला. परंतु कृष्ण मात्र रथातून उतरून धावतच पुढे गेला आणि कर्णाच्या मृतदेहाजवळ येऊन उभा राहिला. कर्णाला मृतावस्थेत पाहून कृष्णाचेही मन गहिवरले. त्याने कर्णाच्या मस्तकावरून हळुवारपणे हात फिरवला आणि लगेचच कृष्ण परत फिरला. कृष्णाची ही कृती पाहून अर्जुनालाही थोडेसे गोंधळल्यासारखेच झाले. त्याला काहीच अर्थबोध होईना. पण अर्जुनाने कृष्णाला काही विचारण्याच्या आधीच कृष्णाने अर्जुनाला रथात बसवले आणि पांडवांच्या शिबिरात नेले. तेथे गेल्यावरती कृष्णाने स्वतः आपल्या हाताने अर्जुनाच्या शरीरावरील जखमा धुतल्या आणि त्याच्यावर औषधोपचार केले. श्रांत झालेल्या अर्जुनाला कृष्णाने विश्रांती घेण्यास सांगितले आणि तो स्वतः त्वरेने कुंतीच्या भेटीस गेला. कुंतीला एकांतात भेटून कृष्णाने कर्णवधाची बातमी सांगितली. कुंतीलाही अश्रूपात अनावर झाला. एवढी वर्षे उरात प्रयत्नपूर्वक बांधून ठेवलेल्या तिच्या दुःखाला कुंतीने मोकळी वाट करून दिली. कृष्णाचेही मन भरून आले आणि तोही कुंतीच्या दुःखात पूर्णपणे सहभागी झाला.”



बोलता बोलता नारद जसा गंभीर झाला होता तशीच लक्ष्मीही ऐकता ऐकता गंभीरच झाली होती आणि तेही अगदी साहजिकच होते. कारण कर्णाचा विषय तसा गंभीर तर होताच, पण त्यामध्ये अनेक संमिश्र भावनांचा अंतर्भाव झालेला होता. मुळामध्ये लक्ष्मीच्याठायी जी कर्णाविषयी सहानुभूती होती, त्यामुळेच कर्णाच्या मृत्यूच्या प्रसंगाने ती अस्वस्थही झाली होती. शेवटी लक्ष्मीने तिच्या मनाची अस्वस्थता व्यक्त केलीच.

“नारदा, कर्णाच्या मृत्यूमुळे झालेल्या कुंतीच्या दुःखात जेथे कृष्णही सहभागी झाला, तेथे मलाही वाईट वाटणे अगदी साहजिकच नाही का? कर्णाच्या शोकांतिकेला तो स्वतःही कारणीभूत होता ही गोष्ट जरी खरी असली, तरी कर्णाविषयी थोडीशी सहानुभूती वाटतेच ना? प्रत्यक्ष कृष्णालाही वाईट वाटलेच आणि ते त्याच्या प्रतिक्रियेवरून सहज लक्षात आले. कृष्णालाही गहिवरून आले आणि त्याने कर्णाच्या मस्तकावरून हात फिरवून त्याची भावना व्यक्त केलीच. कृष्णाची ही कृतीच अत्यंत बोलकी आहे. परंतु त्याच्याच आधी थोडा वेळ कर्ण व अर्जुन यांचे प्रत्यक्ष युद्ध सुरू असताना मात्र, कृष्णाने कर्णाची मुळीच गय केली नव्हती. कर्णाच्या अंतरंगातील दूषित अंगांना उघडे करण्यामध्येही कृष्ण जरासुद्धा कमी पडला नाही. कृष्णाने त्याच्या सडेतोड बोलण्याने कर्णाठायीच्या विदारक वस्तुस्थितीवरही झगझगीत प्रकाश टाकून ती प्रत्यक्ष कर्णालाच उघड करून दाखविली. त्यावेळी कृष्णाचा प्रगटलेला आवेश पाहून मीही ऐकताना जरा बावरलेच. क्षणभर मलाही असेच वाटले की कृष्ण असा कसा काय बोलू शकला? पण मला लगेचच जाणवले की केवळ कृष्णच असे बोलू शकेल. कोणाच्या बाजूने किंवा कोणाच्या विरूद्ध म्हणून असे मुद्दामहून न बोलता स्पष्ट गोष्टी स्पष्टपणे सांगण्याइतके कृष्णाचे अंतःकरण स्वच्छ व निर्मळ आहे. कृष्णाचे अंतःकरण हे एक गूढच आहे. त्याचा थांगपत्ता लागणे कधीतरी शक्य आहे का असाच प्रश्न काही काही वेळा माझ्या मनात येत असतो. मला माहित आहे की कृष्णाच्या अंतःकरणाविषयी बोलण्याचा अधिकार केवळ तुझाच आहे. कारण तुझे

अंतःकरणही कृष्णाच्या अंतःकरणासारखेच आहे हे सत्य मी जाणून आहे. तेव्हा तूच कृष्णाच्या अंतःकरणातील गूज मला समजावून सांग बरे.”

लक्ष्मीच्या बोलण्याने नारदही थोडासा अधिकच गंभीर झाला आणि त्याच गंभीरतेने तो बोलू लागला. “लक्ष्मी, मुळामध्ये अंतःकरण हा विषयच मुळी गंभीर आहे. त्यातून कृष्णाचे अंतःकरण हा विषय तर, अधिकच गहन आहे आणि कृष्णाचे अंतःकरण त्याच्या चरित्राद्वारे जाणून घेणे आणखीनच कठीण आहे. कारण चरित्र हे सापेक्षतेने प्रगट होत असते, तर अंतःकरणाची अवस्था ही अत्यंत निरपेक्ष असते. कृष्णाचे अंतःकरण त्याच्या चरित्रातूनच दृश्यमान होऊन जाणवते. त्यामुळे कृष्णाचे जीवन हाच त्याचे अंतःकरण प्रगट होण्याचा पत्ता आहे असे म्हणता येईल. परंतु ते प्रगटीकरण तेवढ्यापुरतेच मर्यादित असल्यामुळे, त्याद्वारे कृष्णाच्या अंतःकरणाचा थांग मात्र लागणार नाही, ही गोष्ट अगदी निश्चित आहे. कारण कृष्णाचे अंतःकरण हे तर अथांगच आहे. पण पत्ता मिळाल्यानंतर तिथपर्यंत पोचता येईल आणि जेथे अनेक सागर एकत्र मिळतात, अशा कृष्णाच्या अंतःकरणरूपी महासागरात, त्याचा थांग शोधण्याच्या निमित्ताने उतरता येईल. पण कृष्णाच्या अंतःकरणात उतरताना, उतरणाऱ्याचे अंतःकरणच कृष्णमय होऊन कृष्णाच्या अंतःकरणासारखेच होऊन रहाते. मग त्याठिकाणी कोण कोणाचा थांग घेणार बरे? कारण सागरात शिरणाराच जर सागर होऊन राहिला, तर थांग घेणार कोण आणि थांग घ्यायचा कशाचा, हा प्रश्नच आहे. किंबहुना हा प्रश्नही तेथे उरतच नाही. पण तेथे जाण्यापर्यंतचा रोमहर्षक प्रवास व त्या प्रवासातील आनंदाचा अनुभव मात्र, सांगायला निश्चितच शिल्लक रहातो.

लक्ष्मी, कृष्णचरित्रातून त्याच्या अंतःकरणापर्यंत जायचे म्हणजे त्याची सुरूवात कृष्णाच्या मनापासूनच करावयास हवी. कृष्णाचे मन त्याच्या विशुद्ध अंतःकरणाशी जोडलेले होते. त्यामुळे त्याच्या मनात सर्वच जीवमात्रांविषयी आत्यंतिक आपलेपणा, दया व प्रेम होते आणि म्हणूनच सर्व जीवांना शांती व समाधान लाभावे आणि त्यांनी सुखाने जीवन जगावे, असेच त्याच्या मनात असे. परंतु सर्वच जीव काही कृष्णाला त्यांचा म्हणून पहात नव्हते. त्यामुळे ज्यांची कृष्णावर श्रद्धा होती आणि



ज्यांच्याठायी कृष्णाविषयी प्रेम होते अशाच जीवांशी, कृष्णाची बांधिलकी होती. अशा त्याच्या प्रेमी जीवांसाठीच कृष्ण जीव टाकत असे आणि त्यांना जीव लावतही असे. त्याच्या प्रेमीजनांची काळजी कृष्णाच्या मनात नित्य असे आणि त्यांच्याच रक्षणाची जबाबदारी कृष्ण नित्य वहात असे. त्यामुळे त्याच्या प्रेमीजनांना त्रास व क्लेश देणाऱ्या दुष्ट व दुर्जन व्यक्तींविषयीचे विचारही कृष्णाच्या मनाला करावे लागत आणि त्या दुर्जनांना शासन करून त्यांचा नाश कसा करावा, याच्याही योजना कृष्णाच्या मनामध्ये साकार होऊ लागत.

लक्ष्मी, कृष्णाची बुद्धी हीसुद्धा त्याच्या अंतःकरणाशीच जोडलेली असल्यामुळे ती स्वाभाविकपणे आत्मबुदधीच होती. त्यामुळे सर्व जीवमात्रांच्या ठायी एकच आत्मतत्व आहे हा निश्चय, त्याच्या बुद्धीच्या ठायी सहजपणे होता. परंतु देहबुद्धीने वावरणाऱ्या त्याच्या प्रेमी पण अज्ञानी जनांसाठी मात्र, कृष्ण त्याच्या सद्‌बुद्धीच्या योगे त्यांना समजेल अशा रूपात प्रेम देत असे. पण त्याचबरोबर त्यांना त्याच प्रेमाने सत्यही समजावून सांगत असे आणि त्यानंतर त्यांना बुद्धीयोग देऊन त्यांचे अज्ञान दूर करण्याचा प्रयत्नही सातत्याने करीत असे. त्याचप्रमाणे स्वतःच्या कुशाग्र बुद्धीचा उपयोग करून दुष्ट व दुर्जनांच्या कपट कारस्थानांना उघड करीत असे आणि वेळप्रसंगी त्यांना जशास तसे उत्तरही देऊन त्यांना नामशेष करीत असे.

लक्ष्मी, कृष्णाचे चित्त केवळ त्याच्या अंतःकरणाशी जोडलेलेच नव्हते, तर ते चित्त त्याच्या अंतःकरणाशी निगडीतच होते. त्यामुळे तर त्या चित्ताठायी आत्मतत्त्व नित्य व सहजपणे स्फुरत असे. परंतु म्हणूनच त्याच चित्ताठायी त्याच्या प्रेमीजनांच्या हिताचा निरंतर ध्यास असे. आत्महित हेच खरे हित असल्यामुळे, तेच त्याच्या प्रेमीजनांनी साधावे हाच एक ध्यास, कृष्णाच्या चित्ताला लागून राहिलेला असे. त्यासाठीच त्याच्या प्रेमीजनांना त्यांच्यावरील ईश्वराचे प्रेम कळावे, त्या ईश्वराचेच ते अंश आहेत हे सत्यज्ञान त्यांना होऊन त्याचा निश्चय त्यांच्याठायी व्हावा, त्या ईश्वराची भक्ती करून त्या प्रेमीजनांनी ईश्वराशी ऐक्य साधावे आणि त्या प्रेमीजनांनी ईश्वराशी एकरूप राहून आनंदाने जीवन जगावे, हाच ध्यास कृष्णाच्या चित्तात असे. या ईश्वरी अस्तित्वाची स्थापना भक्तांच्या

हृदयात करणे, हेच कृष्णाचे जीवनकार्य होते आणि हाच त्याचा आत्मधर्म होता. या धर्मकार्याच्या आड येणाऱ्या अधर्मीयांचा पूर्णपणे नाश करून, त्यांचे समूळ उच्चाटन करण्याचा ध्यासही कृष्णाच्या त्याच चित्ताठायी जागृत असे आणि त्या ध्यासाची पूर्ती करण्याचेच व्यवधान त्याच्याठायी नित्य जागृत असे. अशा तऱ्हेने कृष्णाचे मन, बुद्धी व चित्त हे अंतर्बाह्य एकाच कार्यासाठी कार्यरत असत. त्यामध्ये कार्याचा मूळ हेतू, त्याच्या पूर्तीसाठी करावी लागणारी कृती आणि त्या कार्याचे प्रत्यक्ष फळ, ही कार्याची सर्व अंगे सामावलेली होती. कार्य सर्वांगाने यशस्वी झाले तरच ते कार्य आनंदाचा अनुभव देणारे ठरते.

लक्ष्मी, मन, बुद्धी व चित्तापलीकडील कृष्णाच्या अंतःकरणाविषयी बोलायचे, तर शब्द मौनच होतात. कारण ते मनाच्या कल्पनेच्या, बुद्धीच्या समजण्याच्या आणि चित्ताच्या सर्व ध्यासांच्या पलिकडचे आहे, म्हणजे खरे तर ते या सर्वांचे मूळच आहे. त्याचा अनुभवच स्वतःठायी घेता येतो. जेव्हा आपले अंतःकरणच कृष्णाच्या अंतःकरणासारखे होते, तेव्हा तेथे काही वेगळेपणाच रहात नाही. तसे अंतःकरण झाले की त्याच्याविषयी काहीही बोलणे काय, त्याचा वेगळेपणाने विचार करणेही आवश्यक नसते आणि तसे ते शक्यही नसते.

लक्ष्मी, कृष्णाचे अंतःकरण प्रमाण मानून त्याच्या वागण्याबोलण्याचा अभ्यास करणे मात्र शक्यही आहे आणि आवश्यकही आहे. कारण त्या अभ्यासातून कृष्णाच्या चित्ताठायीचा ध्यास कळू शकतो आणि जाणताही येतो. त्यामुळे निदान कृष्णाच्या चित्ताजवळ तरी जाणे घडते आणि कृष्णाचा ध्यास आपल्या चित्ताला लागतो. त्या कृष्णध्यासाने आपल्या चित्ताची शुद्धी होते आणि कृष्णाविषयीच्या भक्तिभावाची वृद्धी होत रहाते. या भक्तिभावाची परिणतीच कृष्णाशी ऐक्य साधण्यात होऊन रहाते. यादृष्टीने कृष्ण ज्या तऱ्हेने कर्णाशी वागला ते विचार करण्यासारखे आहे. मुळात कर्ण हा दुर्योधनासारखा दुष्ट वा खल प्रवृत्तीचा नाही, या गोष्टीची कृष्णाला पूर्ण खात्री होती. कर्ण हा कुंतीपुत्र आहे हेही कृष्णाला ठाऊक होते. त्यामुळे कृष्णाठायी कर्णाविषयी आपलेपणा व सहानुभूतीही अगदी सहजपणे होती. परंतु स्वतःविषयी एक प्रकारचा न्यूनगंड बाळगून असलेला कर्ण, दुर्योधनाच्या संगतीने बिघडायला वेळ लागला नाही.

कर्णाच्याही ही गोष्ट लक्षात आली नाही असे नाही. तरीही कर्ण विवेकाने स्वतःला आवरू शकला नाही. कर्णाने दुर्योधनाला जेव्हा निष्ठेने साथ दिली, तेव्हा ती प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे दुर्योधनाच्या सर्वच कर्मांना दिली गेली. कर्णाची ही निष्ठाच त्याची दुर्बलता ठरली. त्यावरती मात करायची तर विवेक हवा आणि विवेक प्राप्त व्हायचा तर जीवनात मार्गदर्शक हवा किंवा एखादा कृष्णासारखा सन्मित्र तरी हवा. कृष्णासारखा सत्य मार्गदर्शक व खरा मित्र उपलब्ध असतानाही कर्ण त्याचा लाभ करून घेऊ शकला नाही. ही कमसरसता कर्णाची होती. कारण कृष्णाने योग्य वेळेला कर्णाला सावरायचा प्रयत्न करूनही कर्ण सावरला गेला नाही. यामध्ये दोष कृष्णाचा नव्हता तर तो कमीपणा कर्णाठायीच होता.

लक्ष्मी, एक महत्त्वाची गोष्ट तुझ्या लक्षात आली का? कर्णाच्या सज्जनत्वाचा दुर्योधनावरती काहीच परिणाम झाला नाही. पण दुर्योधनाच्या दुर्जनत्वाचा प्रभाव मात्र कर्णावरती पडलाच. 'ढेकणाच्या संगाने हिराही भंग पावतो' असे जे म्हणतात ते कर्णाच्या बाबतीत, दुर्दैवाने अगदी खरे ठरले. म्हणूनच कर्णाची शोकांतिका झाली असे जरी दिसले, तरी त्याची जबाबदारी बहुतांशाने त्याच्याकडेच जाते. केवळ परिस्थितीला दोष देऊन कर्णाच्या वागण्याचे समर्थन करता येतच नाही. कर्णाठायीसुद्धा कृष्णाविषयी आदर होता. परंतु पांडवांविषयीच्या व विशेषतः अर्जुनाविषयीच्या द्वेषमत्सराने ग्रस्त झालेला कर्ण, प्रत्यक्ष कृष्णाकडेही वेगळ्या नजरेने पाहू शकला नाही, ही वस्तुस्थिती योग्य नसली, तरी ती नाकारताही येत नाही.

लक्ष्मी, अशा पार्श्वभूमीवरती कर्ण व अर्जुन यांचे जेव्हा प्रत्यक्ष समोरासमोरचे व जीवनमरणाचे युद्ध सुरू झाले, तेव्हा कृष्णाच्या ठिकाणी एकच व्यवधान होते आणि ते म्हणजे अर्जुनाच्या विजयाचे. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत कर्णाचा पराभव होणे आवश्यक होते. नाहीतर कृष्णाला, कर्णाशी वैयक्तिक असे काहीच देणेघेणे नव्हते आणि तसे असण्याचे काही कारणही नव्हते. खरे तर, कृष्णाला युद्धाच्या वेळी कोणाशीच काही वैयक्तिक देणेघेणे नव्हते. कृष्णाठायी ध्यास होता तो सद्धर्माचा विजय व्हावा हाच आणि त्यासाठीच पांडवांना जय मिळावा

हेच सततचे व्यवधान कृष्णाठायी होते. म्हणूनच कृष्ण सावधही होता आणि दक्षही होता.

लक्ष्मी, कृष्ण जे कर्णाविषयी बोलला त्यातले शब्दच काय, अक्षर न् अक्षर खरे होते. ती काही कर्णाची निंदा नव्हती, तर ती पूर्णपणे वस्तुस्थिती होती. पण ते बोलण्याची योग्य वेळ मात्र कृष्णाने साधली होती. याला कृष्णाचे युद्धातील डावपेच असेही म्हणता येईल. पण युद्ध जिंकण्यासाठी ते आवश्यकच होते आणि अत्यावश्यक गोष्टींचा उपयोग करण्यासाठी कृष्णाने मुळीच मागेपुढे पाहिले नाही. कारण कृष्णाला जसे युद्ध जिंकायचे होते, तसेच ते योग्य वेळेत संपवायचेही होते. आधीच भीष्म सेनापती असताना दहा दिवस, द्रोण सेनापती असताना पाच दिवस आणि कर्ण सेनापती असतानाचे दोन दिवस मिळून सतरा दिवस एवढा काळ युद्ध लांबले होते आणि आता थांबायला कृष्णाला वेळ नव्हता. पण रथाचे रूतलेले चाक वर काढताना कर्ण जेव्हा अर्जुनाला युद्ध थांबवण्याची विनंती करू लागला, तेव्हा भावनेच्या आहारी जाऊन अर्जुनाची द्विधा मनःस्थिती झाली होती आणि अर्जुनाचा बाण सोडणारा हात ढिला पडत होता ही गोष्ट कृष्णाने लगेचच ओळखली आणि ती गोष्ट त्याला अजिबात सहन झाली नाही, म्हणून मग कृष्णाने कर्णावर शब्दरूपी बाण सोडून त्याला नामोहरम करावयास सुरुवात केली. कर्णाशी बोलताना कृष्णाला त्वेष आला होता, असेही क्षणभर दिसले. पण खरे तर, कृष्णाचे सर्व बोलणे अर्जुनाला त्वेष यावा, यासाठीच होते. कारण अर्जुनाठायी त्वेष असता तरच त्याच्याकडून कर्णाचा वध होणे शक्य होते. नाहीतर, तसे बघायला गेले तर कर्णाचा वध करणे ही गोष्ट अर्जुनासाठीही कठीणच होती. म्हणूनच कृष्णाने जाणूनबुजूनच कर्णाच्या सर्व दुष्कृत्यांचे अर्जुनाला स्मरण करून दिले आणि त्याचा अपेक्षित परिणाम अर्जुनावर झाला. अर्जुनाठायी पुन्हा युद्धाचा त्वेष जागा झाला. त्याने धर्म-अधर्माचा निवाडा व त्याची सर्व जबाबदारी कृष्णावर सोपवली आणि कर्णाच्या वक्षस्थळाचा बाणाने छेद घेत अर्जुनाने त्याचा वध केला.

लक्ष्मी, कर्णाचा वध झाल्यानंतर, कृष्ण कर्णाच्या मृतदेहाच्या जवळ गेला आणि त्याच्याकडून कर्णाविषयीच्या त्याच्या भावनाही सहजपणे व्यक्त झाल्या. कारण कृष्णाने कर्णाच्या दुष्कृत्यांचा निषेध जरूर केला,



परंतु म्हणून कृष्णाने कर्णाचे सर्वच व्यक्तिमत्त्व त्याज्य मानले नाही. हाच तो कृष्णाच्या अंतःकरणाचा मोठेपणा होय आणि हीच त्या कृष्णाच्या अंतःकरणाची विशुद्धता होय. त्यातूनही कर्ण हा कुंतीपुत्र असल्यामुळे कुंतीच्या भावनाही कृष्ण जाणून होता. कुंतीचे मन, पुत्र म्हणून कर्णामध्ये साहजिकच गुंतलेले होते आणि ही गोष्ट कृष्णाला ठाऊक होती. त्यामुळे कृष्णालाही कर्णाच्या मृत्यूचे दुःख हे झालेच आणि ते त्याने व्यक्त करून कुंतीच्या कर्णाविषयीच्या भावनांचाच आदर केला, असेच म्हणावे लागेल. त्यानंतरही कृष्णाने स्वतः कुंतीची भेट घेऊन तिला कर्णाच्या मृत्यूची बातमी सांगितली आणि तिच्या पुत्रवियोगाच्या शोकामध्येही कृष्ण मनापासून एकरूप झाला.

कृष्णाकडून कोणत्याही भावाची गोष्ट अत्यंत मनःपूर्वक घडत असे, पण तेवढा वेळच! त्यानंतर क्षणार्धात त्याचे मन त्या भावापासून सहजतेने अलग होत असे आणि त्याच्या अंतःकरणात लयाला जात असे. पण लगेचच कृष्णाच्या त्याच अंतःकरणात दुसरी ऊर्मी उठून त्याच्या मनापर्यंत येत असे. त्या ऊर्मीनुसार अनुभव घेऊन कृष्णाचे मन पुन्हा त्याच्या अंतःकरणात विलय पावत असे. असा हा उत्पत्ती, स्थिती व विलयाचा हृदयंगम व आनंददायी खेळ, कृष्णाच्या अंतःकरणात नित्य घडत असे. तसे म्हटले तर कृष्णाच्या अंतःकरणाची अवस्था विशुद्ध, निरपेक्ष, निष्काम व निःस्पृह होती. त्याठिकाणी सापेक्ष अशी कोणतीही कामना व स्पृहा नव्हती. परंतु त्याच अंतःकरणाठायी सहजपणे स्फुरणारी ऊर्मी जेव्हा कृष्णाच्या मनापर्यंत येत असे, तेव्हा मात्र त्याच्या मनात सापेक्षतेने इच्छा व स्पृहा निर्माण होत असे आणि त्याला प्रत्यक्ष कार्याला प्रवृत्त करीत असे. परंतु सापेक्षतेने साकार होणाऱ्या त्या ऊर्मीतील मूळ विशुद्धता मात्र कायम असे. ती कधीच बाधीत होत नसे आणि त्याचमुळे कृष्णाच्या अंतःकरणाची स्थिती नित्य आनंदाचीच असे. असे हे कृष्णाचे अंतःकरण भाग्यानेच पहायला मिळते, प्रेमानेच त्याच्याशी समरस होणे घडते आणि भक्तिभावानेच त्याचा अनुभवही घेता येतो.”

कृष्णाविषयीच्या भक्तिभावाने भरलेले नारदाचे अंतःकरण लक्ष्मी तन्मयतेने पहात होती, श्रवण करीत होती आणि त्याचा आनंदही अनुभवत

होती. हाच आनंदाचा अनुभव पुन्हा पुन्हा घेण्यासाठी लक्ष्मीच्या मनाची आर्तता मात्र अधिकच वाढत होती. आनंदाच्या अनुभवाच्या तृप्तीचे तेच तर मुख्य लक्षण आहे. त्यामुळे तो भक्तिभाव साकार झालेला पहाण्याची व त्याचे वर्णन श्रवण करण्याची तिच्याठायीची उत्कंठा तिच्या मुखावर सहजपणे दिसत होती. लक्ष्मीची ती अवस्था नारदाच्या लगेचच लक्षात आली. त्यासाठी लक्ष्मीने काहीही बोलण्याची वा विचारण्याची आवश्यकता नव्हतीच. नारदाकडून आपसूकच कृष्णचरित्रातील पुढील कथाभाग त्याच्या रसपूर्ण वाणीतून प्रगट होऊ लागला.

* * * * *



# दुर्योधनाचा वध, पांडवांचा विजय

“हे लक्ष्मी, कर्णाच्या वधानंतर दुर्योधनाच्या युद्ध जिंकण्याच्या सर्व आशा अक्षरशः धुळीत मिळाल्या. पण तरीही त्याने उसने अवसान आणून, कृपाचार्यांना सेनापतीपद देऊन, त्यांना युद्ध चालू ठेवावयास सांगितले. परंतु प्रत्यक्ष युद्धात कृपाचार्यांचाही अर्ध्या दिवसातच वध झाला आणि कौरवांचा पूर्ण पराभव झाला. मृत्यूच्या भीतीने घाबरलेला दुर्योधन तर दूर पळून जाऊन एका सरोवराच्या तळाशी लपून राहिला. परंतु त्याला आता तसे मोकळे सोडायचे नाही, असा कृष्णाचा निश्चय होता. अर्जुन व भीम यांना बरोबर घेऊन कृष्णाने दुर्योधनाचा ठावठिकाणा शोधून काढलाच. कृष्णाने दुर्योधनाला जलाशयाच्या बाहेर पडायला भाग पाडलेच. दुर्योधन समोर आल्यावरती कृष्णाच्या सांगण्यावरून भीमाने दुर्योधनाकडे गदायुद्धाची मागणी केली. क्षत्रियधर्माच्या नियमानुसार ती मागणी दुर्योधनाला मान्य करावीच लागली आणि भीम व दुर्योधन यांनी गदायुद्ध करण्याचे ठरवले.

लक्ष्मी, तेवढ्यात कर्मधर्मसंयोगाने त्याठिकाणी बलरामाचे आगमन झाले. खरे तर, ऐन युद्धाच्या वेळी बलराम जाणूनबुजून तीर्थयात्रेला निघून गेला होता. कारण कौरव-पांडव यांचे युद्ध होत आहे, ही गोष्टच त्याच्या मनाला पटत नव्हती आणि मान्यही होत नव्हती. तेव्हा प्रत्यक्ष स्वतःच्या डोळयांनी युद्ध बघण्याची वेळ येऊ नये, केवळ याच हेतूने बलरामाने तीर्थयात्रेला जाण्याची योजना आखली होती. परंतु दैवगती विचित्र व तर्काच्या पलिकडे असते, हेच खरे! कारण युद्ध संपण्याच्या अगदी शेवटच्या घडीला बलरामाचे येणे झालेच आणि युद्धाचा अंतिम भाग बघण्याची वेळ बलरामावरती आलीच. बहुधा त्याचे वेळेचे गणित चुकले असावे. एवढे दिवस युद्ध लांबणे शक्य नाही, असाच बलरामाचा अंदाज असावा. किंबहुना, कृष्ण प्रत्यक्ष युद्धात पांडवांचा मार्गदर्शक आहे असे म्हटल्यावर, एवढे दिवस युद्ध लांबणे शक्य नाही याची बलरामाला खात्रीच होती. कारण कोणतीही गोष्ट विनाकारण लांबणीवर न टाकता किंवा रेंगाळत न ठेवता, ती गोष्ट लवकरात लवकर संपवून त्याचा काय तो निर्णय लावायचा, असाच कृष्णाचा स्वभाव होता. त्यामुळे अठरा दिवस

युद्ध चालणे ही गोष्ट बलरामाला अशक्यच वाटली असणार. परंतु जे युद्ध तो टाळू पहात होता, त्याच्या शेवटच्या भागासाठी बलरामाला साक्षीदार व्हावेच लागले. अर्थात ही गंमत कृष्ण व बलराम यांच्यातील खाजगी होती. इतर कोणाच्या ती लक्षात येणे शक्यच नव्हते. त्यामुळे बलरामाचे त्याठिकाणी येणे झाल्यावरती कृष्णाने बलरामाकडे पाहून किंचित, पण मिश्किल हास्य केले. बलरामाने ते निश्चितच पाहिले, पण काहीही प्रतिक्रिया व्यक्त न करता बलराम स्वस्थ राहिला. बलरामासाठी हा प्रसंग आणखीही एका दृष्टीने कठीण होता. कारण भीम व दुर्योधन हे दोघेही बलरामाचे गदाविद्येतील शिष्य होते. परंतु भावनिक न होता बलराम तटस्थच राहिला आणि गदायुद्ध नियमाला धरून खेळले जात आहे ना, यासंबंधी दक्ष होऊन राहिला.

युध्द सुरू करण्यापूर्वी भीम व दुर्योधन या दोघांनी बलरामाला वंदन करून त्याचे आशीर्वाद मागून घेतले आणि बलरामानेही त्या दोघांनाही मनःपूर्वक आशीर्वाद दिले. भीमाने अर्जुनाकडूनही शुभेच्छा मागून घेतल्या असता, अर्जुनाने भीमाचे दोन्ही हात धरून त्याच्याशी हस्तांदोलन केले. भीम कृष्णाच्या जवळ आला असता, कृष्णाने भीमाच्या पाठीवर प्रेमाने थोपटून त्याला प्रोत्साहित केले. त्यानंतर भीम व दुर्योधन एकमेकांच्यासमोर उभे ठाकले. दोघांनीही मोठ्याने गर्जना करून एकमेकांना आव्हान दिले आणि त्यांच्या गदा एकमेकांना भिडून त्याचा प्रचंड आवाज झाला. दोघेही जण परस्परांच्या अंगावर गदेचा प्रहार करण्याचा प्रयत्न करून, दुसऱ्याचा प्रहार वाचविण्याचा प्रयत्न कसोशीने करीत होते. काही वेळा त्यांचे ते प्रयत्न यशस्वी होत होते, तर काहीवेळेला अयशस्वी होत होते. गदेवरती गदा आपटून होणारा आवाज तर भयकारीच होता. हळूहळू गदेचा आघात उभयतांच्या अंगावर होऊन त्यांच्या अंगातून रक्ताच्या धाराही वाहू लागल्या. परंतु त्या दोघांना एवढा युध्दज्वर आला होता की स्वतःच्या रक्तबंबाळ झालेल्या अंगाकडे पूर्ण दुर्लक्ष होऊन त्यांना अधिकच चेव येत होता.

अशा तऱ्हेने बराच काळ गेला तरी दोघेही एकमेकांना आटपेनात. दोघेही कसलेले गदायोध्दे होते आणि मुख्य म्हणजे परपस्परांचे युध्द करण्यामधील गुणदोष जाणून होते. भीम सर्व शक्ती पणाला लावून लढत



होता खरा, परंतु दुर्योधनावरती मात करणे त्याला काही केल्या शक्यच होत नव्हते. भीमाने त्याचे सर्व कौशल्य व कसब वापरले. पण दुर्योधनानेही त्याला तेवढेच खणखणीत प्रत्युत्तर देऊन नामोहरम केले. शेवटी भीमाचा जोर थोडासा कमी होऊ लागला आणि दुर्योधनाचा जोर वाढू लागला, तेव्हा अर्जुनही कावराबावरा झाला. अर्जुनाने कृष्णाकडे पाहिले असता कृष्ण वरकरणी तरी शांतच दिसत होता. पण अर्जुनाच्या एक गोष्ट लक्षात आली की कृष्ण भीमाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत होता आणि ते भीमाच्या लक्षात येत नव्हते. गदायुध्दाच्या नियमाप्रमाणे गदायुध्द खेळणाऱ्यांना दुसऱ्या व्यक्तीने बाहेरून काहीही सूचना वा मार्गदर्शन करायचे नसते. अर्जुनाच्या मनाची अस्वस्थता वाढू लागली. तेवढ्यात कर्मधर्मसंयोगाने भीमाचे लक्ष कृष्णाकडे गेले असता, त्याने असहाय्य नजरेने कृष्णाकडे पाहिले. कृष्णाला भीमाची दया आली. कृष्णालाही हे युध्द असेच फार वेळ चालायला नकोच होते. त्याने केवळ भीमालाच कळेल अशा तऱ्हेने स्वतःचा उजवा हात सहजतेने व हळूच स्वतःच्या मांडीवर ठेवल्यासारखे केले आणि हात पुन्हा वर उचलला. कृष्णाची खूण भीमाच्या लगेचच लक्षात आली. कृष्ण दुर्योधनाच्या मांडीवरती गदेचा प्रहार करावयाची सूचना करीत आहे, हे भीमाने लगेचच ओळखले आणि तोही संभ्रमात पडला.

लक्ष्मी, गदायुद्धाच्या नियमानुसार मांडीवरती गदेचा प्रहार करणे अवैध आहे आणि नेमकी तीच गोष्ट कृष्ण भीमाला करावयास सांगत होता. भीमाच्या मनाचा निश्चय होत नव्हता. तशाच स्थितीत आणखी काही काळ भीम लढत राहिला. पण काही केल्या युद्धाचा शेवट दृष्टीपथात येईच ना आणि मग भीमाचाही नाईलाजच होऊ लागला. त्याने पुन्हा एकदा कृष्णाकडे हळूच पाहिले असता, कृष्णाने संमतीदर्शक अशी केवळ त्याची मानच किंचितशी हलवली, जी फक्त भीमाच्याच लक्षात आली. तेव्हा मात्र भीमाने कृष्णावरती पूर्ण भरवसा ठेवला आणि तो अचानक पुढे सरसावला. भीमाने चपळाई करून  दुर्योधनाच्या उजव्या मांडीवर गदेचा जोरदार प्रहार केला. त्या अनपेक्षित आघाताने दुर्योधन चकित होऊन मोठ्याने विव्हळला. तोच भीमाने गदेचा दुसरा प्रहार दुर्योधनाच्या डाव्या मांडीवर केला. पायातील त्राणच निघून गेल्यामुळे खाली कोसळत

असलेल्या दुर्योधनाच्या दोन्ही मांड्यांवरती भीमाने गदेचे आणखीही प्रहार केले. तेव्हा मात्र दुर्योधनाच्या मांड्या रक्तबंबाळ होऊन पूर्णपणे विदीर्ण झाल्या आणि दुर्योधन भूमीवर निपचित होऊन पडला. अर्धवट बेशुद्धावस्थेत असलेल्या दुर्योधनाने, त्याही स्थितीत कृष्णाकडे रागाचा एक जळजळीत कटाक्ष टाकला. हा सर्व कृष्णाचाच कावा असणार याची दुर्योधनाला पक्की खात्री होती.

लक्ष्मी, दुर्योधनाचा संशय अर्थातच खराही होता. त्याचे कारण असे होते की दुर्योधनाच्या बाबतीतील असे एक रहस्य होते की ते केवळ कृष्णालाच माहित होते. दुर्योधनाची माता गांधारी हिच्या नेत्रांमध्ये अत्यंत तेज साठलेले होते. कारण तिचा पती धृतराष्ट्र हा अंध असल्यामुळे गांधारी तिच्या नेत्रांवर सदैव पट्टी बांधून ती ते मिटून ठेवीत असे. या तेजाचा उपयोग दुर्योधनाला करून द्यावा असे गांधारीला पुत्रप्रेमामुळे वाटले. म्हणून तिने एक दिवस दुर्योधनाला विवस्त्र होऊन तिच्या महालात येण्यास सांगितले. गांधारीच्या दुर्योधनावरील एका दृष्टीक्षेपानेच त्याचे सर्व अंगच वज्राप्रमाणे अभेद्य झाले असते. परंतु ही गोष्ट गुप्त हेरांकडून कृष्णाच्या कानावर आली आणि पुढे होणाऱ्या संभाव्य अनर्थाची कृष्णाला चाहूल लागली. तो अनर्थ टाळण्यासाठी म्हणून कृष्ण अक्षरशः धावतच दुर्योधनाच्या भेटीस गेला आणि त्याने दुर्योधनाशी बोलून त्याला गांधारीच्या बोलण्याचा शब्दशः अर्थ न घेण्याविषयी समजावले. दुर्योधनाने स्वतःच्या वाढलेल्या वयाचा विचार करून वागावे असे सांगून, कृष्णाने दुर्योधनाला फुलांच्या अर्ध्या वस्त्रांनी त्याच्या कमरेच्या खालील भाग झाकण्याची सूचना केली. कृष्णाच्या बोलण्याने दुर्योधनाच्या मनालाही भुरळच पडल्यासारखे झाले आणि कृष्णाच्या सूचनेचे त्याने पालन केले. गांधारीने खरेच तिच्या डोळयावरची पट्टी काढून दुर्योधनाकडे क्षणभरच पाहिले आणि त्याचे सर्व अंग खरोखरीच वज्रासम कठीण होऊन राहिले. पण कृष्णाच्या सावधानतेने व चतुराईमुळे दुर्योधनाच्या मांड्यांचा भाग मात्र दुर्बलच राहिला. ही गोष्ट, केवळ कृष्णालाच माहित होती आणि म्हणूनच त्याने भीमाला दुर्योधनाच्या मांड्यांवरतीच गदेचा आघात करण्यास प्रवृत्त केले. दुर्योधनाच्या शरीराच्या इतर भागावर कितीही वेळ कितीही प्रहार जरी भीमाने केले असते, तरी त्याचा काहीही उपयोग

झालाच नसता. त्यामुळे भीमाला दुर्योधनावरती मात करता येणे, कधीही शक्य झालेच नसते. दुर्योधनाला हतबल करण्याचा एकच मार्ग होता जो अवैध होता खरा, परंतु त्या मार्गाचा अवलंब करणे कृष्णालाही भागच पडले. कारण केवळ त्यामुळेच दुर्योधनाचा, कौरवांचा व युद्धाचाही शेवट होणे शक्य होते आणि तसा तो झालाही.

लक्ष्मी, भीमाने अवैध मार्गाने दुर्योधनाच्या मांडीवर गदाप्रहार केला, ही गोष्ट बलरामाला साहजिकच अजिबात सहन झाली नाही. तो पुढे सरसावला आणि त्याने भीमाची निंदा केली. काही प्रत्युत्तर न करता भीम मान खाली घालून उभा होता आणि फक्त मधून मधून कृष्णाकडे पहात होता. कृष्णानेही नजरेच्या खूणेने भीमाला स्वस्थ बसण्यास सांगितले. परंतु रागाच्या भरात जेव्हा बलराम हातात गदा घेऊन खरोखरीच भीमाच्या अंगावर धावला, तेव्हा मात्र कृष्णाने मध्ये पडून बलरामाला आवरले आणि तो म्हणाला,


“दादा, तुम्ही स्वतःला सावरा आणि जी चूक भीमाकडून घडली, ती तुम्ही तरी करू नका. रागाच्या भरात भीमाच्या मनाचा तोल गेला आणि त्याच्याकडून घडू नये ती गोष्ट घडून गेली. त्याचे कर्म निश्चितच निंदेस पात्र आहे आणि तुम्ही त्याची तशी निंदा केलेलीही आहे. पण तुम्ही भीमावर गदा चालवणे, हे मात्र योग्य नाही. भीमाचा विवेक सुटला म्हणून तुमचा विवेक जर ढळला, तर ते तुमच्या योग्यतेला धरून होणार नाही. शेवटी भीम हा तुमचा शिष्य आहे ही गोष्ट लक्षात ठेवा. कारण जर यदाकदाचित तुमच्या हातून भीमाचा वध झाला, तर शिष्याच्या वधाचे पाप नाहक तुमच्या शिरावर येईल.”

कृष्णाच्या बोलण्याचा योग्य तो परिणाम, सुदैवाने बलरामावर झाला आणि त्याने स्वतःच्या रागाला आवर घातला. परंतु त्याचा राग मात्र त्याच्या मनातून गेलेला नव्हताच. बलरामाने पुढे होऊन निश्चेष्ट पडलेल्या दुर्योधनावर एक दयेचा दृष्टीक्षेप टाकला आणि भीमाकडे वा कृष्णाकडेही न बघताच तो तेथून निघून गेला. त्यानंतर कृष्णाने पुढे होऊन भीमाची पाठ थोपटली आणि त्याचे प्रेमाने कौतुक केले. अर्जुनानेही भीमाचे अभिनंदन केले. दुर्योधनाला तशाच अवस्थेत ठेवून कृष्ण, भीम व

अर्जुन यांच्यासह पांडवांच्या शिबिरात परतला. धर्मराजाला सर्व हकीगत सांगून पांडवांचा विजय झाल्याचेही घोषित करण्यात आले आणि उभय सैन्यांनी शस्त्रे खाली ठेवली. खरे तर, उभय बाजूच्या सैन्याची एवढी हानी झालेली होती, की सैन्य असे काही जास्त उरलेच नव्हते आणि त्यातूनही जे काही सैनिक जिवंत राहिले होते, ते अत्यंत जखमी अवस्थेतच होते. सर्व सैनिकांची ही अवस्था पाहून धर्मराजालाच काय, सर्वांनाच एक प्रकारची विषण्णता आली होती. सर्वांच्याच मनावर उदासीनतेचे घनदाट सावट आले होते. त्यामुळे युद्धामध्ये विजय मिळूनही विजयाचा आनंद कोठेच दिसत नव्हता. जे काही मिळाले त्याच्या सुखापेक्षा, जे सर्व गमावले त्याचेच दुःख अधिक होते.

लक्ष्मीच्या मुखावरतीही दुःखाचेच भाव प्रकर्षाने दिसत होते. तिची भावना मोकळी केल्याशिवाय तिच्या मनाला स्वस्थता लाभणे शक्य नव्हते, हे तीही जाणून होती आणि नारदही जाणून होता. त्यामुळे नारदही लक्ष्मीकडे तिच्या बोलण्याच्या अपेक्षेने वाट पहात स्वस्थ बसला होता. लक्ष्मीनेही मग तिचे मन मोकळे करण्यास सुरुवात केली.

“नारदा, खरोखरीच या युद्धामध्ये झालेल्या जीवितहानीचा विचार केला तर मनामध्ये विषादच निर्माण होतो खरा. युद्ध म्हटल्यावर या सर्व गोष्टी अटळच आहेत हे जरी बुद्धीला माहित असले तरी ते मनाला झेपत नाही, हे खरेच आहे. या युद्धामध्ये हरणारे तर हरलेच पण जिंकणारेही खऱ्या अर्थाने जिंकले नाहीतच, असेच म्हणावे लागेल. राज्य प्राप्त करूनही ज्यांच्यावर राज्य करायचे, ती राज्यातील प्रजा तर अत्यंत दुःखात व शोकातच असणार. कारण प्रजाजनांचे नातलगच युद्धामध्ये धारातीर्थी पडलेले असणार. त्यांचे सांत्वन कोण करणार आणि त्यांना त्यांच्या शोकग्रस्त अवस्थेतून कोण बाहेर काढणार? अर्थात मला वाटते धर्मराजाने ही सर्व परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली असणारच. कारण धर्मराजावरील सुसंस्कार व त्याचा सुस्वभाव यांच्या बळावरती त्याने प्रजेला मानसिक आधार देऊन नक्कीच सावरले असणार. परंतु एक गोष्ट मात्र चांगली झाली. पांडवांचा वनवास खऱ्या अर्थाने संपला. त्यांचे सर्व दुःखभोगही सरले आणि त्यांच्या जीवनातील शांती समाधानाचे पर्व सुरू



झाले. विशेषतः द्रौपदीचे दुःखाचे दिवस निश्चितच संपले आणि तिच्यासाठी सुखाचे व आनंदाचे दिवस उगवले. माझ्या दृष्टीने हीच गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. कारण त्या बिचारीने अनन्वित कष्ट व मानसिक क्लेश भोगले होते. कृष्णावरील प्रेमाने व श्रद्धेने तिने सर्व गोष्टी सहन केल्या हे जरी खरे असले, तरी तिच्या सहनशक्तीचीही अगदी पुरेपूर कसोटीच लागली. द्रौपदी मात्र तिच्या कृष्णावरील भावाने कृष्णाच्या कृपेला पात्र ठरली आणि कृष्ण सदैव तिच्या जीवनात राहिला. तेव्हा आता तिच्या पुढील सुखी जीवनाची कथा ऐकण्यासही मी अत्यंत आतुरलेली आहे.”

लक्ष्मीने तिचे मन मोकळे करून हलके केले. त्यामुळे नारदालाही बरे वाटले. लक्ष्मीला झालेले दुःख तिच्या मनाची संवेदनक्षमताच व्यक्त करीत होते. पण त्याचबरोबर तिचे मन द्रौपदीच्या सुखासाठीही तेवढेच संवेदनाक्षम होते, ही गोष्ट महत्त्वाची. नारदालाही याच गोष्टीचे कौतुक वाटले आणि त्याने त्याची मनापासून दाद दिली. लक्ष्मीच्या बोलण्यातील सूत्र धरून नारदाने बोलावयास सुरुवात केली.

“लक्ष्मी, मानवी जीवन म्हणजे सुखदुःखाच्या प्रसंगांची एक मालिकाच आहे. पण जीवनात किती प्रसंग सुखाचे असावेत किंवा किती प्रसंग दुःखाचे असावेत, याचे काही गणित नाही. सुखाच्या किती प्रसंगांनंतर दुःखाचे प्रसंग यावेत किंवा दुःखाच्या किती प्रसंगांनंतर सुखाचे प्रसंग यावेत, याचा काहीही नियम नाही. ते सर्व काही ईश्वराच्या नियतीनुसारच घडत असते आणि ती नियती तर अगम्यच आहे. पण जीवनातील अशा सुखदुःखाच्या प्रसंगांना सामोरे जाणे हे मात्र, ज्याच्या त्याच्या मनःस्थितीनुसार घडत असते. ही मनःस्थिती अंतःकरणाच्या अवस्थेवरती अवलंबून असते. ज्यांच्या अंतःकरणामध्ये वासनेचे मूळ खोलवर आहे, त्यांच्याठायी ध्यासही केवळ त्यांच्या वासनांच्या पूर्तीचाच असतो. त्यामुळे त्यांचे सुखदुःखही त्यांच्या वासनेनुसारच ठरते आणि त्यांच्या मनाकडूनही तसेच ते अनुभवले जाते. हा वासनापूर्तीचा ध्यासच त्यांना अत्यंत स्वार्थी बनवतो आणि काही वेळेला अधर्मीही करतो. स्वतःचा स्वार्थ हर भल्याबुऱ्या प्रकाराने साधण्याचाच त्यांचा नेहमी प्रयत्न

असतो. त्यांचा स्वार्थ साधला की असे लोक अधिकाधिक विषयासक्त आणि विषयसेवनाने उन्मत्त होत रहातात. स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या विचाराने त्यांना जणू अंधत्वच येते आणि दुसऱ्यांची दुःखे त्यांना दिसतच नाहीत. किंबहुना वेळप्रसंगी स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी इतरांना दुःखी करावयासही ते मागेपुढे पहात नाहीत. स्वार्थापोटी त्यांच्या मनाची संवेदनाक्षमता जणू नष्ट होऊन त्यांचे मन बधिरच झालेले असते.

हे लक्ष्मी, जे सज्जन स्वभावाचे असतात ते मात्र स्वतःच्या सुखाबरोबर दुसऱ्यांच्या दुःखाचाही विचार करतात आणि स्वतः सुख प्राप्त करून घेऊन दुसऱ्यांनाही सुखी करण्याचा प्रयत्न करतात. ते दुसऱ्यांना जाणूनबुजून तर कधी दुःख देतच नाहीत, पण यदाकदाचित त्यांच्याकडून दुसऱ्याला चूकून जरी दुःख दिले गेले, तर त्यांना मनापासून वाईट वाटते आणि स्वतःची चूक सुधारण्याचा ते जास्तीत जास्त प्रयत्नही करतात. परंतु सुखदुःखाच्या चक्रात अडकलेल्या स्वतःला सोडवण्याचा प्रयत्न किंवा विचारही त्यांच्याकडून कधी घडत नाही. कारण या सर्वाविषयी त्यांच्याठायी पूर्ण अज्ञान असते. त्यांच्याठायी वासनेचे मूळ जरी असले, तरी कर्मे मात्र ते विवेकाने करतात आणि केलेल्या कर्मांची फळे विनातक्रार सेवन करतात. त्यामुळेच वासनेतून निर्माण होणारा विकारांचा मळ त्यांच्याठायी जास्त काळ टिकत नाही आणि मन नेहमी साफही रहाते. अर्थात वासनेचे मूळ कायम असल्यामुळे मनात पुन्हा पुन्हा मळही निर्माण होत रहातोच आणि तेवढा वेळ तरी विकारांच्या आहारी गेलेले मन सुखदुःखाचा अनुभव घेतेच. असेच त्यांचे बऱ्यावाईट अनुभवांचे जीवन असते आणि तसेच ते त्यांनी मान्य करून स्वीकारलेलेही असते.

लक्ष्मी, परंतु ज्यांची अंतःकरणे ईश्वरी प्रेमाने युक्त होऊन राहिलेली असतात असे ईश्वराचे भक्त मात्र, नेहमीच अंतरात पूर्ण तृप्त व अत्यंत समाधानी असतात आणि त्यांचे प्राप्त जीवन आनंदाने जगत असतात. त्यांच्या मनातील सुखाच्या कल्पना व दुःखाच्या भावना पूर्णपणे लयाला गेलेल्या असतात. कारण त्यांचे मन ईश्वरी प्रेमातच, इंद्रियातीत असलेले सर्व सुख अनुभवीत असते. एकच ईश्वरीप्रेम अनेक अंगाने व अनेक प्रकारे अनुभवण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांच्याठायी सदैव सात्त्विक भावच असतो. त्याचीच लक्षणे म्हणून त्यांच्याठायी अज्ञानी जीवांविषयी दया व

अपराधी व्यक्तिंविषयी क्षमा असते. कोणत्याही प्रसंगात त्यांची मनःशांती कधीच ढळत नाही. शांत चित्ताने सर्व प्रसंगांना ते सहजपणे सामोरे तर जातातच, पण प्रसंगातील त्यांच्या वागण्याबोलण्याने असे ईश्वराचे भक्त उठूनच दिसतात. त्यांचे विचार करणे वा वागणे सामान्य जीवांसारखे कधीच नसते. ईश्वराचे भक्त हे सदैव ईश्वरीभावानेच असणार यात नवल ते काय? स्वतःसाठी सुखदुःखे समसमान दृष्टीने पहाणारे हे ईश्वराचे भक्त, दुसऱ्यांच्या सुखदुःखासाठी मात्र अत्यंत संवेदनाशील असतात आणि प्रसंगी स्वतः सर्व आघात सहन करून दुसऱ्यांच्या भावनांशी समरस होतात.

लक्ष्मी, तू म्हटल्याप्रमाणे द्रौपदी तिच्या भावाने कृष्णाच्या कृपेला पात्र ठरली होतीच आणि तिला तिच्या बाह्य जीवनातही कृष्णाचा केवढा तरी आधार व रक्षण मिळाले होतेच. पण याद्वारे द्रौपदीने जे कृष्णाचे प्रेम अनुभवले होते त्यातूनच कृष्ण व द्रौपदी यांचे प्रेमसंबंधही अधिकाधिक वृद्धिंगत होत राहिले. द्रौपदीच्या ठायी कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्याची जाणीव तर पहिल्यापासूनच होती. त्यामुळेच द्रौपदीच्या अंतरात कृष्णाविषयी भक्तिभाव निर्माण झालेला होता. ‘कृष्ण म्हणजे कृष्णाचे अंतःकरणच’ हे तिने जाणले होते आणि कृष्णाच्या अंतःकरणाचा ध्यासच द्रौपदीठायी लागून राहिलेला होता. कृष्णाच्या अंतःकरणाची अवस्था व स्वतःच्या अंतःकरणाची अवस्था यातील फरक व अंतर द्रौपदीला वारंवार जाणवत असे आणि ती अवस्थेतील विभक्तताच तिला सहन होत नसे. ती विभक्तता दूर व्हावी म्हणून द्रौपदी सदैव आर्त असे. सुखदुःखाच्या भावनेतून द्रौपदीचे मन कधीच सुटलेले होते आणि वासनेचे मूळही पूर्णपणे तुटलेले होते. भक्तिभावाच्या या ध्यासामुळेच द्रौपदीचे अंतःकरण कृष्णमय होत होते आणि त्याची प्रचितीही तिला तिच्या जीवनातील पुढील एका अत्यंत दुःखाच्या प्रसंगामध्ये आली. दुःखाचा केवढा तरी प्रचंड आघात तिने सहन तर केलाच, पण शांतचित्त राहून तिच्याकडून त्या वेळी तिच्या अंतःकरणाची कोमलता, संवेदनशीलता व सबलता प्रगट झाली.

* * * * *

## अश्वत्थाम्याचा सूडाग्नी आणि द्रौपदीची सहृदयता

लक्ष्मी, दुर्योधन रणभूमी सोडून निघून गेल्यानंतर द्रोणाचार्यांचा पुत्र अश्वत्थामा, हा दुर्योधनाच्या शोधार्थ निघाला. बराच वेळ शोध घेतल्यानंतर अश्वत्थामा त्याठिकाणी आला, ज्याठिकाणी दुर्योधन निश्चेष्ट स्थितीत भूमीवरती पडला होता. परंतु दुर्योधनाच्या प्राणांची थोडीशी धुगधुगी अजूनही कायम होती. दुर्योधनाची ती तशी विकल अवस्था पाहून अश्वत्थाम्याला अतिशय वाईट वाटले. परंतु जेव्हा दुर्योधनाने भीमाबरोबरच्या गदायुद्धाची घडलेली सर्व हकीगत त्याला सांगितली तेव्हा अश्वत्थाम्याच्या मनाचा अतिशय संताप झाला. पिता द्रोणाचार्य यांच्या वधाचा सूडाग्नी आधीच अश्वत्थाम्याच्या मनात धगधगत होता. त्यामध्ये दुर्योधनाच्या बोलण्याने तेलच टाकल्यासारखे झाले आणि अश्वत्थाम्याच्या मनातील सूडाची भावना अधिकच भडकली. त्याने तेथल्या तेथे पांडवांचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली आणि त्यासाठी दुर्योधनाची अनुमती मागितली. खरे तर, दुर्योधन जीवनाचे अंतिम क्षण मोजत होता. पण त्याही स्थितीत अश्वत्थाम्याच्या वचनाने त्याचे मन सुखावले. त्याने अश्वत्थाम्याला केवळ संमतीच दिली असे नाही तर ‘ही माझी मृत्यूसमयीची अंतिम इच्छा आहे असे समजून ती पूर्ण कर, त्याशिवाय माझ्या आत्म्याला कदापिही शांती मिळणार नाही’ असे म्हणून दुर्योधनाने अश्वत्थाम्याला उद्युक्तच केले.

दुर्योधनाची आज्ञा घेऊन अश्वत्थामा तेथून निघाला आणि मध्यरात्रीच्या सुमारास पांडवांच्या शिबिराजवळ येऊन पोहोचला. सर्वत्र अंधःकारच अंधःकार होता आणि पांडवांचे उरलेले सर्व सैन्य शांतपणे विश्रांती घेत निद्राधीन झालेले होते. युद्ध संपल्याचे व जिंकल्याचेच वातावरण त्याठिकाणी असल्यामुळे सर्वच जण साहजिकच पूर्णपणे बेसावध होते. त्यामध्ये द्रौपदीचे पुत्रही होते. कर्मधर्मसंयोगाने पाचही पांडव मात्र हस्तिनापूरला परत आले होते. पण ही गोष्ट अश्वत्थाम्याला माहित नव्हती. त्याने परिस्थितीचा अचूक फायदा उठवला आणि दिव्यास्त्रांचा वापर करून सर्व सैन्याचा नाश केला. त्यामध्ये पांडवही नाश पावले असणार याची त्याला पूर्ण खात्री होती. त्याने ताबडतोब



दुर्योधनाला जाऊन ही बातमी सांगितली असता, त्या मरणोन्मुख स्थितीतही दुर्योधनाचे डोळे चमकले. पांडवांचा नाश झाला या सुखाच्या भ्रमातच दुर्योधनाचे प्राणोत्क्रमण झाले. अश्वत्थाम्यानेही दुर्योधनाची इच्छा पूर्ण केल्याचा व पित्याच्या वधाचा सूड घेतल्याचा आसुरी आनंद अनुभवला.


लक्ष्मी, दुसऱ्या दिवशी हा सर्व घोर प्रकार जेव्हा उघडकीला आला, तेव्हा सर्वत्र शोकाचे वातावरणच पसरले. पांडवांच्या दुःखाला तर पारावारच राहिला नाही. परंतु द्रौपदीवरती जणू दुःखाचा डोंगरच कोसळला होता. तिचे मनही अत्यंत शोकाकुल झाले. पांडवांच्या सांत्वनासाठी धावून आलेल्या कृष्णालाही अतीव दुःख झाले आणि त्याचेही अंतःकरण कळवळलेच. द्रौपदीला झालेले तिच्या पुत्रांच्या मृत्यूचे दुःख हे कोणतेही सांत्वनाचे शब्द बोलण्याच्या पलिकडचेच होते, हे कृष्ण जाणून होता. म्हणूनच काहीही न बोलता कृष्ण केवळ द्रौपदीच्या समोर येऊन उभा राहिला आणि त्याने हळुवार आवाजात द्रौपदीला तिच्या मूळच्या नावाने, फक्त ‘कृष्णे’ अशी साद घातली. क्षणार्धात कृष्णाच्या अंतरातील दाटलेले सर्व भाव द्रौपदीच्या मनाला स्पर्श करीत तिच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचले. द्रौपदीने तिची मान किंचित वर करून कृष्णाकडे पाहिले तर तिला आढळले की कृष्णाच्या नेत्रांतून दुःखाश्रुंच्या संततधाराच वहात होत्या. कृष्ण व द्रौपदी या उभयतांनाही मग राहवलेच नाही. द्रौपदी कृष्णाच्या कुशीत शिरली, का कृष्णाने तिला आपल्या हृदयाशी धरले हे सांगता येणे शक्यच नव्हते. पण त्या उभयतांनाही एकमेकांच्या प्रेमस्पर्शाने केवढातरी विसावा मिळाला आणि दोघेही हळूहळू शांत झाले.

घडलेल्या दुर्धर प्रसंगाला अश्वत्थामाच कारणीभूत आहे हे कळल्यावरती भीम व अर्जुन हे अश्वत्थाम्याच्या शोधार्थ निघाले. त्याचा सर्वत्र निकराचा शोध घेऊन त्यांनी शेवटी अश्वत्थाम्याला गाठलेच. युद्धात त्याचा पराभव करून आणि त्याला बांधून त्यांनी द्रौपदीसमोर आणून उभे केले. अश्वत्थामा लज्जेने मान खाली घालून उभा राहिला होता. रागाने लाल झालेले भीम व अर्जुन अजूनही अस्वस्थच होते. अश्वत्थाम्याचा वध

केल्याशिवाय त्यांच्या मनाला स्वस्थता लाभणे शक्यच नव्हते. मनाच्या अशा प्रक्षुब्ध अवस्थेतच अर्जुन द्रौपदीला म्हणाला,

“अगं द्रौपदी, तुझे दुःख सांत्वनापलीकडचे आहे हे मी जाणून आहे. आपल्या पुत्रांना मी वाचवू शकलो नाही याची माझ्या मनाला अत्यंत खंत वाटत आहे. खरे तर, अश्वत्थामा जिवंत आहे तोपर्यंत आम्ही सावध रहाणे आवश्यकच होते. परंतु आमच्या थोड्याशा निष्काळजीपणामुळेच हा घोर प्रसंग ओढवलेला आहे. आमच्या चुकीचे परिमार्जन आता करता येणे शक्यच नाही. आपल्या पुत्रांना एवढ्या तरूण वयात मृत्यूला सामोरे जावे लागावे ही गोष्ट माझ्यासाठी लांछनास्पदच आहे. त्यासाठी मी तुझाही अनंत अपराधीच आहे आणि कोणत्याही शिक्षेला पात्रच आहे. परंतु आपल्या पुत्रांचा कपटाने व निष्ठुरपणे वध करणाऱ्या अपराध्याला मात्र आम्ही पकडून आणले आहे. खरे तर, आम्ही त्याचा तेथल्या तेथेच वध करणार होतो. पण त्याआधी या अश्वत्थाम्याला मुद्दामच तुझ्या पायाशी आणलेले आहे. तुझ्या पायावर डोके ठेवून आधी त्याला तुझी क्षमा मागायला भाग पाडू आणि मगच तुझ्या संमतीने तुझ्यासमोरच त्याचा वध करू.”

असे म्हणून अर्जुनाने व भीमाने मिळून अश्वत्थाम्याला द्रौपदीच्या पुढे बळेबळे नमवले. परंतु द्रौपदी सावध झाली आणि ती क्षणार्धात मागे सरली. भीम व अर्जुन यांना हाताची खूण करून द्रौपदीने अश्वत्थाम्याला पुन्हा दूर उभे करावयास त्यांना सांगितले. द्रौपदी शांतपणे उभीच होती. कोणीच काही बोलत नव्हते. सर्वत्र तणावपूर्ण शांतता पसरल्याचे जाणवत होते. सर्वजण द्रौपदीकडे अपेक्षेच्या नजरेने पहात होते. पण द्रौपदी काहीच न बोलता स्वस्थच होती. तेव्हा कृष्ण द्रौपदीजवळ आला आणि त्याने तिच्या मस्तकावर हलक्या हाताने थोपटले. द्रौपदीने मान वर करून कृष्णाच्या नेत्रात पाहिले. नजरेला नजर मिळाली आणि हृदयाला हृदयही मिळाले. दोघांचाही भाव एकच झाला आणि तोच द्रौपदीच्या मुखातून व्यक्त होऊ लागला.



“अहो नाथ, सर्वप्रथम त्या अश्वत्थाम्याला बंधपाशातून मुक्त करा. तो अनंत अपराधी असला तरी तो तुमच्या गुरूंचा पुत्र व गुरूबंधूही आहे हे विसरू नका आणि त्याच्याशी उचित आदराने वागा.”

द्रौपदीचे हे शब्द ऐकून भीम व अर्जुन दोघेही चमकले. पण अश्वत्थाम्याला मुक्त करण्यास ते राजी होईनात. परंतु जेव्हा त्यांनी द्रौपदीकडे पाहिले तेव्हा तिच्या नजरेतील निश्चयीपणा त्यांना जाणवला आणि भीम व अर्जुन यांनी अत्यंत नाइलाजाने अश्वत्थाम्याला पाशातून मोकळे केले. पण तरीही ते दोघे त्याच्याकडे रागाच्या जळजळीत नजरेने पहातच होते. द्रौपदीने मात्र त्या दोघांकडे शांत नजरेने पाहिले आणि तिने पुन्हा एकदा कृष्णाच्या नजरेला नजर मिळवली. कृष्णाने किंचितशी मान हलवली आणि तो द्रौपदीकडे अपेक्षेने पाहू लागला. द्रौपदीनेही मनाचा निश्चय केला आणि धीर गंभीर वाणीने ती एकेक शब्द बोलू लागली.

“या अश्वत्थाम्याने बेसावध सैन्यावरती छुपा हल्ला करून, त्यांची निर्घृण हत्या करून पापकर्माची परिसीमाच गाठली आहे. पण त्याहीपेक्षा ते एक अमानुष कृत्य आहे. पाप व पुण्य यांचा निवाडा करावयाचा माझा अधिकार नाही आणि मला कारणही नाही. परंतु असंख्य जीवांची विनाकारण हत्या झाली याने मात्र माझे मन अत्यंत व्यथित झाले आहे. त्या जीवांमध्ये माझे पुत्रही होते, म्हणून मला होणारे दुःखही पराकोटीचेच आहे. त्यातूनही माझे पुत्र तरूण वयाचेच होते. स्वतःचे जीवन त्यांनी अजूनही पूर्णपणे पाहिले नव्हते किंवा अनुभवलेही नव्हते. असे असताना त्यांना त्यांचे जीवन जगण्याचा हक्क अशा निष्ठुरपणे नाकारला गेला यासारखी दुसरी अन्यायकारक गोष्ट नाही. प्रत्यक्ष युद्धात लढत असताना जर त्यांना अभिमन्युसारखे वीरमरण लाभले असते, तरी ते त्यांच्यासाठी गौरवास्पद व आपल्याला भूषणास्पद वाटले असते. पण त्यांचा तोही हक्क त्यांच्यापासून हिरावून घेतला गेला. मला या गोष्टीचेच दुःख अधिक होत आहे.

आता प्रश्न अश्वत्थाम्याला शिक्षा करण्याचा आहे. त्याच्या अपराधाचा विचार केला तर त्याला जरी मृत्यूदंडाची शिक्षा झाली तरी

ती कमीच आहे, एवढा घोर अपराध त्याच्याकडून घडलेला आहे. परंतु हे नाथ, जी चूक त्याने केली ती चूक तुम्ही करू नका आणि गुरूपुत्राचा वध करण्याचे पापकर्म करू नका. अशा आततायी कृत्यापासून स्वतःला परावृत्त करा. अश्वत्थाम्याच्या मृत्यूने त्याच्या मातेला म्हणजेच तुमच्या गुरूपत्नीला काय दुःख होईल याचा विचार करा. पोटी जन्मलेल्या आणि अत्यंत प्रेमाने, पोषण करून वाढवलेल्या पुत्राच्या मृत्यूचे दुःख हे केवळ एक माताच जाणू शकते. दुर्दैवाने ते दुःख आता मीच अनुभवते आहे आणि म्हणूनच तसे दुःख अश्वत्थाम्याच्या मातेच्या वाट्याला येऊ नये, असे मला अगदी अंतःकरणापासून वाटते. खरे तर, असे दुःख कोणत्याही मातापित्यांवर येऊ नये. परंतु निदान आपण तरी तशी वेळ कोणावर येऊ देऊ नये. या एकाच भावनेने व हेतूने मी या अश्वत्थाम्याला अगदी अंतःकरणापासून क्षमा करते आणि त्याला जीवनदान देते. खरे तर, हे जीवनाचे दान परमेश्वरानेच सर्वांना दिलेले आहे आणि ते कोणापासूनही हिरावून घेण्याचा आपल्याला, किंबहुना कोणालाच हक्क नाही."

असे बोलता बोलताच द्रौपदीच्या नेत्रातून अश्रुधारा वहातच होत्या आणि एवढा वेळ आवरून धरलेला हुंदका तिने मोकळा केला. सर्वांचेच नेत्र पाणावले होते. तशाच नजरेने द्रौपदीने कृष्णाकडे पाहिले, तर त्याच्याही नेत्रातील अश्रू त्याच्या गालावर ओघळत होते. त्याच्या मुखावरती द्रौपदीच्या कौतुकाचा भाव दाटून राहिला होता. कृष्णाने अत्यंत प्रेमभराने द्रौपदीकडे पाहून त्याचा भाव नजरेने व्यक्त केला. द्रौपदीचा भाव कृष्णाच्या अंतःकरणाला पावल्याचीच तू खूण होती आणि द्रौपदीसाठी तर कृष्णाच्या अंतःकरणाची प्रसन्नता हेच सर्वस्व होते. त्यातच तिला सर्व पावले होते.

द्रौपदीच्या भावपूर्ण व निश्चयात्मक बोलण्याचा प्रभाव सर्वांवरतीच झाला. द्रौपदीचे कोमल व निर्मळ अंतःकरण अश्वत्थाम्यालाही जाणवले आणि त्याला स्वतःची स्वतःला लाज वाटून त्याने शरमेने मान खाली घातली. द्रौपदीकडे वर मान करून पाहण्याचे धाडसही त्याला होणे शक्यच नव्हते. भीम व अर्जुन अश्वत्थाम्याला तेथून घेऊन गेले. द्रौपदीच्या इच्छेनुसार त्यांनी त्याला जीवनदान दिले खरे, परंतु अश्वत्थाम्याला त्याच्या अपराधाची शिक्षाही त्यांनी दिली. अश्वत्थाम्याच्या मस्तकावर



जन्मजातच एक तेजस्वी मणी होता ज्यामुळे त्याच्याठायी दैवी तेज होते. अर्जुनाने स्वतःच्या तलवारीने तो तेजस्वी मणी छेदून टाकला आणि तेजोहीन अवस्थेतील अश्वत्थाम्याला त्याने मोकळे सोडून दिले.”

द्रौपदीची भावपूर्ण अवस्था प्रगट करीत असताना नारदच एवढा भावपूर्ण झाला होता, तर लक्ष्मीही भावपूर्ण झाली यात जराही नवल नव्हते. भावपूर्ण प्रसंगाचाच तो परिणाम होता. अंतःकरणाच्या भावपूर्ण अवस्थेमुळेच भावपूर्ण प्रसंग घडतात आणि अशा भावपूर्ण प्रसंगांमुळे अंतःकरणाची भावपूर्णता अधिक वाढते. ही अंतःकरणाची भावपूर्णता पुन्हा शब्दांच्या माध्यमाचा आधार घेऊन प्रगट होण्याचा प्रयत्न करीत रहाते. लक्ष्मीच्या बाबतीतही नेमके तसेच झाले आणि तिच्या अंतःकरणातील भावपूर्णता उत्स्फूर्तपणे शब्दरूप घेऊन साकार होऊ लागली.

“नारदा, हा तर द्रौपदीच्या भक्तिभावाचा कळसच झाला. तिचे अंतःकरण पूर्णपणे कृष्णमय झाले असल्याचेच ते लक्षण आहे. कृष्णप्रेमाने भरलेल्या तिच्या अंतःकरणामध्ये कोणताही विकार किंवा त्याचे मूळ याचा लवलेशही नाही. कोणाविषयी राग नाही, लोभ नाही की कोणाविषयी द्वेषमत्सरही नाही. एवढेच नव्हे, तर ज्याने घोर अपराध केला आहे त्या अश्वत्थाम्यासाठीही तिच्याठायी दया आहे, क्षमा आहे आणि तिच्या अंतःकरणात पूर्ण शांती आहे. हे द्रौपदीच्या कृष्णभक्तीचेच फळ आहे याची मला पूर्ण खात्री आहे. खरोखरीच कृष्णावर अपरंपार श्रद्धा व प्रेम असलेल्या द्रौपदीने प्रयत्नपूर्वक तिच्या जीवनात कृष्णाचे स्थान कायम ठेवले आणि कृष्णाच्या सहवासात कृष्णाचे माहात्म्य जाणता जाणता द्रौपदीच्याठायी कृष्णाविषयी भक्तिभाव निर्माण झाला. मुख्य म्हणजे तिचा हा भक्तिभाव फलरूप झाला आणि ते भक्तिभावाचे फळ तिने कृतज्ञभावाने कृष्णालाच समर्पित केले. होय ना?”

लक्ष्मीचे बोलणे संपण्याच्या आधीच नारद होकारार्थी मान हलवत होता आणि तिचे बोलणे संपताक्षणीच तो उत्स्फूर्तपणे उद्गारला,

"बरोबर! लक्ष्मी, अगदी बरोबर! म्हटले तर कृष्णावरील श्रद्धेने कृष्ण बाह्यांगाने तिच्या जीवनात आधार म्हणून असावा एवढीच सुरुवातीला द्रौपदीची इच्छा होती. त्याप्रमाणे कृष्णाने द्रौपदीला नेहमीच आधार व रक्षण दिले. परंतु प्रत्यक्ष जीवनात मात्र ते दोघेही एकमेकांच्या जीवनामध्ये ना भागीदार होऊ शकले किंवा ना वाटेकरी होऊ शकले. त्यातल्या त्यात द्रौपदीच्या व्यक्तिगत जीवनात कृष्णाचा बराचसा सहभाग तरी होता आणि तेही कृष्णाच्या अर्जुनाशी असलेल्या मैत्रीच्या संबंधामुळे शक्य झाले. परंतु कृष्णाच्या व्यक्तिगत जीवनात मात्र द्रौपदीचा काहीही सहभागच काय, संबंधही असणे शक्य नव्हते. तरीही कृष्णाच्या सहवासात तिला कृष्णाचे जे प्रेम मिळाले, त्याचे खरे माहात्म्य कळून तिला जाणवू लागले आणि कृष्ण म्हणजे त्याचे अंतःकरणच होय ही मूलभूत व मुख्य गोष्ट द्रौपदीच्या लक्षात आली. तेव्हा कृष्णाचे अंतःकरण जे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येक अंगातून प्रगट होत होते, त्यालाच प्रमाण मानून स्वतःमध्ये बाह्यांगाने तसा बदल करण्याचा द्रौपदीचा निश्चय झाला आणि तसा ती प्रत्यक्ष प्रयत्नही करीत राहिली. तिच्या प्रयत्नांना कधी यश मिळाले तर कधी नाही, पण त्याचा ध्यास कायम ठेवून ती प्रयत्न मात्र करीत राहिली. बाह्यांगाने करता करताच द्रौपदीच्यात आंतरिकही बदल होत राहिले. म्हणजे तसे तिने विवेकाने व प्रयत्नपूर्वक केले. सुरुवातीला द्रौपदीच्या भावनांशी कृष्ण एकरूप होत असे. पण नंतर मात्र द्रौपदीने स्वतःच्या भावना बाजूला सारल्या आणि ती कृष्णाच्या विचारांशी, मार्गदर्शनाशी व त्याच्या भावाशी समरस होऊ लागली. त्यामुळेच कृष्णाच्या अंतःकरणाशी एकरूप होण्याचा मार्ग द्रौपदीसाठी सुगम झाला. कृष्णावरच्या आत्यंतिक प्रेमातून व श्रद्धेतून त्या मार्गाचा उगम झाला होता. म्हणूनच द्रौपदीचा भक्तिभाव व कृष्णाचे अंतःकरण यांचा संगम झाला आणि द्रौपदी कृष्णाच्या अंतःकरणाशी एकरूप होऊन राहिली. म्हणजेच द्रौपदीचे अंतःकरणच कृष्णाच्या अंतःकरणासारखे होऊन राहिले; कारण कृष्ण पावणे म्हणजे अंतःकरणच कृष्णमय होऊन रहाणे होय."

नारदाने लक्ष्मीकडे अपेक्षेने पाहिले असता लक्ष्मीने मान डोलवून व केवळ नजरेनेच तिची नारदाच्या बोलण्याशी असलेली सहमती व्यक्त



केली. लक्ष्मीच्या मुखावरती तृप्तता व प्रसन्नता पसरली होती आणि तिच्या अंतःकरणातील आनंदही तिच्या मुखावरून भरभरून ओसंडत होता. थोडा वेळ तरी असेच जाणवले की लक्ष्मीला आता काही विचारायचेही नाही आणि काही ऐकायचेही नाही. परंतु कृष्णमाहात्म्य श्रवणाची तिला लागलेली गोडी अजूनही तिच्याठायी कायमच होती. त्यामुळे लक्ष्मीला नुसते तसेच स्वस्थ बसून रहाणेही जास्त वेळ शक्य झालेच नसते आणि तसेच झालेही. थोड्या वेळाने लक्ष्मीच्या मुखातून जणू तिच्या नकळतच, पण शब्द हे बाहेर येऊ लागलेच.

“नारदा, मला वाटते युद्ध खऱ्या अर्थाने आता संपले. पुढे पांडवांनीही धर्माने व नीतीने सुराज्य केले असणारच आणि सर्व प्रजेला सुखी व समाधानी केले असणार. पांडवांनाही त्यांच्या पराक्रमाने सर्व वैभव व ऐश्वर्यही नक्कीच मिळाले असणार याविषयीही मला पूर्ण खात्री आहे. परंतु युद्ध जिंकल्यानंतर कृष्णाचे धर्मकार्य पूर्ण झाले का? अधर्माचा बऱ्याच अंशी नाश झाला हे खरे आहे, पण ज्या धर्माला कृष्णामुळे रक्षण व आधार मिळाला, तो धर्म नंतर तरी वृद्धींगत झाला का? त्या अर्थाने कृष्णाचे धर्मकार्य यशस्वी झाले का? हे सर्व महत्त्वाचे प्रश्न अजूनही माझ्यासाठी अनुत्तरीतच राहिले आहेत, कारण तरच कृष्णाचे जीवितकार्य सुफलित झाले असे म्हणता येईल. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाने संमतीदर्शक मान डोलावली आणि तो म्हणाला,

“लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे आणि तुझ्या मनात आलेले प्रश्नही योग्यच आहेत. कारण युद्ध जिंकल्यामुळे बाह्यांगाच्या अधर्माला आळा बसला आणि त्याला आवर घातला गेला. अर्थात तेही अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे होतेच. पण अधर्माचे मूळ हे मनामध्ये अत्यंत खोलवर असते. तो अधर्म समूळ नष्ट होऊन त्याठिकाणी आत्मधर्माची जाणीव निर्माण होणे हेच खरे धर्मकार्य होय. पण हे धर्मकार्य हे प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीच घडायचे असते आणि तेही ज्याचे त्यानेच घडवायचे

असते. त्यासाठी कृष्ण हा बाह्यांगाने केवळ निमित्तमात्रच होऊ शकत होता. त्याच्या रूपगुणांमुळे व व्यक्तिमत्त्वामुळे कृष्णाने अनेकांची मने आकर्षून घेतली. त्यामुळे त्यांची मने संसाराच्या मोहातून व आसक्तीमधून सुटण्यास कृष्ण हा बाह्यकारण झाला. कृष्णाच्या व्यक्तिगत व शुद्ध प्रेमाच्या अनुभवामुळे अनेकांची मनेही कृष्णप्रेमाने भरून निर्मळ व प्रेमळही झाली. वेळप्रसंगी कृष्णाने ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचे सत्यज्ञान प्रगट करूनही अनेकांना बोधित केले. पण त्या ज्ञानाचा निश्चय करून तसा अनुभव घेण्याचा ध्यास मात्र ज्याला त्यालाच घ्यायचा होता. आता अशी संधी ज्यांना मिळाली त्यांनी त्याचा किती लाभ करून घेतला, हाच मुख्य व विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

हे लक्ष्मी, द्रौपदीच्या भक्तिभावामुळे तिचे अंतःकरणच कृष्ण झाले. कृष्णाच्या मुखातून तिने वेळोवेळी श्रवण केलेले ज्ञान, ही तिच्या अंतःकरणाचीच अवस्था होऊन राहिली आणि कृष्णाचा ईश्वरी अनुभव हा द्रौपदीचाही सहजपणे स्वानुभव झाला. पण अर्जुनाची अवस्था वेगळी होती. युद्धाच्या सुरुवातीला त्याच्यासाठी कृष्णाकडून आत्मज्ञान शब्दरूपाने प्रगट झाले आणि ईश्वर हृदयातच आहे हे त्याला कळले. पण ते केवळ अर्जुनाच्या मानसिक अवस्थेच्या निमित्ताने प्रगट झालेले तात्कालिक ज्ञान होते. त्या ज्ञानाचा बुद्धीच्याठायी कायमचा निश्चय होऊन, त्याचा अनुभव घेण्याचा ध्यास अर्जुनाला लागणे आवश्यक होते. त्यासाठी अर्जुनाने कृष्णाचा सहवास करून कृष्णाशी त्याचा संवादही व्हायला हवा होता. हे सर्व व्हायला हवे होते, म्हणजे कोणीतरी करायला हवे होते. कारण केल्याशिवाय गोष्टी आपसूक कधीच घडत नाहीत. त्या मुद्दामहून कराव्याच लागतात आणि तेव्हाच त्या घडू शकतात. आता प्रश्न असा आहे की त्यासाठी पुढाकार कोणी घ्यायचा? कृष्णाने की अर्जुनाने? खरी आवश्यकता कोणाला? कृष्णाला की अर्जुनाला? खरे तर, हा अनुभव ज्याने घ्यायचा आहे, त्या अर्जुनालाच केवळ ती आवश्यकताच नव्हे, तर आर्तताच निर्माण व्हायला हवी होती. पण अर्जुनावरील प्रेमापोटी कृष्णालाच, त्याचा आत्मानुभव हा अर्जुनाचा व्हावा असे अगदी अंतःकरणापासून वाटत होते. परंतु कृष्णाच्याही मर्यादा होत्याच आणि त्याने त्याच्या मर्यादेत किंवा वेळप्रसंगी थोडेसे मर्यादेबाहेर जाऊनही

अर्जुनासाठी जास्तीत जास्त केले होतेच. अर्थात् एखादेवेळेस असेही झाले असेल, की पुढाकार नेहमी कृष्णानेच घेण्याची अर्जुनालाही एवढी सवय जडली असेल, की त्यामुळे कृष्णानेच पुढाकार घेण्याची अपेक्षा धरून आणि कृष्ण आपणहून काहीतरी बोलेल याची वाट बघत अर्जुन स्वस्थ बसला असेल.

लक्ष्मी, पण पांडवांच्या जीवनात पुढे वेगाने अनेक चांगल्या गोष्टी घडत राहिल्या. धृतराष्ट्राने स्वतः धर्मराजाला सिंहासनावर बसवले आणि सर्व प्रजेसाठी सुखसमृद्धीचे राज्य सुरू झाले. नंतर कृष्णाने धर्मराजाकडून अश्वमेध यज्ञ करवून घेतला आणि पांडवांना केवढेतरी राज्यवैभव प्राप्त झाले. धर्मराजाला राज्यकारभारासाठी त्याच्या सर्व बंधूंचे साहाय्य होतेच आणि त्याने प्रत्येकाकडे विशिष्ट कामगिरी सोपवून दिली होती. अर्थात् अर्जुनही तनमनाने राज्यकारभारात पूर्णपणे गुंतला आणि त्याला कृष्णाच्या सहवासासाठी जास्त वेळच मिळेनासा झाला. अर्जुनाला हस्तिनापूर सोडून द्वारकेला कृष्णभेटीसाठी जाणे शक्य होत नव्हते आणि जेव्हा कृष्ण हस्तिनापूरला येई, तेव्हा राज्यकारभारात व्यस्त असल्यामुळे अर्जुनाला जास्त वेळ मिळत नसे. त्यातूनही जेव्हा कृष्ण व अर्जुन यांची भेट होई तेव्हाही अर्जुनाचे मन राज्यकारभाराच्या कसल्यातरी व्यवधानातच असे. त्यावेळी मग कृष्ण व द्रौपदी यांनाच भेटीची भरपूर संधी मिळत असे आणि त्याचा ते पुरेपूर लाभ करून घेत असत. परस्परांच्या सहवासात त्यांना एकमेकांवरील प्रेमाचा आनंद मोकळेपणाने घेता येत असे आणि सख्य भक्तीमधील ऐक्यत्व अनुभवता येत असे.

* * * * *

# अनुगीता

लक्ष्मी, एकदा अशीच कृष्ण व अर्जुन यांची भेट झाली. त्यावेळी अर्जुनाशी बोलता बोलता कृष्णाने अप्रत्यक्षपणे मुद्दामहूनच विषय काढला आणि युद्धाच्या सुरुवातीला त्याचे जे अर्जुनाशी बोलणे झाले होते, त्याचे अर्जुनाला स्मरण करून देण्याचा प्रयत्न केला. अर्जुनाला कृष्णाच्या बोलण्याचा आधी एकदम संदर्भ लागलाच नाही. पण थोड्या वेळाने अर्जुनाला तो प्रसंग आठवला. अर्जुन थोडासा विचारात पडला आणि नंतर कृष्णाला म्हणाला,

“कृष्णा, तो प्रसंग मी माझ्या आयुष्यात केव्हातरी विसरणे शक्य आहे का? अरे, ऐन युद्धाच्या वेळी माझ्या मनाला अचानक निराशेने ग्रासले आणि युद्ध करण्यासाठी मी तयारच होईना. त्यावेळी तू मला कितीतरी प्रकारे समजावलेस. मीही तुला अनेक प्रश्न विचारले आणि तूही त्या प्रश्नांची उत्तरे देऊन माझ्या मनाचे समाधानही केलेस. त्याचवेळी तू ईश्वर व त्याचे अस्तित्व, खरे कर्तव्यकर्म, ईश्वराची प्राप्ती यासंबंधी सुद्धा बरेचसे सांगितल्याचे मला स्मरते. परंतु तुझ्या त्या बोलण्याचा तपशील मात्र माझ्या आता तेवढासा लक्षात नाही. तू त्यावेळी काहीतरी गहन ज्ञान सांगत होतास एवढे मात्र मला अजूनही आठवते. त्यावेळी बोलताना तुझ्या मुखावर केवढेतरी गंभीर व तेजस्वी भाव होते हेही मला आठवते आहे. त्यावरून एक गोष्ट निश्चित आहे, की तू काहीतरी अत्यंत महत्त्वाचा विषय माझ्याशी बोलत होतास. पण त्यानंतर तुझ्या त्या बोलण्याचा विचार करायला मला वेळच मिळाला नाही. धर्मराजाने माझ्यावरती एवढ्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत, की मला जराही उसंत अशी मिळतच नाही. माझी होणारी धावपळ तूही पहात आहेसच. दिवस न् दिवस माझी द्रौपदीशीही नीटशी भेट होऊ शकत नाही. पण जेव्हा केव्हा भेट होते तेव्हा मात्र तुझा विषय तिच्या बोलण्यात येतोच येतो आणि तीही युद्धाच्या आधी तू मला सांगितलेल्या विषयांबद्दल विचारत असते. पण त्यासंबंधी मी तिच्याशी तेवढेसे बोलू शकत नाही. कारण मला तुझ्या बोलण्यातील गाभाच कळलेला नाही हेच खरे. ‘तो विषय मी तुझ्याशी पुन्हा बोलून नीट समजावून घ्यावा’ असेही द्रौपदी मला सुचवीत असते. परंतु मला



आतापर्यंत तशी सवडच मिळू शकली नाही. सुदैवाने आज माझ्यापाशी वेळ आहे आणि तूही भेटला आहेस. तेव्हा युद्धाच्या आधी सांगितलेले ते सर्व विषय तू आताच मला पुन्हा नीट समजावून सांगण्याचे करशील का?”

लक्ष्मी, अर्जुनाचे बोलणे ऐकून कृष्ण थोडावेळ काहीही न बोलता स्वस्थच राहिला. आत्मज्ञानाचा विषय हा काही असा सहजगत्या बोलण्यासारखा विषय नाही ही गोष्ट कृष्ण जाणून होता. कारण आत्मज्ञान हे गुरूशिष्य संवादातूनच प्रगट होते आणि असा संवाद गुरूशिष्य संबंधातूनच घडू शकतो. असे संबंध शिष्याच्या अनन्य शरण्य भावातूनच निर्माण होत असतात आणि असा शरण्यभाव काही एकदम निर्माण होत नाही. केवळ ‘मी तुम्हाला शरण आलो आहे’ असे एकदा किंवा वारंवार म्हणूनही असा शरण्यभाव होणे शक्य नाही. त्यासाठी सद्‌गुरूंचा दीर्घकाळचा सततचा सहवास करणे, केवळ त्यांच्या मार्गदर्शनानुसारच जीवन जगणे आणि त्यांचीच अखंड सेवा घडणे, हे अत्यावश्यक आहे. त्यामुळेच अन्य गोष्टींचा आधी कृतीने व मग मनानेही त्याग घडून अनन्यभाव निर्माण होतो. या अनन्यभावाने दिलेली शरणागती हाच खरा शरण्यभाव आणि हाच शरण्यभाव हे त्या भक्तिभावाचे मूळ होय. या भक्तिभावानेच प्रत्यक्ष सगुण सद्‌गुरूंचीच भक्ती घडते तेव्हाच आत्मस्वरूप ईश्वराच्या प्राप्तीच्या मार्गातील वाटचाल सुरू होते.

लक्ष्मी, हे सत्य कृष्ण स्वानुभवाने जाणत होता आणि तसा शिष्यत्वाचा शरण्यभाव अर्जुनाठायी नव्हता हेही त्याला स्पष्टपणे दिसत होते. पण अर्जुनावरती अंतःकरणापासून प्रेम करणाऱ्या कृष्णाला अर्जुनाची दयाच आली. अर्जुनाशी झालेले एवढे बोलणे वायाच गेले म्हणून कृष्णाला अर्जुनाचा राग तर आलाच नाही, उलट परिस्थितीमुळे होत असलेली अर्जुनाची अडचण लक्षात घेऊन कृष्णाला अर्जुनाविषयी सहानुभूतीच वाटली. म्हणून मग कृष्णाने अर्जुनाशी पुन्हा उत्साहाने व नव्या उमेदीने बोलावयास सुरुवात केली.

“अर्जुना, कोणताही विषय केवळ एकदाच श्रवण करून समजणे शक्यच नसते. एवढेच काय त्याचे स्मरणही रहाणे कठीण असते. मग त्या विषयाचा गाभा कळणे हे तर दूरच राहिले. त्यासाठी श्रवण केलेल्या

विषयांचे मनन करून अनुसंधान ठेवणे आवश्यक असते. त्यानंतर पुन्हा ज्याच्या मुखातून श्रवण केले त्यांच्याशी संवाद साधून, तो विषय सर्व अंगाने अधिकाधिक समजावून घेतला पाहिजे. आत्मज्ञानासारखा विषय तर केवळ शब्दाने समजून घेण्यासाठी नसून त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असतो. म्हणून केवळ बुद्धीची समज न होता, बुद्धीचा त्या ज्ञानाविषयी निश्चयच झाला पाहिजे. त्यानंतर इतर सर्व व्यवधाने प्रयत्नपूर्वक दूर करून त्या ज्ञानाचा अनुभव घेण्याचा ध्यासच धरावयास हवा. तरच मन हळूहळू त्या अनुभवाच्या दिशेने वाटचाल करीत राहील आणि एक दिवस ती अनुभवाची अवस्था निश्चितपणे प्राप्त करून घेईल.

अर्जुना, तू ते आत्मज्ञान शब्दरूपाने फक्त एकदाच श्रवण केलेस आणि तेही युद्ध सुरू होण्याच्या आधीच्या धांदलीच्या व गडबडीच्या परिस्थितीत. अर्थात् त्या शब्दज्ञानाचाही तुला तात्कालिक का होईना, पण उपयोग हा झालाच. तुझ्या मनाला झालेला विषाद नाहीसा होऊन तू युद्धाला उद्युक्त झालास आणि पराक्रमाने त्या युद्धात विजयीसुद्धा झालास. पण ते ज्ञान तू आत्मसात करू शकला नाहीस. कारण त्यानंतर तुझ्याठिकाणी त्या ज्ञानाचे व्यवधान राहिलेच नाही आणि तू पुन्हा तुझ्या नित्याच्या जीवनात गुंतून राहिलास. काहीही निमित्त वा कारण होवो, परंतु तुला त्यावेळी आपल्यात घडलेल्या बोलण्याची पुन्हा आठवण झाली, ही गोष्ट निश्चितच चांगली झाली. परंतु तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगतो, की ज्या वेळेस माझ्याकडून तुझ्यासाठी आत्मज्ञान शब्दरूपाने प्रगट झाले तेव्हा मी पूर्णपणे आत्मभावाने युक्त झालेलो होतो. तुझ्या अवस्थेचे निमित्त होऊन आणि तुझ्यावरील आत्यंतिक प्रेमातून माझी आत्मानुभवाची अवस्था शब्दरूप झाली. आता जर तू मला त्यावेळी तुझ्याशी झालेले बोलणे व विषय पुन्हा जसेच्या तसे सांगावे असे म्हणशील, तर ते मलाही शक्य होणार नाही. कारण जशी तुझी त्यावेळची आर्त अवस्था आता नाही, तशीच माझीही त्यावेळची अंतःकरण भरून वाहणारी अवस्था आता नाही.

अर्जुना, पण ज्या अर्थी तुला ते ज्ञान श्रवण करण्याची इच्छा पुन्हा झालेली आहे त्या अर्थी ती मी निश्चितच पुरी करीन. त्यासाठी मी असे करतो की पूर्वी घडून गेलेली एक कथा तुला सांगतो. ‘एका गावात एक



ब्राम्हण व त्याची पत्नी ब्राम्हणी रहात होती. ब्राम्हण हा अत्यंत तपश्चर्यावान होता आणि त्याने सद्‌गुरूंना शरण जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घेतले होते. त्याच आत्मज्ञानाच्या अनुभवाने तो त्याचे प्राप्त जीवन शांतीने, समाधानाने व आनंदाने जगत होता. त्याची पत्नीही एकनिष्ठ भावाने पतीला अनुसरत असे. एक दिवस तिलाही मानवी जन्माचे रहस्य व मानवी जीवनाची इतिकर्तव्यता याविषयी जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली. म्हणून तिने त्या ब्राम्हणाला त्यासंबंधी प्रश्न विचारला असता, त्या ब्राम्हणानेही तिला सर्व उकल करून सांगितले. ब्राम्हणीनेही संवाद करून तिच्या पतीला अनेक प्रश्न विचारले आणि त्या ब्राम्हणानेही त्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे सांगून, त्याच्या पत्नीच्या मनाचे पूर्ण समाधान केले. त्या ब्राम्हणीनेही त्या ज्ञानाचा बुद्धीठायी निश्चय करून त्याचा ध्यास धरला आणि आत्मानुभवाची अवस्था प्राप्त करून घेतली.’

ही कथा सांगत असताना कृष्णाने अर्जुनाला, तो ब्राम्हण व ब्राम्हणी यांच्यातील प्रश्नोत्तरे व त्यांच्यात घडलेला संवाद सविस्तरपणे कथन केला. कृष्ण किती तरी वेळ रंगून सांगत होता आणि अर्जुनही ऐकण्यात पूर्णपणे रंगला होता. कथा सांगून संपल्यावरती कृष्ण बोलावयाचा थांबला आणि अर्जुनाकडे अपेक्षेने पहात राहिला. अर्जुनही बराच वेळ काही न बोलताच स्वस्थ बसला. शेवटी अर्जुनाने कृष्णाकडे पाहिले आणि बोलावयास सुरुवात केली.

“कृष्णा, ब्राम्हण व ब्राम्हणी यांची तू सांगितलेली कथा मला अतिशय आवडली. विशेषतः त्यांच्यामध्ये घडलेला संवाद हा तर अभ्यसनीयच होता. त्या ब्राम्हणीने विचारलेले काही प्रश्न तर माझ्याही मनातील होते. त्या प्रश्नांना ब्राम्हणाने जी उत्तरे दिली, त्यांनी माझ्याही मनाचे समाधान झाले. मला एका गोष्टीचे नवल व कौतुकही वाटते, की त्यांचे नाते पतीपत्नीचे असूनही त्यांच्यामध्ये एवढ्या गहन विषयासंबंधी कसे काय बोलणे झाले? ते एकमेकांकडे केवळ पतीपत्नी या नात्याने पहात नव्हते हे निश्चित. असे पतीपत्नीचे संबंध असू शकतात ही गोष्ट विशेषच आहे. त्या उभयतांची भेट घ्यावी असे माझ्या मनात प्रकर्षाने येत आहे. तरी ते ब्राम्हण-ब्राम्हणी सध्या कोठे वास्तव्य करून आहेत हे तू मला सांगू

शकशील का? त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊनच मनाचे समाधान करून घ्यावे एवढीच माझी इच्छा आहे.”

अर्जुनाचे बोलणे ऐकून कधी नव्हे तो कृष्णही अत्यंत चकितच झाला आणि त्याच्या मनाला थोडासा बसलेला धक्का त्याच्या मुखावरती दिसलाच. पण कृष्णाने स्वतःला प्रयत्नपूर्वक सावरले आणि तो काहीही न बोलता स्वस्थच बसला. कृष्णाची मनःस्थिती बहुधा अर्जुनाच्या लक्षातच आली नसावी. कारण तो कृष्णाकडे उत्तराच्या अपेक्षेने टक लावून पहातच राहिला होता. त्याची नजर टाळणे कृष्णालाही अशक्यच होऊ लागले. शेवटी थोड्याशा नाइलाजानेच कृष्णाने अर्जुनाशी बोलावयास सुरुवात केली.

“अरे अर्जुना, तुझी तर कमालच आहे. असे ब्राम्हण व ब्राम्हणी खरेच कोठेतरी आहेत असे तुला खरोखरीच वाटले की काय? अरे, मी त्यांची कथा केवळ रूपक म्हणून सांगत होतो. असे ब्राम्हण व ब्राम्हणी प्रत्यक्ष कोठेही नाहीत. खरे तर, हा माझा माझ्या ठिकाणीच घडलेला संवाद आहे. माझे मन व माझी बुद्धी यांच्यामध्ये घडलेली ही प्रश्नोत्तरे आहेत. आत्मस्वरूपाविषयी निश्चयात्मक असलेली माझी आत्मबुद्धी व आत्मस्वरूपाच्या प्रेमानुभवाने सदैव युक्त असलेले माझे मन, यांच्यात घडलेला हा संवाद आहे. तो ब्राम्हण माझ्या आत्मबुद्धीचे प्रतीक आहे. तर ती ब्राम्हणी आत्मप्रेमाने युक्त अशा माझ्या मनाचे प्रतीक आहे. खरे तर, हा संवाद माझ्या चित्ताठायी सतत घडतच असतो आणि तेच माझ्या आत्मजागृतीचे लक्षण आहे व कारणही आहे. तू सुद्धा तुझ्याठायी असाच मन व बुद्धी यांचा संवाद करीत रहाशील, तर त्या निमित्ताने तुझ्याकडूनही मनन व चिंतन घडत राहील. त्यामुळेच तुझे मन तू श्रवण केलेल्या ज्ञानाच्या बोधाशी स्थिर राहील आणि बुद्धीठायीही तसा निश्चय होईल. त्यातूनच मग तुझ्याठायी त्या ज्ञानाचा अनुभव घेण्याचा ध्यास लागेल आणि प्रत्यक्ष अनुभवाच्या दिशेने तुझी वाटचाल हळूहळू घडत राहील. जे सर्वश्रेष्ठ असे आत्मज्ञान माझ्याकडून तुझ्यासाठी आता उत्स्फूर्तपणे प्रगट झाले ते वाया घालवू नकोस, एवढेच मी तुला अतिशय



कळकळीने सांगतो. त्या ज्ञानाची श्रेष्ठता व अमोलिकता जाणून घे आणि त्याचा अनुभव घेऊन तुझ्या जन्माची सार्थकता करून घे."

अर्जुनाशी बोलताना कृष्णाचेच अंतःकरण आर्त झाले आणि त्याच्याठायी अर्जुनाविषयी अत्यंत कळवळा निर्माण झाला. अर्जुनालाही तो जाणवल्याशिवाय राहिला नाही. तो थोडा वेळ काहीच बोलला नाही. नंतर कृष्णाकडे बघून अर्जुन एवढेच म्हणाला,


"कृष्णा, तुझ्याठायी माझ्याविषयीचा असलेला आत्यंतिक आपलेपणा मी जाणून आहे आणि त्यासाठी मी स्वतःला नेहमीच भाग्यवान समजत आलेलो आहे. तुझ्याठायीचा कळवळाही मला जाणवतो. तुझ्या अपेक्षेनुसार माझ्या मनाठायी आर्तता निर्माण होत नाही हे माझ्या लक्षात येते. त्या गोष्टीचे जसे तुला वाईट वाटते तसेच मलाही वाटते. फक्त त्यावरती निश्चित काय उपाययोजना करावी हे मलाही कळत नाही. पण मी तुला असे खात्रीपूर्वक आश्वासन देतो, की तू सांगितल्याप्रमाणे मी मनन व चिंतन करण्याचा निश्चित प्रयत्न करीन. सध्या कार्यबाहुल्यामुळे मला जास्त वेळ मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती तुलाही माहित आहेच. परंतु एकदा का हा राज्यशासनाचा कारभार मार्गी लावून सर्व काही स्थिरस्थावर झाले, की मात्र मी वेळात वेळ काढून या सर्वाचा सवडीने व सावकाश विचार नक्कीच करीन. तेव्हा तू कृपा करून माझ्यावर नाराज होऊ नकोस आणि मला प्रेमाने असाच भेटत राहून आठवण करून देत रहा."

अर्जुनाचे बोलणे ऐकून कृष्णाने अर्जुनाकडे पाहून मंदस्मित केले आणि अर्जुनाला आश्वासित केले. कृष्ण अर्जुनाशी जरी काही बोलला नाही, तरी त्याला अर्जुनाचा राग येणे तर शक्यच नव्हते, पण त्याला अर्जुनाविषयी दया मात्र जरूर वाटली. कारण अर्जुन ज्या काळाचा भरवसा धरून बोलत होता, त्या काळाचा भरवसा नाही हे सत्य कृष्ण केवळ जाणूनच होता असे नव्हे, तर त्याच्याठायी ते सत्य नित्य जागृत असे. काळाची सत्ता ही कोणालाही चुकत नाही. ती सत्ता जरी आत्म्यावर नसली तरी देहावर मात्र असतेच आणि देहाचे अस्तित्व घडीघडीने संपत चाललेले असते. अर्थात या नियमाला कृष्णाचा देहही अपवाद नव्हताच. कृष्णाला त्याची जणू

चाहूलच लागायला सुरुवात झालेली होती आणि म्हणूनच त्याच्या अंतःकरणातील आर्तता वाढत चालली होती. ज्यांना कृष्णाने त्याचे प्रेमीजन म्हणून जवळ केले, त्यांनी त्यांचे आत्मकल्याण करून घ्यावे आणि ईश्वरी प्रेमाच्या आनंदाने जीवन जगावे असे कृष्णाला अगदी अंतःकरणापासूनच वाटत असे आणि त्यासाठीच त्याचा प्रयत्नही असे. त्याचे सर्व सांगणे व करणे हे एकीएक त्याच हेतूने घडत असे. पण कृष्णाला जशा अर्जुनाच्या मर्यादा लक्षात आल्या होत्या, तशाच स्वतः कृष्णालाही मर्यादा या होत्याच आणि त्याच कृष्णाला आता विशेषत्वाने जाणवू लागल्या होत्या. काळाची मर्यादा ही तर सर्वांनाच असते. अर्जुनाला ती मर्यादा जरी कळत होती, तरी त्याच्या दृष्टीने त्याला अजूनही काळाचा अवधी आहे असेच तो गृहीत धरून चालत होता. परंतु कृष्ण हा सावध होता आणि आता कृष्णाच्याही सांगण्याच्या व करण्याच्या मर्यादा आलेल्या आहेत, हे कृष्णाच्या स्वतःच्याच लक्षात आलेले होते. म्हणूनच कृष्णाने यापुढे अर्जुनाशी हा विषय कधीही काढावयाचा नाही असे ठरवले आणि तो स्वस्थ बसला.”

नारद बोलत असताना त्याच्या बोलण्याचा सूरही जरा जास्त गंभीर झाला होता आणि ही गोष्ट लक्ष्मीच्याही लक्षात आली. त्यामुळे ती एकदम सावध झाली. नारद सांगत असलेल्या विषयातील गांभीर्य तिच्याही लक्षात आले आणि तीही गंभीरच झाली. त्याच गांभीर्याने ती नारदाशी बोलू लागली.

“अरे नारदा, मला वाटते तू सांगत असलेल्या विषयाला एकदम कलाटणी मिळत आहे. सामान्य जीवांना मर्यादा या असणारच हे तर गृहीतच आहे. कृष्णाच्या सहवासात आलेल्या प्रेमीजनांनाही त्यांच्या मनाच्या मर्यादा आड येतात आणि त्यामुळेच ते कृष्णाचे भक्तजन होऊ शकत नाहीत, ही गोष्टही मान्य होण्यासारखी आहे. काळाची मर्यादा ही सर्वांनाच असते हे तर सत्यच आहे. पण बोलता बोलता तू असे अगदी सहजपणे म्हणालास की ‘कृष्णालाही मर्यादा या होत्याच आणि त्याला त्या जाणवूही लागल्या होत्या.’ हे विधान तू ज्या सहजतेने केलेस, त्याने माझ्या मनात एक प्रकारची अस्वस्थताच निर्माण झालेली आहे. कारण तुझे



म्हणणे जर खरे आहे, तर कृष्णाच्या कार्यालाही मर्यादा आलेल्या असणारच आणि कृष्णाचे त्याच्या प्रेमीजनात गुंतलेले मन जर एकदा का सुटले, तर मग त्याच्याकडून त्या प्रेमीजनांचे व्यवधान घेणे घडणेही शक्य नाही. मग कृष्णाच्या प्रेमीजनांचे काय व कसे होणार? ते तर बिचारे उघड्यावरतीच पडतील. त्यांना सांभाळणार कोण? त्यांची काळजी कोण घेणार आणि त्यांना त्यांच्या हिताची आठवण वारंवार कोण करून देणार ? मला तर काहीच समजेनासे झाले आहे. मग भक्तहिताचे कार्य तरी कृष्णाकडून कसे काय घडणार? तेव्हा कृपा करून मला कृष्णाच्या या वृत्तीचा अर्थ नीट समजावून सांग. कारण मला तरी कृष्णाची ही भाषा कार्यनिवृत्तीचीच वाटते आणि त्याचाच माझ्या मनाला ताण येत आहे."

लक्ष्मीची अशी अवस्था पाहून नारदालाही तिचा कळवळाच आला. खरे तर, त्याचीही अवस्था लक्ष्मीसारखीच झालेली होती. परंतु त्याने स्वतःला लागलीच विवेकाने सावरले आणि तो स्वतः स्वतःशीच बोलल्यासारखा बोलू लागला.

"अगं लक्ष्मी, तुझ्या मनाची व्यथा मी स्वानुभवाने जाणू शकतो. परंतु बाह्यांगाने कोणीही कोणासाठी कायमचे राहू शकत नाही आणि कोणाचे पूर्णपणे होऊही शकत नाही हे सत्य आहे. कृष्ण हा त्याच्या प्रेमीजनांचे कल्याण करण्यासाठी बाह्यांगानेच निमित्तमात्र होता. त्यांना तो साहाय्यभूतही होत होता. परंतु कृष्णाच्या प्रेमाने मनाची शुद्धी, कृष्णाने सांगितलेल्या बोधाने बुद्धीची शुद्धी आणि कृष्णाच्या भक्तिभावाने चित्ताची शुद्धी करणे हा जो आंतरिक प्रयत्नांचा भाग आहे, तो तर कृष्ण प्रत्यक्षपणे करू शकतच नव्हता. तो प्रयत्न ज्याचा त्यानेच करावयाचा होता. फार तर कृष्ण त्यांच्यासाठी प्रेरणादायी होऊ शकला असता. पण पुन्हा ती प्रेरणासुद्धा ज्याने त्यानेच घ्यायची होती. तेव्हा काळाच्या ओघात आता अशी वेळ आलेली होती, की कृष्णाच्या प्रेमीजनांनी आता स्वतःचे व्यवधान स्वतःच घेणे आवश्यक होते. स्वतःचे स्वतःलाही त्यांनीच सांभाळणे जरूरीचे होते. स्वतःची काळजीही स्वतःच घ्यावयास हवी होती आणि कृष्णाने दाखवलेल्या मार्गाने जाऊन स्वतःचे हित गाठण्याचे

प्रयत्नही त्यांचे त्यांनीच करावयास हवे होते. कृष्णाचे एवढे प्रेम मिळूनही कोणाचे आंतरिक दोष अजूनही कायम राहिले असतील, तर कृष्णही आता काही करू शकत नव्हता ही वस्तुस्थितीच होती. कृष्णाला ती निश्चितच जाणवली होती. ज्या कोणाला ही वस्तुस्थिती लक्षात आली, ते वेळीच सावध होऊन दक्ष राहिले आणि त्यांनी विवेकाने व कृष्णाच्या प्रेमबळाने स्वतःच्या ठायीचे अवगुण प्रयत्नपूर्वक घालवून स्वतःची पूर्ण आंतरिक शुद्धी केली. त्यांची अंतःकरणे नित्य कृष्णप्रेमाने भरलेली राहिली आणि त्यांच्याच अंतःकरणात कृष्णाच्या भक्तिभावाचे बीज रूजले गेले. त्यांचीच भक्ती एक दिवस निश्चितपणे फलद्रूप झाली आणि प्रेमरसाने पूर्णपणे भरलेल्या अमृतफळाचा आनंद सेवन करण्याचे भाग्य त्यांनाच लाभले.

लक्ष्मी, परंतु जे प्रेमीजन केवळ कृष्णाचे रूपगुण, त्याचे व्यक्तिमत्त्व, त्याचे कार्य यांना भुलून त्याच मर्यादेत राहिले ते मात्र बेसावध राहिले. त्यांच्या अंतरीचे दोष आतमध्ये तसेच दडून राहिले आणि कृष्णापासून दूर गेल्यावरती त्यांचे दूषित अंतर उघडेच पडले. त्यांना त्यांच्या अवगुणांनी पूर्णपणे पछाडले. त्यांची मने पुन्हा सांसारिक कर्मांच्या जाळयामध्ये अडकली आणि सुखदुःखांचा अनुभव घेत, ते सामान्य जीवांसारखे केवळ प्रापंचिक जीवनच जगत राहिले. ज्यांनी कृष्णाच्या सहवासात केवळ त्याच्या प्रेमाचे सुखच अनुभवले, त्यांचे ते सुख एक दिवस बाह्य कारण नाहीसे झाल्यावर संपले आणि ते पुन्हा दुःखी होऊन राहिले. ज्यांना कृष्णापासून रक्षण व आधार मिळाला, त्यांची आंतरिक दुर्बलता दोषांमुळे कायमच राहिली आणि त्यांच्या पुढील जीवनात तीच त्यांना दुःख भोगायला कारणीभूत ठरली. तेव्हा कृष्णाचा सहवास संपल्यानंतर सर्वचजण उघडे पडणे अगदी साहजिकच होते आणि कृष्णाचा बाह्यांगाचा सहवास एक दिवस संपणे ही गोष्ट तर अटळच होती. पण त्याचवेळी जसे कोणाचे दोष उघडे पडले, तसेच ज्यांचे गुण होते तेही उघड होऊन प्रगट झालेच ना!

लक्ष्मी, एक गोष्ट मात्र खरी होती, की कृष्ण हा अधिकाधिक अंतर्मुख होत होता. त्याची बाह्यांगाची अनेक व्यवधाने सुटत चालली होती आणि त्याने प्रयत्नपूर्वक कमीही केली होती. स्वतः स्वतःमध्ये रमण्याची त्याची वृत्ती वाढत होती आणि त्याचमुळे त्याच्या कार्यातील त्याची निवृत्तीही

वाढत होती. कृष्णाने अनेकांसाठी अनेक गोष्टी जीवनभर केलेल्या होत्याच. त्यातून ज्यांना योग्य ती समज आली व जीवनाचा खरा अर्थ समजला, त्यांची कृष्णाला आता काळजी नव्हती. कारण ते स्वतःचे जीवन आनंदाने जगण्यासाठी समर्थ झाले असतेच. परंतु ज्यांच्यासाठी ही समज झाली नाही किंवा होऊ शकली नाही, त्यांच्यासाठी अधिक काही करणे आता कृष्णालाही शक्य नव्हते. कारण त्याचीही मर्यादा आली होतीच. या मर्यादेचे मूळ व मुख्य कारण एकच होते आणि ते म्हणजे कृष्णाची अंतर्मुखता!

लक्ष्मी, कृष्णाच्या आयुष्याचा जवळजवळ सव्वाशे वर्षांचा काळ उलटून गेला होता आणि अवतारसमाप्तीचे वेध त्याच्या अंतःकरणाच्या ठायी सहजपणे व अचानकपणे निर्माण होऊ लागले होते. अवतारकार्यासाठी या सृष्टीमध्ये धारण केलेला देह पुन्हा सृष्टीच्या हवाली करून, आपले आत्मस्वरूप पुन्हा या मूळ नारायणाच्या स्वरूपात एकरूप करण्याची ओढ कृष्णाच्या अंतःकरणात निर्माण होऊन, अधिकाधिक वाढू लागली होती ही गोष्ट खरीच होती. कृष्णाने बाह्यांगाने तसे कोणालाही कधी जाणवू दिले नाही. परंतु एकंदरीतच जगाच्या बाह्य व्यवहारातील त्याचा सहभाग कमी होऊ लागला होता. बाह्य जगाविषयीचे भानही कृष्णाच्याठायी हळूहळू कमी कमी होऊ लागले होते. कृष्णालाही एक दिवस त्याच्या नाशिवंत देहाचा त्याग करणे आवश्यकच होते आणि आता त्याचेच व्यवधान कृष्णाठायी लागून राहिलेले होते. देहत्याग केव्हा व कसा होईल ही गोष्ट कृष्णालाही माहित नव्हती आणि त्याची त्याला काळजीही नव्हती. ईश्वराच्या काळसत्तेत सर्व काही सहजपणे घडणार होते.”

नारदाचे बोलणे ऐकत असताना लक्ष्मीठायीची गंभीरता अधिकच वाढत होती आणि ती लक्ष्मीला असह्यही होऊ लागली. नारदाच्या बोलण्यावरती काय व कशी प्रतिक्रिया व्यक्त करावी हे तिलाही कळेचना. पण तिला काही बोलल्याशिवाय स्वस्थ रहाणेही शक्य होत नव्हतेच. शेवटी न राहवून लक्ष्मीने बोलावयास सुरुवात केली.

“नारदा, तुझ्या बोलण्यावरून मला एकच गोष्ट निश्चितपणे जाणवत आहे, की कृष्णाच्या अवतार चरित्राच्या समाप्तीची सुरुवात झालेली आहे

आणि हीच गोष्ट आपल्या उभयतांना मानवत नाहीए. तो विचारही आपल्या मनाला सहन होऊ शकत नाही. काळाची सत्ता, ईश्वराची नियती, मानवी देहाचा नाशिवंतपणा या सर्व गोष्टी आपल्याला शब्दाने माहित आहेत खऱ्या, परंतु त्यांचा प्रत्यक्ष स्वीकार करण्याची वेळ आली की मन थोडेसे घाबरतेच आहे. कारण त्या मनाला कृष्णचरित्रातूनच सर्वार्थाने प्रगटलेल्या मधुर कृष्णप्रेमरसाची एवढी गोडी व चटक लागलेली आहे, की ते सोडण्याची मनाची तयारी होणे कठीणच आहे. कृष्णप्रेमाने मन जरी सबळ झालेले असले तरी ते जीवनातील इतर सुखदुःखाचे आघात सहन करण्यासाठी. पण प्रत्यक्ष कृष्णाचाच विरह सहन करण्याचे बळ कृष्णप्रेमात आहे का? मला वाटते आता पुढे त्याचीच कसोटी लागणार आहे.

* * * * *



## कृष्णभक्त उद्धव

नारदा, तुझ्या बोलण्यातून मला आणखीन एक गोष्ट जाणवली. कृष्ण शेवटी एकटाच राहिला की काय? कृष्णाने एवढी वर्षे सर्वांसाठी एवढे काही केले. पण काळाच्या ओघात सर्वजण त्याच्यापासून दूर गेले आणि त्याच्या सोबतीला आता कोणीच राहिले नाही, असे कसे झाले? या विचारांचाच मला जास्त त्रास होत आहे. पण मला एका गोष्टीचे राहून राहून नवल व थोडेसे वाईटही वाटत आहे, की खुद्द द्वारकेमध्ये कृष्णाला असा कोणीच जीवाभावाचा भेटला नाही का? ज्या कोणाशी कृष्णाने त्याचे मन मोकळे करावे, अशी प्रेमाची एकही व्यक्ती सर्व द्वारकेत नव्हतीच का? कृष्णाला असे एकटेपणे राहण्याची वेळ यावी हे मला तरी योग्य वाटत नाही. कोणीतरी त्याच्या जोडीला व साथीला असते तर कृष्णालाही किती बरे वाटले असते ना? कारण कृष्णाच्या स्वभावानुसार त्याला एकलेपण मानवणे शक्य नाही, असे मला तरी वाटते."

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने क्षणभरच विचार केला आणि तो म्हणाला,

"लक्ष्मी, तुझा अंदाज अगदी बरोबर आहे. अवतारकार्य संपत आल्याची जाणीव कृष्णाठायी अचानकपणे निर्माण झालेली होती आणि अवतार समाप्तीचे वेधही कृष्णाच्या अंतरात लागायला सुरुवात झाली होती. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे की कृष्णाचे चरित्र संपले, तरी त्यातून व त्यामुळेच आपल्या अंतःकरणात निर्माण झालेले कृष्णप्रेम मात्र कधीच संपणार नाही. ते तसे संपूच शकणार नाही. कारण त्या कृष्णप्रेमाची मुळे अंतःकरणात अगदी खोलवर जाऊन रूतलेली व रूजलेली आहेत आणि कृष्णप्रेमाचा कल्पवृक्ष विस्तार पावून चांगलाच डवरलेला आहे. त्या वृक्षाला कृष्णप्रेमाची सदा ताजी असलेली पालवी फुटलेली आहे. चंदनापेक्षाही सुगंधित असलेल्या कृष्णप्रीतीच्या सुंदर व नाजूक फुलांनी तो वृक्ष बहरलेला आहे आणि अमृताहुनी गोड अशा प्रेमाच्या रसाने परिप्लुत असलेल्या आनंदाच्या फळांनी तो वृक्ष परिपूर्ण

अवस्थेला आलेला आहे. कृष्णप्रेमाने अंतःकरणच कृष्णमय झालेले असल्यामुळे, सर्वांगाने नेहमी कृष्णप्रेमाचाच अनुभव येणार हे निश्चित आहे. अर्थात् कृष्णाचे प्रेम बाह्य रूपगुणांनी नाही, म्हणून कृष्णाचा विरह तर मनाला निश्चितच जाणवेल. परंतु जेव्हा ते मन अंतर्मुख होईल तेव्हा त्याच्या लक्षात येईल, की अंतःकरणामध्ये कृष्णाचा कायमचा संयोगच होऊन राहिलेला आहे. मग त्या मनाला कृष्णाचा वियोग कधीच जाणवणार नाही. त्यानंतर कृष्णप्रेमाने भरलेले मन जेव्हा पुन्हा बहिर्मुख होईल, तेव्हा त्या मनाला बाहेरही कृष्णप्रेमाशिवाय दुसरे काही दिसणारच नाही. एकीएक कृष्णप्रेमाचाच अनुभव येईल. कृष्णप्रेमाचा अनुभव म्हणजेच कृष्णाच्या भेटीचा अनुभव होय आणि कृष्णाची भेट म्हणजे तर आनंदाची नित्य पर्वणीच होय.

लक्ष्मी, तुझा दुसरा प्रश्न हा कृष्णाच्या एकटेपणाचा आहे. पण तसे पहायला गेले, तर कृष्णाला पहिल्यापासूनच म्हणजे अगदी लहानपणापासूनच एकलेपण अत्यंत प्रिय होते. एकांतात बसणे, एकांतात विचार करणे, एकांतात मुरलीवादन करून स्वतःचे स्वतःलाच रिझवणे कृष्णाला अत्यंत प्रिय होते. एवढेच काय, त्याच्या प्रेमीजनांना एकांतात भेटणेच कृष्णाला अत्यंत आवश्यक वाटत असे. त्यांच्या एकांतातील भेटीच कृष्णाला अधिक आनंददायी असत. या एकांतातील भेटीमुळेच अनेकांच्या मनात कृष्णप्रेमाचा प्रवेश झाला आणि त्या प्रेमाने काहीजणांच्या हृदयात ठावही घेतला. खरे सांगायचे तर एकलेपणा हे कृष्णाचे जसे मूळस्थान होते, तसेच ते त्याचे बलस्थानही होते. या एकांतातच कृष्ण जसे त्याच्या प्रेमीजनांचे प्रेम अनुभवीत असे, तसेच स्वतःच्या स्वतःवरील आत्मप्रेमाचा अनुभवही कृष्ण याच एकांतात घेत असे. तेव्हा म्हटले तर कृष्ण हा कधीच एकला नव्हता किंवा म्हटले तर कृष्ण हा नेहमीच एकला होता.

लक्ष्मी, पण अजूनही कृष्णचरित्रातील एक अत्यंत महत्त्वाचा पैलू प्रगट व्हावयाचाच आहे. त्याशिवाय कृष्णचरित्राची पूर्ती होऊच शकणार नाही आणि ती कृष्णचरित्राची केवळ पूर्तीच नव्हती, तर तो कृष्णचरित्ररूपी रमणीय मंदिरावरील अत्यंत सुशोभित असा कळसच होता. तुला या गोष्टीचे नवल व थोडेसे वाईटही वाटले होते, की कृष्णाला खुद्द द्वारकेत एकही जिवलग मित्र कसा भेटला नाही म्हणून. पण खरी



वस्तुस्थिती अशी आहे की कृष्णाला असा एक जिवलग भेटला होता आणि त्याचे नाव होते उद्धव. यादवकुळातच जन्माला आलेल्या उद्धवाची कृष्णाशी तेव्हाच ओळख झाली जेव्हा कृष्ण गोकुळ सोडून मथुरेत आला. त्या वेळी ओळख झाली असे म्हणणेही चुकीचेच ठरेल. कृष्णापेक्षा वयाने लहान असलेल्या उद्धवाने कृष्णाला प्रथम केवळ दुरूनच पाहिले आणि तेव्हापासूनच उद्धव हा कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाने जो प्रभावित झाला तो अगदी कायमचाच! कृष्णाने केलेला कंसवधाचा पराक्रम पाहून तर उद्धव कृष्णाचा चाहताच होऊन राहिला. पण उद्धवाला कृष्णाच्या जवळ येण्याची खरी संधी मिळाली, ती मात्र सांदिपनी ऋषींच्या आश्रमात राहून परत आल्यानंतरच. कृष्णाने जेव्हा प्रत्यक्ष राज्यकारभारात सहभाग घेण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला प्रथम सहकारी भेटला तो उद्धवच. कामाच्या निमित्ताने एकत्र येता येता व एकत्र वावरताना कृष्ण व उद्धव यांची मनेही जवळ येऊन जुळू लागली आणि त्यांच्यातील जवळीकता वाढू लागली. केवळ राज्यकारभारापुरताच नव्हे, तर कृष्णाच्या व्यक्तिगत जीवनातही उद्धव हा कृष्णाचा अत्यंत विश्वासाचा व अत्यंत जवळचा असा मित्रच होऊन राहिला.

लक्ष्मी, कृष्ण पहिल्यापासूनच त्याचे मन उद्धवाकडे मोकळे करीत असे. त्यामुळे उद्धवाच्या ठिकाणीही मोकळेपणा येत राहिला. उद्धवाच्या जीवनात अशी कोणतीही गोष्ट नव्हती, की जी त्याने कृष्णाला सांगितली नव्हती. मग ती गोष्ट उद्धवाची व्यक्तिगत असो किंवा त्याची कौटुंबिक असो. कृष्ण ज्या वेळेस काही कामानिमित्त मथुरा नगरीच्या बाहेर जात असे तेव्हा सर्व जबाबदारी, मग ती राज्यकारभारासंबंधी असो किंवा त्याची व्यक्तिगत असो, पूर्णपणे उद्धवावरतीच सोपवून जात असे. कृष्णाने उद्धवाला काही कामगिरी सांगितली आणि त्याने ती पुरी केली नाही असे कधीच झाले नाही. त्याचे कारणही एकच होते, की उद्धव हा कृष्णाने सांगितलेल्या कामामागील कृष्णाचा हेतू व कृष्णाची भावना जाणून मगच तशी कृती करीत असे. कृष्णाच्या भावनेशी पूर्णपणे समरस होऊनच केल्यामुळे उद्धवाची कामगिरी ही नेहमी सरसच होत असे आणि त्यामुळे कृष्णालाही प्रसन्नता लाभत असे. अशा तऱ्हेने कृष्ण व उद्धव यांच्यातील प्रेमलोभ सतत वाढतच राहिला.

लक्ष्मी, पण एकदा एक प्रसंग असा घडला की त्यामुळे उद्धवाला कृष्णाचे माहात्म्यही लक्षात आले. खरे तर, कृष्ण त्याच्या गोकुळातील पूर्व जीवनाविषयी कोणाशीही कधीच बोलत नसे आणि त्याला तशी आवश्यकताही कधी जाणवत नसे. पण याला अपवाद फक्त उद्धवाचा होता. त्याच्याशी मात्र बोलताना कधीकधी कृष्ण गोकुळाचा उल्लेख करीत असे. गोकुळात घडलेले काही विशेष भावपूर्ण प्रसंगही कृष्णाने बोलण्याच्या ओघात उद्धवाला सांगितले होते. पण एक गोष्ट उद्धवाच्या लक्षात आली, की जेव्हा जेव्हा कृष्ण गोपगोपींच्या किंवा पेंद्याच्या प्रेमाच्या अनुभवाविषयी बोलत असे तेव्हा तो एकदम भावूक होत असे. विशेषतः राधेच्या भावाविषयी कृष्णाकडून असे बोलणे होई की जणू काही राधा प्रत्यक्ष तेथे हजरच आहे. राधेविषयी बोलताना कृष्णाकडून केव्हाही 'राधा अशी होती' असा उल्लेख न होता 'राधा अशी आहे' असाच सहजोद्गार कृष्णाच्या मुखातून निघत असे. त्यावरून उद्धवाने लागलीच ओळखले होते, की राधेने कृष्णाच्या हृदयातच कायमचे स्थान घेतलेले आहे आणि राधा ही कृष्णाच्या अंतःकरणाचा एक अविभाज्य भाग होऊन राहिलेली आहे. अशा राधेविषयी उद्धवाच्या ठिकाणी कमालीची उत्सुकता निर्माण झालेली होती.

उद्धवाने एक दिवस धीर करून हा विषय कृष्णापाशी काढलाच. "अरे कृष्णा, एवढे दिवस तुला एक गोष्ट विचारीन विचारीन असे मी म्हणतो खरा, परंतु मला विचारायला थोडासा संकोचच वाटत असे. खरे तर, तू मला पूर्ण मोकळीक दिलेली आहेस आणि कोणताही आडपडदा न ठेवता तूही माझ्याशी अत्यंत मोकळेपणाने बोलत असतोस. म्हणूनच मी तुला ही गोष्ट विचारण्याचे स्वातंत्र्य घेत आहे. एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे की राधा ही तुझ्या अंतःकरणाच्या अगदी जवळची आहे. तुझ्या बरोबरच जणू तिचाही वावर तुझ्या एकांतात असतो असे मला बऱ्याच वेळा जाणवते. राधा ही तिच्या भावाने तुझ्याशी पूर्णपणे एकरूप होऊन राहिली असल्याचेच हे लक्षण आहे. पण एक विचार माझ्या मनात वारंवार येतो, की तुझे मथुरेला येणे झाल्यानंतर राधेची अवस्था काय झालेली असेल बरे? तिने जो तुझ्या प्रेमाचा सहवास अनुभवला त्या सहवासाला तर दुसरा पर्याय नाही आणि त्याच सहवासाला तर राधा



कायमची मुकली आहे. मग तिच्याठायी आता नक्कीच एक प्रकारची पोकळी निर्माण झालेली असणार, जी दुसऱ्या कशानेही भरून निघणे शक्यच नाही. तेव्हा तुझ्या विरहाने दुःखी झालेली राधा आता तिचे जीवन कसे बरे कंठीत असेल, हा प्रश्न माझ्याच मनाला जास्त सतावत आहे.

कृष्णा, मला एका गोष्टीचे राहून राहून नवल वाटते की राधेविषयीची जी काळजी माझ्या मनात आहे ती तुझ्या मनात आहे, असे एकंदरीत तुझ्या वागण्याबोलण्यावरून तरी दिसत नाही. अरे, तुझे व राधेचे एवढे अत्यंत प्रेमाचे व जवळीकतेचे संबंध होते, तर ती तुला विसरणे कसे शक्य आहे? मला अगदी खात्रीपूर्वक वाटते की तुलाही तिची आठवण नक्कीच येत असणार. मग अशावेळी तू काय करतोस? तिची भेट घेण्याचा तू काही प्रयत्न करीत आहेस असे मला तरी कधी दिसत नाही. बरे, तू स्वतः गोकुळाला जाऊन राधेची व इतर गोकुळवासीयांची भेट घेण्याचे तर नावही काढत नाहीस किंवा राधेलाही येथे बोलावून घेत नाहीस. राधाही येथे येऊन तुझी भेट घेण्याचा काही प्रयत्न करीत असेल असेही मला वाटत नाही. नाहीतरी तिचे जीवन हे परावलंबीच असणार. तिला येथे येणे शक्यच होत नसणार. पण तू तरी कमीत कमी तिची ख्यालीखुशाली जाणून घेशील की नाही! मला तरी तुझी ही प्रेमाची अनोखी परी कळत नाही. तूच मला समजावून सांग बरे!”

उद्धव कृष्णाशी अत्यंत मनमोकळेपणाने बोलत होता. त्याच्या बोलण्याच्या सुरावरून तर असेच जाणवत होते की राधा व कृष्ण यांची भेट होत नाही याचे दुःख उद्धवालाच जास्त होत आहे. ती जणू त्याचीच मनोव्यथा झाली होती. उद्धवाचे बोलणे ऐकत असताना कृष्णाने त्याचे नेत्र पूर्णपणे मिटून घेतले होते. उद्धवाचे बोलणे थांबल्यावरती कृष्णाने त्याचे नेत्र अलगद उघडले आणि त्याने उद्धवाकडे पाहून मंदस्मित केले. थोडा वेळ कृष्ण काहीच बोलला नाही. पण नंतर उद्धवाशी हळुवार स्वरात बोलू लागला.

“अरे उद्धवा, तू तर थेट माझ्या अंतःकरणातील अत्यंत नाजूक व हळुवार अशा भागालाच स्पर्श केलास. परंतु त्यामुळे माझ्याठायी

गोकुळातील व राधेच्या स्मृती जागृत झाल्या आहेत असे मात्र मुळीच नाही. कारण गोकुळ ही माझ्यासाठी स्मृती नसून ती माझ्यासाठी एक कायमची अनुभूतीच आहे. मी बाह्यांगाने गोकुळात नसलो तरी गोकुळ माझ्या अंतःकरणात आहे असेच मला नेहमी जाणवत असते. कारण माझ्यासाठी गोकुळ म्हणजे निरागस प्रेमभाव, गोकुळ म्हणजे प्रेमातील अनन्य निष्ठा, गोकुळ म्हणजे प्रेमातून निर्माण होणारी सहनशक्ती, गोकुळ म्हणजे प्रेमासाठी घडणारा त्याग आणि गोकुळ म्हणजे पराकोटीची प्रीती होय. प्रेमाची ही अनेक अंगे माझ्या अंतःकरणात नित्य जागृत असतात आणि मला गोकुळाचा अनुभव नित्यच आणून देत असतात. आता राधा म्हणशील, तर माझ्यासाठी राधा म्हणजे प्रेमभावाची आर्तता, राधा म्हणजे भक्तिभावाची पूर्तता आणि राधा म्हणजे अनुभवाची ऐक्यता होय. अशी राधेशी एकरूपता तर मी माझ्या अंतःकरणात नित्यच अनुभवीत असतो. म्हणूनच राधा माझ्यापासून दूर आहे असे मला कधीच वाटत नाही, तर राधा तिच्या भावाने नित्य माझ्या संगेच आहे असेच मला सतत जाणवत असते.

उद्धवा, पण राधेच्या बाजूने मात्र मी आतापर्यंत कधी विचारच केला नव्हता. कारण तसा तिच्याविषयी वेगळेपणाने विचार करणे मला शक्यच नाही. आताचे तुझे बोलणे ऐकल्यावरती मात्र मला तुझ्या बोलण्यात थोडेसे तथ्य वाटू लागले आहे. पण खरंच, मला राधेची काळजी मात्र मुळीच वाटत नाही. पूर्वी तिच्या सुखदुःखात सहभागी होण्यासाठी मी प्रत्यक्ष होतो. तिला काही अडचणी आल्या तर मार्गदर्शन करण्यासाठी मी तिच्या जवळ होतो. राधा माझ्या भेटीसाठी जेव्हा प्रेमार्त होत असे त्या वेळेस पूर्तता करण्याची जबाबदारीही मीच घेत होतो. पण आता या सर्व गोष्टी करण्यासाठी राधा कोणावरती अवलंबून असेल, असा प्रश्न मात्र माझ्याठायी अजिबात नाही. परंतु मुख्य प्रश्न तुझाच आहे. तुला पडत असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळणार कशी? या प्रश्नांची सर्व उत्तरे तुला एकच व्यक्ती सांगू शकते आणि ती म्हणजे खुद्द स्वतः राधाच! बरे, तिला खरेच काही अडचण असेल तर ती कळवणार तरी कसे? दुसऱ्या



कोणाबरोबर निरोप पाठवणेही त्या बिचारीला शक्य होणार नाही. मग यावरती उपाय काय?

उद्धवा, तू बघतोच आहेस की मी या राज्यकारभारात एवढा व्यस्त आहे, की मला सवड मिळणे वा काढता येणे शक्यच नाही. राधाही ज्याअर्थी एवढे दिवस झाले तरी मला येऊन भेटली नाही त्या अर्थी तिच्याही काहीतरी अडचणी असणारच. कारण नाही म्हटले तरी राधेचे जीवन पूर्णपणे परावलंबी आहे ही गोष्ट विसरता येत नाही. नाहीतर ती नक्की आल्याशिवाय राहिली नसती. तेव्हा तू असेच का करेनास. तू स्वतःच गोकुळामध्ये जा आणि प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे हे स्वतः तुझ्या डोळयांनीच पहा. माझी अडचण काय आहे हे राधेला समजावून सांग आणि तिची काही अडचण असेल तर ती तू समजावून घे. त्यावरती तुला जमेल तसे तिला मार्गदर्शनही कर आणि मुख्य म्हणजे माझ्या विरहाने राधा दुःखी असल्यास तिचे सांत्वनही कर. तिला चार गोष्टी समजावून सांग आणि तिला जरासा दिलासा दे.”

नारदाचे बोलणे मध्येच थांबवीत लक्ष्मी म्हणाली,

“अरे नारदा, कृष्णाच्या या अशा बोलण्याचे मला तरी नवलच वाटत आहे. कृष्ण उद्धवाची गंमत तर करीत नव्हता ना? कारण कृष्णाच्याठायी तर राधेविषयी पूर्ण खात्रीच असणार. मग कृष्णाच्या बोलण्यातून असा राधेविषयी अविश्वासाचा सूर कसा व का लागावा बरे? मला तरी याचा काही अर्थबोध होत नाही. कारण कृष्ण व राधा यांच्यामध्ये जी एकरूपता होती त्याचा अनुभव त्या उभयतांचाही असणार. होय ना? मग जर कृष्ण त्याच्या अंतःकरणात राधेशी असलेले ऐक्य अनुभवीत होता, तर तसेच राधेचे कृष्णाशी असलेले ऐक्य राधाही अनुभवीत असणारच, अशी खात्री कृष्णाच्याठायी सुद्धा असावयास हवी, म्हणजे तशी ती असणारच ना? असे असतानाही कृष्ण उद्धवाशी राधेविषयी अशी वेगळीच शंकेची भाषा का बरे बोलत होता? कृष्णाचे बोलणे खरेच होते की केवळ गमतीचे होते? मला जरा नीटपणे समजावून सांग बरे.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारद किंचित हसला व म्हणाला,

“लक्ष्मी, कृष्णाचे बोलणे जरी सकृतदर्शनी गमतीचे वाटत होते तरी ते खरेही होतेच. एकरूपता ही दोघांमधील असली तरी त्या एकरूपतेचा अनुभव मात्र ज्याचा त्याचाच असतो. कारण एकरूपता ही अंतःकरणाची असते पण त्याचा अनुभव घेणाऱ्या त्या दोघांचे अस्तित्व मात्र वेगवेगळेच असते. राधा व कृष्ण यांचेही तसेच असणार ना? आणि ते तसेच होतेही. मुख्य म्हणजे, त्या दोघांचे अस्तित्व वेगळे वेगळे आणि बाह्य जीवनही वेगवेगळे होते. दोघांची बाह्य परिस्थितीही वेगवेगळी होती. एकरूपतेच्या अनुभवामध्ये जो तो त्याच्याशी असलेले दुसऱ्याचे ऐक्य अनुभवीत असतो. त्यामुळेच राधा कृष्णाशी एकरूप आहे हा अनुभव कृष्णाचा होता, तर कृष्ण राधेशी एकरूप आहे हा अनुभव राधेचा होता. ‘कृष्णाच्या अंतःकरणातील आनंदाठायी स्फुरणारा भक्तिभाव म्हणजेच राधा’ हा कृष्णाचा अनुभव होता, तर ‘राधेच्या भक्तिभावपूर्ण अंतःकरणामध्ये अनुभवाला येणारा आनंद म्हणजेच कृष्ण’ ही निश्चिती राधेच्याठायी होती. खरे तर, आनंद व भक्तिभाव हे तर सूर्य व प्रकाश, फूल व सुगंध, जल व शीतलता किंवा साखर व गोडी यांच्याप्रमाणे एकरूपच आहेत. ते दोन्ही मिळूनच आनंदाचा एकीएक अनुभव आहे. पण जर बोलण्यासाठी किंवा सांगण्यासाठी आनंद व भक्ती असे द्वैत निर्माण केले, तर आनंद म्हणजे कृष्ण आहे आणि भक्ती म्हणजे राधा आहे. परंतु त्या द्वैतातील ऐक्याचे जर वर्णन करावयाचे झाले तर राधा व कृष्ण मिळून, म्हणजेच भक्ती व आनंद मिळून एक परमानंदच आहे.

लक्ष्मी, राधेचा भक्तिभाव हा कृष्णाचा अनुभव असल्यामुळे त्याच्या ठायी राधेच्या भक्तिभावाची खात्रीच होती. परंतु राधा एक व्यक्ती म्हणून काय अनुभव घेत आहे आणि तिच्या अंतःकरणाची अवस्था काय आहे, हे कृष्णाला माहित असण्याचे कारणच नव्हते. कारण कृष्णासाठी राधेचे व्यक्ती म्हणून असलेले वेगळे अस्तित्व उरलेलेच नव्हते. त्यामुळे राधेच्या अवस्थेविषयी कृष्णाच्या मनात काही प्रश्न निर्माण होणे हे असंभवनीयच होते. कारण कृष्णाठायी राधेविषयी काहीही विचारच नव्हते. परंतु



उद्धवाने जेव्हा राधेविषयी एक व्यक्ती म्हणून वेगळेपणाने कृष्णाला प्रश्न विचारला, तेव्हा मात्र कृष्ण राधेविषयी एक व्यक्ती म्हणून वेगळेपणाने विचार करू लागला. पण कृष्णापाशी राधेविषयी एक व्यक्ती म्हणून काहीच माहिती नव्हती. तिच्या परिस्थितीचीही कृष्णाला काहीच कल्पना नव्हती आणि परिस्थितीची तर अनेक अंगे संभवतात. पण ज्या अर्थी हा प्रश्न उद्धवाला पडला होता, त्या अर्थी त्या सर्व गोष्टी उद्धवाने प्रत्यक्ष माहित करून घेणे आवश्यक होते आणि उद्धवाने तसे करावे, एवढेच खरे तर कृष्ण उद्धावाला सुचवीत होता. अर्थात कृष्णाचा मिश्किल स्वभाव हा त्याच्या बोलण्यामध्ये सहजपणे थोडासा मिसळला गेलाच. त्यामुळेच कृष्णाचे बोलणे हे थोडेसे गंमतीदार जाणवले हेही खरेच आहे. पण काय करणार? मिश्किलता हा कृष्णाचा स्वभाव बाजूला कसा करता येणार? ते त्यालाही शक्य नाही. मग ते दुसऱ्या कोणालाही कसे काय शक्य होणार? आणि मला वाटते त्याची आवश्यकताही नाही. कृष्ण त्याच्या स्वभावासहच नेहमी प्रिय होऊन रहाणे, हाच तर कृष्णाविषयीचा भक्तिभाव आहे आणि त्यातच खरा आनंद आहे.

* * * * *

## उद्धवाचे गोकुळगमन

लक्ष्मी, कृष्णाचे बोलणे ऐकून उद्धवाचा मात्र निश्चितच असा समज झाला, की त्याच्यावर कृष्ण ही जणू एक कामगिरीच सोपवीत होता. कारण कृष्णाच्या व्यक्तिगत जीवनातील भावनिक व अत्यंत नाजूक असलेला असा तो विषय होता आणि त्यासाठीच कृष्ण जणू उद्धवाची मदत घेत होता, असा समज उद्धवाचा झाला. कृष्णाने दाखविलेल्या या विश्वासामुळे उद्धवाला साहजिकच आनंद झाला आणि कृष्णाचा विश्वास सार्थ करून दाखविण्याचा उद्धवाने निश्चय केला. त्याने ताबडतोब गोकुळाला जाण्यासाठी तयारी सुरु केली. प्रत्यक्ष निघताना उद्धवाने कृष्णाला एकच प्रश्न विचारला, "कृष्णा, तुझा काही गोकुळवासीयांसाठी किंवा विशेषतः राधेसाठी काही खास निरोप आहे का?" त्यावर कृष्णाने काहीही न बोलता फक्त मान हलवूनच 'काही नाही' एवढेच उत्तर दिले. कृष्णाच्या या प्रतिक्रियेने उद्धव थोडासा चकित झाला. त्याला काहीच अर्थबोध होईना. 'आपले गोकुळाला जाणे कृष्णाला आवडत आहे की नाही' यासंबंधी उद्धवाला काहीच कळेना. परंतु गोकुळाला जाण्यासाठी उद्धव स्वतः मनातून अत्यंत उत्सुक होता. त्यामुळे गोकुळाला जाण्याचा निर्णय त्याने कायम ठेवला आणि त्याप्रमाणे तो गोकुळाच्या दिशेने निघाला.

लक्ष्मी, प्रत्यक्ष प्रवास करीत असताना उद्धवाच्या मनामध्ये अनेक तऱ्हेचे विचार येत होते. 'कृष्णाच्या विरहाने गोकुळवासीयांच्या मनाची स्थिती कशी बरे असेल? कृष्णाचा विरह ते कसा सहन करीत असतील? विशेषतः राधेला तर कृष्णाशिवाय जीवन जगणे अत्यंत कठीण जात असणार. कारण त्यांची तर जवळ जवळ रोजची भेट होत होती. एकमेकांच्या सहवासाची तर त्यांना एवढी सवय झाली होती की मग आता राधेला कसे चैन पडत असेल? तिला बेचैनी ही निश्चितच असणार. 'मी कृष्णाकडून आलो आहे' हे राधेला सांगितल्यावर तर कृष्णाच्या आठवणीने तिला निश्चितच रडू कोसळेल. कृष्णाने तर माझ्यावर तिचे



सांत्वन करण्याची जबाबदारी सोपवलेली आहे. मग तिची समजूत कशी घालू? मला राधेला अनेक गोष्टी समजावून सांगाव्या लागतील आणि तिच्या मनाला शांत करावे लागेल. हे सर्व मला जमेल ना? नाहीतर राधेचे अश्रू पाहून माझ्या डोळयातूनही अश्रूंच्या धारा वहायला लागतील. पण तसे होऊन चालणार नाही. मी असे भावनाविवश होता कामा नये. माझ्या भावना मला प्रयत्नपूर्वक आवरूनच धरल्या पाहिजेत.' अशा तऱ्हेने मनातल्या मनात स्वतःच स्वतःला समजावीत व बजावीत उद्धव गोकुळात येऊन पोहोचला.

लक्ष्मी, गोकुळात प्रवेश करताक्षणीच उद्धवाचे मन भारावले. त्याला अत्यंत प्रिय असलेल्या कृष्णाचे बालपण जेथे गेले, ज्या ठिकाणी कृष्ण खेळला, बागडला, ज्या ठिकाणी कृष्णाच्या अनेक लीला प्रगट झाल्या, त्या परिसरात येताक्षणीच उद्धवाचे मन कृष्णाच्या प्रेमाने व स्मरणाने भरून आले. उद्धवाने गोकुळातील माती अत्यंत पवित्र समजून स्वतःच्या कपाळाला लावली आणि त्याला धन्य झाल्यासारखे वाटले. गोकुळच्या हवेत जणू कृष्णप्रेमाचा सुगंध भरून राहिलेला आहे आणि त्याचेच सुखद वारे मनाला आनंदित करीत आहेत, असेच उद्धवाला जाणवू लागले. सर्वकडे पहात पहात उद्धव सावकाशपणे चालत होता आणि त्याच्या लक्षात आले की सर्वच गोकुळवासी अत्यंत शांतपणे व उत्साहाने वावरत आहेत. जो तो त्याच्या कामामध्ये व्यग्र होता खरा, परंतु कोणाच्याही मुखावर कोणताही व कसल्याही प्रकारचा ताण तर दिसत नव्हताच, उलट सर्वांच्या मुखावर एक प्रकारची प्रसन्नता होती. सर्वांचे जीवन अत्यंत मोकळेपणाने व आनंदाने सुरळीत चालू होते. मनातल्या मनात आश्चर्य करीत उद्धव नंदाच्या वाड्यापर्यंत येऊन पोहोचला. मथुरेहून आणि तेही कृष्णाकडून कोणीतरी आलेले आहे हे कळताच, नंद धावतच वाड्याच्या द्वारापाशी आला आणि त्याने उद्धवाला प्रेमाने मिठीच मारली. नंदाच्या मागोमाग यशोदाही लगबगीने बाहेर आली आणि उद्धवाला पाहूनच तिच्या नेत्रातून अश्रूधारा वाहू लागल्या. उद्धवाने पुढे होऊन वाकून नंद व यशोदा या उभयतांनाही नम्रभावे नमस्कार केला. नंदाने स्वतः उद्धवाचा हात धरून त्याला राजवाड्यात नेले.

लक्ष्मी, उद्धवाला पाहून नंद व यशोदा यांना साहजिकच कृष्णाची आठवण प्रकर्षाने झाली आणि जणू त्यांचे कृष्णावरचेच प्रेम उद्धवावरती प्रगट होऊ लागले. नंदाने उद्धवाला स्वतःच्या अगदी जवळ बसवून घेतले आणि यशोदेने सर्वात प्रथम गरम दूध उद्धवाला देऊन त्याचा प्रवासाचा थकवा दूर केला. त्यानंतर तिने उद्धवाला अनेकविध पदार्थ तर दिलेच, पण सर्वात आधी गोकुळचा खास म्हणून प्रसिद्ध असलेला खरवस उद्धवाला दिला. नंद व यशोदा यांच्या या प्रेमवात्सल्याने उद्धवही भारावलाच. मनातल्या मनात तो जाणून होता, की मुळात हे सर्व प्रेम नंद व यशोदा यांचे कृष्णावरचे आहे. परंतु नंद व यशोदा यांना आनंद वाटत आहे याचा उद्धवाला आनंद झाला. थोड्या वेळाने नंदाने उद्धवाशी बोलावयास सुरूवात केली.

“अरे उद्धवा, आमचा कृष्ण कसा आहे बरे? त्याचे तेथील जीवन व्यवस्थित चालू आहे ना? त्याला आमची आठवण तरी येते का रे? का तो आम्हाला विसरला? पण तसे होणे शक्यच नाही. कृष्ण आम्हाला कधीच विसरणार नाही, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. परंतु मथुरेला गेल्यापासून आम्हाला त्याची काहीच ख्यालीखुशाली कळलेली नाही. गोकुळातून मथुरेला जाताना तर तो आम्हाला अगदी खात्रीपूर्वक सांगून गेला होता, की मथुरेला जाऊन कंसाचा वध केल्यानंतर तो लागलीच गोकुळाला परत येईल. कंसवधाची बातमी व मुख्य म्हणजे वसुदेव देवकी यांच्या सुटकेची बातमी आम्हाला कळली आणि आम्हाला अतिशय आनंद झाला. तेव्हापासून आम्ही कृष्णाची अत्यंत आतुरतेने वाट पहात आहोत. परंतु ना कृष्ण येथे आला, ना त्याचा काही निरोप येथे आला. पण तू आलास आणि आमच्या मनाची खात्री झाली की कृष्ण आम्हाला विसरलेला नाही. आमच्या मनाला केवढा तरी दिलासा मिळाला. तू आमच्यासाठी कृष्णाचा निरोप घेऊनच आला आहेस हे नक्की! तो निरोप आम्हाला त्वरित सांग बरे. आम्हाला भेटायला कृष्ण केव्हा येणार आहे? अरे, त्याच्याशिवाय आमचे सर्व जीवनच नीरसच झालेले आहे.”




बोलता बोलता नंदाला भरून आले आणि त्याचेच काय पण उद्धवाचे नेत्रही पाणावले. काय बोलावे हे उद्धवालाही सुचेचना. कारण खरे तर, कृष्णाने नंद व यशोदा यांचा विषय उद्धवाकडे मुद्दामहून असा कधी काढलाच नव्हता. बोलण्याच्या काही संदर्भात जेवढा त्यांचा उल्लेख कृष्णाकडून कधीतरी होत असे, तेवढाच. परंतु उद्धवाकडे नंद व यशोदा यांच्याविषयी खास असे बोलणे कृष्णाने कधी केलेच नव्हते. परंतु ही गोष्ट जर उद्धवाने नंद व यशोदेला सांगितली असती, तर त्यांना कितीतरी वाईट वाटले असते, याचा विचार उद्धवाने केला आणि म्हणून तो तसे काहीच बोलला नाही. परंतु असे स्वस्थ बसूनही भागणार नव्हते. कारण नंद व यशोदा यांचे समाधान करणे तर आवश्यकच होते. उद्धवानेही मग त्याच हेतूने बोलावयास सुरुवात केली.

“अहो नंदमहाराज, अहो यशोदामाई, कृष्ण तुम्हाला विसरणे कधीतरी शक्य आहे का? लहानपणी तुम्ही त्याला एवढे लाडाने व कौतुकाने वाढवलेत, त्याची जाणीव कृष्णाच्याठायी सदैव आहे आणि ती त्याच्या बोलण्यातून वारंवार व्यक्तही होत असते. तुमची भेट घेण्याची इच्छा तर कृष्णाठायी अतिशय आहे, परंतु त्याला वेळ मिळणे खरोखरीच शक्य होत नाही, ही गोष्ट खरीच आहे. कंसवधानंतर अनेक दिवस गडबडीचेच गेले आणि त्यानंतर कृष्ण तर सांदिपनींच्या आश्रमात अध्ययनासाठी राहिला होता. तेथून मथुरेला परत आल्यानंतर कृष्ण राज्यकारभारात वसुदेव महाराजांना प्रत्यक्ष मदत करू लागला. त्यामुळे तर कृष्णाची व्यवधाने व कामाचा व्याप एवढा वाढला आहे, की त्याला सवडच मिळेनाशी झाली आहे. पण म्हणूनच, त्याने मला मुद्दाम तुमची भेट घेऊन खुशाली जाणून घेण्यासाठी स्वतःहून येथे पाठवले आहे. त्याच्याठायी तुमचे व्यवधान असल्याचेच हे लक्षण आहे. पण पुढे वेळात वेळ काढून कृष्ण येथे येऊन तुमची भेट नक्की घेणार आहे. तसाच निरोप कृष्णाने माझ्याकरवी तुम्हाला पाठवला आहे आणि त्यासाठीच तर मी येथे आलो आहे.”

उद्धवाचे बोलणे ऐकून नंद व यशोदा या उभयतांच्या मुखावरती समाधान दिसू लागले आणि ते पाहून उद्धवालाही बरे वाटले. खरे तर,

उद्धव काही पूर्णपणे खरे बोलत नव्हता. परंतु त्याचाही नाइलाजच झाला होता. उद्धवाने मनातल्या मनात कृष्णाची क्षमा मागितली. परंतु केवळ नंद व यशोदा यांना बरे वाटावे एवढ्याचसाठी, आपण हे बोलणे केलेले आहे ही गोष्ट कृष्णही ओळखेलच, याची खात्री उद्धवाला होती. उलट समयसूचकता दाखवून बोलणे केल्याबद्दल आणि नंद व यशोदा यांच्या भावना राखल्याबद्दल कृष्णाला कौतुकच वाटेल, असा विश्वासही उद्धवाठायी होता. परंतु उद्धव मुख्यतः ज्या कारणासाठी गोकुळात आला होता त्याची पूर्ती त्याला करावयाची होती. त्याला गोकुळच्या परिसरात फिरायचे होते. यमुना नदीचा तट, वृंदावन आणि कुंजवनही त्याला स्वतःच्या नेत्रांनी पहायचे होते. उद्धवाने तशी इच्छा व्यक्त केल्यावरती नंदाने ताबडतोब खुद्द पेंद्यालाच वाड्यावर बोलावून घेतले. पेंद्याला पहाताच उद्धवाला अत्यंत हर्ष झाला. उद्धव हा मथुरेहून कृष्णाकडून आलेला आहे हे कळताच पेंद्याने धावतच पुढे येऊन उद्धवाचे स्वागत केले. उद्धवाने तर पेंद्याला मिठीच मारली. नंदाच्या सांगण्यावरून उद्धव पेंद्याबरोबर गोकुळचा परिसर पहाण्यासाठी म्हणून बाहेर पडला. उद्धवाने पेंद्याचा हात प्रेमाने हातात धरला होता आणि फिरता फिरता उद्धव जेव्हा यमुनाकाठी आला तेव्हा तो पेंद्याशी बोलू लागला.

"अरे पेंद्या, मला माहित आहे की तू कृष्णाचा अत्यंत जवळचा असा बालमित्र आहेस आणि कृष्णाच्या अत्यंत प्रेमाचाही आहेस. कृष्णाचे बालपण आणि त्याचे गोकुळातील वास्तव्य ही अत्यंत विशेष गोष्ट होती, हे मी जाणून आहे. ज्या गोकुळात कृष्णाने तुमच्यासंगे खेळून व बागडून तुमचे प्रेम अनुभवले, त्या गोकुळात मलाही काहीतरी विशेषच जाणवत आहे. खरेच, तुम्ही गोकुळवासी अत्यंत भाग्यवान आहात असेच म्हणावे लागेल. कारण तुम्हाला कृष्णाचे अत्यंत शुद्ध व पवित्र असे प्रेम अनुभवण्याची केवढीतरी संधी मिळाली. परंतु मला एका गोष्टीचे राहून राहून नवलच वाटत आहे की कृष्णाचा एवढ्या काळाचा प्रेमसहवास तुला मिळाल्यानंतर, आता खरे तर तू त्या सहवासाला व प्रेमाला मुकला आहेस. पण तरीही तुझ्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे दुःख वा निराशा मला आढळत नाही आणि याच गोष्टीचे मला कुतूहलही वाटत आहे. ते जाणून घेण्याची मला फारच आतुरता लागून राहिलेली आहे."



उद्धवाचे बोलणे ऐकून पेंद्या उद्धवासह आधी तेथेच यमुनाकाठी बसला आणि बराच वेळ काहीच बोलला नाही. नंतर त्याने मान वर करून उद्धवाकडे अश्रूपूर्ण नजरेने पाहिले आणि तो सावकाशपणे बोलू लागला.

“अहो उद्धवजी, जे भाग्य आमचे आहे तेच भाग्य तुमचेही आहे. कारण कृष्णाचा प्रेमळ सहवास आता तुम्हालाही लाभला आहे. कृष्णाच्या सहवासात त्याचे प्रेम आपल्याला अगदी सहजपणे मिळत असते. त्यासाठी आपल्याला म्हणून काही वेगळे प्रयत्न करावेच लागत नाहीत. अर्थात कृष्णाचे प्रेम कळायला थोडासा वेळ लागतो आणि ते प्रेम कळेपर्यंत मात्र आपल्या मनाला थोडासा त्रास होतोच. कारण कृष्णाचे प्रेम हे केवळ खाण्यापिण्यापुरते किंवा नाचगाण्यापुरते किंवा लाडकौतुकापुरते मर्यादित नसते, तर कृष्णाचा प्रयत्न आपले व्यक्तिमत्त्व घडवण्याकडे असतो असा माझा अगदी स्पष्ट अनुभव आहे. त्यासाठीच कृष्ण आपल्यातील गुण हेरून आपल्याला जवळ करतो आणि त्याच्या प्रेमाने आपले गुण बलवान करतो. एकदा का आपले गुण बलवान झाले आणि आपली कृष्णावरील श्रद्धा वाढली की मग कृष्ण आपल्यातील दोष घालवण्याचा प्रयत्न करू लागतो. त्यावेळी अर्थातच आपल्या मनाला थोडेफार क्लेश होतात. परंतु आपलेही मन कृष्णावरती प्रेमाने जडलेले असल्यामुळे आपल्याला कृष्णप्रेम सोडवत नाही आणि मग कृष्णप्रेमासाठी आपल्यातील दोषांना आपल्याला सोडावेच लागते. त्यामुळे मनाची दुर्बलता पूर्ण नाहीशी होते आणि मन कृष्णप्रेमाने पूर्णपणे सबळ होते. ही सर्व कृष्णप्रेमाचीच किमया आहे. कृष्णप्रेमाने युक्त असलेले मन मग सर्व प्राप्त जीवन, अत्यंत सहजतेने व आनंदाने जगू शकते हा माझा अनुभव आहे.

उद्धवजी, खरे तर आपण कृष्णावरती प्रेम केले असे म्हणायला काहीच वाव नसतो. कारण कृष्णच आपल्यावरती खरे प्रेम करीत असतो आणि त्याच्या प्रेमाला आपल्याकडून थोडा जरी प्रतिसाद दिला गेला तरी आपलेच त्याच्यावरती फार प्रेम आहे, असा तोच अनुभव घेतो आणि तसेच तो म्हणतोही. म्हणूनच कृष्णाचेच प्रेम खरे आहे. पण या कृष्णाच्या आपल्यावरील प्रेमातून आपल्याठायीही कृष्णाविषयी प्रेम निर्माण होत असते ही गोष्टही खरीच आहे. फक्त ते आपल्याला कळायला वेळ लागतो.

त्यासाठी एखादे वेळेस काहीतरी बाह्य कारण घडावे लागते आणि कृष्णाचा विरह हे एक सर्वात मोठे कारण आहे.

उद्धवजी, तुम्हाला मी खरेच सांगतो की कृष्ण गोकुळ सोडून मथुरेला निघून गेल्यानंतर, मी तर पूर्णपणे हादरलोच होतो. कृष्णाच्या सहवासाची एवढी सवय झालेली होती आणि कृष्णाची भेट घेण्याशिवाय दुसरे कोणतेही व्यवधान माझ्याठायी नसे. दररोज कृष्णाला भेटायचे, त्याचे मन ओळखून त्याच्याबरोबर वावरायचे, कृष्णाच्या प्रेमाने हसायचे व कृष्णाच्या प्रेमासाठी रडायचे, एवढेच मला माहित होते आणि तेच मी करीत असे. कृष्णाकडूनच नेहमी प्रेमाची व सुखाची अपेक्षा करीत रहायचे. ते मिळाले की सुखायचे आणि ते नाही मिळाले की दुःखी होऊन कृष्णावरती रूसायचे, एवढेच मला जमत असे. कृष्णही माझ्यासारख्या वेड्याची समजूत काढण्याचा खटाटोप करीत असे आणि मला खुशवीत असे. माझ्यासाठी तरी कृष्ण हा माझा देवच होता आणि कृष्णापरते मी दुसरे काहीही जाणतच नव्हतो. माझ्या दैनंदिन जीवनाची सुरुवात कृष्णापासून होऊन ती कृष्णापर्यंत जाऊन थांबत असे. अशा कृष्णाच्या विरहाने तर मी पूर्णपणे होरपळूनच गेलो होतो. जीवनात तर मला पूर्ण पोकळीच भासत होती आणि माझे जीवन मला अर्थशून्यच वाटत होते.

उद्धवजी, पण माझ्या अशा मनःस्थितीतून मला सावरले, ते फक्त राधेनेच! खरे तर, कृष्णविरहाचा जो प्रसंग माझ्यावर गुदरला होता तोच राधेवरही आलेला होता आणि मला राधेचीही अत्यंत काळजीच वाटत होती. कारण राधेचे कृष्णाशी एवढे प्रेमाचे व जवळीकतेचे संबंध होते, की राधा कृष्णाशिवाय रहाणे शक्यच नाही याची मला पूर्ण खात्री होती. परंतु प्रत्यक्षात तर मला वेगळेच चित्र दिसत होते. राधा अत्यंत निश्चल होती. तिच्याठायी कोणतीही चलबिचल नव्हतीच. एवढेच नव्हे, तर ती अत्यंत मोकळेपणाने तिचे जीवन जगत होती. कृष्ण मथुरेला गेल्यावरती जेव्हा मी प्रथम राधेला भेटलो, तेव्हा तर मला आश्चर्याचा धक्काच बसला. मला वाटले होते की राधाही माझ्याप्रमाणेच शोकाकुल झालेली असणार. पण राधेने अत्यंत शांतपणे माझ्याशी बोलून माझे सांत्वन केले. एवढेच नव्हे, तर राधेने माझ्यावरील कृष्णाच्या प्रेमाचे मला स्मरण करून दिले आणि माझ्याठायीचे कृष्णप्रेम जागे केले. त्या कृष्णप्रेमानेच माझे जीवन कसे

जगायचे, हे राधेनेच मला शिकवले आणि राधेच्या सहवासात तिच्या मार्गदर्शनाने मलाही हळूहळू माझे जीवन जगण्याचे बळ मिळत राहिले.

उद्धवजी, तुम्हाला एक खरी गोष्ट सांगतो की राधेच्या रूपाने मला तरी, कृष्णाचीच भेट झाल्यासारखे वाटते. राधेच्या बोलण्यातील आपलेपणा व कळवळा, राधेची एखादी गोष्ट अगदी शांतपणे समजावून सांगण्याची परी, राधेच्या डोळयात दिसणारा माझ्याविषयीचा विश्वास हे सर्व पाहिले, की राधेच्या व्यक्तिमत्त्वामधून कृष्णच प्रगट होत आहे याची मला पूर्ण खात्री पटते. पण याहीपेक्षा राधेचा महत्त्वाचा गुण म्हणजे तिची निगर्विता व तिच्याठायीची नम्रता. कृष्ण मथुरेला गेल्यानंतर राधेच्या पुढाकाराने आम्ही सर्वांनी मिळून कृष्णजयंतीचा आनंददायी सोहळा साजरा केला होता. त्यावेळेस कार्यक्रमाचा समारोप करतानाचे राधेचे रूप व तिचे बोलणे तर मी कधीच विसरू शकणार नाही. कृष्णप्रेमाने भरलेले राधेचे अंतःकरण भरभरून अगदी मोकळेपणाने वहात होते. कृष्णाचे प्रेम व कृष्णाची थोरवी राधेच्या नसानसातून भरून वहात होती आणि तिला तर सर्वत्र व सर्वच कृष्णमय दिसत होते. तेव्हा तर माझा ठाम निश्चयच झाला की राधेच्या अंतःकरणात, केवळ कृष्णाचीच मूर्ती आहे. मग मला तरी कृष्णाची भेट घेण्यासाठी दुसऱ्या कोठेही जाण्याची आवश्यकताच राहिली नाही. राधेच्या भेटीतच माझ्या कृष्णभेटीच्या भावाची पूर्तता होत असते."

बोलता बोलता जसे पेंद्याला गहिवरून आले तसेच उद्धवालाही भरून आले. त्याने पेंद्याचा एक हात आपल्या हातात धरला आणि दुसऱ्या हाताने पेंद्याच्या खांद्यावर थोपटले. पेंद्याने स्वतःला लगेचच सावरले आणि उद्धवाकडे पाहून मंदस्मित केले. मग उद्धवालाही राहवले नाही. तो पेंद्याला म्हणाला,

"पेंद्या, तू तर केवळ कौतुक करण्याच्याही पलिकडचाच आहेस. तुझी तर खरेच धन्यच आहे. कारण तू कृष्णप्रेम राधेच्या रूपाने अनुभवीत आहेस, ही साधी गोष्टच नाही. राधेचे प्रेम हे कृष्णप्रेमच आहे हे तू ओळखलेस, हे तुझ्याठायी कृष्णप्रेम असल्याचेच लक्षण आहे. कारण खरे प्रेमच खऱ्या प्रेमाला ओळखू शकते हेच खरे आहे. कृष्णाचे प्रेम तुला

मिळाले आणि कळाले, म्हणूनच राधेचे प्रेम हेच कृष्णप्रेम आहे हे तुला कळाले आणि तुला ते मिळाले. आता तू माझ्यासाठी एकच गोष्ट कर आणि ती म्हणजे माझी राधेशी भेट घडवून आण. कृष्णमय झालेल्या राधेची भट घेण्यासाठी मी केवळ उत्सुकच नसून, अत्यंत आतुरही झालेलो आहे. राधेची भेट घेतल्याशिवाय माझ्या गोकुळाला येण्याची सांगताच होऊ शकणार नाही. तेव्हा तू मला राधेकडे त्वरित घेऊन चल बघू.”

उद्धवाचे बोलणे ऐकून पेंद्याने किंचित मान डोलवली आणि तो म्हणाला, “उद्धवजी, तुमचे म्हणणे अगदी बरोबरच आहे. कारण राधेची भेट म्हणजेच कृष्णाच्या गोकुळाची भेट होय. कृष्णासाठी राधा म्हणजेच गोकुळ व गोकुळ म्हणजे राधाच, असेच जणूकाही झालेले होते. तेव्हा राधेच्या भेटीतच तुमची गोकुळची भेट पूर्ण होणार आहे. आता गोकुळातही पाहण्यासारख्या अनेक चांगल्या गोष्टी आहेतच. जसे की, हा यमुनाकाठचा परिसर आहे, वृंदावन आहे, कुंजवन आहे आणि गोवर्धन पर्वतही आहे. त्या त्या ठिकाणी गेले की कृष्णाच्या सहवासात तेथे अनुभवलेल्या कृष्णाच्या नानाविध लीलांचे निश्चितच स्मरण होते. अनेकजण त्या ठिकाणी जाऊन त्यांच्या ठिकाणच्या कृष्णस्मृती जाग्या झाल्याचा अनुभव घेतातही. सुरूवातीला मीही तेथे जाऊन कृष्णाच्या वियोगाने आर्त झालेले मन शांतवण्याचा प्रयत्न करीत असे आणि थोडा वेळ माझे मन शांतही होत असे, पण थोडा वेळच! कारण नंतर कृष्णाचा वियोग तीव्रतेने जाणवून मन अधिकच दुःखी होत असे. पण राधेच्या सहवासात मात्र कृष्णप्रेमाचा खऱ्या अर्थाने अनुभव येऊन मन खरेच शांत होत असे. आता हळूहळू माझे मलाच बरे वाटू लागले आहे. पण तरीही दिवसातून एकदा तरी राधेची भेट घेतल्याशिवाय मला चैनच पडत नाही, ही गोष्टही खरीच आहे. तेव्हा तुम्हालाही ‘राधेची भेट घेतल्याशिवाय गोकुळभेटीची पूर्ती होणार नाही’ असे जे वाटत आहे, ते अगदी बरोबर आहे. तुम्ही तिची भेट जरूर घ्याच, पण त्यासाठी तुमच्याबरोबर मात्र कोणीही येण्याची आवश्यकता नाही. तुम्ही तिची एकट्यानेच भेट घ्या. म्हणजेच तुम्हाला राधेची खरी भेट घेतल्याचा आनंद मिळेल.”



पेंद्याचे बोलणे ऐकून तर राधेची भेट घेण्याची उद्धवाची उत्कंठा अधिकच वाढली. लगेचच्या लगेच जाऊन राधेची भेट घ्यावी असे त्याच्या मनात आले, पण त्याने विवेकाने मनाला आवरले. कारण पेंद्याशी बोलत असताना वेळ कसा व कधी गेला हे त्या उभयतांनाही कळलेच नव्हते. परंतु सूर्य त्याच्या नियमितपणाच्या स्वभावानुसार अस्ताला गेल्यासारखा दिसत होता आणि आता संधिप्रकाशही सरून काळोख पसरू लागला होता. तेव्हा उद्धव नंदाच्या राजवाड्याकडे परतला. नंदराज त्याची वाटच पहात होता. नंद व यशोदा यांनी प्रेमाने केलेल्या अगत्याचा व आतिथ्याचा स्वीकार करून उद्धवाने त्यांच्यासमवेत भोजन केले. भोजनाच्या वेळी यशोदा आग्रहपूर्वक अनेक पदार्थ वाढीत होती आणि नंद उद्धवाशी अनेक गोष्टी बोलत होता खरा, परंतु उद्धवाचे कशाकडेच नीट लक्ष लागत नव्हते. शेवटी ‘प्रवासाने थकल्यामुळे विश्रांतीची आवश्यकता आहे’ असे सांगून उद्धव शयनकक्षात गेला आणि शयनमंचकावर शांतपणे पडून राहिला. राधेसंबंधीचे विचार त्याच्या मनात सतत नुसते घोळत नव्हते, तर खेळतच होते. निद्रेच्या अधीन होण्यासाठी त्याचे मन तयारच होत नव्हते. परंतु दमलेल्या शरीराने मनाशी सहकार करण्यास पूर्णपणे नकार दिला आणि मध्यरात्रीनंतर केव्हातरी उद्धवाचा डोळा लागलाच. परंतु पहाटेला झुंजूमुंजू होत असतानाच गाईंच्या हंबरण्याच्या आवाजाने आणि त्यांच्या गळयातील घंटांच्या मधुर नादाने जेव्हा उद्धवाला जाग आली, तेव्हा मात्र उद्धवाला अत्यंत ताजेतवाने वाटत होते. त्याचा शारीरिक थकवा तर पळून गेला होताच, परंतु त्याचे मनही अतिशय उल्हसित अवस्थेमध्ये होते. त्वरेने प्रातर्विधी उरकून उद्धव एकटाच राजवाड्याबाहेर पडला आणि राधेच्या भेटीसाठी निघाला. खरे तर, त्याला राधेच्या घराचा पत्ता असा माहित नव्हताच आणि तो कोणाला विचारून घ्यावा असेही त्याला वाटत नव्हते. पण जणूकाही एका आंतरिक प्रेरणेने व राधेचे घर माहित असल्याच्या आत्मविश्वासाने उद्धव चालत राहिला.

* * * * *

# उद्धव-राधा भेट

गोकुळातील बहुतेक पुरूष कामासाठी बाहेर पडत होते. मोठी व तरूण मुले गाईवासरांना चरायला नेण्यासाठी त्यांच्यासह चालू लागली होती. घरांच्या बाहेरील अंगणात सडासंमार्जन करून स्त्रिया रांगोळया काढण्यात मग्न होत्या. सकाळच्या त्या मंगल वातावरणात चालत असताना उद्धवाच्याठायीही कृष्णाचे मंगलदायी स्मरण होत होते. चालता चालता उद्धवाचे पाय अचानक एका घरासमोर थबकले. उद्धवाला त्याच्या मनात एक अनामिक हुरहुर जाणवू लागली. त्याचे लक्ष त्या घराबाहेरील रांगोळीकडे वेधले गेले. त्या रांगोळीच्या मध्यभागी सुंदर व रंगीत अक्षरात '**कृष्ण सखा**' असे शब्द लिहिले होते आणि त्या शब्दांच्या बरोबर खाली एक मुरलीचे सुरेख चित्र रेखाटलेले होते. उद्धवाला राधेच्या घराची खूण पटली आणि त्याने त्या घराच्या आवारात प्रवेश केला. उद्धव पुढे पाऊल टाकणार तेवढ्यात, मुरलीचे मंजुळ स्वर त्याच्या कानावर आले आणि उद्धव पुन्हा जागच्या जागीच खिळून उभा राहिला. मुरलीच्या त्या देहभान हरवणाऱ्या मधुर नादाने, उद्धव तर मंत्रमुग्धच झाला होता. थोड्या वेळाने तशाच भारावलेल्या अवस्थेत उद्धवाची पावले त्याच्याही नकळतच पुढे पडू लागली आणि उद्धव त्या घराच्या द्वारात जाऊन उभा राहिला. तेथूनच उद्धवाने घराच्या अंतर्भागात नजर टाकली असता अत्यंत भावपूर्ण दृश्य त्याच्या दृष्टीस आले.

एका सुंदरशा चंदनाच्या देव्हाऱ्यामध्ये कृष्णाची संगमरवरी उभी मूर्ती ठेवलेली होती. बालरूपातील त्या मूर्तीच्या मस्तकावर सोनेरी मुकूट होता आणि तिच्या हातातील मुरली अधरावर धरलेली होती. अर्धोन्मिलीत अवस्थेत नेत्र असलेल्या त्या कृष्णमूर्तीच्या मुखावर कमालीची प्रसन्नता होती. मूर्तीच्या दोन्ही बाजूंना दोन पितळी समया तेवत होत्या आणि त्यांच्या मंद प्रकाशाने मूर्तीचे मुख पूर्णपणे उजळलेले होते. मूर्तीच्या गळयात तुळशीची माळ होती आणि मस्तकावर व चरणांवर अनेक प्रकारची सुगंधित फुले वाहिलेली दिसत होती. समोरील तबकामध्ये दुधाची वाटी व लोणीसाखर ठेवलेले होते. देव्हाऱ्यात जळत असलेल्या धूप व उदबत्तीचा सुवास सर्व घरभर दरवळून राहिलेला होता. अशा त्या मंगलमय वातावरणामध्ये राधा मूर्तीसमोर नेत्र मिटून बसलेली



होती आणि तिने ओठांवर धरलेल्या मुरलीतून निघणाऱ्या आर्त स्वरातील भावपूर्णता सर्वत्र व्यापून राहिलेली होती.

देव्हाऱ्यातील कृष्णाच्या त्या मनोहारी मूर्तीकडे व तिच्या सन्मुख बसलेल्या राधेच्या पाठमोऱ्या आकृतीकडे अनिमिष नेत्रांनी पहात, उद्धव कितीतरी वेळ जागच्या जागीच उभा होता आणि त्या दृश्यातील भावपूर्णता स्वतःच्या मनामध्ये साठवून ठेवीत होता. असा किती वेळ गेला याचे उद्धवाला भानही नव्हते. परंतु थोड्या वेळाने राधेचे मुरलीवादन सहजपणे थांबले, तरीही मुरलीच्या स्वरांचे निनाद अजूनही त्याठिकाणी घुमतच होते. कृष्णाच्या मूर्तीसमोर वाकून राधेने तिचे मस्तक टेकले आणि दोन्ही हात जोडून नमस्कार करीतच ती उठून उभी राहिली. राधेने हातामध्ये आरतीचे तबक उचलून घेतले आणि ती मागे वळली. दारामध्ये उभ्या असलेल्या उद्धवाला पाहून राधा थोडीशी चकित झाली खरी, परंतु तरीही उद्धवाकडे पाहून राधा अत्यंत प्रसन्नतेने हसली. राधेने पुढे होऊन उद्धवासमोर आरतीचे तबक धरले. उद्धवाने अभावितपणे व भाविकपणे तबकातील निरांजनाच्या ज्योतीवर आधी आपले दोन्ही हात थोडा वेळ धरले. नंतर तेच हात नेत्रांना व कपाळाला लावून पुन्हा जोडले आणि नमस्कार केला. राधेने तबकातील वाटीमध्ये ठेवलेले लोणीसाखर थोडेसे उद्धवाच्या हातावर ठेवले. उद्धवाने त्याचे प्रसाद म्हणून सेवन केले असता राधा पुन्हा आतमध्ये वळली आणि तिने उद्धवाला आतमध्ये येऊन बसण्याची मानेनेच खूण केली. उद्धवही राधेने निर्देश केलेल्या आसनावर थोडासा संकोचूनच बसला. राधेने दिलेले जल उद्धवाने प्राशन केले. त्यानंतर राधेने दोन्ही हात जोडून उद्धवाला नमस्कार केला आणि ती प्रश्नार्थक नजरेने उद्धवाकडे पहात राहिली. उद्धवाने स्वतःला सावरले. त्यानेही दोन्ही हात जोडून राधेला नमस्कार केला आणि तो एकेक शब्द सावकाशपणे उच्चारीत राधेशी अदबीने बोलू लागला.

“राधाजी, मी कृष्णाचा अत्यंत जवळचा मित्र उद्धव असून, तुमची भेट घेण्यासाठी मथुरेहून मुद्दाम येथे गोकुळात आलेलो आहे. खरे तर, मी कृष्णाचा अत्यंत जवळचा मित्र आहे, असे मी म्हणत नाही. तर कृष्ण तसे मला म्हणत असतो आणि मला तसाच त्याच्याजवळ नेहमी पहातही

असतो. त्याच जवळीकतेने माझ्याशी बोलत व वागत असतो. अर्थात कृष्णाचे हे स्वभाववैशिष्ट्य मी तुम्हाला सांगण्याची मुळीच जरूरी नाही हे मला ठाऊक आहे. कारण कृष्णाला माझ्यापेक्षा तुम्हीच जास्त ओळखता. तुम्हीच त्याला अत्यंत जवळून पाहिलेले आहे आणि अनुभवलेलेही आहे. कृष्णाने मला दिलेल्या जवळीकतेमधून माझ्या एक गोष्ट लक्षात आली, की तुम्ही कृष्णाच्या अंतःकरणामध्ये अत्यंत खोलवर असे स्थान घेतलेले आहे. खरे तर, कृष्ण हा भूतकाळाच्या स्मृतीमध्ये रमणारा नाही हे माझ्यापेक्षा तुम्हीच जास्त जाणून आहात. पण तरीही कधीकधी कृष्ण त्याचे अंतःकरण माझ्याकडे अनाहूतपणे मोकळे करतो आणि तेव्हा त्याच्याकडून गोकुळातील काही प्रसंगांचा सहजपणे ओझरता उल्लेख होतोच. ते प्रसंग कृष्ण तपशीलवार जरी सांगत नसला, तरी बोलताना कृष्ण काहीवेळा अचानक भावपूर्ण होतो आणि पुढे बोलायचाही थांबतोच. त्या प्रसंगातील भावपूर्णता कृष्णाच्या अंतःकरणात अत्यंत खोलवर साठलेली आहे, ही गोष्ट अगदी निश्चित आहे. पण असे भावपूर्ण प्रसंग जास्त करून तुमच्या संबंधातीलच असतात आणि हा निव्वळ योगायोग नाही हे मी जाणून आहे.

राधाजी, कृष्ण गोकुळातील त्याच्या काही पराक्रमाच्या प्रसंगांचा उल्लेख करतो, तसाच काही गंमतीच्या प्रसंगांचाही उल्लेख करतो. परंतु जेव्हा तो तुमच्या बाबतीतल्या प्रसंगांविषयी बोलू लागतो, तेव्हा मात्र तो लागलीच अंतर्मुखही होतो आणि त्याचे बोलणेही थांबते. त्याच्या व तुमच्या नात्याच्या संबंधाचा काही अर्थबोध लावणे मला तरी शक्य होत नाही. मग मलाच एक प्रकारची बेचैनी जाणवू लागते. बरे, माझी बेचैनी घालवण्यासाठी कृष्णाची काही मदत होणे तर शक्यच नाही. कारण एक तर तो विषय कृष्ण आपणहून कधी काढत नाही आणि जर मी तसा प्रयत्न केला तर कृष्ण त्याला काहीही प्रतिसाद न देता, तो विषय वाढवतच नाही. मला वाटते, एक तर कृष्णाला तुमचा अत्यंत विरह जाणवत असून तो त्याला सहन होत नाही किंवा कृष्ण तुम्हाला त्याच्या अंतःकरणात एवढा जवळ पहात असावा, की तुमच्याविषयी तो वेगळे काही बोलूच शकत नाही.



राधाजी, कृष्णाची ही अवस्था पाहून मग माझ्या मनात तुमच्याविषयी विचार सुरू झाले. ज्या तुमच्यामुळे कृष्णाच्या अंतःकरणाची अशी अवस्था झालेली आहे त्या तुमची अवस्था काय असेल, या विचाराने तर मी अक्षरशः बेचैनच होऊ लागलो. तसा विषय मी कृष्णाकडे वारंवार काढू लागलो. तुम्हालाही कृष्णाच्या विरहाचे दुःख होत असेल, तर ते कृष्णाने जाणून घेणे अत्यंत आवश्यकच आहे. एवढेच नव्हे, तर त्यासाठी त्याने तुम्हाला मदत करणे हे त्याचे कर्तव्यकर्मच आहे, असे मी त्याला बजावून सांगू लागलो. परंतु त्याच्या स्वभावाप्रमाणे कृष्ण मला काहीच दाद देईना. जेव्हा मी फारच आग्रही झालो तेव्हा, कृष्णाने मला हा मार्ग सुचवला आणि प्रत्यक्ष तुमचीच भेट घेऊन तुमच्याकडून सर्व काही माहित करून घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कालच गोकुळात आलो आणि प्रथम नंद व यशोदामाई यांची भेट घेतली. साहजिकच त्यांना कृष्णाचा अत्यंत विरह जाणवत आहे आणि कृष्ण त्यांच्या भेटीला येईल किंवा कधी ना कधीतरी त्यांच्या लाडक्या कृष्णाची भेट होईल अशी वेडी आशा धरून ते आहेत. अर्थात कृष्णाची वृत्ती पहाता तशी शक्यता जवळ जवळ नाहीच. परंतु मी मुद्दामच नंद व यशोदा यांना तसे काही सांगून निराश केले नाही. मला त्यांच्याविषयी अत्यंत वाईट मात्र निश्चितच वाटत आहे. पण त्यावरती माझ्याकडे तरी काही इलाज नाही.

राधाजी, नंतर काल संध्याकाळी माझी पेंद्याशी भेट झाली आणि मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. कृष्णाच्या विरहाने पेंद्या पूर्णपणे खचला असेल याविषयी, मला तरी खात्रीच वाटत होती. परंतु पेंद्या माझ्याशी अत्यंत मोकळेपणाने वागला व बोलला. कृष्णाचे प्रेम त्याच्याठायी जागे असल्याचेच ते लक्षण आहे हे माझ्या लक्षात आले आणि पेंद्यानेही त्याच्या या अवस्थेचे गूज मला सांगितले. कृष्णाचे प्रेम त्याला तुमच्याकडून मिळते आणि कृष्णप्रेमाचा अनुभव तो तुमच्याच भेटीत घेतो, असे त्याने मला मोकळेपणाने सांगितले. एवढेच नव्हे, तर पेंद्या आता मनाने मुळीच दुर्बल राहिलेला नाही आणि त्याचे प्राप्त जीवन तो सुखासमाधानाने जगत आहे, हा त्याचा अनुभवही त्याने मला सांगितला. पेंद्याशी झालेल्या बोलण्याने तुमची भेट घेण्याची माझी आतुरता तर अधिकच वाढली.

खरे तर, रात्रभर त्याच विचाराने मी जागाच होतो. केव्हा एकदा तुम्हाला येऊन भेटतो असेच मला झाले होते. म्हणून भल्या सकाळीच तुमची भेट घेण्यासाठी तुमच्या घरी आलो. माझे येणे असे अवेळी झाल्याबद्दल मी तुमची क्षमाच मागतो. तुमचे घर मात्र, मला अजिबात शोधावे लागले नाही. तुमच्या घराबाहेर काढलेल्या रांगोळीमध्ये 'कृष्णसखा' असे शब्द माझ्या नजरेस आले आणि 'हे कृष्णाच्या राधेचेच घर आहे' याची मला खूण व खात्री लगेचच पटली. त्यानंतर दरवाज्याशी उभे राहून मी जेव्हा कृष्णाच्या पूजेत निमग्न असलेल्या तुम्हाला पाहिले, तेव्हा तर क्षणभर माझेही देहभान हरपलेच. वातावरणात भरून राहिलेली प्रसन्नता व मांगल्य आणि सर्व वातावरणालाच भारून टाकणारे ते मुरलीचे सूर, ही तर माझ्यासाठी एका अनाकलनीय आनंदाची अनुभूतीच होती. असाच आनंदाचा आगळा वेगळा अनुभव मला काही वेळा कृष्णाच्या सहवासातही येत असतो. यावरून तुम्हाला तर कृष्णाचा विरह अजिबात जाणवत नाही, याची मला खात्रीच पटली. त्यामुळे तुमच्याशी काय बोलावे हेच आता मला कळत नाही. माझ्या मनातील सर्व प्रश्न तर कधीच निरूत्तर झालेले आहेत. खरे तर, तुमचे सांत्वन करण्याच्या हेतूने व तशा तयारीनेही मी येथे आलेलो होतो. परंतु आता तुम्हालाच माझे सांत्वन करावे लागेल असे मला वाटते. कारण मी तर पुरता गोंधळूनच गेलेलो आहे. तेव्हा तुमची मला अगम्य असलेली ही अवस्था समजावून सांगाल का? खरेच तुमचे माझ्यावर अनंत उपकारच होतील."

उद्धवाचे बोलणे थांबताक्षणीच राधा लगबगीने आतमध्ये गेली आणि थोड्यावेळाने एका फुलपात्रातून गरम दूध घेऊन बाहेर आली. तिने तो दुधाचा पेला उद्धवाच्या हातात दिला. राधेने दिलेला दुधाचा पेला हातात तसाच धरून उद्धव अजूनही तिच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पहात होता. राधेने एक क्षणभरच तिचे नेत्र मिटून घेऊन एक दीर्घ श्वास घेतला आणि नंतर उद्धवाकडे पाहून मंदस्मित करीत राधा बोलू लागली.

"उद्धवजी, खरेच हा कृष्ण आपल्याला भेटला, हे आपले जन्मोजन्मीचे भाग्यच आहे आणि त्याने आपल्यासारख्यांना जवळ केले हे त्याचे



आपल्यावरील, कधीही न फेडता येण्यासारखे उपकारच आहे. त्यासाठी आपण त्याचे जन्मभर ऋणी होऊन रहाण्यातच आपली धन्यता आहे. खरे तर, कृष्ण व कृष्णप्रेम हा असा  बोलण्याचा विषय नाही, तर तो फक्त जाणण्याचा व अनुभवण्याचाच विषय आहे. कारण, कृष्ण व कृष्णप्रेम या दोन गोष्टी वेगळया नाहीतच. कृष्ण म्हणजे प्रेमच आणि प्रेम म्हणजे कृष्णच! कृष्णामुळे त्याचे प्रेम मिळते आणि कृष्णप्रेमामुळेच कृष्ण कळतो. कृष्ण म्हणजे त्याचे अंतःकरण आणि कृष्णाचे अंतःकरण म्हणजे त्याची प्रेमस्वरूप अवस्था होय. सर्वांवरती समभावाने व अकारण असलेल्या कृष्णप्रेमाची थोरवी कळायला, वेळ हा लागतोच. सुरूवातीला सुखावणारे व सांसारिक दुःखांना थोडा वेळ विसरायला लावणारे म्हणून कृष्णाचे प्रेम मनाला भावते हे जरी खरे असले, तरी कृष्णाच्या निःस्वार्थी व निरपेक्ष प्रेमाचा गुण नाही, तरी वाण मात्र आपल्या मनाला लागत रहातो, हेही तितकेच खरे आहे. कृष्णप्रेमाचे अनेक रंग त्याचे विशुद्ध व संवेदनशील अंतरंग दाखवीत रहातात. ते रंग मनालाही रंगवीत रहातात आणि आपल्या मनाला शुद्ध करीत त्याठिकाणी कृष्णप्रेमाला स्थिर करीत रहातात. मग कृष्णप्रेमाचे मूळ हळूहळू आपल्या मनात खोलवर जाऊन रुजू लागते आणि कृष्णप्रेमाचे गुणही आपल्या मनामध्ये निर्माण होऊ लागतात. कृष्णप्रेमातील खरे सुख कळल्यावर व मिळाल्यावर सांसारिक सुखदुःखाच्या सर्व कल्पनांचा निरास होतो आणि मनाचे सर्व क्लेशही संपतात. मन अत्यंत शांत व समाधानी होते.

उद्धवजी, परंतु कृष्णाकडून मिळणारे प्रेम सेवन करीत असताना कळत नकळत आपल्या ठिकाणीही कृष्णाविषयी जे प्रेम निर्माण झालेले असते, ते मात्र आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. ते प्रेम आपण केवळ कृष्णालाच देऊ शकतो आणि केवळ कृष्णच ते प्रेम घेऊ शकतो. म्हणून ते कृष्णप्रेम कृष्णाला अर्पण करीत रहावे, तर ते अधिकच वाढत रहाते. त्यामुळेच आपले मन नेहमी कृष्णप्रेमाने युक्त व आर्त होऊन रहाते आणि निर्भयता, धैर्यबळ हे कृष्णप्रेमाचे गुण आपल्या अंगी हळूहळू बाणू लागतात. कृष्ण हा प्रेम देण्यात जसा कधी कमी पडत नाही, तसाच तो प्रेम घेण्यातही कधी कमी पडत नाही. अशी स्वतः प्रेमाची नित्य देवाण घेवाण करून त्यासाठी आपल्यालाही नेहमी उद्युक्त करणारा कृष्ण तर,

माझ्यासाठी माझा देवच होऊन राहिला. ईश्वर कसा व कोठे आहे ते मी पाहिलेले नाही. पण त्या ईश्वराचे रूप म्हणजे कृष्णच होय, अशी अनुभवाने माझी श्रद्धा दृढ झाली आणि तेच माझे ईश्वराविषयीचे ज्ञान! ईश्वराची भक्ती म्हणजे काय, हे मला माहितही नव्हते. पण कृष्णापासूनची विभक्तता मला सहन होत नसे. कारण कृष्ण मला त्याच्यापासून वेगळेपणाने पहात नसे व अनुभवीतही नसे. कृष्ण माझ्याशी एकरूप होण्यासाठी आतुर असे, तर तो अनुभव त्याला आणून देण्यासाठीचा ध्यास माझ्याठायी असे. एकीएक कृष्णालाच पहायचे आणि त्यालाच भेटायचे. एकीएक त्यालाच सर्व काही सांगायचे आणि सर्व काही त्याचेच ऐकायचे, अशीच माझी अवस्था होऊन राहिली होती आणि त्यात माझा काहीच पराक्रम नव्हता. ती तर सर्व कृष्णप्रेमाचीच किमया होती आणि आहेही. मी कृष्णाशी एकरूप झाले असे म्हणायलाही त्या कृष्णाने मला वाव ठेवला नाही, तर कृष्णच माझ्याशी एकरूप होऊन राहिलेला आहे. माझ्या अंतःकरणात त्याने कायमचे वसतीस्थान केले आहे, हेच खरे. कृष्ण हा नित्य माझ्या संगेच आहे असाच मला अनुभव येतो. माझ्या संगे तो चालतो, माझ्या संगे तो बोलतो, माझ्या संगे तो पहातो आणि ऐकतोही. माझा कृष्ण तर त्याच्या स्वभावानुसार नित्यच माझ्या संगे खेळत असतो आणि आनंदाचे नानाविध रंग माझ्या अंतरंगात उधळीत असतो. उद्धवजी, या कृष्णाने माझी अशी अवस्था करून ठेवलेली असताना 'कृष्ण माझ्याजवळ नाही' असे मी कसे काय म्हणू शकेन बरे? कृष्णाने जर विरहच ठेवलेला नाही, तर कोणत्या विरहाचे दुःख मी करीत बसू, हे तुम्हीच मला आता सांगा!"

बोलता बोलता राधेचा कंठ दाटून आला आणि तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहू लागल्या. राधेच्या मुखावरील भक्तिभावपूर्णता पाहून उद्धवाला राधेच्या अंतःकरणातील कृष्णमूर्तीचे दर्शन झाले आणि नकळतपणे त्याचे हात जोडले गेले. हात जोडत असताना, उद्धवाने एवढा वेळ हातात तसाच धरून ठेवलेला दुधाचा पेला खाली ठेवला होता. राधेने चटकन् पुढे होऊन तो पेला उचलला आणि ती पटकन आतमध्ये गेली. थोड्याच वेळात लगबगीने राधा पुन्हा बाहेर आली आणि तिने पुन्हा गरम



करून आणलेल्या दुधाचा पेला उद्धवासमोर ठेवला. राधेने हात जोडून उद्धवाला दूध प्राशन करण्याची विनंती केली. भारावलेल्या अवस्थेतील उद्धव राधेकडे एकटक नजरेने पहात पहातच, सावकाशपणे दूध प्राशन करू लागला. त्याच्याकडे प्रसन्नतेने पहात राधा म्हणाली,

“उद्धवजी, या कृष्णाने तर मला तक्रार करायला कोणतीच जागा ठेवलेली नाही. त्याच्याच कृपेने बाह्यांगाचीही सर्व अनुकूलता मला लाभलेली आहे. माझे पती ‘अनय’ यांचे पती म्हणून प्रेम व साथ मला नेहमीच मिळत असते. तुम्ही येण्याच्या थोडा वेळ आधीच ते कामानिमित्त बाहेर गेलेत. हा सुंदर देव्हारा त्यांनीच खास माझ्यासाठी करून घेतलेला आहे. देव्हाऱ्यातील बाळकृष्णाची मूर्तीही स्वतः त्यांनीच घडवून घेतलेली आहे आणि दरवर्षी कृष्णजयंतीच्या आधी ते स्वतः ती मूर्ती अतिशय सुंदरपणे रंगवतातही. त्यांच्यापाशीही कृष्णाच्या अनेक स्मृती आहेत आणि त्याविषयी ते माझ्याशी मधून मधून बोलतही असतात. म्हाळसाकाकू सुद्धा माझे सर्व काही प्रेमाने करून अत्यंत लाड व कौतुकही करीत असतात. त्याही कृष्णाची अधून मधून आठवण काढीत असतात आणि कृष्णाच्या जयंतीदिनी आठवणीने बेसनाचे लाडू करून सर्वांना देतात. त्याही आता यमुनातीरी गेलेल्या आहेत.

अर्थात ही सर्व अनुकूलता असली तरी कृष्णभेटीचा आनंद अनुभवण्याची ओढ मात्र रहातेच आणि त्याकरिता मात्र, माझ्यासाठी कृष्णाची मुरली हेच माध्यम आहे. मथुरेला जाताना कृष्णाने, त्याची जणू प्रिय सखीच असलेली ही मुरली मला प्रेमभेट म्हणून दिली आणि तीच मला माझ्या प्रिय सख्याची भेट घडवून देते. सकाळी मनोभावे कृष्णमूर्तीची पूजा केल्यानंतर, त्याच्या प्रिय सखीला प्रेमाने क्षणभर छातीशी धरून ओठावर ठेवावे आणि अंतरात अखंड स्फुरत असलेल्या कृष्णप्रेमाच्या नादाचा निनाद मुरलीच्या द्वारे घुमवून, स्वतःच त्याचा श्रवणानंद घ्यावा. कृष्ण हा तर माझा श्वासच आहे आणि त्याची प्रेमधून तर हृदयात नित्य चालूच असते. पण या मुरलीच्या माध्यमातून वेगळेपणाने प्रगटणाऱ्या प्रेमाच्या स्वरलहरी, माझ्या कानाद्वारे पुन्हा माझ्या हृदयात जाऊन विलीन पावतात. असा हा कृष्णप्रेमाचा मुळापासून

मुळापर्यंतचा प्रवास पूर्ण होतो आणि तरीही चालूच रहातो. अशी ही कृष्णाची आनंददायी भेट, कृष्णाच्या प्रेमामुळे व त्याच्याच कृपेमुळे घडत असताना, कृष्णाचा शोध तर संपलाच. कृष्ण तर माझ्या हृदयातच मला सापडला. माझ्या हृदयातच कधी कृष्ण लपतो आणि लगेचच तेथेच प्रगटही होतो. अशा या त्याच्या लपाछपीच्या खेळामुळेच कृष्णाचे प्रेम अंतरात साकार होऊन रंगत रहाते आणि कृष्णभेटीचा आनंद गुणाकाराने वाढत रहातो."

बोलता बोलता राधा अंतर्मुख झाली आणि मग तिचे शब्दही थांबलेच. राधेची ती भावपूर्ण अवस्था, उद्धव अनिमिष नेत्रांनी पहात स्तब्धच झाला होता. परंतु थोड्या वेळाने तेवढ्याच सहजपणे राधेने तिचे नेत्र उघडून उद्धवाकडे पाहिले आणि मंदस्मित केले. उद्धवाच्या हातातील दुधाच्या पेल्याकडे निर्देश करून राधा म्हणाली,

"अहो उद्धवजी, मला वाटते तुमच्या पेल्यातील दूध पुन्हा थंड झाले असणार. थांबा! मी तुम्हाला ते गरम करून आणून देते," असे म्हणून राधेने तिचा हात तो पेला घेण्यासाठी पुढे केला. परंतु उद्धवाने पेल्यातील उरलेले दूध त्वरित प्राशन केले आणि पुढे होऊन त्याने तो पेला राधेच्या हातात दिला. पुढे काहीही न बोलता उद्धवाने दोन्ही हात जोडून राधेला नमस्कार केला आणि तो जाण्यासाठी निघाला. राधेने हाताने खूण करून त्याला थांबण्यास सांगितले आणि ती लगबगीने आतमध्ये गेली. राधेने पुन्हा बाहेर येऊन हातात असलेल्या पात्रातील खरवस उद्धवाच्या हातावर ठेवला आणि एवढेच म्हणाली, "हा कृष्णाचा प्रसाद!" उद्धवाने त्याचा स्वीकार करून तो सेवन केला आणि राधेचा नजरेनेच निरोप घेऊन तो निघाला. तेवढ्यात थांबून उद्धवाने राधेला विचारले, "कृष्णासाठी काही निरोप?" क्षणभर थांबून राधेने उद्धवाला विचारले, "कृष्णाचा माझ्यासाठी काही निरोप?" उद्धव म्हणाला, "काही नाही." त्यावर हसून राधाही त्वरित म्हणाली, "माझाही काही नाही." आश्चर्यचकित झालेला



उद्धव राधेच्या घराबाहेर कसा व केव्हा गेला, हे त्याचे त्यालाही कळलेच नाही.


उद्धव जेव्हा भानावर आला तेव्हा तो नंदाच्या वाड्यात येऊन पोहोचलाही होता. त्याने नंदाची भेट घेतली आणि तो म्हणाला, “नंद महाराज, माझी गोकुळची भेट पूर्ण झाली. ज्या उद्देशाने मी येथे आलो होतो त्याची पूर्ती झाली आणि मला समाधान झाले. आता मला येथून निघण्याची अनुज्ञा द्यावी. कारण आता कृष्णाची भेट घेतल्याशिवाय माझ्या मनाला चैन पडणे शक्यच नाही. कृष्णही मथुरेला माझी वाट पहात असणार याची मला खात्री आहे. आपण अत्यंत प्रेमाने माझे स्वागत केलेत आणि आदरातिथ्य केलेत त्याचा मला आनंद आहे. तुमच्या कृष्णाविषयीच्या भावना व तुमचा निरोपही मी कृष्णाला नक्कीच कळवीन. तुमची व कृष्णाची भेट निश्चितपणे होईल याची खात्री बाळगा. कृष्ण तर तुमच्या इच्छेचा निश्चितच आदर करेल. मी आता निघतो.”

उद्धवाची अशी अचानक निघण्याची लगबग पाहून नंदालाही नवलच वाटले. त्याने यशोदेला सांगून प्रवासात लागतील असे काही खाद्यपदार्थ उद्धवाबरोबर दिले. यशोदेने तर काही खास पदार्थ कृष्णाला देण्यासाठी म्हणून उद्धवाला दिले. नंद व यशोदेच्या डोळयात टचकन् पाणी आले. उद्धवालाही गहिवरून आलेच होते. परंतु जराही वेळ न दवडता उद्धव त्वरेने मथुरेकडे निघाला आणि वाटेत कोठेही न थांबता, तो वेळेआधीच मथुरेला जाऊन पोहोचला देखील! गेल्या गेल्या स्वतःच्या घरी न जाता आधी तो कृष्णाच्या भेटासाठी धावतच गेला. कृष्ण जणू त्याची वाटच पहात होता. कृष्णाला पहाताच पुढे झेपावून उद्धव कृष्णाच्या कुशीतच शिरला आणि मुसमुसून मुसमुसून रडू लागला. कृष्णाने उद्धवाच्या पाठीवरून व मस्तकावरून प्रेमाने हात फिरवीत त्याचे परोपरीने सांत्वन केले. कृष्णाने उद्धवाला मंचकावर स्वतःच्या शेजारी बसवले आणि त्याला स्वतःच्या हाताने जल प्राशन करविले. थोड्या वेळाने शांत झाल्यावरती कृष्णाने उद्धवाकडे पाहून स्मितहास्य केले आणि उद्धवानेही थोडेसे हसून त्याला प्रतिसाद दिला. कृष्णाने उद्धवाला काहीही विचारले नाही आणि उद्धवानेही कृष्णाला काहीही सांगितले नाही. कारण

कोणीही काही विचारण्याची व कोणालाही काही सांगण्याची आवश्यकता राहिलेलीच नव्हती.”

नारदाचे बोलता बोलता थांबणे हे अपेक्षितच होते. कारण भावपूर्ण प्रसंगाचे वर्णन होत असताना सहाय्याला आलेले शब्द भाव व्यक्त करण्यासाठी जेव्हा असमर्थ ठरू लागतात, तेव्हा शब्दांवरील भार वाढू लागतो. त्याचीच परिणती म्हणजे शब्दप्रवाहावरील ताण वाढून त्याची गती कमी होते. त्यामुळेच नारदाच्या मुखातून प्रगटणारा शब्दप्रवाह हळूहळू मंद होत थांबला, यात नवल नव्हते. पण श्रवण करणाऱ्या लक्ष्मीच्या मनातील भावपूर्णता एवढी वाढून राहिली होती, की तिच्या भावाला शब्दरूप घेणे भागच पडले. तिला न बोलता स्वस्थ बसणे शक्यच होईना. त्यामुळे नारदाचे बोलणे थांबले न थांबले तोच, लक्ष्मीने बोलावयास सुरूवात केलीच.

“अरे नारदा, या कृष्णचरित्रातील सगुण प्रेमाची गोडी अगदी न्यारीच आहे. ज्याला त्या प्रेमाची गोडी लागली आणि त्या प्रेमाचे माहात्म्य कळले तो खराच भाग्यवान होय यात जराही शंकाच नाही. कृष्णाच्या जीवनात आलेल्या अशा भाग्यवान व्यक्तिंमध्ये उद्धवही आहे हे ऐकून, मला तर अतिशय आनंद झालेला आहे. कारण त्याला कृष्णाचा सहवास एवढ्या जवळून करण्याची नामी संधी मिळालेली होती. पण जर त्याला कृष्णाचे माहात्म्य कळले नसते, तर त्याला कृष्णप्रेमाचे योग्य मूल्यही कळले नसते आणि मग मिळालेल्या संधीचे उद्धवाला चीज करता आले नसते. पण त्याला वेळीच कृष्णाची व त्याच्या प्रेमाची थोरवी कळली हे मात्र, योग्य व चांगलेच झाले. पण त्यासाठी कृष्णाने उद्धवाला अत्यंत योग्य ठिकाणीच पाठविले होते, हे मात्र खरे! कारण जेथे कृष्णाच्या प्रेमाची अगदी लयलूट झाली, असे गोकुळासारखे दुसरे ठिकाणच नाही आणि कृष्णप्रेम अगदी यथार्थपणे अनुभवून त्या कृष्णप्रेमाला म्हणजेच कृष्णाला, जिने स्वतःच्या अंगाअंगातून बाणवले अशी राधेसारखी दुसरी व्यक्ती नाही, हे खरेच आहे. कृष्णच जिचे अंतःकरण होऊन राहिलेला आहे अशी केवळ राधाच कृष्णप्रेमाची महती स्वानुभवाने प्रगट करू शकत होती. म्हणूनच उद्धवाला राधेच्या भेटीत कृष्णाचीच भेट झाल्याचा



अनुभव आला आणि राधेच्या भेटीनेच उद्धवाच्या गोकुळच्या भेटीची सार्थकता झाली, यात काहीही नवल असे मुळीच नाही.

नारदा, पण मला एका गोष्टीचे मात्र तसे पाहिले तर नवल वाटते आणि वाटतही नाही, की कृष्णचरित्राच्या या अंतिम पर्वाच्या वर्णनामध्ये पुन्हा गोकुळचा व विशेषतः राधेचा उल्लेख यावा, हा निव्वळ योगायोग आहे असे मला तरी वाटत नाही. तू काही कृष्णचरित्र हे घटनाक्रमानुसार आणि केवळ इतिहास म्हणून तर नक्कीच सांगत नाहीस. पण कृष्ण व उद्धव यांच्या संबंधाचे वर्णन करीत असताना तू आधी त्यांच्या संबंधाचे मूळ दाखवलेस आणि ते दाखवीत असताना तू कृष्णचरित्राच्या मुळापाशीच आलास. कृष्णचरित्राचे मूळ हे त्याने गोकुळात अनुभवलेल्या प्रेमामध्येच आहे हे तर अत्यंत स्पष्ट व खरेच आहे. म्हणूनच तर कृष्णचरित्र हे मुळापासूनच गोड आहे आणि ते तसे मुळासकट संपूर्णच सेवन करावयास हवे. तरच कृष्णचरित्राचा पूर्ण स्वाद व लज्जत अनुभवता येईल. तेव्हा कृष्णाचे माहात्म्य व कृष्णप्रेमाचे खरे मूल्य जाणून घेऊन गोकुळातून परत आलेला उद्धव आणि उद्धवाला स्वतःच्या अंतरामध्ये अत्यंत जवळ पहाणारा व अनुभवणारा कृष्ण यांच्यामध्ये पुढे अधिकाधिक जवळीकता घडत गेली असणार, हे तर निश्चितच आहे. फक्त ते कसे कसे घडले आणि कृष्ण व उद्धव यांचे संबंध कसे अधिक दृढ होत राहिले, हे सर्व मला आता तुझ्या मुखातून ऐकावयाचे आहे. तेव्हा माझी ही इच्छा पूर्ण करण्याची तू कृपा करावीस हीच प्रार्थना आहे."

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदाने संमतीदर्शक मान डोलावली आणि बोलावयास सुरुवात केली.

"लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. गोकुळात जाऊन परत आल्यापासून उद्धवाची कृष्णाकडे पहाण्याची दृष्टीच बदलली. त्याला स्वतःच्या भाग्याची जाणीव झाली आणि तो अधिक सावध व दक्ष झाला. कृष्णाच्या माहात्म्याचे मनावर दडपण येऊ न देता उद्धव मनाने अधिकाधिक मोकळा होत राहिला. स्वतःचे सर्व बाह्यांगाचे जीवन तर तो कृष्णाला सांगत असेच, पण त्याचबरोबर सांसारिक गोष्टींचा त्याच्या मनावर होणारा परिणामही, तो कृष्णाला मोकळेपणाने सांगत असे. मग

त्या निमित्ताने उद्धवाशी कृष्णाचे बोलणे होई आणि त्यावरती उद्धवाकडून विचारही घडत असे. त्याचीच परिणती म्हणजे उद्धवाच्या मूळ विचारसरणीतच मुलभूत बदल होत राहिले आणि उद्धवाचे मन विचारांनी व भूमिकेनेही कृष्णाशी जुळून राहिले. त्यामुळेच उद्धवाच्या मनातील कृष्णाविषयीचे प्रेम हे निश्चयात्मक व सबळ झाले आणि त्याची कृष्णमाहात्म्याची जाण वाढत राहिली.

लक्ष्मी, कृष्णाने प्रेमाच्या हक्काने उद्धवाच्या व्यक्तिगत जीवनातील सर्व सूत्रे स्वतःच्या हातात घेतली आणि उद्धवाच्या जीवनाचा व मुख्य म्हणजे त्याच्या मनाचा, कृष्ण सूत्रधार होऊन राहिला. कृष्णाने स्वतः पुढाकार घेऊन उद्धवाचा विवाहही घडवून आणला आणि हळूहळू कृष्ण उद्धवाचे सर्व जीवनच व्यापून राहिला, असेच म्हणावे लागेल. कृष्ण व उद्धव यांच्या या प्रेमसंबंधांचा उद्धवाला जसा उपयोग झाला, तसाच तो कृष्णालाही झाला ही गोष्टही खरीच होती. कृष्णाच्याही व्यक्तिगत जीवनातील सर्व गोष्टी, कृष्ण केवळ उद्धवालाच सांगत असे. फक्त उद्धवाकडेच कृष्णाचे अंतःकरण पूर्णपणे मोकळे होत असे. म्हणूनच कृष्णाची कोणतीही गोष्ट उद्धवापासून लपून राहिलीच नव्हती, म्हणजे कृष्णानेच तशी ती ठेवली नव्हती. मग ते कृष्णाचे व रूक्मिणीचे संबंध असोत किंवा कृष्णाचे अर्जुनाशी असलेले संबंध असोत, नाहीतर कृष्णाचे अगदी द्रौपदीशी असलेले संबंधही असोत, त्या सर्वांविषयी कोणताही आडपडदा न ठेवता, कृष्ण सर्व काही उद्धवाला सांगत असे. काही वेळेला उद्धवालाच त्याचे थोडेसे दडपण येत असे. परंतु त्याच वेळेला कृष्णाच्या या भरवशाला पात्र होऊन रहाण्याचा निश्चयही उद्धव मनोमनी करीत असे. उद्धवाचे व्यक्तिगत जीवन साहजिकच अत्यंत मर्यादित होते. परंतु कृष्णाचे जीवन व त्याचे भावविश्वही अत्यंत व्यापक होते, त्यामुळे कृष्णाशी जुळलेले उद्धवाचे मनही हळूहळू व्यापक होत गेले.

लक्ष्मी, कौरव-पांडव यांच्याविषयीची कृष्णाची भूमिका व प्रत्यक्ष सहभाग याची उद्धवाला पूर्ण माहिती होती आणि जाणीवही होती. कृष्णाचे धर्मस्थापनेचे कार्य, त्यासाठी त्यानेच पुढाकार घेऊन घडवून आणलेले कौरव व पांडव यांच्यातील युद्ध, त्या युद्धात घडलेले अनेक रोमहर्षक व भावपूर्ण प्रसंग हे सर्व सर्व कृष्ण उद्धवाला सांगत असे.



भीष्मांच्या भक्तिभावाचा झालेला आनंद आणि त्यांच्या मृत्यूची योजना आखताना मनाला झालेले दुःखही कृष्णाने उद्धवाला सांगूनच मोकळे केले होते. भीष्मांच्या अंतसमयीचा प्रसंग सांगताना तर कृष्णाला भरूनच आले होते. कृष्णाच्या बोलण्यातून त्याच्या अंतःकरणातील राग, व्यथा, हर्ष व आनंद यासारखे नानाविध भाव उद्धवापाशी व्यक्त होत असत. त्यामुळे कृष्णाचे अंतःकरण उद्धवाला अधिकाधिक कळत राहिले आणि तो कळत नकळतपणे कृष्णाच्या अनेकविध भावांशी समरस होऊ लागला. युद्ध समाप्तीनंतर अश्वत्थाम्याने केलेला द्रौपदीच्या पुत्रांचा वध आणि त्या वेळेस द्रौपदीच्या अंतःकरणाची प्रगट झालेली भावपूर्ण व सबळ अवस्था, याविषयी उद्धवाला सांगत असताना कृष्णाचे अंतःकरण तर एवढे भरून आले, की तो अक्षरशः उद्धवाच्या खांद्यावर मस्तक ठेवून अश्रुपात करू लागला. कृष्णाची ती अवस्था पाहून उद्धवही भांबावलाच. पण त्याने कृष्णाचे सांत्वन करून त्याला धीर दिला.

* * * * *

# कृष्णाला अवतारसमाप्तीचे वेध

हे लक्ष्मी, पांडवांचा विजय होऊन त्यांना त्यांच्या हक्काचे हस्तिनापूरचे राज्य मिळाले आणि ते त्या राज्यकारभाराच्या जबाबदारीत पूर्णपणे अडकले. कृष्णाचे त्याठिकाणी जाणेही हळू हळू थांबले आणि त्याचा द्वारकेतील वास्तव्याचा काळ वाढू लागला. साहजिकच उद्धवाला कृष्णाचा सहवास जास्त मिळू लागला. पण उद्धवाच्या एक गोष्ट लगेचच लक्षात आली, की कृष्ण हा अधिकच अंतर्मुख झालेला आहे आणि तो सतत कोणत्या तरी विचारामध्ये गढलेला असतो. कृष्णाचे उद्धवाशी बोलणेही हळूहळू कमीच झाले. पण तरीही उद्धव मात्र कृष्णाच्या नित्य सहवासात राहून त्याची सेवा करीत असे. कृष्णाला त्या बाह्यांगाच्या सेवेचीसुद्धा तेवढी आवश्यकता वाटेनाशी झाली. परंतु उद्धवाने कृष्णाची साथ सोडली नाही. कारण तो तसा विचारही करू शकत नव्हता. असेच एकदा एकांतात असताना कृष्ण अत्यंत सहजपणे व जणू स्वतःशीच बोलल्यासारखा बोलू लागला.

“अरे उद्धवा, पांडवांच्या निमित्ताने धर्माचा विजय झाला याचा मला अत्यंत आनंद होत आहेच. परंतु त्याचबरोबर मला एक काळजीही वाटत आहे की हा धर्माचा झालेला विजय टिकून कसा राहील? अधर्माचा जरी पराभव झाला असला तरी तो काही पूर्ण व समूळ नष्ट झालेला नाही ही गोष्ट मी जाणून आहे. कारण या अधर्माची मुळे व्यक्ती-व्यक्तींच्या मनात अत्यंत खोलवर असतात आणि त्यांना थोडेसे अनुकूल हवामान व खतपाणी मिळाले, तरी त्यांची वाढ झपाट्याने होऊन त्याचा मोठा वृक्ष होण्यास जराही वेळ लागत नाही. आता पुढील काळ तर अधिकच कठीण येणार आहे. कारण कलियुगाची सुरुवात होण्याची वेळ अगदी जवळ येऊन ठेपलेली आहे आणि त्यामुळे अधर्माची वाढ होऊन तो फोफावण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. लोक अधिकाधिक विषयासक्त होतील आणि त्यांच्यासाठी विषयसुखाची अनेकानेक साधनेही निर्माण होत रहातील. त्यामुळे लोकांच्या विषयवासना अधिकच प्रबळ होत रहातील. लोक केवळ विषयांत धुंदच होणार नाहीत, तर विषयांधही होतील आणि त्यापोटी सर्व नातीगोती विसरून स्वार्थी व कपटी होतील.



बाह्याचरणाचीही चाड कोणाला रहाणार नाही. ईश्वर, त्याचे अस्तित्व व धर्म याचा उपयोगही लोक स्वतःचा स्वार्थ व कामना पूर्ण करण्यासाठीच करून घेतील. बाह्यांगाने व्रतवैकल्ये, उपासतापास, पूजाअर्चा चालू ठेवतील, परंतु अंतरातील वासना व अहंकार यांच्या अस्तित्वामुळे सर्वत्र दांभिकपणा पसरून राहील. अर्थात सात्त्विक वृत्तीचा पूर्णपणे लोप होणार नाही हे जरी खरे असले तरी ती अत्यंत दुर्बल होऊन राहील आणि त्यांच्यासाठी आंतरिक शांती समाधान देणारा ईश्वरप्राप्तीचा मार्गही दिवसेंदिवस दुर्मिळच होत राहील. माझ्या अंतःकरणात ही व्यथा मला तीव्रतेने जाणवत आहे. परंतु काळाच्या सत्तेपुढे कोणाचाही, म्हणजे अगदी माझाही इलाजच नाही. माझ्या कार्याच्या व जीवनाच्या मर्यादाही आता मला स्पष्टपणे दिसू व जाणवू लागल्या आहेत. आता पुढे सर्व काही परमेश्वराच्या नियतीनुसार जे घडायचे असेल ते घडेलच. मला त्याची चिंता नाही, पण काळजी मात्र निश्चितच वाटते.

उद्धवा, माझ्याठायी सर्वात मोठे दुःख आहे ते आपल्या यादवांचे व यादवसेनेचे. त्यातील बरीचशी यादवसेना कौरव-पांडवांच्या युद्धामध्ये नष्ट झाली असली तरी यादव कुळाची मात्र जी अधोगती झालेली आहे ती मला पाहवत नाही. राज्यसत्तेचा उपयोग सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी करण्याच्याऐवजी, त्यांनी विषय उपभोगासाठीच त्याचा वापर केला. मी व बलराम होतो म्हणून आतापर्यंत यादवांचे अनेक दोष झाकले गेले आणि त्यांच्या दुष्कर्मांना आळा तरी बसला होता. परंतु त्यांच्यावरील आमचे छत्र एकदा का बाजूला झाले की ते सर्वांगाने उघडे पडतील आणि मग त्यांना कोणी त्राताच उरणार नाही. त्यांचा मनमानीपणा वाढतच जाईल आणि ते डोईजड होऊन रहातील. पण त्यामुळे सामान्य प्रजाजन भरडले जातील आणि मला त्याचीच काळजी जास्त वाटत आहे. आजकाल तर हे यादव एवढे माजले आहेत की ते मला व बलरामालाही जुमानीत नाहीसे झाले आहेत. तेव्हा या यादवांचे आता काय करावे हा मोठा प्रश्नच मला पडला आहे. तुला त्याच्यावरती काही उपाय सुचत असल्यास मला सांग बरे!”

कृष्णाचे बोलणे ऐकत असताना उद्धवालाही थोडेसे गोंधळल्यासारखेच झाले. त्याला कृष्णाचा सूर व भाषाही काहीशी

वेगळीच जाणवली. कृष्णाच्या बोलण्यातील गांभीर्य उद्धवाच्याही लक्षात आले आणि तोही गंभीरच झाला. पण काय बोलावे हे त्यालाही सुचेनाच. परंतु उद्धवाला यादवांपेक्षा स्वतःचीच काळजी जास्त वाटू लागली. यादवांचे पुढे काय होणार यापेक्षा आपले पुढे काय होणार, या विचारानेच उद्धव जास्त ग्रस्त झाला. त्यामुळेच त्याच काळजीच्या सुरात उद्धवाने कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

"अरे कृष्णा, मला एक गोष्ट कळतच नाही की तू अचानक अशी पुढची भाषा का बोलायला लागलास? मला तरी तुझ्या या बोलण्याची थोडीशी भीतीच वाटू लागली आहे. काही कारण नसताना तू फारच पुढची भाषा बोलत आहेस असे मला तरी वाटते. तू तर एकदम निरवानिरवीचेच बोलणे सुरू केले आहेस. काळाच्या ओघात तुझ्या जीवनाला व कार्याला मर्यादा आल्याही असतील. पण याचा अर्थ असा नव्हे की सर्व संपतच आलेले आहे. अजून तुझे केवढे तरी जीवन बाकी आहे आणि तुझे कार्यही अजून पूर्ण झालेले नाही. परमेश्वराच्या कृपेने तुला उदंड आयुष्य लाभणार आहे आणि त्याच्याच इच्छेनुसार तुझ्याकडून भरपूर कार्यही घडेल याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा तू उगाचच ही 'तुझ्या नंतरची' भाषा बोलून माझ्या जीवाला घोर लावू नकोस. मला एका गोष्टीचे नवल वाटते की मी ज्याचा विचार काय, कल्पनाही करू शकत नाही त्याविषयी तू एवढ्या सहजतेने कसे काय बोलू शकतोस? तेव्हा एक गोष्ट लक्षात ठेव की यापुढे माझ्याशी बोलताना अशी भाषा वापरायची नाही, की ज्यामुळे माझ्या मनात अत्यंत काळजी निर्माण होईल.

रहाता राहिला यादवांचा प्रश्न. तुझे म्हणणे योग्यच आहे. यादव अत्यंत उन्मत्त व बेपर्वा झालेले आहेत ही गोष्ट खरीच आहे आणि ते एक काळजीचा व चिंतेचा विषय होऊन राहिलेले आहेत. परंतु थोडासा विचार केला तर त्यावरती काही निश्चितच उपाय निघेल अशी मला खात्री आहे. त्यांना एकदा चार गोष्टी नीट समजावून सांगाव्या लागतील आणि त्यांना योग्य ती समज करून द्यावी लागेल. पण ही जबाबदारी तुलाच घ्यावी लागेल. कारण त्यातल्या त्यात ते तुझेच काहीतरी ऐकण्याची थोडीफार



शक्यता आहे. बाकी दुसऱ्या कोणालाही ते दाद देणार नाहीत. आपणच काहीतरी निमित्त काढून सर्व यादवांना युक्तिने एकत्र बोलावले पाहिजे, म्हणजे मग ती संधी साधून तुला त्यांच्याशी त्यांच्या हिताचे चार शब्द बोलता येतील. मला वाटते येथे द्वारकेमध्ये ते जमणे शक्य नाही. कारण त्यांचा आपापसातील बेबनावही अतिशय वाढलेला आहे. तेव्हा आपण सर्वांनी मिळून कुठेतरी जाण्याचे करूया. त्यातल्या त्यात जर आपण एखाद्या तीर्थक्षेत्राला जाण्याचे ठरवले तर ती सूचना सर्वांनाच मान्य होण्यासारखी आहे. याबाबत तुला काय वाटते? तुझा काय विचार आहे?”


उद्धवाचे बोलणे संपत असतानाच कृष्णाने संमतीदर्शक मान डोलवली आणि तो म्हणाला, “उद्धवा, तुझी सूचना निश्चितच विचार करण्यासारखी आहे. खरे तर, ही यादवमंडळी काहीही समजावून सांगण्याच्या पलिकडेच गेलेली आहेत. पण तुझ्याठिकाणी त्यांच्याविषयी अजूनही काही आशा शिल्लक राहिली असेल, तर त्यांच्याशी एकत्रितपणे बोलावयास माझी काही हरकत नाही. परंतु त्यातून काही निष्पन्न निघेल असे मला तरी वाटत नाही. तेव्हा त्याबाबतीत तूच काय ते ठरव आणि आपण कसे व कोठे जायचे ते तूच सर्वांना सांग, म्हणजे झाले.

उद्धवा, तुला आणखीन एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. माझ्या बोलण्यात जेव्हा जेव्हा पुढील काळाचा उल्लेख येतो तेव्हा तू एकदम काळजीने युक्त होतोस आणि मला तुझ्याठायी एक प्रकारची भीती निर्माण झाल्याचे जाणवते. पण काळ पुढे जात आहे ही तर वस्तुस्थितीच आहे. ती कोणालाही डावलता येणार नाही. भविष्यकाळाची उगाच चिंता करू नये हे बरोबरच आहे. परंतु आतापर्यंतच्या अनुभवावरून भविष्यकाळाकडे पहाण्याची दृष्टी मात्र आपल्याला आलीच पाहिजे आणि भावी गोष्टींना सामोरे जाण्याचे धैर्यबळही आपल्याला आलेच पाहिजे. तरच आजपर्यंतच्या अनुभवाचा आपल्याला उपयोग झाला असे म्हणता येईल. काळाचा प्रवाह आहे, तसाच जीवनाचाही प्रवाह आहे आणि शेवटी जीवनाचा प्रवाह कालप्रवाहात विलीन होतो हेच सत्य आहे. ईश्वराचे रक्षण तर सर्वांनाच आहे पण ते मृत्यू येईपर्यंतच. कारण मृत्यू हा जीवनाचा अटळ शेवट आहे. फक्त तो शेवट गोड व आनंदाचा करणे हे मात्र ज्याच्या

त्याच्या हाती आहे. ज्यांना ईश्वराचे प्रेम मिळाले आणि त्यातून ज्यांच्या अंतरात ईश्वरीप्रेमाचे मूळच निर्माण होऊन रूजले, त्यांचे सर्व जीवनच फलरूप व मुळासकट गोड होऊन रहाते. त्यांना मग या काळाची जरासुद्धा भीती वाटत नाही. त्यांचा जीवनप्रवाह काळप्रवाहाच्या द्वारे परमेश्वराठायी जाऊन विलीन होतो. परंतु उद्धवा, मी आताच तर कोठे जात नाही ना? मग कशाला काळजी करतोस? आता तर आपण सर्वजण मिळून तीर्थयात्रेला जात आहोत ना? मग तू आपला त्याच्याच तयारीला लाग बघू."

कृष्णाचे असे बोलणे ऐकल्यानंतर उद्धवाला जरा धीर आला आणि त्याने पुन्हा स्वतः शांतपणे विचार केला. सर्वांनी मिळून कोठे जावे या संबंधी मग त्याने इतरांशीही विचारविनिमय केला. त्यानंतर सर्व यादवांनी मिळून 'प्रभास' नावाच्या तीर्थक्षेत्री जाण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे एका शुभतिथीचा योग साधून सर्व यादव, कृष्ण व बलराम यांच्यासह प्रभास क्षेत्री जाऊन दाखल झाले. परंतु तेथेही यादवांनी गोंधळ घातलाच. नदीस्नान व देवतांची पूजाअर्चा इत्यादी झाल्यानंतर सर्व यादव एकत्र जमून सहलीची मौज लुटू लागले. एवढेच नव्हे, तर त्यांनी त्याठिकाणी मद्यप्राशनास सुरुवात केली. उद्धवाने त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. निदान तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी तरी त्यांनी मद्यप्राशनासारखे निंद्य कर्म करू नये म्हणून उद्धवाने त्यांना विनवून सांगितले. परंतु कोणीही उद्धवाला जुमानले नाही. विनाशकाळ जवळ आल्यानंतर विपरीत बुद्धी झाल्याचेच ते कुलक्षण होते. यादवांना मद्याची नशा व धुंदी एवढी चढली की त्या भरात त्यांची आपापसातच वादावादी सुरू झाली. वादावादीचे रूपांतर भांडणामध्ये झाले आणि भांडणाची परिणती प्रत्यक्ष युद्धामध्येच झाली. सर्वचजण आपापसातच युद्ध करून स्वकीयांनाच ठार मारू लागले.

परिस्थिती हाताबाहेर जात आहे हे लक्षात आल्यावरती कृष्ण व बलराम यांनी मध्ये पडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा यादवांवरती उलटाच परिणाम झाला आणि ते कृष्ण व बलराम यांनाच दूषणे देऊन



त्यांच्यावरतीच उलटले. त्यातल्या काहीजणांनी तर कहरच केला. 'यादवांच्या आजच्या दुःस्थितीला तुम्हीच जबाबदार आहात' असा कृष्ण व बलराम यांच्यावरती आरोप करून त्यांनी कृष्ण व बलराम यांच्यावरतीच शस्त्र उगारायला कमी केले नाही. तेव्हा मात्र कृष्णाचा राग अनावर झाला. त्याने फक्त एकच दृष्टीक्षेप बलरामाकडे टाकला. त्याचा जो अर्थ समजायचा तो बलराम समजला आणि कृष्ण व बलराम या दोघांनी मिळून यादवांवरती प्रतिहल्ला चढवला. या अनपेक्षित हल्ल्याने यादव जरी सुरुवातीला गांगरले, तरी मद्याच्या नशेमुळे आलेला त्यांच्याठायीचा चेव मात्र कायम होता. तेही हट्टाला पेटले आणि प्राणपणाने लढू लागले. कृष्णाच्या हातातील गदा व बलरामाच्या हातातील मुसळ याद्वारे प्रगटणाऱ्या त्यांच्या पराक्रमापुढे यादवांचा निभाव लागणे शक्यच नव्हते आणि स्वतःचे प्राण गमावण्यावाचून त्यांना दुसरे गत्यंतरही नव्हतेच. शेवटी तेच झाले आणि सर्व यादवांचा निःपात झाला. ते भयंकर दृश्य पाहून उद्धवही जरासा घाबरलाच. कृष्णाचे असे प्रगटलेले क्षात्रतेज आणि त्याचा पराक्रम उद्धव प्रथमच पहात होता. उद्धवाला यादवांविषयी निश्चितच वाईट वाटले. परंतु त्यांना त्यांच्याच दुष्कर्माचे व प्रत्यक्ष कृष्णाचाच अवमान केल्याचे फळ मिळाले हे उद्धवाने ओळखले आणि तो काहीच न बोलता कृष्णाच्या समोर येऊन उभा राहिला. उद्धवाला पहाताच कृष्ण शांत झाला. त्याने उद्धवाच्या खांद्यावर हलकेच थोपटले आणि उद्धवाचे मुख कुरवाळून कृष्णाने त्याचे सांत्वन केले. उद्धव पूर्णपणे शांत झाला आहे असे पाहून कृष्णाने त्याच्याशी बोलावयास सुरुवात केली.

"उद्धवा, पाहिलेस ना? ज्या यादवांना मी सर्व राज्यवैभव प्राप्त करून दिले ते यादव शेवटी माझ्यावरतीच उलटले आणि त्यांनी स्वतःचा सर्वनाश स्वतःच्या हातांनीच ओढवून घेतला. कृतज्ञता तर नाहीच, पण उलट माझ्याशी ते कृतघ्नच झाले आणि त्याचेच फळ त्यांना भोगावे लागले. पण झाले ते एका अर्थी योग्यच झाले असेच म्हणावे लागेल. कारण असे उन्मत्त झालेले हे यादव पुढे या पृथ्वीला केवळ भारभूतच नव्हे, तर त्रासदायकही होऊन राहिले असते. एक गोष्ट बरी झाली, की मी माझ्याच हातांनी त्यांना संपवले आणि या पृथ्वीचा भार थोडातरी हलका केला. त्यामुळे मी माझ्या एका मोठ्या जबाबदारीतून मोकळा झालेलो आहो.

आता तू एक कर. द्वारकेला जाऊन येथे घडलेला प्रसंग तेथील स्त्रियांना व वृद्धांना कथित करून त्यांचे सांत्वन कर आणि नंतर पुन्हा येथे येऊन या यादवांच्या मृतदेहांच्या अंत्यविधीची व्यवस्था कर. तोपर्यंत येथे मी व बलराम थांबून रहातो.” कृष्णाचे बोलणे ऐकून उद्धव अत्यंत नाइलाजाने व जड पावलांनी तेथून निघाला आणि त्याने द्वारकेच्या दिशेने प्रवास सुरु केला.

कृष्ण व बलराम हे दोघेही अत्यंत थकलेले होते. अचानक घडलेले युद्ध आणि त्यामध्ये झालेला यादवांचा विनाश पाहून बलरामालाही उदासीनताच आली होती. काळाची खूण त्याच्याही लक्षात आली होतीच. थोडा वेळ स्वस्थ राहून त्यानेही विचार केला आणि त्याने शांतपणे कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.

“कृष्णा, मला एवढा मानसिक धक्का बसला आहे, की मी त्याच्यातून अजूनही सावरलेलो नाही. ज्या यादवकुळात आपण जन्माला आलो आणि वाढलो, ज्या यादवकुळाच्या उत्कर्षासाठी आपण अक्षरशः हाडाची काडे करून अपार कष्ट केले आणि ज्या यादवांना आपण राज्यवैभव व सर्व ऐश्वर्य प्राप्त करून दिले, त्या यादवांनाच आपल्यावर असे उलटलेले पाहून माझे मन तर उद्विग्नतेने पूर्णपणे ग्रासलेले आहे. या यादवांनी तर कृतघ्नतेची परिसीमाच गाठली असेच म्हणावे लागेल. ते यादव तर त्यांच्या कर्माने मेलेच. पण मी आता जिवंत कशासाठी व कोणासाठी आहे हेच मला कळेनासे झाले आहे. माझ्या जीवनाला आता काही अर्थ वा प्रयोजनच राहिलेले नाही आणि असे निरर्थक जीवन जगण्याची माझ्या ठिकाणी उमेदही शिल्लक राहिलेली नाही. मला वाटते की मी आता माझी जीवनयात्रा शांतपणे व समाधानपूर्वक संपवणेच अधिक योग्य होईल. कृष्णा, तेव्हा तू मला त्यासाठी संमती दे आणि मला प्रेमाने निरोप दे.”

असे म्हणून बलराम आवेगाने पुढे झाला आणि तो कृष्णाच्या जवळ येऊन समोर उभा राहिला. दोघांनी एकमेकांकडे काही न बोलता अश्रूपूर्ण नेत्रांनी पाहिले आणि परस्परांना दृढ आलिंगन दिले. दोघांनाही एकमेकांना सोडवतच नव्हते. पण कृष्ण व बलराम हे उभयता ईश्वराची



नियती जाणत असल्यामुळे काळाचा संकेतही ते ओळखून होते. त्या दोघांचे मौनही सर्व काही बोलून गेले. बलरामाने स्वतःला कृष्णापासून प्रयत्नपूर्वक दूर केले. बलराम त्याचठिकाणी भूमीवरती मांडी घालून बसला. त्याने नेत्र मिटून घेतले आणि मनाच्या सर्व बाह्य वृत्तींचा अवरोध करून पंचप्राणांना शरीरात उर्ध्वगामी केले. क्षणार्धात बलरामाचे पंचप्राण त्याच्या देहाला सोडून पंचत्वात विलीन झाले आणि त्याचा जड देह खाली पडू लागला. कृष्ण धावतच पुढे आला. त्याने बलरामाच्या देहाला सावरून धरले आणि सावकाशपणे खाली भूमीवर ठेवले. कृष्ण अत्यंत प्रेमाने बलरामाचे मुखकमल कुरवाळीत होता आणि त्याला स्वतःच्या अश्रूंनी जणू स्नानच घालीत होता.

बलरामाचा देहत्याग झाल्यावरती कृष्ण पूर्णतः अंतर्मुख झाला आणि त्याचे देहभान पूर्णपणे हरपले. तशाच अवस्थेत कृष्णाच्या पायांनी चालावयास सुरुवात केली आणि कृष्ण तेथून दूर जाऊ लागला. काही काळ चालल्यानंतर वाटेत उभ्या असलेल्या एका अश्वत्थ वृक्षाकडे कृष्णाचे पाय नकळतपणे वळले. अनाहूतपणे, अत्यंत सहजतेने कृष्ण त्या वृक्षाखाली जाऊन बसून राहिला. एवढे दिवस, नव्हे नव्हे, एवढी वर्षे अविश्रांतपणे कष्टलेला कृष्णाचा देह जणू काही त्याठिकाणी प्रथमच विश्राम पावला होता. झाडाच्या बुंध्याला टेकून व उजव्या पायावर डावा पाय ठेवून बसलेला कृष्ण, अत्यंत स्वस्थचित्त अशा अवस्थेत होता आणि नेत्र मिटलेले त्याचे मुखकमल अत्यंत शांत व निर्विकार दिसत होते. कृष्णाच्यासाठी काळसत्ता थांबलीच होती आणि काळाचे मोजमापही संपलेच होते.

* * * * *

# निर्वाणीचा कृष्ण

लक्ष्मी, तेवढ्यात एक अकल्पित घटना घडली. नेमका त्याचवेळी एक व्याध शिकारीच्या शोधात त्या परिसरात आला होता. दुरून पाहिले असता अश्वत्थवृक्षाच्या फांद्या व पानांनी झाकल्या गेलेल्या कृष्णाच्या उजव्या पायावरील डावे पाऊल फक्त त्या व्याधाच्या दृष्टोत्पत्तीस आले. कृष्णाचे ते सुकोमल व नाजूक पाऊल म्हणजे जणू एका हरिणाचे मुख आहे असा समज त्या व्याधाचा झाला आणि साहजिकच त्याला अत्यंत हर्षही झाला. लागलीच जराही वेळ न दवडता त्या व्याधाने धनुष्याला बाण लावून कृष्णाच्या पावलावरती नेम धरला आणि पुढच्याच क्षणाला वेध घेऊन बाण सोडलाही. त्या बाणाने त्याचे लक्ष्य अचूक गाठले आणि तो कृष्णाच्या पावलात शिरून रूतून बसला. बाणाने झालेल्या जखमेतून रक्ताची धार सुरू झाली, तरीही कृष्णाला त्याचे भानच नव्हते. बाण सोडल्यानंतर बाणाच्या पाठोपाठ तो व्याधही त्याला मिळालेली शिकार पहाण्यासाठी धावतच आला. कृष्णाला पहाताच व्याधाने त्याला ओळखले आणि तो तर चकितच झाला. त्याच्याकडून घडलेली चूक त्याच्या लक्षात आली आणि त्या व्याधाच्या ठायी अपराधाची भावना निर्माण झाली. पुढे येऊन तो व्याध कृष्णाच्या पायाजवळ बसला आणि स्फुंदून स्फुंदून रडू लागला. व्याधाच्या रूदनाच्या आवाजाने कृष्ण हळूहळू देहभानावर आला आणि त्याने हलकेच त्याचे नेत्र उघडले. समोर बसून शोक करीत असलेल्या त्या व्याधाला पाहून कृष्णाला काहीच अर्थबोध होईना. व्याधाचे सांत्वन करण्यासाठी म्हणून कृष्ण थोडासा पुढे वाकू लागला असता, त्याला एकदम त्याच्या पायात रूतलेल्या बाणाची जाणीव झाली आणि कृष्णही चकितच झाला. कृष्ण प्रश्नार्थक नजरेने त्या व्याधाकडे पाहू लागला. पण व्याधाच्या तोंडातून एकही शब्द फुटेचना. कृष्णाने हाताच्या खुणेने त्या व्याधाला धीर देऊन आश्वासित केले असता त्या व्याधाने सर्व धैर्य एकवटून बोलावयास सुरूवात केली,

“अरे कृष्णा, मी तुझा अनंत अपराधी आहे आणि माझ्या अपराधाला मृत्यूदंडाशिवाय दुसरी कोणतीही शिक्षा असूच शकत नाही. शिकार करण्यासाठी म्हणून मी सावज शोधीत होतो आणि दूरून पहात असताना चुकून तुझ्या या सुंदर व नाजूक पावलालाच मृगाचे मुख समजलो. योग्य



सावज मिळाल्याच्या आनंदातच मागचा पुढचा काहीच विचार न करता मी बाण सोडला आणि तो बाण तुझ्या या पावलाचा छेद घेऊन त्यात रूतून बसलेला आहे. माझ्याकडून नकळत का होईना पण जे पाप घडलेले आहे त्याचे कशानेही क्षालन होणे शक्यच नाही. या पापकर्माचे ओझे माझ्या मनावर कायमचे रहाणार आहे आणि त्याचा भार माझ्या मनाला जन्मभर वहावा लागणार आहे; तेव्हा कृपा करून मला मृत्यूदंडाची शिक्षा दे आणि या पापातून माझी कायमची सुटका कर.” असे म्हणता म्हणता त्या व्याधाचे शब्द त्याच्या कंठातच अडकले आणि अश्रुधारा मोकळ्या होऊन नेत्रातून वाहू लागल्या.

कृष्णाच्या शांत मुखावर गंभीरता पसरली. घडलेल्या प्रसंगातील काळाचा संकेत कृष्णाला कळला. काळाची पडत असलेली पावले कृष्णाने ओळखली आणि त्याला काळसत्तेचे कौतुकच वाटले. परंतु कृष्णाला त्या व्याधाची मात्र अत्यंत दया आली आणि कृष्णाने त्या व्याधाशी सांत्वनपर बोलावयास सुरूवात केली.

“अरे व्याधा, तुला वाईट वाटणे हे अगदी साहजिक आहे. परंतु तुझ्याकडून ही गोष्ट अनवधानाने घडलेली आहे. त्यात तुझी काहीच चूक नाही आणि तुझा काही दोषही नाही. मनात पापाचे विचार वगैरे तर मुळीच आणू नकोस. तुला मी सांगतो त्यावर विश्वास ठेव, की नकळतपणाने का होईना, पण तू मला साहाय्यभूतच झालेला आहेस. अरे, माझा आयुष्यकाळ संपून देहत्यागाची वेळ जवळच आलेली होती आणि देहत्याग कसा घडेल बरे, या विचारातच मी होतो. एक प्रकारे त्या विवंचनेतूनच तू मला सोडवलेस असेच म्हणावे लागेल. हे तर तुझे माझ्यावरचे एक प्रकारे उपकारच आहेत. कारण तू मला साहाय्यभूतच झाला आहेस. ईश्वराच्या नियतीतच तुझे येथे असे अचानक येणे झाले. त्या ईश्वरानेच जणू तुला येथे पाठवले आणि त्याच्या कार्यासाठी तुला निमित्त केले. तेव्हा मनात कोणत्याही प्रकारची खंत वा अपराध भावना अजिबात बाळगू नकोस. तुझ्याकडून कोणतेही पापकर्म तर अजिबात घडलेले नाही. आता तू निःशंक मनाने येथून निघून जा. येथे जर कोणी तुला पाहिले तर उगाचच तुझ्यावर दोषारोप केले जातील आणि मग तुला त्याचा त्रास

होईल. तुला जीवनात सर्व सुखे मिळतील आणि इहलोक सोडल्यावरती तुला निश्चितपणे स्वर्गाची प्राप्ती होईल, असे माझे तुला आशीर्वाद आहेत. येथे जराही न थांबता तू येथून त्वरित निघण्याचे कर. येथे घडलेला प्रसंग तू कोणालाही सांगू नकोस आणि तूही तो विसरून जा.”

कृष्णाच्या बोलण्याने व्याधाचेही मन भरून आले. तशा अवस्थेमध्येही कृष्णाठायी व्याधाविषयी काळजीच होती आणि त्यानेच तो व्याध भारावला गेला. व्याध कृष्णाची काही मदतही करू शकत नव्हता आणि त्याचे तेथे जास्त वेळ थांबणे उचितही नव्हते हे व्याध जाणून होता. त्यामुळे अत्यंत नाईलाजाने व झाल्या गोष्टीचा मनाशी विचार व अचंबा करीत करीतच, तो व्याध अतिशय जड पावलांनी तेथून निघता झाला.

लक्ष्मी, कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे उद्धवाने द्वारकेला जाऊन प्रभास क्षेत्री घडलेली सर्व हकीकत तेथील प्रजाजनांच्या कानावर घातली आणि अर्थातच सर्व नगरीत एकच हलकल्लोळ माजला. सर्व यादव स्त्रियांनी व वृद्धजनांनी रडून रडून आकांत केला. उद्धवाने त्याच्या परीने सांत्वन करण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु जनांच्या शोकाला तोही आवर घालू शकला नाही. उद्धवाला तेथे जास्त वेळ थांबणेही शक्यच नव्हते, कारण प्रभास क्षेत्री परत जाऊन त्याला मृत पावलेल्या यादवांचे अंत्यविधी करावयाचे होते. त्यासाठी कृष्ण आतुरतेने त्याची वाट पहात असणार याची उद्धवाला खात्री होती आणि त्याचीच त्याला काळजीही वाटत होती. उद्धवाची वाट पहाणारी कृष्णाची नजर त्याच्या दृष्टीसमोर आली आणि कृष्णाच्या भेटीसाठी उद्धवही अस्वस्थच झाला. त्यालाही द्वारकेमध्ये क्षणभरसुद्धा थांबणे अशक्य होऊ लागले आणि तो तेथून त्वरेने परत निघालाच.

उद्धव वाटेत जराही विश्रांती न घेता जेव्हा पुन्हा प्रभास क्षेत्री परत आला, तेव्हा त्याला त्याठिकाणी कृष्ण आढळला नाही. उद्धवाच्या मनात थोडीशी पाल चुकचुकली खरी, परंतु त्याने कृष्णाच्या सांगण्यानुसार आधी यादवांच्या मृतदेहांवरती अग्निसंस्कारासह इतर सर्व विधी करण्यासाठी प्रभासक्षेत्रीच्याच स्थानिक लोकांची मदत घेतली आणि ते कार्य मार्गी लावले. तेवढ्यात उद्धवाची नजर तेथून जरा दूरवर दिसणाऱ्या एका



मृतदेहावरती गेली. उद्धव धावतच त्याठिकाणी गेला असता, तो मृतदेह बलरामाचा आहे हे त्याच्या लक्षात आले आणि तो हबकलाच. त्याचा त्याच्याच डोळयांवरती विश्वास बसेना. बलरामाच्या देहावरती काहीच जखमा व इतर खुणा दिसत नव्हत्या परंतु तरीही त्याचा देह निष्प्राण झालेला होता हे सत्यच होते. भयचकित होऊन उद्धव भिरभिरत्या नजरेने कृष्णाला शोधू लागला. पण कृष्ण कुठेच आढळेना. हवालदिल होऊन उद्धवाने सर्व परिसर धांडोळला. पण कृष्णाचा काहीच ठावठिकणा लागेना. उद्धव तर अत्यंत रडकुंडीला आला. काय करावे व कृष्णाला कोठे शोधावे हे त्यालाही सुचेना आणि तो अतिशय बेचैन झाला. तेवढ्यात उद्धवाला एका वाटेने जाणाऱ्या पाऊलखुणा आढळल्या आणि उद्धवाने कृष्णाचे पदचिन्ह ताबडतोब ओळखले. काहीही विचार न करता उद्धव त्या पाऊलखुणांचा मागोवा घेत त्या दिशेने धावतच सुटला आणि धावता धावता एकदम थबकला. वाटेपासून जरा बाजूला असलेल्या अश्वत्थ वृक्षाखाली बसलेली कृष्णाची मूर्ती उद्धवाला आढळली आणि तो आवेगाने कृष्णाच्या जवळ धावलाच. जवळ आल्यावरती जेव्हा उद्धवाला दिसले की बाणाने विद्ध झालेला कृष्णाचा पाय रक्ताने माखलेला आहे, तेव्हा तर उद्धव आधी घाबरलाच, परंतु लागलीच तो कृष्णाच्या पायांशी बसला आणि कृष्णाला हाका मारू लागला. कृष्णाच्या नेत्रांवर ग्लानी आलेली होती. परंतु उद्धवाचा आवाज कृष्णाने ओळखला आणि आपले नेत्र हळूहळू उघडले. समोर बसलेल्या उद्धवाला पहाताच कृष्णाच्या नजरेत एक चमक आली आणि त्याने उद्धवाकडे पाहून मंदस्मित केले. पुढे होऊन कृष्णाच्या पायातील रूतलेला बाण काढण्याच्या उद्धवाच्या प्रयत्नाला कृष्णाने हाताच्या खुणेनेच मना केले. काय करावे हे उद्धवालाही कळेना आणि कृष्णाला काही विचारून त्या स्थितीत बोलावयास लावावे हेही त्याच्या मनाला पटेना. परंतु मनाची अस्वस्थता उद्धवाला स्वस्थही बसू देईना. उद्धवाची ही मनःस्थिती कृष्णाने ओळखली. त्याला उद्धवाची दयाच आली आणि कृष्णाने उद्धवाशी प्रयत्नपूर्वक बोलावयास सुरूवात केली.

“अरे उद्धवा, असा घाबरू नकोस. आधी मन शांत कर आणि मी काय सांगतो आहे ते नीट ऐकून घे. केवळ अपघातानेच हा बाण माझ्या पायात रूतून बसलेला आहे. प्रभासक्षेत्री तू बलरामाचा मृतदेहही पाहिला

असशीलच. यादवांनी स्वतःचाच ओढवून घेतलेला विनाश पाहून बलरामानेही त्याची जीवनयात्रा संपवण्याचा निर्णय घेतला. कारण त्याच्यासाठी जीवन जगायचे काही कारणच राहिलेले नव्हते. मीही तेथून निघून येथे, या अश्वत्थ वृक्षाखाली बसून विश्रांती घेत असतानाच, कोठून तरी अचानक हा बाण येऊन माझ्या पायात रूतून बसला. थोडासा रक्तपात झाल्यामुळे मला जराशी ग्लानी आली होती एवढेच. पण काळजी करण्याचे कारण नाही. तू स्वस्थ मनाने सर्वांच्या व विशेषतः बलरामाच्या मृतदेहावरील सर्व संस्कार नीटपणे पूर्ण कर आणि मग येथे ये. मी तुझी वाट पहात येथे थांबून आहे.”

कृष्णाचे बोलणे ऐकून उद्धवाच्या ठायी कृष्णाविषयी अधिकच काळजी निर्माण झाली. त्याच्या मनात एक प्रकारची कालवाकालवच सुरू झाली. कृष्णाला तशा अवस्थेत सोडून जाणे त्याला शक्यच होणार नव्हते. पण दुसरीकडे कृष्णाच्या बोलण्यातील आग्रहीपणा त्याच्या मनावर थोडेसे दडपण आणीत होताच. परंतु शेवटी उद्धवाने मनाठायी निश्चय केला आणि तो कृष्णाशी बोलू लागला.

“कृष्णा, एक गोष्ट मी तुला निक्षून सांगतो, की काही झाले तरी तुला अशा परिस्थितीत एकटा सोडून मी कोठेही जाणार नाही. मग त्यासाठी तू माझ्यावरती रागावलास तरी चालेल. तुझा तो राग एकवेळ मी सहन करीन, परंतु येथून मी अजिबात हलणार नाही. माझी इतर जी कर्तव्यकर्मे आहेत ती मी सावकाश सवडीने करीन. त्याला उशीर झाला म्हणून काहीही बिघडणार नाही. नाहीतरी ते सर्व क्रियाकर्म मृतदेहांसाठीचे आहे. परंतु येथे प्रत्यक्ष तुझ्या देहाला जखम होऊन रक्त वहात असताना, आधी तुला मदत करणे हेच माझ्यासाठी योग्य आहे. कृष्णा, तुझ्या मुखावरती जरी वेदनांची चिन्हे दिसत नसली तरी तुझ्या देहाला त्या होत असणारच. केवळ मनोबळाने तू सहन करीत आहेस एवढेच. बरे, तो बाणही तू मला बाहेर काढू देत नाहीस. खरे तर, तुझ्यावरती त्वरित इलाज करणे आवश्यक आहे. त्यासाठी मी धावत जाऊन एखाद्या वैद्याला तरी घेऊन येतो किंवा तुलाच हळूहळू धरून रथात बसवून वैद्याकडे नेतो. पण या दोन्हीला तुझी तयारी नाही. तुझ्या मनात काही वेगळेच विचार चाललेले



असावेत अशी मला दाट शंका येते आणि त्याचीच माझ्या मनाला अत्यंत भीती वाटत आहे. तुझा काय विचार किंवा इरादा आहे ते मला मोकळेपणाने सांग आणि मी तुझ्यासाठी निश्चित काय व कसे करू ते मला त्वरित सांग. माझ्या मनाची अत्यंत चलबिचल अवस्था झालेली आहे. कृपा करून माझा अंत पाहू नकोस. मी हे सहन करूच शकत नाही."

* * * * *

## उद्धवाला भागवत धर्माचा बोध

उद्धवाची केविलवाणी अवस्था पाहून कृष्णाला त्याची दया आली. उद्धवाचे कृष्णावरचे प्रेम कृष्ण जाणून होता. आलेल्या प्रसंगाला तो समर्थपणे सामोरा जाईल की नाही याची कृष्णाला खात्री वाटत नव्हती आणि म्हणूनच कृष्ण उद्धवाला काहीतरी कारण सांगून दूर जावयास सांगत होता. परंतु अखेर कृष्णाने मनाशी निश्चय केला आणि उद्धवाला खरी परिस्थिती काय आहे ते समजावून सांगण्याचे ठरवले. त्याने उद्धवाला खुणेने आपल्याजवळ बोलावले आणि त्याच्याशी अत्यंत प्रेमाने व आर्त सुरात बोलावयास सुरुवात केली.

“अरे उद्धवा, तुझ्या मनात जी शंका येत आहे ती खरीच आहे. माझ्या या देहाकडून या जगातील घडणारे कार्य आता संपलेले आहे आणि मी या देहाचा त्याग करून निजधामाला, म्हणजेच त्या परमेश्वराच्या परमधामाला प्रस्थान करीत आहे. प्रत्येक मानवी देहधारी जीवासाठी अशी वेळ काळाच्या ओघात केव्हा ना केव्हा ही येतच असते. त्यासाठी बाह्यांगाचे काही ना काहीतरी निमित्त होते एवढेच! माझ्यासाठी एका व्याधाच्या बाणाचे निमित्त झाले आहे आणि आता हा देह येथेच सोडून मी निघालो आहे. उत्पत्ती, स्थिती व लय हा या सृष्टीतील नियमच आहे आणि तो नियम अत्यावश्यकही आहे. कारण म्हणूनच या सृष्टीचा व्यवहार व्यवस्थितपणे चालू आहे. अनेक जीव जन्माला येऊन व काही काळ त्यांचे जीवन जगून देहाने मृत्यू पावतात, म्हणूनच नवीन जन्माला आलेल्या जीवांना त्यांचे जीवन जगण्याची संधी व वाव या सृष्टीत मिळत असतो, ही गोष्ट खरीच आहे. मृत्यूमुळे सर्वांच्याच जीवनाचा शेवट होतो. परंतु या सृष्टीमध्ये ईश्वराचे प्रेम अनुभवीत असताना व ईश्वराचे कार्य करीत असताना जो जीवनाचा शेवट होतो, तो शेवट अत्यंत गोड असतो. कारण असे भाग्यवान जीव हे ईश्वरी प्रेमाने स्वतःच गोड होऊन राहिलेले असतात आणि त्यामुळेच त्यांची जीवनेही आनंदाची होऊन राहिलेली असतात. माझ्याही जीवनाद्वारे असे परमेश्वरी कार्य घडले. मी केवळ त्यासाठी निमित्तमात्र झालो आणि आता परमेश्वरी नियतीनुसार मी

माझ्या मूळ स्थानाला निघालो आहे. तेव्हा तू आता शोक करीत न बसता मला प्रेमाने व आनंदाने निरोप देण्याचे कर.”

कृष्णाचे बोलणे सुरू असतानाच उद्धवाच्या नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या होत्या आणि तो मुसमुसून रडू लागला होता. कृष्णाचे बोलणे थांबल्यावरती उद्धवाच्या मनातील भावनेचे सर्व बांध फुटलेच आणि तो मोठमोठ्याने हुंदके देऊ लागला. कृष्ण हळुवार हाताने उद्धवाचे मस्तक थोपटून त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होता. शेवटी उद्धवाच्याच लक्षात आले, की त्याच्या हातातून वेळ निसटून चालली होती. म्हणून त्याने प्रयत्नपूर्वक स्वतःला कसेबसे सावरले आणि तो विनवणीच्या सुरात कृष्णाशी बोलू लागला.

“कृष्णा, अशी निर्वाणीची भाषा तू बोलू नकोस. मी ती ऐकूच शकत नाही. एवढे दिवस तू मला प्रेमाने वाढवलेस, प्रेमाने माझे जीवन घडवलेस आणि आता मला येथे एकट्याला सोडून तू कोठे निघून जात आहेस? तुझ्या विरहाची कल्पनाही जेथे मी करू शकत नाही, तेथे तुझा प्रत्यक्ष विरह सहन करणे मला कधीही शक्य होणार नाही. तुझ्या प्रेमाशिवाय माझे जीवन मृतप्रायच होऊन राहील. ते जगणे हे जगणे असूच शकणार नाही आणि तू नाहीस तर तुझे प्रेम तरी कसे व कोठे मिळणार? कृष्णा, असा निष्ठुर होऊन मला कायमचा सोडून जाऊ नकोस. तू गेल्यानंतर माझ्या जीवनाला काहीच अर्थ रहाणार नाही आणि मग असे निरर्थक जीवन संपवण्याशिवाय मला तरी दुसरा काहीच मार्ग दिसणार नाही, हे मी तुला निक्षून सांगतो. तेव्हा आता माझा अंत न पहाता माझ्यावर दया कर. पण तुझा तर हे जग सोडून जाण्याचा निश्चयच झालेला दिसत आहे. मग माझ्यासाठी एवढेच कर, की मला तुझ्यासंगे घेऊन चल. तू जेथे कोठे जात आहेस तेथे मी तुझ्यासंगे येणार म्हणजे येणारच! त्यासाठी मला कोणीही म्हणजे कोणीही, अगदी तूही अडवू शकत नाहीस हे तू लक्षात ठेव आणि त्याप्रमाणे आता काय तो निर्णय घे.”

उद्धवाला त्याचा शोकावेग अनावर होत होता आणि त्याच्या मुखातून धड शब्दही बाहेर फुटत नव्हते. परंतु त्याच्या नेत्रातून अश्रू मात्र

फुटून बाहेर पडत होते. उद्धवाची ती अवस्था पाहून कृष्णालाही अतिशय वाईट वाटत होतेच. परंतु त्याचाही नाइलाजच होत होता. उद्धवाचे सांत्वन कसे करावे हे कृष्णालाही कळेनासे झाले. काळ आला होता आणि वेळही संपत आलेली होती ही गोष्ट कृष्ण जाणून होता. म्हणूनच कृष्ण पुन्हा उद्धवाची समजूत घालू लागला.

“अरे उद्धवा, असे वेड्यासारखे करू नकोस. स्वतःला सावर आणि माझे सांगणे नीट ऐकून घे. माझे जे निजधाम आहे ते तर सर्वांचेच परमधाम आहे आणि सर्वांनाच त्याठिकाणी एक दिवस जायचे आहे. परंतु त्याठिकाणी या मानवी देहाने जाताच येत नाही, अशी त्या परमेश्वराची नियती आहे आणि त्या नियतीने सर्व म्हणजे सर्वच, अगदी मीही व तूही बांधले गेलेलो आहोत. कारण माझे काय किंवा तुझे काय देहाचे अस्तित्व हे खरेच नाही. अरे, आपण तर या पंचमहाभूतात्मक देहामध्ये काही काळ केवळ वास्तव्य करून असतो आणि वेळ झाली की या देहाचा त्याग करून आपल्या मूळ स्थानाला जाणे हे तर सर्वांनाच क्रमप्राप्त आहे. त्याला मीही अपवाद नाही व तूही अपवाद नाहीस, ही गोष्ट जाणून घे आणि त्याचा तुझ्या बुद्धीच्याठायी निश्चय कर. म्हणजे तुझ्याठायी विवेक जागा होईल आणि वस्तुस्थिती स्वीकारून तिला सामोरे जाण्याचे बळ तुझ्या मनाला प्राप्त होईल.

उद्धवा, आपला देह ही आपली खरी ओळखच नाही. या देहात आत्म्याच्या रूपाने वास्तव्य करून असलेला ईश्वर, हीच आपली खरी ओळख आहे आणि ईश्वर ना कोठे जातो ना कोठे येतो. जातो-येतो तो हा नश्वर देह. म्हणूनच देह संपला तरी आपले अस्तित्व कायमच असते. देहाचे रूप येते नि जाते परंतु ईश्वर नाही असे कधीच होत नाही. तो सदा सर्वकाळ आहेच. तेव्हा आत्म्याचे अस्तित्व ओळखले तरच या देहाला तो असेपर्यंत काहीतरी किंमत आहे. नाहीतर त्या देहाचे अस्तित्व फुकटच आहे आणि त्याचे व्यर्थ ओझेच आहे. परंतु मानवी देहाने असेपर्यंत ज्यांना या ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव होते, तेच मानवी जन्मात त्या ईश्वराच्या प्रेमाचा अनुभव घेतात आणि त्यांच्याचकडून कृतज्ञताभावाने ईश्वराचे कार्यही घडत रहाते. ईश्वराचे कार्य सेवाभावाने करीत असतानाच ईश्वरी प्रेमाचा आनंद ते अनुभवतात आणि एक दिवस निसर्गधर्मानुसार या



देहाचा त्याग करून ते भाग्यवान आपल्या ईश्वरी स्वरूपात विलीन होतात.”

कृष्णाचे बोलणे ऐकून उद्धवाने थोडासा विचार केला आणि तो कृष्णाला म्हणाला, “अरे कृष्णा, तू सांगत असलेली ही ज्ञानवचने खरी असतीलही. माझ्या बुद्धीला ती कळतातही. पण माझे मन मात्र एकच गोष्ट मला वारंवार सांगते, की फक्त तुझे प्रेमच खरे. मी भाग्यवान असा की तुझे प्रेमच मला जीवनभर मिळत राहिले आणि आता तुझ्या जाण्याने माझे भाग्यच मला सोडून जात आहे. तू सांगितलेल्या ज्ञानाने माझ्या मनाची समजूत जरी मी घातली, तरी त्या मनाला तुझ्या ज्या प्रेमाची सवय व चटक लागलेली आहे, ते प्रेम मी त्या मनाला कोठून देऊ? तुझ्यासारखे प्रेम देणारा या जगात दुसरा कोणीही असणे शक्यच नाही. तेव्हा हे जग सोडून जाण्याचा जर तुझा निश्चयच झाला असेल, तर तुझ्यासंगे येण्याचा माझाही निर्धारच झालेला आहे. आवश्यक असल्यास त्यासाठी माझ्या देहाचा त्याग करण्याचीही माझी तयारी आहे. जसा मी तुला जाण्यापासून थांबवू शकत नाही, तसा तूही मला तुझ्यासंगे येण्यापासून थांबवू शकत नाहीस.”

असे म्हणत असताना उद्धवाला अधिकच उमाळा आला आणि तो पुन्हा स्फुंदू लागला. उद्धवाची ती भावनाविवश अवस्था पाहून कृष्णालाही वाईट वाटलेच. पण त्याच्याठायी उद्धवाविषयी अधिकच काळजीही निर्माण झाली आणि त्याच काळजीने तो उद्धवाला म्हणाला,

“उद्धवा, असा भावनेच्या आहारी जाऊन मनाने दुर्बल होऊ नकोस. माझे प्रेम तुझ्याठायी असताना मनाची अशी दुर्बलता योग्य नाही. खऱ्या प्रेमाचे ते लक्षणच नव्हे. खरे प्रेम हे मनाला सबळच करते आणि प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्याचे धैर्यच देते. जेथे माझे प्रेम आहे तेथे कशाचा म्हणजे कशाचाही, अगदी माझाही मोह नाही हे लक्षात ठेव. कारण मोह हाच मनाला दुर्बल करीत असतो. मी म्हणजे केवळ माझा देह नव्हे, तर मी म्हणजे माझ्याठायी असलेले निरपेक्ष व निःस्वार्थ प्रेम होय आणि त्या प्रेमालाच ईश्वरी प्रेम असे म्हणतात. ते ईश्वरीप्रेम अनुभवण्यासाठी देह हे

माध्यम व केवळ साधन आहे. त्यामुळे देह जरी नाश पावला तरी ईश्वरी प्रेम अविनाशी असल्यामुळे ते कुठल्या ना कुठल्यातरी रूपाने प्रगट रहात असतेच. फक्त ते ओळखता आले पाहिजे आणि त्याचा अनुभव घेता आला पाहिजे.

एक गोष्ट लक्षात ठेव, की मी देहाने नसलो तरी माझे प्रेम तुझ्याठायी रहाणारच आहे. ज्याप्रमाणे साखर व गोडी हे एकरूप असतात, तसेच मी व माझे प्रेम हे एकरूपच आहेत. साखर विरघळल्यानंतर जशी गोडीरूपाने शिल्लक रहाते, तसाच मी तुझ्याचठायी माझ्या प्रेमरूपाने कायमचा रहाणार आहे. माझे प्रेम तुझ्यासंगे सदैव राहील, म्हणजे मीच तुझ्यासंगे सदैव राहीन. तेव्हा तुला जरी माझ्यासंगे देहरूपाने येता येणे शक्य नसले, तरी मला प्रेमरूपाने तुझ्यासंगे ठेवणे मात्र तुला सहज शक्य आहे आणि तसाच अनुभव तुला येणारही आहे. कारण तुझ्या कळत नकळत तुझ्या हृदयामध्ये मी प्रेमाचे स्थान घेतलेले आहे आणि त्याचठिकाणी तुला माझ्या अस्तित्वाचा अनुभव नित्य येत राहील. एवढेच नव्हे, तर तुझे अस्तित्व हेच माझेही अस्तित्व होऊन राहील.

उद्धवा, तुला आठवत असेलच, की मी गोकुळातून मथुरेला निघून आल्यानंतर तू एकदा गोकुळात जाऊन आला होतास. खरे तर, त्यावेळी मी तुला मुद्दामच त्याठिकाणी पाठवले होते. गोकुळात तुझी व राधेची भेट नक्कीच झाली असणार आणि तेथे माझ्या प्रेमाने युक्त होऊन, आनंदाने जीवन जगणारी राधा तुला पहावयास मिळाली असणार याची मला खात्री आहे. राधारूपाने जर तुला माझ्या प्रेमाचे दर्शन होऊन माझीच भेट घेतल्याचा आनंद झाला होता, तर तुझ्या रूपानेही तुला माझीच भेट घेतल्याचा आनंद होईलच. गोकुळ सोडून निघतानाही मी राधेच्याठायी असलेल्या माझ्या प्रेमाचा, म्हणजेच माझ्या अस्तित्वाचाच, केवळ भरवसाच नव्हे, तर विश्वासच धरला होता आणि त्याप्रमाणे राधेने अनुभव घेतला असणार याची मला पूर्ण खात्री आहे. त्याचप्रमाणे आज, आता या क्षणी हे जग सोडून जाताना मी तुझ्याठायी असलेल्या माझ्या प्रेमाचाच विश्वास बाळगून आहे. कारण राधेप्रमाणे तुझ्याठायीसुद्धा माझ्या प्रेमाचे मूळ अत्यंत खोलवर जाऊन रूजलेले आहे आणि ते प्रेम



त्याच्या सर्व गुणधर्मानुसार तुझ्याकडून अनुभवाने प्रगट होईल याची मला पूर्ण खात्री आहे."

बोलत असताना कृष्णाचा सूर मंद होऊ लागला होता. बोलताना कृष्णाला कष्ट होत आहेत हे उद्धवाला जाणवले आणि पुढे होऊन उद्धवाने कृष्णाचा हात आपल्या हातात धरला. कृष्णाने एकदा उद्धवाच्या नजरेत त्याची नजर मिळवली आणि मंदस्मित केले. उद्धव सावरला आहे हे कृष्णाने ओळखले. एवढेच नव्हे, तर उद्धवाच्या नजरेतील निश्चयात्मकताही कृष्णाच्या लक्षात आली आणि कृष्णालाही समाधान झाले. थोड्यावेळाने उद्धवाने अत्यंत शांतपणे कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली.


"कृष्णा, खरेच तुझे माहात्म्य अत्यंत अद्भुतच आहे. तुझे प्रेम मिळणे हे जेवढे भाग्याचे आहे, त्यापेक्षाही तुझे व तुझ्या प्रेमाचे माहात्म्य कळणे हे अधिक भाग्याचे आहे असेच म्हणावे लागेल. कारण तुझे माहात्म्य कळले तरच तुझे प्रेम खऱ्या अर्थाने मिळाले असे म्हणता येईल. नाहीतर ते प्रेम सुखाच्या पलिकडे कधी जाणारच नाही. या सुखामुळेच तुझ्याविषयीही एक प्रकारचा मोहच निर्माण होतो आणि त्यामुळेच तुझ्या प्रेमाचे माझ्याकडून अवमूल्यनच घडत होते. एक प्रकारे तुझ्या खऱ्या प्रेमाचा माझ्याकडून अवमानच घडत होता. परंतु तू तुझ्या खऱ्या प्रेमाला जागलास आणि माझ्या दृष्टीवर आलेली ही मोहाची झापड दूर करून तू तुझे खरे प्रेम माझ्या दृष्टीस आणून दिलेस. तुझ्याही मोहात तू मला ठेवत नाहीस. म्हणूनच तुझे प्रेम हेच सत्य आहे. राधेचे स्मरण करून देऊन, तिच्या भेटीत तुझीच भेट मी घेतल्याची आठवण करून दिलीस, हे तुझे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तुझ्या ऋणातून कसे मुक्त व्हावे हेच मला कळत नाही. आता तुझ्यासाठी मी काय करू ते तू मला सांग. मी तर तुझ्यासाठी माझे प्राणही द्यावयास तयार आहे."

असे म्हणता म्हणता उद्धवाला अतिशय गहिवरून आले आणि कृष्णही अत्यंत सद्गदित झाला. कृष्णाने बसल्या जागेवरूनच उद्धवाचा हात स्वतःच्या हातात घेतला आणि उद्धवाच्या नेत्रात रोखून पहात म्हणाला,

"अरे उद्धवा, मला तुझे प्राण नको आहेत, तर मला तुझे जीवनच हवे आहे. अधर्माला आवर घालू सद्धर्माला रक्षण व उभारी देण्याचे माझे कार्य अजून अपुरेच आहे. खरे तर, माझी जीवनयात्रा पूर्ण होऊन संपेल, परंतु माझे जीवनकार्य मात्र कधीच पूर्ण होणार नाही. कोणत्या ना कोणत्या देहाच्या माध्यमाने ते ईश्वरी कार्य चालूच राहील. त्यासाठीच मला तुझा देहच हवा आहे. तुझ्या हृदयात अधिष्ठित राहून, तुझ्या देहाच्याद्वारे माझे धर्मकार्य मला यापुढेही चालू ठेवायचे आहे. माझ्या प्रेमाने व माहात्म्याने भरलेले तुझे हृदय हेच माझे निजधाम आहे आणि तेथेच कायमची वसती करून, तुझ्या देहाद्वारे मी नित्य कार्यरत राहीन. तुझ्या जीवनातून माझेच प्रेम व माहात्म्य सदैव वहात राहील आणि त्यामुळे सामान्य जनांनाही त्यांच्या कल्याणाचा मार्ग उपलब्ध राहील.

उद्धवा, पुढे कलियुगाचा खडतर काळ येणार आहे आणि निःस्वार्थी व निरपेक्ष अशा ईश्वरी प्रेमाचा लोपच होणार आहे. सर्व जन स्वार्थी व मतलबी तर होतीलच, परंतु कर्मकांडाचे स्तोम माजून लोक ढोंगी होतील आणि शब्दज्ञानाच्या मागे लागून अहंपणा मिरवत रहातील. पण मनातील वासना व बुद्धीठायीचा अहंकार नष्ट न झाल्यामुळे असे लोक स्वतः तर अधोगतीला जातीलच, पण त्याचबरोबर इतरांच्याही अधोगतीला कारणीभूत होतील. तेव्हा मनाला शुद्ध करणाऱ्या ईश्वराच्या सगुण प्रेमाचा व अहंकाराचे समूळ उच्चाटन करणाऱ्या ईश्वराच्या सगुण भक्तीचा हा भागवतधर्म तू जागा ठेव आणि त्याचाच प्रसार करीत रहा. त्यामुळे सामान्यांची कमीत कमी अधोगती तरी टळेल आणि त्यांचा उद्धार निश्चितपणे होईल. त्यातूनच एखाद्याला ईश्वरप्राप्तीचा ध्यास लागण्याची शक्यता आहे आणि मग सगुण प्रेमभक्तीच्या या मार्गाचे अवलंबन करून, ईश्वरप्राप्तीचा आनंद अनुभवणेही त्याला शक्य होईल.

उद्धवा, पुढील काळामध्ये सामान्य सांसारिक जन ईश्वरापर्यंत येऊन पोहोचणे हे कठीण व दुस्तरच होईल. त्यासाठी तूच स्वतः सामान्य जनांपर्यंत पोहोचण्याचे कर. सांसारिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन कर आणि त्यांच्या सुखदुःखाशी समरस होऊन त्यांना मानसिक आधार दे. त्याचबरोबर त्यांना ईश्वराच्या अवतारचरित्रांतील सगुणकथा सांगून, त्यातील रहस्य उलगडून दाखव आणि महात्म्यांच्या अंतरातील



ईश्वरी अनुभवाचे गूज स्पष्ट करून सांग. त्यामुळेच सामान्य जनांच्या ठायी ईश्वराविषयीचा आस्तिक्यभाव तर टिकून राहीलच, पण त्यांच्याठायी हळूहळू ईश्वराविषयी आस्था व आपलेपणाही निर्माण होत राहील. हे सर्व तुझ्याकडून कसे घडेल याची तू मुळीच काळजी करू नकोस. हे सर्व तुझ्याकडून सहजपणे घडणारच आहे. कारण तुझ्या अंतरात माझे प्रेम अनुभवण्याच्या उर्मी सतत उठत रहातील आणि त्या तुला स्वस्थ बसू देणारच नाहीत, तर सतत कार्यरत ठेवतील. सगुण कथांचे गायन व कीर्तन करून तुझा प्रेमानंद तू सतत अनुभवत रहाशील आणि त्याद्वारेच सगुण प्रेमभक्तीचा आनंददायी मार्ग प्रगट होत राहील. हीच ती ईश्वराची सेवा! हीच ती अखंड घडणारी ईश्वराची भक्ती आणि हेच ते ईश्वराचे धर्मकार्य! आता तू येथे जराही न थांबता त्वरीत बद्रीकाश्रमाला जा आणि ध्यानस्थ राहून चिंतन कर. तुझ्या पुढील जीवनाचा मार्ग तुझ्या दृष्टीसमोर सहजपणे जसा येईल तसा पुढे तू पुढे जात रहा. जीवनाच्या पूर्तीनंतर तू माझ्या परमानंदाच्या परमधामाला येऊन प्राप्त होशील."

कृष्णाचे बोलणे होत असतानाच त्याचे मुखकमल अत्यंत प्रसन्न दिसत होते. त्याच्या मुखावर अत्यंत तेजस्विता झळाळून राहिलेली होती. कृष्णाच्या त्या दिव्य व सुंदर रूपाला उद्धवाने दोन्ही कर जोडून वंदन केले. अत्यंत भावपूर्ण झालेल्या उद्धवाच्या मुखातून त्याच्या अंतरातील कृतज्ञता व भक्तिभाव प्रगट होऊ लागला.

"कृष्णा, तू तर परमात्मस्वरूप आहेस. पण माझ्याठायी तू आत्मरूपाने रहाणार आहेस, ही तुझी माझ्यावरील अनंत कृपाच आहे. या कृपेला तुझ्याच प्रेमाने मी पात्र होईन, असा आत्मविश्वास माझ्याठायी तुझ्यावरील प्रेमानेच निर्माण झालेला आहे. तुझ्या प्रिय उद्धवाला तू तुझ्याबरोबर घेऊन जाणार आहेस आणि माझा प्रिय कृष्ण माझ्या अंतरात बसून माझ्या रूपाने विहार करणार आहे. माझ्या काया, वाचा व मना द्वारे एकीएक माझा कृष्णच प्रगटणार आहे आणि त्याचे सगुण प्रेमभक्तीचे कार्य करीत रहाणार आहे. त्यातच माझ्या जीवनाची सार्थकता आहे आणि धन्यताही आहे.

कृष्णा, तुझ्या पवित्र चरणी प्रेमाची एकच विनवणी आहे. तुझेच प्रेम माझ्या अंतरात नित्य वाढत राहून ते वहात राहो. आतापर्यंत तुला पाहून जे प्रेम मनात निर्माण होत असे आणि तुझे जे प्रेम सेवून माझ्या मनाची तृप्ती होत असे, तेच प्रेम यापुढे तुझ्या भक्तांच्या संगतीत मला नित्य अनुभवता यावे. तुझ्या गुणगान श्रवणासाठी नित्य आतुरणाऱ्या आणि तुझ्या प्रेमवर्णनात सहज रमणाऱ्या माझ्या मनाची ती आस, तुझ्या भक्तांच्या प्रेमळ वचनांद्वारे पूर्ण व्हावी. माझ्या अंतरात प्रेमाच्या लहरी उठवणारे तुझे प्रेमहास्य बघण्यासाठी तुझ्या दर्शनाची अत्यंत ओढ असलेल्या मला, तुझे ते प्रेमळ दर्शन तुझ्या भक्तांच्या प्रेमभेटीतून व्हावे. तुझे प्रेमस्वरूप हे माझे हृदयच होऊन रहावे आणि तुझ्या प्रेमरसाच्या ग्रहणातील परमानंद मला नित्य लाभो एवढेच शुभाशीष तुझ्या चरणी विनम्रभावाने मागत आहे.”

उद्धवाच्या या भक्तिभावपूर्ण आळवणीने कृष्णाचे हृदय भरून येऊन नेत्रातून वाहू लागले. कृष्णाने हलकेच आपला उजवा हात वर करून ‘तथास्तु’ची खूण केली आणि उद्धवाला वरदान देऊन उत्स्फूर्तपणे आपल्या चरणपादुका त्याला दिल्या आणि कृष्णाने त्याचे नेत्र मिटून घेतले. कृष्णाच्या त्या रमणीय रूपाचे दर्शन अंतरात साठवून आणि त्याच्या चरणपादुका आपल्या हृदयाशी धरून उद्धव तेथून अत्यंत जड पावलांनी निघाला.

* * * * *



## कृष्णाचे निर्याण

हे लक्ष्मी, कृष्ण अशा तऱ्हेने निर्वाणीच्या ध्यानस्थ अवस्थेत बसलेला असतानाच त्याठिकाणी अचानक मैत्रेय ऋषींचे आगमन झाले. आत्मज्ञानी असलेले मैत्रेय, कृष्णाचे माहात्म्य पूर्णपणे जाणून होते आणि कृष्णाच्या दिव्य चरित्राने ते अत्यंत प्रभावित झालेले होते. कृष्णाला पहाताच मैत्रेय अत्यंत आनंदाने कृष्णाच्या सन्मुख आले. कृष्णाची ती निर्वाणीची अवस्था मैत्रेयांनी लागलीच ओळखली आणि तेही एकदम भावपूर्ण झाले. पुढे वाकून त्यांनी कृष्णाच्या चरणांना स्पर्श केला आणि कृष्णाला भक्तिभावाने वंदन केले. मैत्रेयांच्या स्पर्शाने कृष्ण किंचितसा भानावर आला आणि त्याने नेत्र उघडून पाहिले. समोर मैत्रेयांना पाहून कृष्णाने त्याही अवस्थेत सहज स्मित केले. मैत्रेयांचे पाणावलेले नेत्र पाहून कृष्णही भारावला, परंतु मुखावरील शांत भाव कायम ठेवून कृष्ण मैत्रेयांना म्हणाला,

“अहो मैत्रेय ऋषी, तुम्ही अगदी वेळेवर आलात. माझ्या निर्याणसमयी तुमच्यासारख्या महात्म्यांचे आगमन झाले हे शुभचिन्हच आहे. परंतु मला तुम्हाला एक विनंती करावयाची आहे. यावेळी मला माझ्या प्रिय विदुराची प्रकर्षाने आठवण येत आहे. माझ्यावर पहिल्यापासूनच जीवापाड प्रेम करणारा हा विदुर, नित्य माझ्याच स्मरणात असतो. त्याच्या ध्यानी मनी मीच एकीएक असतो. परंतु त्याच्या बाबतचे माझे कार्य मात्र अपुरेच राहिले. त्याच्या माझ्याविषयीच्या भक्तिभावाची मी पूर्ती करू शकलो नाही, याचे मला नेहमीच वाईट वाटत असे. परंतु ती पूर्ती आता माझ्या वतीने तुम्ही करावी. आधी माझ्या देहत्यागाची बातमी तुम्ही त्याला जाऊन सांगावी. साहजिकच तो अत्यंत शोकाकुल होईल. तेव्हा तुम्ही त्याचे सांत्वन करावे. एवढेच नव्हे, तर सर्वश्रेष्ठ अशा आत्मज्ञानाने त्या विदुराला बोधीत करावे. त्याला म्हणावे, ‘कृष्ण जरी आता रूपाने नसला, तरी तुझ्याठायी आत्म्याच्या रूपाने कृष्णच नित्य वास करून आहे हे लक्षात ठेव. त्याच कृष्णाच्या संगतीत नित्य राहून त्याचे प्रेमळ अस्तित्व सतत अनुभवीत रहा आणि त्याच कृष्णप्रेमाने युक्त होऊन तुझे जीवन आनंदाने जगत रहा.’

मैत्रेय ऋषी, माझा निर्याणाचा क्षण आता जवळ येत आहे. तेव्हा आता तुम्ही येथे क्षणभरही थांबू नका. विदुराची त्वरित भेट घ्या आणि त्याला माझा निरोप सांगा. तुम्ही स्वतः आत्मज्ञानी आहात आणि ईश्वरी प्रेमाचा अनुभव तुम्ही तुमच्या हृदयात नित्य घेत असता. म्हणूनच माझ्या या अंतिम इच्छेची व विदुराच्या भावाची पूर्ती करण्यासाठी तुम्हीच अत्यंत योग्य आहात हे मी जाणून आहे.”

कृष्णाचे ते बोलणे ऐकून मैत्रेयांचे पाणावलेले नेत्र भरभरून वाहू लागले. त्यांना गहिवर तर अनावरच झाला. तशाच अवस्थेत त्यांनी दोन्ही कर जोडून कृष्णाला नमस्कार केला आणि ते म्हणाले,

“कृष्णा, तुझी खरोखरीच धन्य आहे. निर्याण समयीसुद्धा तुला तुझ्या प्रिय भक्ताची आठवण होऊन त्याच्याविषयी काळजी वाटावी, एवढेच नव्हे, तर त्या भक्ताचे कल्याण व्हावे हीच आर्त इच्छा तुझ्याठायी असावी, हे तुझ्या व्यापक अंतःकरणाचेच द्योतक आहे. भक्तकल्याणासाठी तुझे तीळतीळ तुटणारे अंतःकरण पाहिले की नम्रतेने नतमस्तकच होणे घडते. त्यातूनही तू तुझ्या या कार्यपूर्तीसाठी मला योग्य समजावेस, हे तर माझे परमभाग्यच आहे. तुझ्या जीवनकार्यामध्ये शेवटच्या क्षणी मला थोडी तरी सेवा करायची संधी मिळत आहे यातच मी स्वतःला धन्य समजत आहे.”

असे म्हणून मैत्रेयऋषींनी कृष्णाला पुन्हा एकदा वंदन केले आणि कृष्णाची आज्ञा प्रमाण समजून ते तेथून त्वरेने निघाले खरे, परंतु त्यांना तेथून निघवेना. कृष्णाचे निर्याण पहाण्याची तीव्र इच्छा मैत्रेयांच्या मनामध्ये निर्माण झाली आणि तेथेच एका वृक्षाच्या मागे उभे राहून त्यांनी त्यांची इच्छापूर्ती केली.

लक्ष्मी, कृष्ण पूर्णपणे अंतर्मुख झाला. स्वतःचे मन त्याने मनाच्या सर्व वृत्तींसह चित्तामध्ये लयाला नेले आणि चित्ताठायी सर्व प्राणांचा अवरोध केला. सर्व योग्यांचाही योगेश्वर असलेल्या कृष्णाने चित्ताठायी रोखून धरलेली प्राणशक्ती पूर्णपणे उर्ध्वगामी केली आणि क्षणार्धात् जशी एखादी वीज चमकून जावी तसे कृष्णाचे आत्मस्वरूप व्यापक परमात्मस्वरूपात विलीन झाले. परंतु तरीही कृष्णाच्या मुखावरील शांती, तेज व प्रसन्नता



कायमच होती. कृष्णरूपाने अंशमात्राने प्रगटलेल्या या नारायणाच्या सगुणावताराची जरी समाप्ती झाली, तरी पुढील काळात सगुण प्रेमभक्तिमार्ग मात्र अखंड प्रगट राहिला. कृष्णावतार संपला तरी कृष्णचरित्र मात्र संपले नाही आणि ते कधी संपणारही नाही. आपल्या भक्तांच्या हृदयामध्ये नित्य वास करून कृष्ण तेथे नित्य प्रेमाने खेळून त्याच्या प्रेमलीला प्रगट करीतच रहातो आणि परमानंदाचे अनेक व नानाविध रंग उधळीतच रहातो."

* * * * *

# उपसंहार

नारदाचा शब्दप्रवाह थांबला कारण त्याच्या अंतःकरणात नारायणाच्या सगुण प्रेमाचा प्रवाह एवढ्या जोराने वाहू लागला, की त्याचा वेग व आवेग झेपणे शब्दांना केवळ कठीणच नव्हे तर अशक्यच होऊन राहिले. लक्ष्मीलाही नारदाच्या मुखातून प्रगटणाऱ्या त्या शब्दप्रवाहाची आवश्यकता आता राहिली नव्हती. त्या शब्दप्रवाहाचे कार्य पूर्ण झाले होते आणि लक्ष्मीच्या अंतरातही प्रेम प्रवाही होऊन त्याचे पूरच लोटले होते. लक्ष्मीच्या मुखावरती भक्तिभावाचा आनंद पूर्णपणे पसरला होता, तर नारदाच्या मुखावरती परमानंदाची परमतृप्ती विलसत होती. असा किती काळ गेला असेल हे समजणे कठीणच होते. कारण काळाचे भानच तेथे उरले नसल्यामुळे काळाची गणती करता येणे शक्यच नव्हते. परंतु ज्या शब्दप्रवाहामुळे लक्ष्मीची भक्तिभावपूर्ण अवस्था होऊन ती निःशब्द झाली होती, तो शब्दप्रवाह पुन्हा प्रगट होण्यासाठी लक्ष्मीची भक्तिभावपूर्ण अवस्था हीच कारण ठरली आणि भक्तिभावाचा आनंद व्यक्त होण्यासाठी शब्दप्रवाह हेच माध्यम झाले. लक्ष्मीच्या मुखातून तिच्या नकळतच आनंदाचे शब्द बाहेर पडू लागले.

"नारदा, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. कृष्णाच्या जीवनगाथेचे वर्णन जरी तू थांबवलेस, तरी कृष्णचरित्र संपले आहे असे मात्र मलाही मुळीच वाटत नाही. कारण कृष्णप्रेमाचा नाद अजूनही माझ्या अंतरात घुमतो आहे. आणि कृष्णभक्तीचा आनंद अजूनही माझ्या अंतरात खेळतो आहे. सगुण प्रेमभक्तीचे कारणही कृष्णच आहे आणि त्याचे कार्यही कृष्णच आहे. कारण कृष्णाच्या प्रेमस्वरूप अवस्थेमुळेच त्याच्या भक्तांना सगुण प्रेमभक्तीचा आनंद अनुभवता येतो आणि या आनंदाच्या अनुभवामुळेच त्याच्या भक्तांना कृष्णाची प्रेमस्वरूप अवस्था प्राप्त होते, म्हणजेच त्यांना प्रत्यक्ष कृष्णाचीच प्राप्ती होते. कारण कृष्णाचे प्रेमस्वरूप म्हणजेच प्रत्यक्ष कृष्ण होय! हेच तर कृष्णाचे कार्य होते आणि आहेही. खरोखरी, कृष्ण म्हणजे सगुण प्रेमभक्तीच्या आनंदाचे कारण व कार्य यांचे ऐक्यच होय. हे ऐक्य ज्याठिकाणी अनुभवाला येते, तेथेच कृष्णाचे अस्तित्व आहे आणि असे ऐक्य कृष्णाचे भक्त त्यांच्या हृदयातच नित्य अनुभवतात. म्हणूनच



कृष्णाच्या भक्तांचे हृदय हेच कृष्णाच्या अस्तित्वाचे एकमेव स्थान होय. त्या हृदयीच कृष्णप्रेम खेळत रहाते आणि त्याच हृदयात कृष्णभक्तीचा आनंद होत रहातो.

नारदा, असे हे कृष्णाचे प्रेम त्याच्या जीवन चरित्रातून भरभरून प्रगट झाले. त्याचा लाभ कृष्णाच्या सहवासात भाग्याने आलेल्या सर्वांना जरी मिळाला, तरी त्याचा पूर्ण लाभ कोणी करून घेतला, हे जाणून घेणे मला अत्यंत आवश्यक वाटते. कारण भक्तांच्या भक्तिभावाची खरी कसोटी ही कृष्णाच्या निर्याणानंतरच लागली असणार. कृष्णाचे खरे भक्त कोण होऊन राहिले हे तेव्हाच कळणार होते, जेव्हा कृष्णाचे देहाचे अस्तित्व राहिले नव्हते. कृष्णचरित्रातील काही विशेष व्यक्तिरेखांच्या माध्यमाने तू कृष्णचरित्र रंगवीत होतास. परंतु त्यातील कितीजणांना कृष्णाचा प्रेमरंग लागला, कितीजण कृष्णप्रेमाने पूर्णपणे रंगले आणि कितीजणांच्या अंतरंगात कृष्णभक्तीचा रंग कायमचा रंगत राहिला, हे सर्व त्यांच्या पुढील जीवनावरूनच कळणार होते. काहीजणांच्या मनात कृष्णप्रेमाने निश्चितच प्रवेश केलेला होता. काहीजणांचे मन कृष्णप्रेमाने पूर्णपणे भरलेलेही होते. परंतु कोणाचे अंतरंगच कृष्णप्रेमाचे होऊन राहिले होते का? कृष्णाने तर सर्वांचाच भरवसा धरलेला होता. कारण त्याच्याठायी स्वतःच्या ईश्वरी प्रेमाविषयी पूर्ण खात्री होती. मग कृष्ण कोणाचे अंतःकरणच होऊन राहिला आहे, हे त्यांच्या जीवनाद्वारे सिद्ध झाले का? हे प्रश्न म्हणजे माझ्याठायीच्या शंका नसून, भक्तिभावाचे फळ कसे असते हेच केवळ मला समजून घ्यायचे आहे."

लक्ष्मी केवळ विषय समजावून घेण्यासाठी प्रश्न विचारीत नसून, तिला भक्तिभावाचा गाभा जाणून घ्यायचा आहे, हे नारदाने तात्काळ ओळखले आणि त्याने लक्ष्मीच्या भावाला कौतुकाने मान डोलवून दाद दिली. क्षणभर थांबून नारद विचारपूर्वक बोलू लागला.

"हे लक्ष्मी, तुझ्या विचारांची दिशा अगदी योग्य असून, प्रगटलेल्या विषयाच्या अंतरंगाचा शोध घेणारी आहे. कारण कृष्णप्रेमाने मनात प्रवेश केल्यानंतर त्या प्रेमाने अंतःकरणाचा ठाव घेण्यापर्यंतचा त्या प्रेमाचा

प्रवास, म्हणजेच तर तो सगुणभक्तीचा मार्ग आहे. आणि अंतःकरणच कृष्णमय होऊन रहाण्यामध्येच त्या मार्गाची समाप्ती नव्हे, तर पूर्ती आहे. पण या मार्गातील वाटचालीची लक्षणे बाह्यांगाने जीवनात निश्चितच प्रगट होत असतात. या दृष्टीने कृष्णाच्या प्रेमीजनांच्या पुढील जीवनात त्यांनी काय व कसा अनुभव घेतला हे जाणून घेणे अत्यंत आवश्यकच आहे. कारण त्यामुळेच भक्तिमार्गातील वेगवेगळया अवस्था साकार होतील आणि कोणाला काय व कशा मर्यादा आल्या हे प्रगट होईल. त्याचप्रमाणे भक्तिभावाची पूर्णावस्था कशी असते याची लक्षणेही स्पष्ट होतील.

लक्ष्मी, कृष्णाच्या गोकुळातील जीवनाविषयी मी तुला मागेच सांगितलेले आहे. त्या ठिकाणी पेंद्याचे थोडेसे व राधेचे बरेचसे विशेष प्रेमाचे संबंध कृष्णाशी आले. त्यापैकी पेंद्याचे कृष्णावर न रागावता असलेले निरागस प्रेम कृष्णाला अत्यंत भावले आणि त्यातून कृष्णाचे व्यक्तिगत प्रेम पेंद्याच्या मनात भरून राहिले. परंतु कृष्ण गोकुळ सोडून गेल्यावरती मात्र पेंद्याच्या मनात पोकळी निर्माण झाली. पेंद्याच्या सुदैवाने त्याला राधेच्या रूपाने कृष्णप्रेम मिळत राहिले आणि त्याची कृष्णप्रेमाची कमतरता भरून निघाली. त्यामुळे पेंद्याचे पुढील सर्व जीवन निश्चितच सुखासमाधानाचे झाले. कृष्ण व राधा यांचे मात्र अत्यंत जवळीकतेचे संबंध निर्माण झाले. कृष्णाचा सहवास, सहवासात कृष्णाच्या प्रेमाचा सर्वांगाचा अनुभव, कृष्णाचे प्रत्यक्ष मार्गदर्शन, कृष्णाशी झालेला संवाद या सर्वांतून राधेचे कृष्णाशी सूर जुळले आणि तिच्या ठिकाणी कृष्णाच्या माहात्म्याची जाणीव निर्माण झाली. त्याचीच परिणती राधेच्याठायी कृष्णाविषयी भक्तिभाव निर्माण होण्यात झाली आणि राधा कृष्णाची प्रिय सखी होऊन राहिली. एवढेच नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीतही राधेच्याठायीचा भक्तिभावाचा ध्यास कायम राहून वाढतच राहिला. या ध्यासानेच राधेचे अंतःकरणच कृष्णमय होऊन राहिले. त्यामुळे जेव्हा कृष्णाचे गोकुळ सोडून मथुरेला जाणे घडले, तेव्हा राधेला तिच्या अंतःकरणात कृष्णाचा वियोग जाणवलाच नाही. राधा भक्तिभावाने कृष्णाची होऊन राहिली आणि कृष्ण अनुभवाने राधेचा होऊन राहिला. त्यामुळे राधा तिचे पुढील सर्व जीवन कृष्णच होऊन, म्हणजेच कृष्णाच्या वृत्तीनेच जगली. कृष्णभक्तीचा आनंद राधा तिच्या



अंतःकरणात सदैव अनुभवीत राहिली. परंतु तिचा हा अनुभव तिच्यापुरताच मर्यादीत होता. राधेचे बाह्यांगाचे जीवन मात्र अत्यंत साधे, सरळ व मर्यादशील राहिले. राधेच्या बाह्यजीवनातून तिच्या आंतरिक अवस्थेची लक्षणे तर निश्चितच प्रगटली. परंतु तिची आंतरिक आनंदाची अवस्था मात्र दुसऱ्यांसाठी अप्रगटच राहिली. अर्थात राधेच्या दृष्टीने तिचा आनंद बाह्यांगाने प्रगट होण्याची आवश्यकता नव्हतीच आणि तशी शक्यताही नव्हती.

लक्ष्मी, गोकुळानंतर कृष्णाचे जीवन बाह्यांगाने अत्यंत व्यापक होत राहिले. परंतु त्यातही त्याच्याठिकाणी गोकुळात अनुभवलेल्या प्रेमाची भूक कायम राहिली आणि तो सदैव भक्तिभावाच्या शोधात राहिला. कारण कृष्णाचीही ती आंतरिक गरज होतीच. भक्तिभावाच्या द्वैतामुळेच आनंदाचा अनुभव हा अंतर्बाह्य अशा दोन्ही अंगाने येतो. बाह्यांगाने प्रेमाच्या देवाणघेवाणीचा आनंद तर अंतःकरणामध्ये एकरूपतेचा आनंद. असा हा आगळा वेगळा परमानंदाचा अनुभव भक्तिभावाच्या द्वैतामुळेच शक्य होतो. गोकुळात राधेच्या संगे अनुभवलेल्या या सर्वश्रेष्ठ आनंदासाठीची कृष्णाची भूक शेवटपर्यंत कायम होती. ही आंतरिक आर्तता हीच त्याची शक्ती व उर्जा होती. या आंतरिक अवस्थेमुळेच कृष्ण सर्वांना जसे प्रेम देऊ शकत असे तसेच सर्वांचे प्रेम घेऊही शकत असे, म्हणूनच तर कृष्णाच्या प्रेमीजनांना कृष्णाची भक्ती करण्याची संधी उपलब्ध झालेली होती. ती संधी कोणी साधली हे निश्चितच पहाण्यासारखे व जाणण्यासारखे आहे.

लक्ष्मी, अशा विशेष व्यक्तींमध्ये अर्थातच कृष्णाची प्रिय पत्नी रुक्मिणी हिचा प्रथम क्रमांक आहे. तिची जीवनकथा मी तुला सांगितलेलीच आहे. स्वतः कृष्णच रुक्मिणीकडे 'आत्मसखी' म्हणून पहात व अनुभवीत होता आणि रुक्मिणीनेही तिच्या कृष्णावरील भक्तीभावामुळे तोच अनुभव घेतला. तसे बघायला गेले तर कृष्णाच्या जीवनातील अनेक बाह्य व्यापामुळे कृष्ण व रुक्मिणी यांचे प्रत्यक्ष सहजीवन कमीच होते. पण रुक्मिणीला मात्र त्याची कमतरता व खंत कधीच जाणवली नाही. तिचे कृष्णाशी असलेले आंतरिक ऐक्य कायम होते. त्याचा आनंद रुक्मिणी नित्य अनुभवीत असे आणि बाह्यांगाने कृष्णाला अपेक्षित असे पूरक जीवन

जगून, रुक्मिणी कृष्णालाही आनंदित करीत असे. अशा तऱ्हेने अंतर्बाह्य कृष्णाशी एकरूप असलेली रुक्मिणी केवळ कृष्णाचीच होती आणि तिचे जीवन फक्त कृष्णासाठीच होते. त्यामुळे कृष्णाने निर्याण अंगिकारल्याची बातमी जेव्हा द्वारकेमध्ये रुक्मिणीपर्यंत येऊन पोहोचली, तेव्हा रुक्मिणीचेही जीवन संपलेच. तिच्या बाह्य जगण्याला काही प्रयोजनच राहिले नव्हते. कृष्णाच्या जीवन यात्रेतील त्याची जोडीदार असलेल्या रुक्मिणीचे जीवनकार्यही कृष्णाच्या जीवनकार्याबरोबरच पूर्ण झाले. कृष्णाचे निर्याण झाल्याचे नुसते शब्दही ज्या क्षणी रुक्मिणीच्या कानावर आले, त्याच क्षणी रुक्मिणीचे प्राणही तिचे शरीर सोडून बाहेर पडले आणि पंचत्वात विलीन झाले. रुक्मिणी मानवी देहाचा त्याग करून पुन्हा मुळच्या दिव्य देहाने आणि लक्ष्मीच्या रूपाने, पुन्हा वैकुंठात परत येऊन या नारायणाच्या सेवेत रूजू झाली. विशेष नवलाईची व आनंदाची गोष्ट म्हणजे, तीच आता माझ्यासमोर बसून कृष्णचरित्राचे श्रवण करीत आहे आणि त्यातील प्रेमरसाचे सेवन करून तृप्तभावाचा आनंद अनुभवीत आहे.”

असे म्हणून नारद अत्यंत मोकळेपणे हसला आणि लक्ष्मीनेही तेवढ्याच मोकळेपणे हसून नारदाला साथ दिली व दादही दिली. परंतु नारदाने त्याचे बोलणे मात्र न थांबवता तसेच पुढे चालू ठेवले.

“लक्ष्मी, कृष्णचरित्रातील सुदामाही त्याच्या आगळ्या वेगळ्या भावाने विशेष लक्षात रहातो. म्हटले तर नात्याने कृष्णाचा गुरूबंधू. परंतु त्याला कृष्णाचे व्यक्तिगत प्रेम मिळाल्यावरती तो कृष्णाच्या प्रेमातच पडला. त्याहीपेक्षा सद्गुरू सांदिपनींनी कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जेव्हा सुदाम्याला सांगितले, तेव्हा तर तो कृष्णाचा भक्तच झाला. त्यानंतर पुन्हा कृष्णाची व्यक्तिगत भेट त्याने द्वारकेत जाऊन घेतली आणि कृष्णाच्या केवळ एक दिवसाच्या सहवासात कृष्णाचे अंतःकरण ओळखले, जाणले व अनुभवले. कृष्णाच्या त्याच अंतःकरणाचा ध्यास स्वतःच्या ठायी ठेवून सुदाम्याने त्याचे पुढील सर्व जीवन आनंदानेच जगले. त्यासाठी त्याच्या जीवनाचा कोणताही तपशील माहिती असण्याची मुळीच आवश्यकता नाही.



लक्ष्मी, अर्जुनाविषयी आपण पुष्कळच व सविस्तर बोललेलो आहोतच. कृष्णावरती प्रेम व श्रद्धा असूनही अर्जुनाच्या मानसिक मर्यादा होत्या आणि त्या त्यालाही माहित होत्या. त्या जेव्हा कृष्णाच्याही लक्षात आल्या तेव्हा मग कृष्णानेही त्याच्याशी बोलणे जास्त वाढवले नाही. पुढे तर अर्जुनाच्या कार्यबाहुल्यामुळे अर्जुनाचे कृष्णाशी व्यक्तिगत भेटणेही कमीच झाले. कृष्णाचे निर्याण झाल्याचे कळल्यावर अर्थातच अर्जुनाला अत्यंत शोक झाला आणि तो त्वरेने प्रभासक्षेत्री धावून गेला. अर्जुनाने जड अंतःकरणाने स्वतः कृष्णाचे व बलरामाचे और्ध्वदैहिक केले आणि यादवांच्या राजस्त्रियांना घेऊन तो हस्तिनापूरला निघाला. वाटेत काही चोर दरोडेखोरांनी अर्जुनावरती हल्ला चढवला. त्यांचा प्रतिकार करीत असताना अचानकपणे अर्जुन त्याची सर्व शस्त्रास्त्र विद्याच विसरला. अर्जुनाचा पाडाव करून त्या दरोडेखोरांनी सर्व राजस्त्रियांना त्यांच्या दागदागिन्यांसह पळवून नेले. कृष्ण देहाने गेला आणि अर्जुनाच्या पराक्रमातील जणू आत्माच निघून गेला. निष्प्रभ झालेला अर्जुन विमनस्क अवस्थेत जेव्हा हस्तिनापूरला परतला, तेव्हा त्याचा जीवन जगण्याचा सर्व उत्साहच निघून गेला होता. अर्जुनाने व्यासांची भेट घेऊन त्यांचे मार्गदर्शन मागितले. व्यासांनी अर्जुनाच्या मानसिक अवस्थेचा व त्याच्या क्षमतेचा पूर्ण विचार केला आणि अर्जुनाला व सर्व पांडवांनाच स्वर्गारोहण करण्याचा सल्ला दिला. व्यासांच्या सांगण्याला अनुसरून सर्व पांडवांनी द्रौपदीसह स्वर्गारोहणाचा मार्ग स्वीकारला.

लक्ष्मी, कृष्णनिर्याणाची बातमी ऐकल्यावरती द्रौपदी मात्र निश्चलच राहिली. अंतःकरणामध्ये नित्य कृष्णमूर्तीचेच ध्यान असलेले द्रौपदीचे जीवन तर सुफलितच झालेले होते. त्यामुळे बाह्यांगाने द्रौपदीला काहीच मिळवायचे नव्हते. तिच्या तर सर्व इच्छांची पूर्ती कृष्णाने केव्हाच केलेली होती. निरिच्छ व पूर्ण तृप्त असलेले द्रौपदीचे मन तिच्या अंतरातील कृष्णमूर्तीच्या ठायीच पूर्णपणे जडलेले होते. त्यामुळे द्रौपदी जेव्हा सर्व पांडवांबरोबर स्वर्गारोहण करू लागली तेव्हा तिची पावले जड पडू लागली. स्वर्गाच्याच काय, मनात कोणत्याही सुखाचे अजिबात आकर्षण न राहिलेल्या द्रौपदीला मग तिचा देहही साथ देईनासा झाला. सर्व पांडवांच्या मागून चालत असताना, कृष्णाठायी पूर्णपणे जडलेला

द्रौपदीचा जीव तिच्या देहाला केव्हा सोडून गेला, हे पांडवांच्याही लक्षात आले नाही आणि पांडवही द्रौपदीकडे मागे वळूनही न पहाताच पुढे तसेच चालत राहिले.

लक्ष्मी, विदुराचाही उल्लेख करणे अटळच आहे. मैत्रेयाने जेव्हा विदुराची भेट घेतली आणि त्याला कृष्णाच्या निर्याणाची बातमी सांगितली, तेव्हा विदुराला तर त्याचा शोक आवरणे अशक्यप्रायच झाले. परंतु जेव्हा मैत्रेयाने विदुराला सांगितले, की कृष्ण अंतसमयी विदुराची आठवण काढीत होता, तेव्हा तर विदुर धाय मोकलून रडू लागला. 'आपल्यासारख्या एका साध्या व क्षुल्लक जीवाला कृष्णाने एवढे महत्त्व द्यावे यात आपला मोठेपणा नाही, तर ती कृष्णाची महानता आहे' हे विदुराने जाणले. कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे मैत्रेयाने विदुराला आत्मज्ञान सांगून बोधीत केले आणि त्याच्या ठायीचे आत्मस्वरूप खुणेने दाखवले. विदुराने मात्र त्याच्या आत्मस्वरूपाठायी कृष्णरूपाचाच निश्चय केला आणि तोच ध्यासही धरला. त्यामुळे विदुर संसाराच्या सर्व बंधनातून तर मनाने मुक्त झालाच, परंतु कृष्णमाहात्म्याच्या जाणीवेने तो कृष्णप्रेमाने युक्त होऊन राहिला आणि कृष्णभक्त म्हणूनच पुढील सर्व जीवन आनंदाने जगला. यथावकाश वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून विदुराने संसाराचा बाह्यांगानेही त्याग केला आणि पुढे देहत्यागानंतर कृष्णध्यासामुळे सहजपणे कृष्णस्वरूपात विलीन झाला.

लक्ष्मी, पण कृष्णचरित्राचा जणू कळसच होऊन राहिलेला उद्धव हा, कृष्णाला अभिप्रेत असलेल्या सगुणप्रेमभक्तीच्या भागवत धर्माचा पाया ठरला असेच म्हणावे लागेल. कृष्णाचे अंतिम दर्शन घेऊन उद्धव जो निघाला, तो इतर कोठेही न जाता थेट बद्रीकाश्रमाला गेला. त्याचे संसाराचे सर्व मोह व आसक्ती कृष्णप्रेमात पूर्णतः बुडून गेली होती. त्यामुळेच त्याच्याकडून संसाराचा त्याग एवढ्या सहजपणे होऊ शकला. अंतःकरणात कृष्णरूप पूर्णपणे भरून घेतल्यावरती उद्धव कृष्णस्वरूपच होऊन राहिला. त्याचे पुढील सर्व जीवन एकीएक कृष्णासाठीच समर्पित भावाने जगले गेले. बद्रीकाश्रमी काही काळ राहून उद्धवाने, कृष्णाने सांगितलेल्या बोधाचे मनन व चिंतन केले आणि नंतर तेथून निघून



कृष्णकार्याची पूर्ती करण्यासाठी उद्धवाने भागवतधर्माचा प्रसार सुरू केला असे म्हणण्यापेक्षा, त्याच्या भक्तिमय जीवनामुळे भागवतधर्माचा प्रसार झाला आणि भागवत धर्माची ध्वजा फडकत राहिली असे म्हणणेच अधिक सयुक्तिक होईल. कृष्णाचे प्रेमस्वरूप अंतःकरणात पूर्णपणे भरून सर्वांगाने वहात राहिल्यामुळे उद्धवाच्या रूपाने ईश्वराचे सगुण प्रेमच साकार होत राहिले आणि ईश्वराच्या सगुण भक्तीचा आनंदच व्यक्त होत राहिला. त्यामुळेच ईश्वराचे सगुण प्रेम सामान्यांच्यापर्यंत पोहोचून, त्यांच्या मनाला त्या प्रेमाचा कमीत कमी स्पर्श तरी होण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध होऊन राहिली. पुढे येणाऱ्या कलियुगासारख्या खडतर काळामध्येही ईश्वरप्राप्तीसाठी असलेला सगुण प्रेमभक्तीचा एकमेव मार्ग प्रगट रहाण्याची अंधुकशी का होईना पण जी काही आशा टिकून राहिली, ती सुद्धा केवळ उद्धवाच्या जीवन कार्यामुळेच, हे मात्र निर्विवाद सत्य आहे."

बोलता बोलता नारद अतिशय भावपूर्ण झाला होता. नारायणाविषयीच्या भक्तिभावाने त्याचे अंतःकरण दाटून आले होते आणि शब्दप्रवाहही बाह्यांगाने थांबला होता. कारण आता शब्दांची आवश्यकताच राहिलेली नव्हती. शब्दातीत भाव पूर्णतः अनुभवरूप होऊन राहिला होता. नारदाची ती स्वानंदात रमलेली देहातीत अवस्था लक्ष्मीने ओळखली. नारद अंतःकरणामध्ये नारायणाशी पूर्णपणे एकरूप झालेला आहे हे लक्ष्मीने जाणले. तिने नेत्र मिटून घेऊन भक्तिभावाने हात जोडले असता तिच्या अंतःचक्षुंसमोर नारायणाचीच मूर्ती आली. हृदयस्थ नारायणाच्या त्या दर्शनाने लक्ष्मीच्या अंतरातील भक्तिभाव दाटून आला. तिचा देह व मन दोन्हीही मोहरून आले आणि नेत्र सजल होऊन बरसू लागले. लक्ष्मीच्या अंतरातील आनंद मावेनासा झाला आणि म्हणून त्या आनंदाला मोकळे करण्यासाठी तिने तिचे नेत्र पुन्हा उघडले. समोर पहाते तो काय, तेथे नारद नव्हताच आणि नारद तेथे येऊन गेल्याचे काही बाह्य चिन्हही दृष्टोत्पत्तीस येत नव्हते. परंतु नारायण मात्र एकटाच त्याच्या शय्येवरती शांतपणे पहुडलेला होता. त्यामुळे खरोखरीच नारद वैकुंठात आला तरी होता की नाही, असा एक विचार क्षणार्धात लक्ष्मीच्या मनात येऊन गेला आणि ती स्वतःशीच मोकळेपणाने हसली. नारायणाच्या मुखावरील प्रसन्न भाव पाहून लक्ष्मीला अतिशय आनंद झाला. अत्यंत

सावकाशीने पावले टाकीत लक्ष्मी नारायणाच्या जवळ येऊन त्याच्या चरणांशी बसली आणि नारायणाचे सुंदर व प्रसन्न मुखकमल न्याहाळीत, नारायणाचे सुकोमल चरण अत्यंत हळुवारपणे चुरू लागली.

**।। हरि ओम् तत् सत् ।।**



# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर . आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य